ड/१४०
३.५१२
१

विद्यार्थ्यांस अत्यंत उपयोगी ग्रंथ.

# चार वीर व मुत्सद्दी.

वा. अ. भिडे.

डेक्कन व्हर्न्यांक्युलर ट्रान्स्लेशन
सोसायटी, पुणें.
लायब्ररी.

पुस्तकाचें नांव चार वीर मुत्सद्दी

नंबर :—

विषय व नंबर } चरीत्र 37

DECCAN VERNACULAR TRANS. SOCIETY + POONA. 1894 +

~~३५११२~~

रा. रा. चिटणीस,
डे० ए० सो० सोसायटी
यांजकडे उत्तेजनार्थ.

३/१४०

कुमठे-डांगोरे, } बाळकृष्ण अनंत भिडे
१५५२९ }

No 13 of 1928129

Recd 19/5/28

३/१४०

# चार वीर व मुत्सद्दी

( क्रॉम्वेल्, शिवाजी, वॉशिंग्टन्, व बोनापार्ट्. )

लेखक-

बाळकृष्ण अनंत भिडे, बी. ए.

प्रकाशक-

केशव भिकाजी ढवळे, गिरगांव-मुंबई.

मे सन १९२८

किंमत एक रुपया.

Printed by B. M. Sidhaye at the Bombay Vaibhav Press, Servants of India Society's Home, Sandhurst Road, Bombay

AND

Published by Keshav Bhikaji Dhavle, Ramchandra Building, Girgaon, Bombay

*All rights reserved by the Publisher.*

# विषयानुक्रम.


| प्रकरण | पृष्ठ. |
|---|---|
| १ विषयप्रवेश. ... ... ... ... | १—४ |
| २ ऑलिव्हर् क्रॉम्वेल. ... ... ... | ६—४८ |
| ३ शिवाजी. ... ... ... ... | ४९—१०६ |
| ४ जॉर्ज् वॉशिंग्टन. ... ... ... | १०७—१७० |
| ५ नेपोलियन् बोनापार्ट ... ... ... | १७१—२१४ |
| ६ चर्चा. ... ... ... ... ... | २१५—२३३ |

# चार वीर व मुत्सद्दी.

## प्रकरण पहिलें.

### विषयप्रवेश.

प्रत्येक लहानमोठ्या राष्ट्राच्या इतिहासांत वेळोवेळीं अलौकिक गुणांनीं प्रसिद्धीस व सत्तेस चढलेल्या पुरुषांचीं नांवें झळकलेलीं दृष्टीस पडतात. हे पुरुष, शौर्य, धैर्य, साहस, उद्यमशीलता, चिकाटी, शहाणपणा, चातुर्य इत्यादि बहुमोल गुणांनीं सामान्य स्थितींतून चढतचढत आपआपल्या राष्ट्रांत अत्यन्त श्रेष्ठ पदवीस पोंचले, इतकेंच नाहीं, तर त्यांच्या अद्भुत चरित्रांनीं व पराक्रमांनीं सर्व जगालाही तोंडांत बोट घालावयास लाविलेलें आहे.

### भल्याबुऱ्याची कसोटी.

परंतु, एवढ्यावरूनच सर्व विभूतींचीं चरित्रें अनुकरणीय किंवा आदरणीय होतात, अशांतला भाग नाहीं. सत्ता किंवा गुण हीं स्वतांच चांगलीं अगर वाईट नसतात, तर त्यांचा उपयोग जसा सद्धेतूनें व सत्कार्याकडे, अगर दुष्ट हेतूनें व दुष्कर्माकडे, केला जातो, त्याप्रमाणें तीं सुष्ट किंवा दुष्ट ठरत असतात. बचनाग नांवाच्या वल्लींत जलाल शक्ति आहे. वैद्यानें रोगाची नीट चिकित्सा करून विचारपूर्वक रोगनिवारणार्थ या वल्लीची योजना केली, तर ती अमृतसिद्धीच्या पंक्तीस

जाऊन बसते. उलट पक्षीं, द्वेषमत्सरानें प्रेरित होऊन एकाद्या दुर्जनानें त्याच वल्लीचा प्रयोग घातक हेतूनें कोणावर केला, तर ती हालाहलाचेंच भावंड होते. वक्तृत्व हा मोठा गुण आहे. याचा उपयोग करून साधुसंतांनीं अनेक तळमळणाऱ्या जीवांना शान्तिलाभाची जोड करून दिली आहे. कित्येक परहितपरायण महाशयांनीं याच गुणाच्या जोरावर राष्ट्राच्या सद्भावना जाग्या करून त्यास सत्कार्याला प्रवृत्त केलें आहे. परंतु, याच वक्तृत्वगुणाच्या सामर्थ्यानें कोणीं साध्यांभोळ्यांस भुलवून तोंडघशीं पाडलें, किंवा उन्मत्त वृत्तींचें प्रोद्दीपन करून अल्पवयी तरुणांस अत्याचारांत गुंतविलें, असेंही आढळतें. पहिल्या प्रकारांत वक्तृत्वगुणाचा सदुपयोग आहे, तर दुसऱ्या प्रकारांत त्याच गुणाचा दुरुपयोग आहे. एवंच कोणतीही वस्तु, शक्ति, किंवा गुण, स्वयमेव वंद्य किंवा निंद्य नसतो, तर ज्या हेतूनें व ज्या कार्याकडे त्यांचा विनियोग करण्यांत येतो, त्या हेतूनें व कार्यानें तीं कल्याणकारक किंवा अनर्थावह होतात, आणि त्याच मानानें त्या गुणादिकांनीं संपन्न असलेले पुरुष जगाला आदरणीय किंवा तिरस्करणीय वाटतात. तानाजी मालुसरे व हरि रामोशी, हे दोघे साहसी शूर वीर होते, आणि दोघांचेही पोवाडे लोक गातात. पण राष्ट्रकार्यासाठीं स्वामिसेवेंत कोंडाणा किल्ल्यावर आपल्या प्राणाची आहुति देणारा साहसी तानाजी राष्ट्रवीर कोठें, आणि केवळ द्रव्यलोभानें व खोट्या स्वार्थानें प्रेरित होऊन घरफोडीच्या धाडी घालण्यांत जीवावर उदार होणारा साहसी हरि रामोशी कोठें! साहसी धाडसाच्या व शौर्याच्या समान धर्मावर या दोघांना एकाच माळेचे मणि समजणें कधींही समंजसपणाचें होणार नाहीं. दोघांचीही चरित्रें

सारखींच आश्चर्यकारक व अलौकिक असतील, पण तीं सारखींच शुद्ध, उदात्त, आदरणीय, व अनुकरणीय आहेत, असें कोणीही सुज्ञ म्हणणार नाहीं.

**दैवी प्रवृत्ति व संपत्ति.**

मनुष्यांची प्रवृत्ति, आणि सामर्थ्य, अधिकार, द्रव्य, बुद्धिमत्ता, इत्यादि संपत्ति, यांचे श्रीमद्भगवद्गीतेंत[1] जे दैव व आसुर असे दोन वर्ग केले आहेत, त्यांचेंही रहस्य हेंच आहे. ज्ञानेश्वर[2] महाराज सांगतात,—

**जयांचिया आस्थेचिया सद्भावा—आंत धर्म करी राणिवा,**
**जयांचें मन ओलावा विवेकासी, ॥**
**जे ज्ञानगंगे नाहाले, पूर्णता जेऊनि धाले,**
**जे शान्तीसी जाले पल्लव नवे, ॥**
**जे परिणामा निघाले कोंभ, जे धैर्य मंडपाचे स्तंभ,**
**जे आनंदसमुद्रीं कुंभ चुबुकळोनि भरले, ॥**
**जयांची भक्तीची येतुली प्राप्ति, जे कैवल्यातें परतें सर म्हणती,**
**जयांचिये लीलेमाजीं नीति जियाली दिसे, ॥**

असे जे आपल्या गुणसंपत्तीचा सदुपयोग करतात, तेच दैवी प्रवृत्तीचे खरे महात्मे होत.

**आसुरी प्रवृत्ति व संपत्ति.**

आसुरी प्रवृत्तीचे पुरुषही गुणसंपन्न असतातच, परंतु ते आपल्या आसुरी प्रवृत्तीनें त्या गुणसंपत्तीलाही आसुरी बनवितात, आणि जगाच्या सुखशान्तींत माती कालविण्याचें घोर कर्म आचरतात. ज्ञानेश्वर[3] महाराज वर्णन करतात,—

१ अध्याय ९ व १६. २ ज्ञानेश्वरी अध्याय ९. ३ ज्ञानेश्वरी अध्याय १६.

जैसें चरणें शेळियेचें, का धांवणें वारियाचें,
जाळणें अग्नीचें भलतेंउतें. ॥
तैसें पुढांसूनि स्वैर, आचरती ते गा आसुर,
सत्येंसीं कीर वैर सदांचि तयां. ॥
जरी नांगिवा आपुलिया, विंचू करी गुदगुलिया,
तरी साचा बोलिया बोलती ते. ॥
जैं आटावे होती जळचर, तैं डोहीं मिळती ढीवर,
का पडावें होय शरीर, तैं रोगां उदय. ॥
उदैजणें केतूचें जैसें, विश्वा अनिष्टोद्देशें,
जन्मती ते तैसे लोकां आटूं. ॥
विरूढलिया अशुभ, फुटती तैं ते कोंभ,
पापाचे कीर्तिस्तंभ चालते ते. ॥
आणि मागांपुढां जाळणें, वांचूनि आगी कांहीं नेणे,
तैसें विरुद्धचि एक करणें भलतेयां. ॥
मातलिया कुंजरा, आगळी जाली मदिरा,
तैसा मदाचा ताठा नवजरा चढता आंगीं. ॥
आणि आग्रहा तोचि ठावो, वरी मौढ्याऐसा सावावो,
मग काय वानूं निर्वाहो निश्चयाचा ? ॥
जिहीं परोपताप घडे, परावा जीवू रगडे,
तिहीं कर्मीं होऊनि गाढे जन्मवृत्ति. ॥
मग आपुलें केलें फोकारिती, आणि जगातें धिक्कारिती,
दाही दिशीं पसरिती स्पृहाजाळ. ॥

एकंदरींत निरनिराळ्या राष्ट्रांच्या इतिहासांत ज्या कर्तबगार व सामर्थ्यवान् व्यक्तींचीं नांवें ठळकपणें चमकतात, त्यांच्या चरित्राच्या

भलेबुरेपणाची वास्तविक कसोटी त्यांचे हेतु व ध्येय हीच होय. केवळ त्यांच्या पराक्रमानें, अजब धोरणानें, किंवा यशःसिद्धीनें, दिपून जाऊन, त्यांच्या मोठेपणाचा सरसहा गाजावाजा व पुकारा करीत राहणें, हें सर्वस्वीं योग्य आहे, असें ठरणें अशक्य आहे.

## प्रबंधाचा आराखडा.

प्रस्तुतच्या चरित्रपर व चर्चात्मक प्रबंधांत ऑलिव्हर क्रॉम्वेल्, शिवाजी राजे, जॉर्जवाशिंग्टन्, व नेपोलिअन् बोनापार्ट्, या चार इतिहासप्रसिद्ध वीरमुत्सद्यांचा समावेश करण्यांत आला आहे. या चार वीर मुत्सद्यांचीं नांवें अनुक्रमें इंग्लंड्, महाराष्ट्र, अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें, व फ्रान्स्, या चार राष्ट्रांच्या इतिहासांत अजरामर झालेलीं आहेत. यांतील पहिले दोन पुरुषसिंह इ. स. १७ व्या शतकांत उदयास आले, व दुसरे दोन १८ व्या शतकांत अवतरले. हे सर्वच धैर्य, साहस, शौर्य, धोरण, निश्चय, उद्योगशीलता, इत्यादि गुणांनीं मंडित होते, आणि या गुणांच्या जोरावर प्रतिकूल परिस्थितीशीं टक्कर देतदेत व हातीं येणाऱ्या प्रत्येक प्रकारच्या साधनांचा कुशलपणानें उपयोग करीत करीत, सामान्य स्थितींतून मार्ग काढीतकाढीत ते आपापल्या राष्ट्रांत उच्चतम पदाला, अधिपतीच्या पदवीला, चढले. परंतु त्यांचीं चरित्रें त्यांच्या प्रवृत्तिभेदानें व हेतुभेदानें निरनिराळ्या रंगांनीं रंगलेलीं आहेत.

पुढील चार प्रकरणांत या चार वीर मुत्सद्यांचीं त्रोटक चरित्रें देऊन, अखेरच्या प्रकरणांत त्यांच्या चरित्राला वर उल्लेखलेली कसोटी लावून त्यांची तुलनात्मक चर्चा करण्याचें योजिलें आहे.

# प्रकरण दुसरें.

## ऑलिव्हर् क्रॉम्वेल्.

### जन्म व कुलवृत्तान्त.

ऑलिव्हर् क्रॉम्वेल्चा जन्म इंग्लंडांत हंटिंग्डन् गांवीं इ. स. १५९९ सालीं झाला. याचें घराणें बऱ्याच नांवलौकिकाचें व सुखवस्तु होतें, व त्याच्या मूळ खुटाला सरदारकीचाही मान लाभला होता. ऑलिव्हर्च्या पूर्वींच्या चारपांच पिढ्यांतील पुरुष मोठे रुबाबदार, राजनिष्ठ, प्रतिष्ठित, व सार्वजनिक कामगिरींत पुढाकार घेणारे, म्हणून आपल्या परगण्यांत मान्यतेस चढले होते.

### वडील.

इंग्लंडमध्यें कोणत्याही घराण्याचे परंपरागत मानमरातब व जमीन-जुमला यांचा वारसा ज्येष्ठ मुलाकडेच वारशीनें जातो, आणि ऑलि-व्हरचा बाप रॉबर्ट् क्रॉम्वेल् हा ज्येष्ठ पुत्र नसल्यामुळें त्याची स्थिति सामान्य प्रतीचीच होती. हंटिंग्डन् शहरीं व त्याच्या आसपासच्या गांवांत थोडीशी स्थावर मिळकत त्याच्या वांट्यास आली होती, आणि तिची वहिवाट करून व स्वतः जमिनी कसून, तो आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चांगल्या प्रकारें चालवीत असे. आपल्या निर्वाहाच्या साधनांत भर घालण्याकरितां तो कांहीं काळपर्यंत दारू गाळण्याचाही व्यवसाय करीत असे, असाही क्वचित् ध्वनि कानीं येतो. तें कसेंही असलें, तरी ऑलिव्हर्चें बाळपण ददातींत गेलें नाहीं, हें खास.

## मातुःश्री.

ऑलिव्हर्‌ची आई एलिजाबेथ् ही स्टुअर्ड् घराण्यांतील होती. ती आपल्या नवऱ्याच्या मागें सुमारें सदतीस वर्षें हयात होती आणि तिच्या भोंवतीं दहा मुलांचा परिवार होता. परंतु मुलें कर्तीसवर्तीं होतपर्यन्त तिनें आपल्या प्रपंचाचा गाडा सुरळीत रीतीनें चालविला. ती साध्या सरळ वर्तनाची होती, पण तिचा स्वभाव मोठा निग्रही असून, ती फार कर्तबगारीची हुशार बायको होती. आपल्या कामसू-पणानें, टापटिपीनें, व काटकसरीनें, तिनें संसार चांगला आटोपून आपल्या लेंकरांस कोणतीही ददात भासूं दिली नाहीं. तिचें वर्तनही अगदीं चोख असे. या गुणांमुळें या बाईला आपल्या सासरमाहेरच्या गोतावळ्यांत व शेजाऱ्यांपाजाऱ्यांत सर्वजण फार मान देत असत. तिची धर्ममतें प्यूरिटन् पंथाचीं होतीं, म्हणजे क्रिस्ती धर्माचें शुद्ध स्वरूप बायबलमध्येंच आहे, आणि धर्माच्या बाबतींत बायबलचा आधार व जीजस् क्राइस्टची मध्यस्थी, हीं दोन सर्वस्वीं पुरेशीं आहेत आणि या दोहोंशिवाय इतर कोणा धर्माध्यक्षाची, उपाध्यायाची, धर्माधिकाऱ्याची, अगर उपदेशकाची, जरूरी नाहीं, अशी तिची श्रद्धा होती. एलिजाबेथ् व ऑलिव्हर् या मायलेंकांत जिव्हाळ्याचें रहस्य होतें आणि तें एलिजाबेथ्‌चा काळ होईपर्यन्त अखंड टिकलें. तिच्या दहा अपत्यांपैकीं ऑलिव्हर् हा पांचवें अपत्य व एकुलता एक मुलगा होता. ती अखेरपर्यन्त शक्य तोंवर त्याच्याजवळच राहात असे. तिनें त्याला सद्वर्तन, निश्चय, उद्योग, व प्यूरिटन् पंथाचीं धर्ममतें, यांचें बाळकडूच पाजलें होतें, आणि या गोष्टींचा ठसा ऑलिव्हर्‌च्या चरित्रावर सर्वत्र उमटलेला स्पष्ट दिसून येतो. ऑलिव्हर्‌ही आपल्या आईला

अत्यंत मान देत असे, आणि जरी तो पुढें परम वैभवाला व पदवीला चढला, तरी तो तिच्या प्रेमाचा, उपदेशाचा, व आशीर्वादाचा, निरन्तर भुकेलेला असे.

### शिक्षण.

ऑलिव्हर क्रॉम्वेल्चें प्राथमिक शिक्षण हंटिंग्डन् येथील शाळेंत झालें, आणि नंतर तो पुढील शिक्षणाकरितां केंब्रिज् येथील एका वरिष्ठ विद्यालयांत प्रविष्ट झाला. परंतु विद्यापीठाची कोणतीही पदवी न मिळवितांच त्याच्या शिक्षणाचा ग्रंथ वयाच्या अठराव्या वर्षींच आटपला. कारण, त्याचे वडील त्या वर्षीं म्हणजे इ. स. १६१७ सालीं वारले, आणि ऑलिव्हर विद्यालयाला रामराम ठोकून घरसंसार पाहण्याकरितां घरींच येऊन राहिला, आणि असें करणें त्याला एका दृष्टीनें अवश्यही होतें, कां कीं तो आपल्या बापाचा एकुलता एकच मुलगा होता, आणि सर्व स्थावर मिळकत आतां वारसदारीनें त्याच्या गळ्यांत पडल्यामुळें तिची नीट व्यवस्था लावल्यावांचून त्याला गत्यन्तर नव्हतें.

ऑलिव्हर्चें एकंदर शिक्षण तरी किती झालें होतें, हें नीटसें समजत नाहीं. तरी पण लॅटिन भाषा, गणित, व इतिहास, या विषयांत त्याची बरीच गति झाली होती, व ते विषय त्याला महत्वाचे वाटत, असें मानण्यास बरीच जागा आहे. पुढें प्रौढपणीं जेव्हां त्याच्या मुलाच्या शिक्षणाविषयीं प्रश्न निघाला त्यावेळीं त्यानें एक दोन पत्रांत असा स्पष्ट अभिप्राय व्यक्त केला आहे, कीं, आपल्या मुलानें इतिहास, भूगोल, व गणित, या विषयांचा अभ्यास केलाच पाहिजे, कारण सरकारदरबारच्या कामांत या विषयांचें ज्ञान अगदीं अवश्य लागतें.

## धर्ममतें.

पण ऑलिव्हर्च्या शिक्षणाच्या व्याप्तीचा प्रश्न जरी संशयित म्हणून सोडला, तरी एका बाबतींत मात्र त्यास मिळालेल्या शिक्षणाचा त्याच्यावर खोल संस्कार झाला. ही बाब म्हणजे धर्ममताची. हंटिंग्डन् येथील त्याचे गुरुजी डॉ. टी. बर्ड् हे पक्के प्यूरिटन् होते; आणि त्यांची ऑलिव्हर्वर चांगलीच छाप बसली होती, आणि त्या दोघांचा घरोब्याचा परिचय ऑलिव्हर्च्या प्रौढ वयापर्यन्त टिकला. केम्ब्रिज् येथील ज्या वरिष्ठ विद्यालयांत क्राम्वेल् कांहीं वर्षे होता, तें विद्यालयही प्यूरिटन् पंथाचा बालेकिल्ला म्हणून प्रसिद्ध होतें. एवंच प्यूरिटन् आईची घरची शिकवणूक, डॉ॰ बर्ड् सारख्या गुरुजींचा परिचय, आणि वर उल्लेखिलेल्या विद्यालयांतील कांहीं वर्षांचा रहिवास, या त्रिपुटीनें कॉम्वेल्चीं धर्ममतें सर्वस्वीं प्यूरिटन् बनून अगदीं वज्रलेप झालीं. ईश्वरावर अढळ निष्ठा, बायबलविषयीं प्रामाण्यबुद्धि, धर्माध्यक्षांबद्दल तिट्कारा, शुद्ध वर्तन, छानछोकीचा त्याग, ईश्वरी साक्षात्काराबद्दल श्रद्धा, आणि आपल्या भावनेनुसार निश्चित केलेलें कर्तव्य करीत असतां होतील ते कष्ट सोसण्याची व अवश्य तो कठोरपणा दाखविण्याची सिद्धता, इत्यादि या पंथांचीं जीं मुख्य लक्षणें, तीं सर्व क्राम्वेल्च्या पुढील चरित्रांत ठळकपणें दृष्टोत्पत्तीस येतात.

## विवाह.

इ. स. १६२० सालीं म्हणजे वयाच्या एकविसाव्या वर्षीं ऑलिव्हर्चा एलिजाबेथ् बुर्श्यर्शीं विवाह झाला. ही बाई ऑलिव्हर्पेक्षां एक वर्षानें मोठी होती; शिवाय, ती ऑलिव्हर् इतकी कडक प्यूरिटन् मताची नव्हती, किंवा ऑलिव्हर्च्या आईइतका तिच्या अंगीं निग्रह

व धमकही नव्हती. तरी पण ती ढबदार, शान्त, प्रेमळ, व शहाणी होती. ऑलिव्हर्‌च्या बदलणाऱ्या परिस्थितींत तिनें घरसंसाराचा आटोप फार चांगल्या रीतीनें केला, व कधींही कांहीं उणें पडूं दिलें नाहीं कीं हंसें करून घेतलें नाहीं. ऑलिव्हर्‌चें तिच्यावर अत्यन्त निर्मल प्रेम होतें व तें अस्खलितपणें टिकलें. यामुळें या दम्पतीचा प्रपंच मोठा सुखाचा व समाधानाचा झाला. पुढें लढायांच्या धामधुमींत प्रत्यक्ष समरागणांवर झटापटी चालत असतांही ऑलिव्हर् आपल्या पत्नीस पत्रें लिहिण्यास विसरत नसे. यांतील कांहीं पत्रें उपलब्ध आहेत, आणि त्यांवरून ऑलिव्हर्‌च्या अन्तःकरणांत आपल्या पत्नीविषयीं किती प्रेम व आदर होता, हें स्पष्ट दिसून येतें.

### घरसंसार.

विवाहित झाल्यावरही ऑलिव्हर् पत्नीसह आपल्या आईच्या घरीं सर्व कुटुंबामध्यें हंटिंग्डन् येथें राहूं लागला. तो आपल्या बापाप्रमाणेंच आपल्या स्थावर मिळकतीची व्यवस्था पाही व कांहीं जमीन घरींच करी. इ. स. १६२८ सालीं म्हणजे वयाच्या एकोणतिसाव्या वर्षीं तो हंटिंग्डन् परगण्यातर्फे पार्लिमेंट्‌मध्यें ( राष्ट्रसभेंत ) सभासद म्हणून निवडला गेला, परंतु एकच वर्ष सभासदपणा भोगून, तो पुन्हां जों गृहप्रपंचाकडे वळला, तो इ. स. १६४० पर्यन्त, म्हणजे राजा व पार्लिमेंट् यांच्यामध्यें खडाजंगी सुरू होईपर्यन्त, त्याचें नांव सार्वजनिक कार्यांत कोठेंही आढळांत येत नाहीं. म्हणजे ऑलिव्हर् आपल्या वयाच्या एकेचाळिसाव्या वर्षापर्यन्त राजकारणांत प्रत्यक्ष पडला नाहीं, असें सिद्ध होतें.

### स्वभाव चित्र.

या मध्यन्तरींच्या काळांतील त्याच्या चरित्रक्रमाचे जे दाखले उप

लब्ध आहेत, त्यांवरून असें दिसतें, कीं, तो अगदीं कट्टा प्यूरिटन् बनला. कौटुंबिक प्रेम तर त्याच्या ठायीं ओतप्रोत होतें, परंतु कोणाचेंही दुःख व आपत्ति पाहून त्याचा जीव तिळतीळ तुटे. लोकांना मतस्वातंत्र्य आणि धर्मस्वातंत्र्य पूर्णपणें असावें, त्यांच्यावर राजाचें किंवा दुसऱ्या कोणाचेंही या बाबतींत नियंत्रण नसावें, असें त्याच्या मनानें घेतलें. त्याची राहणी साधी, कष्टाळू, व निर्मळ असे. दंभ, ढोंग, डामडौल, व दिमाख, यांचा त्याला अत्यन्त किळस वाटे. ईश्वर दयाळू आहे आणि बायबल्मध्यें सर्व नैतिक व धार्मिक ज्ञान सांठविलेलें आहे अशी त्याची पूर्ण श्रद्धा होती. ईश्वरी साक्षात्कार आपल्याला होतो, अशीही त्याची भावना होत चालली होती, आणि असा संचार झाला म्हणजे त्याला जें आपलें कर्तव्यअसें वाटे, तो ईश्वरी निरोपच आहे, आणि कोणत्याही गोष्टीकडे लक्ष्य न देतां, व दुःख आणि कष्ट यांनीं बुजून न जातां, तें कर्तव्य पार पाडण्यास आपण जीवेंभावें झटलेंच पाहिजे, असा त्याच्या अन्तरंगाचा निश्चय झाला होता. बाय्बल्चें पारायण निरन्तर चालू असल्यामुळें त्याच्या भाषणांत, इतर प्यूरिटन लोकांप्रमाणें, बाय्बल् मधील वचनें सडकून येत, म्हणून त्याचीं भाषणें पुष्कळ वेळां एकाद्या धर्मोपदेशकाच्या व्याख्यानांप्रमाणें कानाला लागतात. परंतु या सर्व गोष्टींत ऑलिव्हर्च्या अंगीं दांभिकपणाचा लवलेशही नसे. पण, जसा आपल्याकडे भोंदू साधुसन्तांचा वारंवार सुळसुळाट झाल्यामुळें सुक्याबरोबर ओलेंही जळून जात असे, त्याचप्रमाणें कित्येक लोक प्यूरिटन् पंथांचें बाहेरील सोंग बेमालूम आणून भोळ्याभाबड्यांना मोहून फशीं पाडीत व आपली तुंबडी भरीत; अर्थात् अशा दांभिकांची उघडीकही वारंवार होत असे. या-

मुळेंच प्यूरिटन् लोकांविषयीं जसे तत्कालीन लोकांचे आदरपूर्ण लेख आढळतात, त्याचप्रमाणें त्यांच्याविषयीं अत्यन्त तिरस्कारानें लिहिलेले लेखही मुबलक सांपडतात.

### हंटिंग्डन् परगणा.

हंटिंग्डन् परगणा व शहर इंग्लंडच्या पूर्व विभागांत आहेत. इंग्लंडचा हा पूर्वभाग फार सुपीक आहे, व येथील बहुतेक लोक ऑलिव्हर्च्या वेळीं प्यूरिटन् पंथाचे असून फार उद्योगी व मेहनती असत. येथील जमीनदार चांगले सधन असून, त्यांचा सार्वजनिक कार्यांत बराच वचक बसत चालला होता. ऑलिव्हर् क्रॉम्वेल् अशाच वजनदार जमीनदारांमध्यें हळूहळू मोडूं लागला. त्याचे बरेचसे नातेवाईक, स्नेही, व परिचित, याच वर्गांतील असल्यामुळें त्यांची चांगलीच जूट जमली होती, आणि लवकरच इंग्लंडच्या या पूर्व भागांतील एकजुटीनें इंग्लंडच्या इतिहासांत विलक्षण क्रान्ति घडवून आणिली.

### इंग्लंडच्या धार्मिक क्रान्तीचा इतिहास.

क्रॉम्वेल्चें पुढील चरित्र निवेदन करण्यापूर्वीं इंग्लंडची धार्मिक व राजकीय स्थिति यावेळीं कशी होती याचा थोडक्यांत आढावा काढणें अवश्य आहे.

पुरातन कालापासून धर्माच्या बाबतींत युरोपांतील क्रिस्ती राष्ट्रांमध्यें सर्व सूत्रें रोमच्या पोप महाराजांच्या हातीं असत, आणि हे पोप आपल्या जगद्गुरुत्वाचा प्रयोग वारंवार राजकीय उलाढाल्या घडविण्यांतही करीत असत. धर्माविषयीं सामान्य जनता अगदीं जखडल्यासारखी झाली होती, व मानसिक अंधत्व पत्करून त्यांना पोप व त्याचे हस्तक यांच्या आज्ञेनुसार निमूटपणें वागावें लागत

असे. पण सोळाव्या शतकाच्या आरंभीं हें पारडें उलटून धर्मक्रान्तीचा वणवा सुरू झाला. पोप व त्याचे हस्तक हे मुद्दाम लोकांना अज्ञान स्थितींत ठेऊन त्यांना धर्मप्रकाशाचें दर्शन होऊं देत नाहीं, ते भाबड्या जनतेच्या देवभोळेपणाचा उपयोग पैसे उकळण्याच्या कामीं करतात, स्वर्गलाभासंबंधें भलभलत्या कल्पना पसरवून भाविकांना आप-मतलबानें आपल्या नादीं लावतात, आणि धर्माच्या नांवावर पुष्कळ वेळां जुलूम जबरदस्ती करून आपल्या ऐहिक वासना तृप्त करून घेतात, असें उघडउघड प्रतिपादून, प्रथमतः जर्मनींत पोपाधिष्ठित म्हणजे रोमन कॅथोलिक पंथाविरुद्ध मार्टिन् लूथर्नें बंड उभारलें. त्या वेळीं इंग्लंडांत आठवा हेन्री हा राजा होता. तो प्रथमतः पोपचा चाहता होता. परंतु कांहीं एका गोष्टींत त्याची पोपशीं तेढ आली, व त्यानें पोपची इंग्लंडांतील सत्ता एकदम उधळून टाकून, तो आपण स्वतःच राष्ट्रीय धर्मसंस्थेचा सर्वाधिकारी झाला. कॅथोलिक् पंथाचा निषेध करून अस्तित्वांत आलेल्या या सुधारक पंथास प्रॉटेस्टंट् पंथ असें नांव आहे. परंतु युरोपांतील इतर राष्ट्रांतील प्रॉटेस्टंट् संस्थेहून इंग्लंडांतील राष्ट्रीय धर्मसंस्थेमध्यें कांहीं निराळींच लक्षणें आढळतात. या संस्थेला इंग्लिश् किंवा अँग्लिकन् चर्च् हें नांव आहे. याची प्राणप्रतिष्ठा आठव्या हेन्रीचा मुलगा साहवा एड्वर्ड् याच्या कारकीर्दींत झाली, पण त्याची पूर्ण जडणघडण ऐलिजाबेथ् राणीच्या अमलांत म्हणजे सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धांत रचली गेली. इंग्लिश् चर्च्चे सर्वाध्यक्षत्व राज्यकर्त्याकडे असतें. राजा ही व्यक्ति बिशप वगैरे धर्माधिकारी नेमून धार्मिक बाबतींत लोकांस नियंत्रण लाविते. लोकांनीं प्रार्थनेकरितां धर्म-मंदिरांत आलें पाहिजे व त्यांनीं प्रार्थना व धर्मविधि ठराविक पद्धती-

नेच केले पाहिजेत, अशीही सक्ति लोकांवर असे. परंतु जुन्या सत्तेला धुडकावून जनतेमध्यें स्वतंत्रतेचें वारें खेळूं लागलें, म्हणजे जुन्याच्या ठिकाणीं येऊं पाहणाऱ्या नव्या एकतन्त्रीसत्तेलाही जनतेला आपली अंकित करून ठेवणें जड जातें, आणि बहुशः तें साधतही नाहीं. असाच प्रकार या प्रकरणीं घडला. पोपच्या सत्तेप्रमाणें राजाच्याही सत्तेचा गंध धार्मिक बाबतींत नसावा, असें म्हणणारा एक मोठा पक्ष निर्माण झाला, व या पक्षांत अनेक पंथ व उपपंथही उत्पन्न झाले. यांतील एक महत्वाचा पंथ म्हणजे प्रेस्‌बिटेरिअन्. या पंथाचा सिद्धान्त असा होता, कीं, धर्माधिकारी व त्यांचीं मंडळें यांनींच धार्मिक प्रश्न सोडवावे, त्यांत राजसत्तेची लुडबुड नको. हा पक्ष स्कॉट्‌लंड्‌मध्यें बहुतेक सर्वत्रच पसरला होता, आणि इंग्लंडांत विशेषतः पूर्व व दक्षिण भागांत याची छाप चांगलीच बसली होती. प्यूरिटन् पंथ याच कोटींतला, पण विशेष जहाल होता. त्या पंथाच्या लक्षणांचा उल्लेख मागें एकदोन ठिकाणीं आलाच आहे.

### क्रॉम्‌वेल्‌च्या वेळची परिस्थिति.

एलिज़ाबेथ् राणी इ. स. १६०३ मध्यें वारली, आणि तिच्या बरोबरच ट्यूडर् घराणें अन्तर्धान पावलें, आणि इंग्लंड्‌च्या राजलक्ष्मीनें, दूरची वारसदारी लक्ष्यांत घेऊन, स्कॉट्‌लंड्‌चा राजा सहावा जेम्स् याला माळ घातली ! अशा रीतीनें स्कॉटलंड् व इग्लंड् हे देश एक छत्राखालीं आले. जेम्स् स्टुअर्ट् हा मोठ्या इतमामानें स्कॉट्‌लंड्‌मधून येऊन लंडन्‌मध्यें पहिला जेम्स् नांवानें इग्लंड्‌च्या तक्तावर बसला.

### पहिला जेम्स.

हा राजा मोठा महत्वाकांक्षी, पण मनानें कमकुवत व डळमळीत

होता. त्यानें ॲंग्लिकन् चर्च् लोकांवर जबरदस्तीनें लादण्याचें सुरू केलें, कारण या चर्च्मध्यें सर्व सत्ता राजाच्या मुठींत असते. राजा हा ईश्वरांश आहे व कोणत्याही मानवी नियमाचें किंवा तत्वाचें बंधन त्यास असूं शकत नाहीं, असें त्यानें पुकारलें. पार्लिमेंट्ला न विचारतां राजाला वाटेल तो कर बसवितां येतो व त्याचें फरमान म्हणजे अढळ कायदाच समजण्यांत यावें, असेंही तो प्रतिपादूं लागला. राजा आज्ञा करील ती न्यायाधीशांनींही शिरसा वंद्य मानली पाहिजे, असें त्यानें ठरविलें. कॅथोलिक् व प्यूरिटन् लोकांचा छळ करण्यासही त्यानें आरंभ केला. अर्थात्, अशा अस्मानीसुलतानीनें त्याचा पार्लिमेन्ट्बरोबर खटका उडावा, हें अपरिहार्य झालें. आपल्या कारकीर्दीच्या आरंभीं त्यानें एकदोन पार्लिमेंट् सभा बोलावल्या, परंतु राष्ट्रसभेशीं खडाजंगी करावी लागते आणि लाभतर कांहींच होत नाहीं, हें पाहून त्यानें सन १६१४ ते १६२१ पर्यन्त राष्ट्रसभा न बोलावतांच आपल्या राजवल्लभांच्या सल्लचानें राजशकट बेगुमानपणें चालविला. परंतु जेव्हां तिजोरीचें अगदींच दिवाळें उडालें, तेव्हां त्यानें इ. स. १६२१ मध्यें एक राष्ट्रसभा बोलावली या पार्लिमेन्ट्नें राजवल्लभांवर आणि लांचखाऊ अधिकाऱ्यांवर तोहमत आणण्यास सुरवात केली, आणि गैरव्यवस्था मोडेपर्यंत राजाला तिर्कीही देण्याचें नाकारलें. राजानेंही रागातमानें पार्लिमेंट् उधळून टाकली. जेम्स् राजा इ. स. १६२९ त वारला, आणि त्याचा मुलगा पहिला चार्लस् हा सिंहासनारूढ झाला. यानेंही सर्व बाबतींत आपल्या बापाचेंच व्रत अधिक निश्चयानें चालविलें.

### राजा चार्लस् व पार्लिमेंट् यांचा लढा.

चार्लस् हा फार कोत्या बुद्धीचा होता, पण हेकेखोरपणा

जसा काय त्याच्या सठीला पूजला होता. शिवाय, ताठा आणि घमेंडखोरपणा या गुणांचें त्याच्यावर साम्राज्यच होतें. तशांत, फ्रान्स्‌ची राजपुत्री व त्याची राणी हेन्रिएटा मराया, व्हिलिअरस् ऊर्फ ड्यूक् ऑव् बकिंग्‌हॅम्, वेंट्वर्थ् ऊर्फ अर्ल् ऑव् स्टॅफर्ड्, अधि-बिशप् लॉड्, यांसारखे जहाल, अविचारी, सल्लागार त्यास मिळत चालले; त्यामुळें, मदान्ध हत्तीला यथेच्छ मदिरापान घडलें असतां त्याच्या स्वैरपणाला जशी सीमा उरत नाहीं, तशी गति चार्लस् राजाची झाली.

त्यानें बोलाविलेल्या पहिल्या व दुसऱ्या राष्ट्रसभानीं ( १६२६ ) स्पष्ट सांगितलें, कीं, "राजाचे सल्लागार व मंत्री हे लोकमताला जबाबदार असले पाहिजेत, म्हणजे लोकमताचा पाठिंबा असल्याशिवाय त्यांना मंत्रिपदावर राहतांच येऊं नये, ही शर्त कबूल असेल, तरच आम्ही राज्ययंत्र चालवण्यास लागणारा पैसा मंजूर करूं." दुसऱ्या सभेनें तर बदसल्लागार बकिंग्‌हॅम् याच्यावर आरोप ठेऊन चौकशीसही सुरवात केली. पण चार्लस् राजानें चार महिन्यांच्या आंतच मोठ्या तावातावानें ही सभा उधळून टाकली.

यानंतर बकिंग्‌हॅम्‌च्या सहाय्यानें दोन वर्षेंपर्यंत राज्यकारभाराचा गाडा कसाबसा मोठ्या ओढगस्त स्थितींत चार्लस्‌नें राष्ट्रसभा न बोलावतां चालविला. पण अखेर जेव्हां पैशाच्या बाबतींत अगदींच खंकपणा आला, तेव्हां त्यानें नाइलाजानें तिसऱ्यांदा राष्ट्रसभा (१६२८) बोलाविली.

याच सभेंत क्राम्वेल् हंटिंग्डन् तर्फे प्रतिनिधि म्हणून पहिल्याप्रथमच प्रविष्ट झाला. परंतु त्यानें कोणत्याही कामांत विशेष पुढाकार घेतलेला आढळत नाहीं. या सभेचें पुढारीपण इलिअट्, पिंप्, वेन्ट्वर्थ्, कोक्, हॅम्प्डन्, वगैरे इसमांकडे होतें, आणि यांनीं ताबडतोब आपला मोर्चा

धर्म, न्यायखातें, बेबंदशाही, व व्यापारी धोरण, यांकडे वळवून त्यांत सुधारणा घडवून आणण्याकरितां पोटमंडळें नेमलीं. लवकरच वेन्ट्वर्थ् हा या साहसाच्या कामगिरींत कचरूं लागला, आणि त्यानें माघार घेतली, व कांहीं दिवसांनन्तर तर तो प्रत्यक्ष राजपक्षाला जाऊन मिळाला, आणि अखेर सरदारकी पटकावून राजाचा एक जहाल सल्लागार बनला. परंतु असे एकदोन अपवाद वगळले असतां, बाकीची सर्व राष्ट्रसभेंतील पुढारी मंडळी पक्की निग्रही होती, आणि राजा व प्रजा यांच्यामधील हा लढा तडीला लागेपर्यन्त त्यांनीं आपला निश्चय तिळमात्रही ढळूं दिला नाहीं.

या सन १६२८ सालच्या राष्ट्रसभेनें प्रजेच्या हक्कांचा व मागण्यांचा एक अर्जदस्त तयार करून मंजूर केला व राजाच्या संमतीकरितां त्याच्याकडे पाठविला. चार्लस्नें बरेचसे आढेवेढे घेऊन त्याच्यावर एकदाची कशीबशी सही केली. या अर्जदस्तांत पार्लिमेंट्च्या अनुमतीशिवाय राजानें कोणताही कर बसवूं नये, कोणालाही चौकशीशिवाय तुरुंगांत डांबूं नये, आणि खासगी घरवाल्यावर लष्करी शिपायांना राहण्यास जागा देण्याची व पोसण्याची जबरदस्ती करूं नये, या मुख्य मागण्या होत्या. यानन्तर पार्लिमेंटांतील पुढाऱ्यांनीं लोकांना धर्मस्वातंत्र्य पूर्णपणें मिळवून देण्याचा घाट घातला. हें पाहतांच चार्लस्च्या तळपायाची आग ताळूस गेली, व त्यानें पार्लिमेंट् एकदम बरखास्त केलें.

### चार्लस्ची सुलतानशाही.

यानंतर अकरा वर्षेपर्यन्त पार्लिमेंट् मुळींच न बोलावतां चार्लस्नें अगदीं स्वैरपणें राज्य केलें. धर्माध्यक्ष लॉड् आणि वेंटवर्थ् ( म्हणजे

स्ट्रॅफर्ड् ), हे त्याचे प्रमुख सल्लागार झाले. धार्मिक व राजकीय गुन्ह्यांचा इनसाफ करण्याकरितां नवीन नवीन न्यायसभा स्थापन करून, लोकांना छळण्याचें काम मोठ्या जारीनें सुरू झालें. दंड, नजराणा, देणगी, भेट, कर्ज, इत्यादि अनेक निमित्तांनीं लोकांचें द्रव्यशोषण करण्याचा सपाटा मांडण्यांत आला. कदाचित् लोक वैतागून बंडावा करतील, म्हणून त्यांस दहशत बसविण्याकरितां वेंट्वर्थ्च्या सल्यानें राजानें भाडोत्री खडें सैन्य राखण्याचा उपक्रम केला. लोकांवर जे नानाप्रकारचे कर बेजबाबदार रीतीनें लादण्यांत आले, त्यांपैकींच 'शिप्मनि' या नांवाचा एक आरमारी कर होता. हा बेकायदा कर न देण्याचा सत्याग्रह हॅम्प्डन् यानें केला व त्यामुळें त्याला बंदिवास भोगावा लागला. क्रॉम्वेल्नेंही हा कर भरण्याचें नाकारलें, परंतु त्याच्यावर खटला भरण्यांत आलेला आढळत नाहीं. असो.

### क्रॉम्वेल्चा प्रपंच.

हा अकरा वर्षांचा बेबंदशाहीचा काळ क्रॉम्वेल्नें आपल्या शेतीभातीच्या व्यवसायांत घालविला. सन १६३० सालीं हंटिंग्डन् शहराचा पट्टा उजळण्यांत आला, आणि नव्या पट्टयांत सर्व नगरव्यवस्थेचे अधिकार तहाहयात नेमलेल्या अध्यक्षाकडे व बारा जणांच्या पंचमंडळाकडे सोंपवण्यांत आले होते. यांविरुद्ध क्रॉम्वेल्नें बरीच चळवळ केली व कांहीं जहाल व्याख्यानेंही दिलीं. यावरून, बेअब्रू करणारीं भाषणें केल्याबद्दल त्याच्यावर खटला भरण्यांत आला. पण या प्रकरणाची अखेर मांडवाळ करण्यांत आली, क्राम्वेल्नें बदनामी केल्याबद्दल माफी मागितली व शहरच्या पट्टयाच्या शर्तींतही

दोनतीन मुद्यासंबंधें दुरुस्ती करण्यांत आली. यानन्तर ऑलिव्हर्नें लौकरच हंटिंग्डन् येथील आपली मिळकत फुकून, तो सेंट् ईव्हज् येथें पट्टयानें जमीन घेऊन राहण्यास गेला. यापुढें कांहीं दिवसांनीं त्यास एलाय् येथें एका वाड्याची व बऱ्याचशा स्थानिक स्थावर मिळकितीची वारशी आजोळघराण्याकडून मिळाली, आणि तो सन १६३६ मध्यें आपल्या सर्व कुटुंबासह ऐलाय् एथें राहायला आला व मिळकितीची व्यवस्था पाहूं लागला. या सर्व काळांत प्यूरिटन् पंथाच्या प्रसाराबद्दलही त्याचे प्रयत्न चालूच होते. चार्लस् राजाकडून होणाऱ्या अन्यायाला व छळाला कंटाळून बरेच प्यूरिटन् लोक या वेळीं अमेरिकेंत नवीन वसाहत करण्याकरितां एकसारखे जात होते. असें सांगतात, कीं, क्राम्वेल्, हॅम्पड्न्, वगैरे मंडळीही राजाच्या जाचाला त्रासून वैतागानें देशत्याग करण्यास सिद्ध झाली होती. परंतु राजानें त्यांच्या तारवाला ऐन वेळीं सफरीवर जाण्याची बंदी केल्यामुळें, त्यांना आपला बेत मोडावा लागला ! याचा परिणाम पुढें काय झाला, हें वाचकांना दिसून येईलच.

### राजा पेंचांत आला.

सन १६३७ सालीं धर्माच्या बाबतींत चार्लस्नें स्काट्लंड्वर मोठीच जबरदस्ती केली. तेव्हां तें प्रेसबिटेरिअन् राष्ट्र एकदम चवताळून गेलें व तेथील लोकांनीं ठिकठिकाणीं सार्वजनिक सभा भरवून आपल्या धर्माची शुद्धि राखण्याकरितां शक्य ते उपाय योजण्याचा एक शपथपूर्वक राष्ट्रीय प्रतिज्ञालेख करून टाकला. चार्लस् राजा ही बंडखोरी ठेंचण्याला अगदीं अधीर झाला होता, परंतु तो पैशाच्या टंचाईमुळें पेंचांत सांपडला. तेव्हां चार्लस्नें १६४० मध्यें पार्लिमेन्ट्

भरविली. या सभेंत क्रॉम्वेल् हा केम्ब्रिज् परगण्यातर्फे प्रतिनिधि निवडून आला होता. पिंप्, हॅम्प्डन्, वगैरे पूर्वींची त्याची आप्तेष्ट मंडळी होतीच. या सभेनें राजाला पैसा पुरवावयाच्याऐवजीं त्याच्या धर्मव्यवहारावर व राज्यकारभारावर टीकास्त्र सोडण्यास आरंभ केला, आणि त्याच तिरमिरीबरोबर राजानेंही या सभेचें विसर्जन केलें !

## चार्लस्ची अखेरची पार्लिमेंट्.

पण पैशाचा पेंच कांहीं ढिला झाला नाहीं ! तेव्हां राजानें आपल्या सरदार लोकांचा सल्ला घेतला, आणि त्यांच्या विचारानें त्यानें आपल्या कारकीर्दींतील अखेरची पार्लिमेन्ट् बोलाविली, हीच इतिहासप्रसिद्ध 'दीर्घकालीन राष्ट्रसभा' होय. हिला हें नांव मिळण्याचें कारण असें, कीं, ही सभा जी १६४० मध्यें प्रथम भरली, ती, १६५३ सालीं क्रॉम्वेल्च्या हातून तिचें उधळण होईपर्यन्त, म्हणजे तेरा वर्षें, टिकून राहिली.

या पार्लिमेन्टांत क्रॉम्वेल् निवडून आला होता. या सभेंत क्रॉम्वेल्नें बरीच कामगिरी केली. त्यानें कधीं भपकेदार आवेशी भाषणें केलीं नाहींत, हें खरें. किंबहुना, कायद्याच्या भानगडी, वहिवाटीची वाटाघाट, वादविवादाचे डावपेंच, इत्यादि फंदांत तो मुळींच पडला नाहीं, परंतु त्यानें आपलें लक्ष्य लांचलुचपत व बेबंद सुलतानशाही यांची उघडीक करण्याकडे व लोकांच्या धार्मिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करण्याकडे लाविलें होतें, आणि या प्रकरणीं नेमलेल्या मंडळांत त्यानें बरीच महत्वाची चळवळ केली. क्रॉम्वेलनेंच सभेच्या मनाला पटवून दिलें, कीं, कायदे नुसते मंजूर करणें किंवा लोकांचे हक्क नुसत्या शाब्दिक वादानें सिद्ध करणें, यांत आतां फारसा अर्थ राहिलेला नव्हता.

बेगुमानपणें चालू असलेल्या हरतऱ्हेच्या जुलुमापासून जनतेचें कृतीनें रक्षण करणें, हेंच आतां पार्लिमेन्ट्चें कर्तव्य होतें. तेव्हां क्रॉम्वेल्च्याच प्रेरणेनें ' प्रचंड निषेध ' या नांवाची एक यादी तयार करण्यांत आली. या यादींत चार्लस् राजाच्या सर्व स्वैर कृत्यांचा इत्थंभूत पाढा वाचण्यांत आला होता. ही यादी १६४१ सालीं पार्लिमेन्ट्मध्यें मंजूर होऊन राजाकडे पाठविण्यांत आली. हिच्या शेकडों प्रती छापून राष्ट्रभर वांटण्यांत आल्या. हा निषेध म्हणजे राष्ट्राला राजाविरुद्ध उठाव करण्याला प्रत्यक्ष आमंत्रणच होतें, असें म्हटलें तरी चालेल. ही यादी मंजूर होण्यापूर्वीं दोन आठवडे क्रॉम्वेल्नें सभेपुढें असा ठराव मांडला, कीं, ट्रेन्ट् नदीच्या दक्षिणेकडील प्रान्तांत राष्ट्रसंरक्षणाकरितां जीं सशस्त्र वीरांचीं पथकें सिद्ध होतील, त्यांचें नेतृत्व पार्लिमेंट्च्या वतीनें इसेक्स् याकडे असावें, आणि त्यानें हा अधिकार, पार्लिमेन्ट्कडून दुसरा हुकूम होईपर्यंत, अस्खलित चालवावा. हा ठराव सभेनें मंजूर केला. अर्थात्, या ठरावांत पार्लिमेन्ट्च्या खास हुकमतींत राहणारें सैन्य तयार करण्याच्या पुढील योजनेचें बीजारोपण होतें, हें सांगणेंच नको.

## युद्धाची तयारी.

नोव्हेंबर १६४१ मध्यें ' प्रचंड निषेध ' पार्लिमेन्ट्नें मंजूर केला. ४२ च्या जानेवारींत राजानें कॉमन्स्च्या सभागृहांत जाऊन चळवळ्या पुढाऱ्यांस कैद करण्याचा अविचारी प्रयत्न केला, पण तो सपशेल फसला. दुसऱ्या दिवशीं राजा जेव्हां राजवाड्यांतून शहरांत गेला, तेव्हां वाटेंत प्रजाजनांचे ' हक्क ! हक्क ! ' याशिवाय दुसरे शब्दच त्याच्या कानावर येतना ! इतक्यांत, राजानें कॉमन्स् सभेचा जो उपमर्द केला, त्याची चौकशी करण्याकरितां आणि राजाच्या रोषास

पात्र झालेल्या पुढाऱ्यांचें स्वागत व अभिनंदन करण्याकरितां, पार्लि-मेन्ट्चें एक पोटमंडळ नेमण्यांत आलें. या सर्व धामधुमीनें राजा इतका भयभीत झाला, कीं, पांच दिवसांच्याआंतच त्यानें लंडन्मधून आपला गाशा गुंडाळला, आणि पुन्हां कांहीं त्याचा राजा या नात्यानें त्या शहरास पाय लागला नाहीं! यानंतर राजा व पार्लिमेन्ट् यांच्यामध्यें कांहीं दिवस समेटाची वाटाघाट चालू राहिली, पण कोणताही पक्ष नमतेंजमतें घेईना. अखेर पार्लिमेंट्नें सैन्याच्या ताब्याची जोरानें मागणी केली, आणि राजानें ती तितक्याच आवेशानें फेंटाळून लाविली. आतां राजा व पार्लिमेन्ट् यांमधील लढा हातघाईवर येणें अपरिहार्य झालें, आणि दोन्ही पक्ष प्रत्यक्ष युद्धाच्या तयारीस लागले. याच वेळेपासून क्राम्वेल् हा पार्लिमेन्ट् पक्षाचा प्रत्यक्ष चैतन्यच बनला.

## राजसैन्य व प्रजासैन्य.

इ. स. १६४२ च्या ऑगस्ट् महिन्यांत राजानें आपलें लढाईचें निशाण नॉटिंग्हॅम् किल्ल्यावर फडकावलें, आणि त्याच्या भोंवतीं सुमारें दहा हजार लोक गोळा झाले. पार्लिमेन्ट्चें घाईघाईनें उभारलेलें जवळ-जवळ तितकेंच बिनलष्करी सैन्यही सामना देण्यासाठीं इसेक्स्च्या आधिपत्याखालीं सज्ज झालें. सामान्यतः इंग्लंड्च्या उत्तर व पश्चिम विभागांत राजपक्षाला चांगलें पाठबळ होतें, परंतु दक्षिण व पूर्व विभागांत पार्लिमेन्ट्पक्ष प्रबळ होता. राजाच्या बाजूस मोठमोठे खानदान, उमराव, बडेबडे व्यापारी, व चैनी खुशालचेंडू, यांचा मोठा भरणा होता. पार्लिमेन्ट्पक्षाला मध्यम स्थितींतील सरदार, वतनदार, जमीनदार, व्यापारी, कारागीर, आणि स्वतःच्या मालकीच्या जमिनी कसणारे शेतकरी, यांचा पाठिंबा होता. राजाच्या पायदळांत

खानदान व उमराव यांचे हस्तक, नौकर, व कुळें, अशा भाडोत्री व अर्धकच्च्या लोकांची विशेष भरती होती. पण त्याचे शिलेदारी घोडदळ फार उमदें व शूर म्हणून नांवाजलेलें होतें. पार्लिमेन्ट्च्या सैन्यांत स्वयंप्रेरणेनें राष्ट्रकार्याकरितां व हक्काकरितां हातीं शस्त्र घेणाऱ्या लोकांचा भरणा होता. त्यांच्या युद्धावेशांत खऱ्या कळकळीचा व स्वार्थत्यागाचा पुष्कळ अंश होता. पण त्यांच्यांत लष्करी शिस्तीचा बराच अभाव होता. पार्लिमेन्ट्चें घोडदळ तर फारच तुटपुंजें असून कमकुवत होतें. राजपक्षाकडे चैन, भपका, व उधळपट्टी, यांचा सुकाळ असल्यामुळें, राजा वारंवार पैशाच्या विवंचनेंत पडे. पार्लिमेन्ट्चा पक्ष बराच काटसरी व साधासुधा होता. शिवाय पार्लिमेन्ट्ला कर बसविण्याचा कायदेशीर हक्क होता, आणि पुष्कळ लोक आपखुषीनेंही सढळ हातानें मदत करीत असत.

## युद्धाचीं पहिलीं दोन वर्षें

या युद्धाचीं पहिलीं दोन वर्षें कोणत्याही पक्षाचा ठळकपणें जय किंवा अपजय न होतांच गेलीं. पार्लिमेन्ट्च्या पक्षांत लष्करी शिस्त व शिक्षण यांचा बराच अभाव असल्यामुळें, त्याच्या आवेशाच्या मानानें त्याच्यांत दमदारपणा फार कमी आणि आडमुठेपणा फार जास्त दिसून येत असे. यामुळें कित्येक प्रसंगीं समरांगणावर असा चमत्कार घडून येई, कीं, एकीकडे एका पथकानें शत्रूवर चढाई करून जयघोषांत बेहोष व्हावें, तर दुसरीकडे दुसऱ्या पथकानें शत्रूच्या हल्ल्यानें भेदरून, संग्रामांतून वायुवेगानें पळता पाय काढावा ! राजपक्षाचीही स्थिति याहून फारशी निराळी नव्हती. त्याचें पायदळ बहुशः बेशिस्त व अर्धकच्चेंच होतें. त्यांत राजाचा भ्याडपणा व लहरीपणा यांची भर

पडे. यामुळें त्याच्या उमद्या घोडदळाच्या हातूनही फारशी नांवाजण्यासारखी कामगिरी घडली नाहीं. शत्रूला चीत करण्याची सोन्यासारखी संधि लाभली असतां, ती फुकट दवडल्याचा नादानपणा दोन्ही पक्षाकडून घडत असे. पण दोन वर्षांनन्तर ही स्थिति एकदम पालटली, आणि राजपक्षाची दाणादाण समरांगणावर जिकडेतिकडे होऊं लागली. ही क्रान्ति घडवून आणल्याचें सर्व श्रेय ऑलिव्हर् क्रॉम्वेल्ला आहे. तें कसें हें आतां संक्षेपानें सांगण्यांत येईल.

## एज्‌हिल्‌ची लढाई.

वर उल्लेखलेल्या दोन वर्षांच्या आरंभींच दोन्ही पक्षांची पहिली चकमक एज्‌हिल् येथें १६४२ च्या आक्टोबर महिन्यांत उडाली. या झटापटींत पार्लिमेन्ट् सैन्याची डावी बगल राजाच्या घोडदळानें पिटाळून तिची काइन्टन् शहरापर्यन्त लांडगेतोड केली. उजवी बगल सेनापति इसेक्स् याच्या खास नेतृत्वाखालीं होती, पण राजाच्या पायदळानें तिचीही अंशतः दाणादाण उडवली. इतक्यांत एका बाजूस मोठ्या दमदारपणानें टिकून राहिलेल्या कांहीं घोडदळाच्या पथकांनीं पार्लिमेन्ट् पक्षाची अब्रू राखली. या पथकांनीं राजाच्या पायदळावर इतक्या आवेशानें एकाएकीं चाल केली, कीं, त्या पायदळाची फळी तेव्हांच फुटली, आणि पार्लिमेन्ट्च्या स्वारांनीं सपासप हत्यार चालवून कापाकापी करतांच त्याची पळापळ सुरू झाली. कांहीं वेळानन्तर डाव्या बगलेची लांडगेतोड करणारीं राजाचीं घोडेस्वारांचीं पथकें परत आलीं, आणि त्यांची व पार्लिमेन्ट्च्या घोडदळाची झकापक सुरू झाली. संध्याकाळ होऊन काळोख पडल्यावर हें द्वंद्व आपोआप बंद झालें,

आणि जयलक्ष्मीची माळ कोणत्याही पक्षाच्या गळ्यांत पडली नाहीं! या ऐन वेळीं कामास आलेल्या पथकांत क्रॉम्वेल्चींच पथकें मुख्यतः होतीं.

### क्रॉम्वेल्ची लष्करी योजना.

क्रॉम्वेल् हा वास्तविक बिनलष्करी इसम होता. आपल्या वयाचीं एकेचाळीस वर्षें त्यानें शेतीभाती व गृहप्रपंच यांचा आटोप करण्यांत घालविलीं होतीं. परंतु लष्करीपेशा धारण केल्याबरोबर, त्याच्या अंगीं त्या पेशाला शोभेल अशी तडफ, साहस, व धोरण हे गुण होते, असें अनुभवास आलें.

एज्हिल्च्या लढाईत जरी राजपक्षाचा विजय झाला नाहीं, तरी पार्लिमेन्ट्च्या पक्षाची बरीच दुर्दशा उडाली, आणि तिचें मर्मही क्रॉम्वेल्च्या ताबडतोब लक्ष्यांत आलें. त्यानें पार्लिमेन्ट्पक्षांतील पुढाऱ्यांस असें पटवून दिलें, कीं, या सर्व दुर्दशेस कारण अडाणीपणा व शिस्तीचा अभाव हे आहेत. सैन्यांत म्हातारे, अशक्त, आळशी, उनाडटप्पू, व आडमुठे, लोकांस मुळींच थारा मिळतां कामा नये. तरुण, धडधाकट, उत्साही, व समजूतदार, अशाच लोकांची भरती करून, त्यांना कडक शिस्त लाविली पाहिजे; तरच पल्ला येईल, नाहींतर, कार्यनाश झाल्यावांचून राहणार नाहीं. त्यानें आपलीं पथकें याच रीतीनें उभारून तयार केलीं होतीं. तो आपल्या लोकांच्या मनावर पूर्णपणें बिंबवी, कीं, आपण ईश्वराच्या आज्ञेनें सत्याकरितां, न्यायाकरितां, जनतेच्या संरक्षणाकरितां व स्वातंत्र्याकरितां, लढत आहों. हें आपलें कर्तव्य आहे, हें आपलें धर्मयुद्ध आहे. तेव्हां—

**जरी मेलांत या युद्धीं, स्वर्गप्राप्ति असेचि कीं; ।**
**जरी झालांत विजयी, सुख लाभेल लौकिकीं ॥**

अशा प्रकारची भावना अन्तःकरणांत बिंबल्यामुळें, त्याचे सैनिक रणभूमीवर ईश्वराची स्तोत्रें गात मोठ्या उल्हासानें शत्रूवर चालून जात व कोणताही प्रसंग गुदरला तरी मागें पाऊल म्हणून घेत नसत. क्रॉम्वेल्‌ची कवाइतीची व शिस्तीची जरबही मनस्वी असे, त्यामुळें समराङ्गणांत त्याच्या पथकांच्या हालचाली एकाद्या यंत्राप्रमाणें अचूक होत, आणि गोंधळ किंवा घोंटाळा लेशमात्रही होत नसे. क्रॉम्वेल्‌च्या या सैनिकांचा लवकरच एवढा दरारा बसला, कीं, त्यांना ‘ अयर्न् साइड्स् ’ म्हणजे ‘ लोखंडासारखे कणखर वीर ’ हें नांव लाभलें.

सैन्य कमावण्याची ही क्रॉम्वेल्‌ची रीत ‘ नवी पद्धति ’ या नांवानें ओळखली जाऊं लागली, आणि पार्लिमेन्ट्‌च्या युद्धमंडळानें ती लवकरच सर्व सैन्याला लागू केली, आणि तेव्हांपासूनच सैन्याचें अधिपतित्व क्रॉम्वेल्‌कडे आल्यासारखें झालें, आणि पार्लिमेन्ट्‌ची मदार त्याच्यावरच टेंकल्यासारखी झाली. १६४३ सालीं चार्ल्स् राजानें आयर्लंड्‌मधून कुमक मिळविण्याचे प्रयत्न चालविले. तेव्हां त्याला तोड म्हणून इंग्लिश् पार्लिमेन्ट्‌नें स्कॉट्‌लंड्‌च्या प्रेस्बिटेरिअन् लोकांशीं कांहीं करार करून त्यांची मदत मिळविली व त्यानें पार्लिमेंट्‌चें बळ पुष्कळच वाढलें.

### मार्स्टन्‌मूर्‌ची लढाई.

सन १६४४ सालीं दक्षिण भागांत इसेक्स्‌ची राजपक्षानें पुष्कळ ठिकाणीं अगदीं गाळण उडवून दिली. परंतु उत्तरेस स्कॉटिश् सैन्याच्या

मदतीनें क्रॉम्वेल्नें राजाच्या सैन्याशीं मार्स्टन्मूर् येथें सामना दिला. या लढाईंत क्रॉम्वेल्च्या 'आयर्न् साइड्स्नीं' शौर्याची कमाल केली. राजाच्या पायदळालाच नव्हे, तर नांवाजलेल्या शिलेदारी घोडदळालाही त्यांनीं चांगलीच धूळ चारली. मार्स्टन्मूर् येथील पराजयानें राजाच्या पक्षाचा कणाच मोडल्यासारखा झाला, आणि यानंतर या युद्धांत क्रॉम्वेल्नें राजाला कोठेंही जय लाभूं दिला नाहीं. याच वर्षाच्या अखेर न्यूबरि येथें पुन्हां चकमक झडली, आणि तेथें राजसैन्याला चांगलीच थप्पड बसली.

## स्वातंत्र्यवादी पक्ष.

या वेळीं जहाल प्यूरिटन् पक्षांत एक ज्वलत्जहाल उपपक्ष बनत चालला होता. याला 'स्वतंत्र पक्ष' हें नांव पडलें. धर्म, राजकारण, व समाजकारण, यांत सर्वस्वीं स्वातंत्र्य असावें, असें या पक्षाचें मत होतें. या स्वातंत्र्यवाद्यांचा क्रॉम्वेल्च्या सैन्यांत मोठा भरणा होता. आतां क्रॉम्वेल्च्या लक्ष्यांत आलें, कीं, पार्लिमेन्ट्चे युद्धमंडळांत बहुतेक लोक बिनलष्करी असल्यामुळें लष्करच्या कामांत त्यांच्याकडून बरेच वेळां नसती ढवळाढवळ होई, झटपट करण्याची कामें दिरंगाईवर पडत, आणि लष्करी धोरण बिनसून जाई. तेव्हां या स्वातंत्र्यवाद्यांच्या मदतीनें त्यानें 'स्वार्थत्यागाचा ठराव' पार्लिमेन्टमध्यें मंजूर करून घेतला. या ठरावानें कोणाही पार्लिमेन्ट्च्या सभासदानें लष्करांत अमलदारी पत्करूं नये, असें निश्चित करण्यांत आलें. या ठरावास धरून इसेक्स् व क्रॉम्वेल् यांना लष्करी जागा सोडाव्या लागल्या. आतां फेअर्फॅक्स् यांस मुख्य सेनापति नेमलें. पण क्रॉम्वेल्शिवाय सर्वत्र अडूं लागलें, कारण तो तर

सर्व सैन्याचा कलिजा झाला होता. तेव्हां कॉम्वेल्च्या अपेक्षेप्रमाणें त्याला ‘ स्वार्थत्यागाच्या ठरावास ’ अपवाद करून लवकरच पुन्हां लष्करांत नेमण्यांत आलें आणि दुय्यम सेनापति हा त्याचा हुद्दा ठरला, पण वस्तुतः तोच खरा व सैन्याचा लाडका सेनापति होता

**नेस्बीची लढाई.**

सन १६४५ सालीं सेनापति फेअर्फॅक्स् यानें नेस्बी येथें राजसैन्याशीं गांठ घालून सामना देण्याचा घाट घातला. पण क्रॉम्वेल् सैन्यांत नसल्यामुळें सैनिकांचा उत्साह बराच फिका पडला आहे, असें त्यास दिसून आलें, आणि क्रॉम्वेल्च्या नेतृत्वावांचून ही कामगिरी धडपणें तडीस जाणार नाहीं, असें त्यास वाटूं लागलें. म्हणून, त्यानें पार्लमेंट्कडे खलिता लिहून ‘ स्वार्थत्यागाच्या ठरावास क्राम्वेल्चा अपवाद समजून त्यास निकडीनें रणांगणावर लष्करी अंमलदार म्हणून पाठवावें,’ असें कळविलें. त्यावरून लवकरच लगबगीनें क्रॉम्वेल् सैन्याच्या तळावर आला आणि त्याला पाहिल्याबरोबर सैन्याचा उत्साह एकदम दुणावला.

नेस्बी येथें १४ जूनला लढाईला तोंड लागलें. या लढाईचें स्वरूप जवळजवळ मार्स्टन्मूर् येथील लढाईसारखेंच होतें. दोन्ही पक्षाचें सुमारें दहादहा हजार सैन्य होतें. परंतु या वेळीं पार्लिमेन्ट्च्या सैन्याची तयारी व शिस्त विशेष होती, व समरांगणावर त्याच्या हालचालीही बऱ्याच समाधानकारक रीतीनें होत होत्या. राजसैन्याचीही तयारी कांहीं कमी होती अशांतला भाग नाहीं. पण क्राम्वेल्च्या सैन्याच्या धडाडीपुढें त्याचा तग लागला नाहीं. मार्स्टन्मूर्प्रमाणेंच नेस्बीलाही क्रॉम्वेल्च्याच धोरणानें, पराक्रमानें, आणि

आवेशानें, यशाचा वांटा पार्लिमेन्ट्ला मिळाला. क्रॉम्वेल् सैन्याच्या एका बगलेस होता. त्यानें आपलयासमोरच्या राजसैन्याच्या बगलेवर एकदम हल्ला करून तिचा धुव्वा उडविला. इकडे पार्लिमेन्ट्सैन्याच्या मध्यभागीं सेनापति फेअर्फॅक्स याची खाशी स्वारी होती, आणि त्याचें पायदळ थोडेंसें डळमळीत होऊन माघार घेऊं लागलें होतें. इतक्यांत समोरच्या शत्रूला अगदीं चीत करून यशस्वी झालेलें क्रॉम्वेल्चें पायदळ व घोडदळ त्याच्या मदतीला आलें, आणि त्यांनीं शत्रूवर गरुडासारखी झेंप घालून शत्रुपक्षांत कहर उडवून दिला. पलीकडची बगल आयर्टन्च्या नेतृत्वाखालीं होती आणि त्याच्यावर राजाच्या नामांकित घोडदळानें निकराचा हल्ला चढविला होता. या शिलेदारी घोडदळाच्या भरारीपुढें आयर्टन्चा मुळींच निभाव लागेना, त्याची फळी फुटली आणि पळापळ सुरू झाली. राजाचें घोडदळ त्यांची लांडगेतोड करण्याच्या विचारांत होतें, परंतु राजसैन्याच्या इतर भागांत क्रॉम्वेल्नें उडविलेली धूळदैना त्यांच्या लक्ष्यांत येऊन, हे घोडेस्वार क्रॉम्वेल्च्या घोडदळाच्या रोखानें वळले. क्रॉम्वेल्चे स्वारही आतां राजाच्या पायदळाचा व तोफखान्याचा सत्यनाश करून मोकळें झालें होतें. शिवाय, फेअर्फॅक्स्च्या पायदळाचें पाठबळही त्यांस होतें. त्यांचें आतां राजाच्या घोडदळाशीं द्वंद सुरू झालें. पण अल्पावकाशांतच क्रॉम्वेल्च्या दळानें राजदळाची अगदीं चांदी आटवली! या लढाईनें या युद्धाचा शेवटच झाला, आणि क्रॉम्वेल्च्या करामतीनें पार्लिमेन्ट् पक्ष यशोमंडित होऊन थाटला.

### पक्षभेद.

पण आतां पार्लिमेन्ट्मध्यें पक्षभेद बळावून जुटीची फाटाफूट व्हावयास लागली होती. प्रेस्बिटेरिअन् पक्षाला आतां यशस्वी लष्कराची

थोडीफार भीति वाटूं लागली, आणि लष्करी पक्षाच्या हातीं सर्व सत्ता गेल्यास राष्ट्रीय अनर्थ कोसळेल, असें त्यांस वाटूं लागलें. तेव्हां राजाशीं आतां कांहीं शर्तींवर तह करावा, व प्रजेच्या हक्कांचें योग्य संरक्षण करून राजास फिरून गादीवर बसवावें, असें ते प्रतिपादूं लागले. लष्करांत ज्वलज्जहाल प्यूरिटन् म्हणजे स्वातंत्र्यवादी पक्षाचा भरणा फार होता. त्यांना धर्मस्वातंत्र्य पाहिजे होतें, इतकेंच नव्हे, तर सामाजिक व राजकीय बाबतींत कोणतीच विषमता किंवा भेदकल्पना असतां कामा नये, असें ते म्हणत, क्रॉम्वेल्ला या पक्षाचें मत सर्वस्वीं ग्राह्य वाटत नव्हतें. राष्ट्रांत शान्तता, व्यवस्था, व न्याय, यांची नांदणूक होण्याला, कांहींतरी सुघटित शासनपद्धति असलीच पाहिजे आणि कोणतीही शासनपद्धति घेतली तरी तींत कोणीतरी सत्ताधारी व्यक्ति असणारच, ही गोष्ट त्यास मान्य होती. म्हणून तो स्वातंत्र्यपक्षाच्या जहाल मताला प्रतिकूलच होता, परंतु त्या लोकांना नाखूष करून सैन्याची घडी विस्कटविण्याला तो तयार नव्हता. ज्यांच्या जीवावर उद्दाम राजपक्षाला आपण वठणीस आणून ठेचलें, त्यांस एकदम बिथरवणें मुत्सद्दीगीरीचें नव्हतें, हें क्रॉम्वेल् जाणून होता. तशांत या स्वातंत्र्यवाद्यापेक्षां प्रेसबिटेरियन् पक्षाचीच त्याला त्यावेळीं विशेष भीति वाटत होती. राजाशीं तह करण्याच्या या लोकांच्या विचारानें त्याच्या अंगाची अगदीं लाही झाली. अशा कृत्यानें, आज चार वर्षें हाडाचीं काडें करून जो खटाटोप केला व राजपक्षाला समरांगणावर जें चीत केलें, त्या सर्वावर पाणी पडणार; असें क्रॉम्वेल्ला स्पष्ट दिसत होतें. कोणत्याही अटी मान्य करून चार्लस् पुन्हां सिंहासनावर आरूढ झाला, तरी तो सर्व अटी मोडील, दिलेल्या वचनांना हरताळ फांसील, व

लोकांच्या कपाळीं वाटाण्याच्या अक्षता लावील, आणि मागील वीस वर्षांचा तमाशा पुन्हां चालू होईल. तेव्हां हें सर्व टाळण्याकरितां प्रेसबिटेरियन् व सनदशीर पक्षाची नांगी ठेंचणें आधीं अवश्य आहे, असें त्याच्या मनानें घेतलें, आणि तो त्या उद्योगाला लागला. या निश्चयांत स्वतःची वैयक्तिक सत्ता कायम टिकावी, या इच्छेची प्रेरणा किती होती, हें नक्की सांगतां येत नाहीं.

## राजाचा बंदीवास.

इकडे नेस्बी येथील लढाईंतून पराभव पावल्यानें चार्लस् राजाची कंबर अगदींच खचली. त्यानें समरांगणांतून पोबारा करून वेल्स् गांठलें, आणि तेथें तो दडून राहिला. कांहीं दिवसांनीं पार्लिमेन्ट् पक्षांत फूट पडत आहे, हें कानीं येतांच त्यानें स्कॉटलंड्च्या प्रेस्बिटेरिअन् लोकांशीं समेटाचें बोलणें करण्यास आरंभ केला. त्यांनीं धर्मस्वातंत्र्याच्या अटीवर त्याला आश्रय देण्याचें कबूल केलें. पण राजानें ही अट मान्य केली नाहीं व समेटाचें बोलणें मोडलें. तथापि आपल्या लहरी स्वभावानुसार चार्ल्स् लवकरच बिनशर्त स्कॉटिश् लोकांच्या स्वाधीन झाला ! त्यांनींही त्याचा चांगला मानमरातब ठेवला.

स्कॉटिश् प्रेस्बिटेरिअन् लोकांच्या हातीं राजा जातांच, तो आपल्या हातीं आला पाहिजे आणि स्कॉटिश् सैन्याची ब्याद एकदाची स्कॉट्-लंड्ला परत पाठविली पाहिजे, असें इंग्लिश् पार्लिमेन्टांतील सर्वच पक्षांना वाटूं लागलें, आणि क्रॉम्वेल्लाही हीच गोष्ट पाहिजे होती. अखेर सन १६४७ च्या जानेवारी महिन्यांत स्कॉटिश् लष्कराला बरेचसे पैसे चारून, इंग्लिश् पार्लिमेन्ट्नें राजाचा ताबा घेतला व स्कॉटिश्

लष्करची धिंडका स्वदेशाला रवाना केली. यानंतर इंग्लंड्मध्यें पार्लिमेन्ट् व लष्कर यांच्या प्रत्यक्ष झटापटीला रंग चढला.

### पार्लिमेन्ट् व लष्कर.

प्रेस्बिटेरिअन् व सनदशीर पक्षांचें असें म्हणणें होतें, कीं, लढाईची आतां इतिश्री झाली आहे, तेव्हां लष्कर उधळून टाकावें, आणि राज्यवस्थेच्या पुढील कामास लागावें. 'लष्कर खडें आहे तसेंच बाळगावें, असें जे म्हणतात, ते देशाचे दुष्मान् होत,' असेंही पार्लिमेन्ट्नें पुकारलें. इतकेंच नव्हे, तर राजाबरोबर जमेल त्या शर्तींवर समेट करावा, पण ही लष्करशाही मोडलीच पाहिजे, असेही या पक्षांचे बेत चालले होते. अर्थातच हा एकंदर पार्लिमेन्ट्चा रागरंग पाहून, सेनापति फेअर्फॅक्स् व क्रॉम्वेल् यांच्या अंगास वणवाच लागला !

यानंतर जून महिन्याच्या दुसऱ्या तारखेस क्रॉम्वेल् एकाएकीं लन्डन्मधून निघून गेला, आणि त्याच दिवशीं जॉयूसे नांवाच्या एका लष्करी अंमलदारानें पार्लिमेन्ट्च्या ताब्यांतून राजाला जबरीनें हिसकावून घेऊन लष्करांत नेलें ! हें सर्व क्रॉम्वेल्च्याच हुकुमानें घडलें होतें. नंतर दहा जूनच्या लष्करचें एक फर्मान निघालें, कीं, लष्करनें आजपर्यन्त कष्ट सोसून जी कामगिरी केली आहे, तिचा योग्य मोबदला पार्लिमेन्ट्नें द्यावा, लष्करच्या शत्रूंना बडतर्फ करावें, राज्याची सुव्यवस्था लावावी, आणि मग लष्कर उधळण्याचा घाट घालावा ! परंतु या धमकीनें पार्लिमेन्ट् किंवा लंडन् शहर वठणीस येण्याचें चिन्ह दिसेना. तेव्हां तीन आगस्ट् रोजीं लष्करनें लंडन्मध्यें घुसून शहराचा प्रत्यक्ष ताबा घेतला, आणि सर्व शहरभर लष्करी मिरवणूक काढून नागरिकांवर दहशत बसवली ! अशा रीतीनें लष्करशाहीचा अंमल सुरू

झाला. हें सर्व सेनापति फेअर्फॅक्स् याच्या हुकुमानें म्हणून करण्यांत आलें, पण याचा खरा चालक क्रॉम्वेल्च होता.

आतां राजा चार्लस् लष्करांतच बंदींत असल्यामुळें त्याची व क्रॉम्वेल्ची वारंवार गांठ पडूं लागली. क्रॉम्वेल् हा क्रान्तिकारक होता खरा, परंतु त्याला बेबंद लोकशाही नको होती. प्रजेचे हक्क व व्यक्ति-स्वातंत्र्य यांना धका न लावतां नियन्त्रित राजशाही स्थापितां येईल, तर त्याला ती पाहिजे होती. म्हणून लष्करला नाराज न करतां राजाशीं समेट करण्याचा त्याचा विचार होता व यासाठीं त्यानें पुष्कळ धडपड चालवली. त्याच्या व राजाच्या वरचेवर गांठीभेटी होऊं लागल्या, तेव्हां, क्रॉम्वेल्ही नादावला कीं काय, असा लष्क-रांतील स्वातंत्र्यवाद्यांना संशय येऊं लागला! कांहींना तर याबद्दल खात्री वाटून ते उघडउघड तसे बोलूंही लागले, आणि कांहीं आततायींनीं तर चार्लस् व क्रॉम्वेल् या दोघांनाही या विश्वासघाताबद्दल देहान्त प्रायश्चित्त देण्याचा कट केला ! अर्थात् क्रॉम्वेल्च्या लष्करचें वारें कसें वाहात होतें हें तत्काळ लक्ष्यांत आलें; शिवाय, राजाशीं समेट कोणत्या तत्त्वावर करावा हें त्याच्या मनानें निश्चित होईना; तशांत राजा आपल्याजवळ गोड बोलतो, पण आंतून गुप्त रीतीनें त्याच्या निरा-ळ्याच खटपटी चालू असतात, हेंही त्याचे अनुभवास आलें. या एकंदर सर्व कारणांनीं त्याचें मन खवळलें आणि त्यानें एकदम उलट खाल्ली !

### राजाची अखेर.

अशा स्थितींत १६४७ च्या नोव्हेंबर महिन्यांत कवाइतीच्या वेळीं दोन पलटणींनीं 'राष्ट्राचें स्वातंत्र्य व लष्करचे हक्क' यांचा पुकारा करून

अंमलदाराचे हुकूम मानले नाहींत. परंतु क्रॉम्वेल्नें ताबडतोब कांहीं पुढाऱ्यांना पकडून, त्यांची लष्करी न्यायमंडळापुढें चौकशी करून, त्यांस देहान्तशासन केलें व आततायी जहालांना जरब लावली. १६४८ च्या आरंभीं इसेक्स् केन्ट्, वगैरे परगण्यांत राजाच्या वतीनें बंडावे उद्भवले. वेल्स्मध्यें तर राजपक्षाच्या सैन्याची जमवाजमव होऊन मोठाच उठाव झाला, आणि उत्तरेकडे वीस हजार स्कॉटिश् लोकांनीं राजाची बाजू घेऊन इंग्लंड्वर चाल केली ! अर्थात् सर्व बाजूंनीं असें काहूर उठल्यामुळें इंग्लिश् पार्लिमेन्ट्चें धाबें दणाणलें, आणि अगदींच अडल्यामुळें तिला पुन्हां लष्करचे अंकित होणें भाग पडलें. इसेक्स् व केन्ट् येथील बंडावे मोडण्याची कामगिरी इतर अंमलदारांवर सोंपवून, क्रॉम्वेल् स्वत: वेल्स्मध्यें सैन्यासह गेला, आणि तेथील काहूर मोडून तो उत्तरेस स्कॉटिश् सैन्याचा समाचार घेण्याकरितां वळला. प्रेस्टन् येथें दोन्ही सैन्यांची गांठ पडली. क्रॉम्वेल्च्या सैन्याच्या तिप्पट स्कॉटिश् सैन्य होतें. शिवाय, लांबचा प्रवास, आजार, आणि लढाईचे कष्ट, यांनीं क्रॉम्वेल्चे लोक अगदीं मेटाकुटीस आले होते. तरी पण रणांगणावर त्यांनीं अप्रतिम शौर्य व साहस दाखविलें आणि क्रॉम्वेल्ची सेनापतीच्या नात्यानें संग्रामकुशलताही या रणांत चांगली प्रत्ययास आली. स्कॉटिश् सैन्याचा पुरा मोड झाला व त्यानें स्वदेशाकडे धूम ठोकली. अशा प्रकारें या पुरवणी युद्धाचा यशस्वी रीतीनें शेवट करून क्रॉम्वेल्नें इंग्लिश पार्लिमेन्ट्ला लष्करच्या कैचींत पक्की पकडून हतबळ करून टाकली ! प्रेस्टन्च्या लढाईनन्तर क्रॉम्वेल् एडिन्बर्ग्पर्यन्त चाल करून गेला, आणि तेथें सर्व स्थिरस्थावर करून १६४८ च्या नोव्हेंबर महिन्यांत परत लंडन्ला आला.

इकडे लष्करची चढती कमान पाहून पार्लिमेन्ट्मध्यें प्रेस्बिटेरिअन् व सनदशीर पक्षांनीं राजाच्या वतीनें जोरानें चळवळ करण्यास आरंभ केला. हें क्रॉम्वेल्च्या नजरेस जेव्हां स्पष्ट आलें, तेव्हां लष्करशाहीचा अखेरचा तडाखा दाखवून राजाचें नाटक भरतवाक्याला पोंचविण्याचा त्यानें दृढ निश्चय केला.

तीस नोव्हेंबर १६४८, रोजीं पार्लिमेन्ट्नें १६४५ चा 'स्वार्थत्यागाचा ठराव' रद्द करून लष्करी व्यवस्था आपलया कबजांत घेण्याचा घाट घातला. पण दोन दिसेंबरला लष्कर लंडन्मध्यें घुसलें. सहा डिसेंबर रोजीं कर्नल् प्राइड्ची पायदळाची फ्लटण पार्लिमेन्ट्च्या सभागृहाकडे गेली, आणि एकशेंएक प्रेस्बिटेरिअन् सभासदांना अटक करण्यांत आलें ! दुसऱ्या दिवशीं क्रॉम्वेल् लंडन् शहरीं आला, आणि त्यानें असें पुकारलें कीं, 'प्राइड्नें केलेली गोष्ट आमच्या सल्लयानें झालेली नाहीं. पण ज्या अर्थीं आतां तो प्रकार घडूनच आला आहे, त्या अर्थीं त्यास आम्ही पाठिंबा देत आहों' ! अशा तऱ्हेनें पार्लिमेन्ट् सभेचें जबरीनें शुद्धीकरण करण्यांत आलें, व लष्करी सत्तावाद्यांच्या हातीं इंग्लंडच्या शासनाधिकाराचीं सूत्रें गेलीं !

यापुढें या नाटकाचे पुढील अंक, शुद्धीकरणानंतर अवशिष्ट राहिलेल्या पार्लिमेन्ट्च्या साह्यानें क्रॉम्वेल्नें भराभर उरकून टाकले ! "देशाचा दुष्मान व प्रजेचा रक्तपात करणारा" म्हणून राजाची चौकशी करण्याकरितां या अवशिष्ट पार्लिमेन्ट्नें एक खास न्यायमंडळ नेमलें. चौकशीला एक आठवडा लागला, आणि न्यायमूर्तींनीं राजाला देहान्त दंड ठोठावला. यानंतर तीनच दिवसांनीं म्हणजे तीस जानेवारी १६४९ इ. रोजीं व्हाइट् हॉल् राजवाड्यासमोरच ही शिक्षा अमलांतही आणली गेली !

## लोकशाही.

आतां इंग्लंडांत लोकशाही पुकारण्यांत आली, आणि राज्य कारभाराचीं सूत्रें एका अकरा जणांच्या मंडळाकडे नांवाला सोंपविण्यांत आलीं; पण खरी सत्ता क्रॉम्वेल् व त्याचे सैनिक यांच्याच हातीं राहिली.

क्रॉम्वेल्ला पुढें आतां अगदीं निकडीचीं दोन तीन कामें होतीं. सैन्याच्या कांहीं पलटणींत आततायी स्वतंत्रतावादी होते. त्यांना राजसत्ता नको होती, इतकेंच नव्हे तर त्यांना कोणतीच सत्ता नको होती. स्वातंत्र्य व समता यांचा पुकारा ते हरएक बाबतींत करून चळवळ करूं लागले. अर्थात् राज्याची सुव्यवस्था लावण्याला व शान्तता प्रस्थापित करण्याला अधीर झालेल्या नेमस्तस्वातंत्र्यवादी क्रॉम्वेल्ला हें सहन होणें शक्यच नव्हतें. त्यानें मोठ्या तडफेनें व हिंमतीनें या लोकांची अशी खोड मोडली, कीं त्यांनीं क्रॉम्वेल्च्या हयातींत पुन्हां वर डोकें म्हणून काढलें नाहीं.

## आयर्लन्ड्ची मोहीम.

आर्यलन्ड्मध्यें राजपक्षानें मयत चार्लस्च्या मुलाला राजा म्हणून मान्य करून, त्याची 'दुसरा चार्लस्'च्या नांवानें द्वाही फिरविली व युद्धाकरितां सज्ज तयारी केली. हें बंड मोडण्याकरितां क्रॉम्वेल्नें आपली ताबडतोब नेमणूक करून घेतली व सतरा हजार सैन्यानिशीं तो डब्लीन्जवळ एका बंदरीं उतरला. सहा महिन्यांच्या अवधींत त्यानें ड्रॉगेडा, वेक्स्फर्ड्, क्लॉन्मेल्, वगैरे ठाणीं सर केलीं. क्रॉम्वेल्नें आजपर्यन्त मारलेल्या सर्वच लढायांत कत्तलीचा मोठा सपाटा दिसून आलेला होता. पण या आयर्लन्डांतील मोहिमेंत कत्तलीचा त्यानें अगदीं कहरच

उसळू दिला. कत्तलीमध्यें बिनलष्करी नागरिक, बायका, मुलें, व धर्मोपदेशक, यांनाही वगळण्यांत आलें नाहीं. या राक्षसी कृत्यानें आयरिश् लोक इतके भेदरून गेले, कीं, त्यांच्या सैन्याचा मोर्चा ज्या दिशेला वळे, तिकडे आयरिश् लोकांची नुसती धांवपळ सुरू होत असे. बरेचसे रोमन् कॅथोलिक् आयरिश लोक स्वदेशाला रामराम ठोकून परागंदा झाले, व त्यांच्या स्थावर मिळकती क्रॉम्वेल्नें इंग्लिश् प्रोटेस्टंटास देऊन नवीन वसाहती वसविण्याचाही उपक्रम आरंभिला. आयर्लंड्ची मोहीम अशा रीतीनें यशस्वी करून, क्रॉम्वेल् जेव्हां लंडन्ला परत आला, तेव्हां त्याचें सार्वजनिक स्वागत फारच थाटानें करण्यांत आलें.

### स्कॉट्लंड्ची मोहीम.

पण क्रॉम्वेल्ला स्वस्थता मिळण्याचा योगच नव्हता. थोड्याच दिवसांत म्हणजे १६५० सालीं मयत राजाचा मुलगा चार्लस् हा स्वतांच स्कॉट्लंडांत आला, आणि त्याचा सर्वत्र जयजयकार झाला. त्याच्या भोंवतीं सैन्य गोळा होऊं लागलें, आणि स्कॉटिश् प्रेस्बिटेरिअन्चें एक मोठें सैन्य डेव्हिड् लेस्लि या कसलेल्या सेनापतीच्या नेतृत्वाखालीं राजाच्या वतीनें इंग्लंड्शीं युद्ध करण्याला सज्ज झालें. ही बातमी कानीं येतांच क्रॉम्वेल् नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें यत्किंचित्ही विलंब न करतां आपलें सैन्य घेऊन स्कॉट्लन्ड्च्या वाटेस लागला. इंग्लंड् व स्कॉट्लंड् यांच्यामधील सरहद्दीवर पोंचल्यावर क्रॉम्वेल्ला असें आढळलें, कीं सरहद्दीपासून फोर्थ नदीच्या मुखापर्यन्तचा प्रदेश स्कॉटिश् सैन्यानें अगदीं बेचिराख करून टाकलेला आहे. डेव्हिड् लेस्लि हा एडिम्बरो जवळच खंदक खणून मोठ्या बंदोबस्तानें तळ

देऊन राहिला होता. क्रॉम्वेल्च्या सैन्याला रसद न मिळाल्यामुळें त्याचे फार हाल होऊं लागले. त्याचें सैन्य जसजसें हालचाल करी, तसतसें डेव्हिड् लेस्लीचें सैन्य त्याच्या पाठीवर मोठ्या सावधगिरीनें येई, परंतु प्रत्यक्ष लढाईला तोंड न देतां, क्रॉम्वेल्च्या सैन्याला उपासमारीनें दमविण्याचा त्याचा निश्चय होता. ही गनिमी काव्याची लढाई क्रॉम्वेल्ला फारच भोवूं लागली.

### डन्बार व वुर्सेस्टर्.

होतां होतां क्रॉम्वेल्चें सैन्य एडिम्बरोच्या पूर्वेस तीन मैलांवर आलें, आणि तेथें त्याचीं मेटें अगदींच बसलीं. स्कॉटिश् सैन्य भोंवतालच्या टेकडींवर सुरक्षित, माऱ्याच्या पलीकडे होतें, पण क्रॉम्वेल्चें सैन्य तळावर होतें. दुष्काळ आपला विक्राळ जबडा पसरून सर्व सैन्याला स्वाहा करण्यास सिद्ध झाला होता. आतां एक निराशेच्या तिरमिरीनें शत्रूवर निष्फळ हल्ला करून नाहक मरून जावें, किंवा नाक घांशीत शत्रूला शरण जावें, यावांचून तिसरा मार्ग नव्हता! असा आजपर्यंत कधींही न आलेला बिकट नामोशीचा प्रसंग क्रॉम्वेल्वर गुदरला. पण अखेर काय असेल तें असो, स्कॉटिश् सैन्य एकाएकीं डोंगरावरील सुरक्षित जागा सोडून आपण होऊन तळांत उतरूं लागलें! हें पाहतांच क्रॉम्वेल्चा आनंद गगनांत मावेना! त्यानें असे उद्गार काढले, कीं, ईश्वराची इच्छाच आमच्या पक्षास यश देण्याची आहे! म्हणूनच यांना तळांत उतरण्याची बुद्धि होत आहे! असो, सर्व स्कॉटिश् सैन्य तळांत आलेलें पाहतांच क्रॉम्वेल्नें आपल्या सैन्यासह त्यांच्यावर वाघासारखा हल्ला केला, आणि थोड्याच अवकाशांत स्कॉटिश् सैन्याचा अगदीं चुराडा उडाला! यानंतर क्रॉम्वेल्नें एडिम्ब्रो, ग्लासगो, वगैरे शहरें

काबिज केली. अशा रीतीनें एक वर्ष क्रॉम्वेल् स्कॉट्लंड्मध्यें राजपक्षाची उखळणी करीत होता, तोंच १६५१ मध्यें ऑगस्ट महिन्याचे सुमारास दुसऱ्या चार्लस्नें आपल्यास राज्याभिषेक करवून घेऊन, एकाएकीं कांहीं स्कॉटिश् सैन्यानिशीं सरहद्द ओलांडून इंग्लंडवर स्वारी केली ! क्रॉम्वेल्ही त्याचा पाठलाग करीत मागोमाग आला. अखेर त्यानें राजाला वुर्सेस्टर् येथें गांठलें. आदल्या वर्षीं ज्या दिवशीं डनूबार्ची लढाई झाली, त्याच दिवशीं म्हणजे सप्टेंबरच्या तिसऱ्या तारखेस क्रॉम्वेल्नें वुर्सेस्टर् येथें राजपक्षाची अगदीं दुर्दशा उडविली. कत्तलही फार झाली. क्रॉम्वेल्ची हीच शेवटली लढाई होय, यानंतर त्याला लढाईचा प्रसंग पुन्हां न येतां, त्याचें शेष आयुष्य इंग्लंडची सुव्यवस्था लावण्यांतच गेलें. येथें एक गोष्ट नमूद करण्यासारखी आहे, ती ही, कीं, क्रॉम्वेल्च्या लष्करी पेशांत त्याला कोणत्याही समरांगणावर एक वेळसुद्धां हार खावी लागली नाहीं. जगाच्या इतिहासांत इतका सतत विजयी होणारा योद्धा सांपडणें जवळ जवळ अशक्यच आहे. “ माझें कार्य ईश्वरालाच आवडत आहे, ” असें जें क्रॉम्वेल्ला वाटत असे, त्याला सतत, अखंड, विजयसिद्धि हें एक मुख्य कारण होतें. वुर्सेस्टर् येथील विजय म्हणजे ‘ ईश्वरीकृपेचा कडेलोट ! ’ असें तो म्हणत असे.

### क्रॉम्वेल्चें सर्वाधिकारित्व.

या मोहिमेच्या विजयाची बातमी जेव्हां पार्लिमेन्ट्नें ऐकिली, तेव्हां सर्व सभासदांना आनंदाची उकळी आली आणि लंडन् शहरांत सर्वत्र उत्सव करण्यांत आला. मोहिमेवरून क्रॉम्वेल् परत आला, तेव्हां त्याचें स्वागत व अभिनंदन करण्याकरितां कॉमन्स् सभेचे अध्यक्ष,

लंडन्‌चे नगराध्यक्ष, शिष्टमंडळें, पार्लिमेन्ट्‌चे सभासद, वगैरे मंडळीचा घोळकाच्या घोळका लंडन्‌जवळच्या मुक्कामावर गेला. पार्लिमेन्ट्‌नें क्रॉम्वेल्‌ला सर्व राष्ट्रसेनेचा ‘ मुख्य सेनापति ’ ही पदवी दिली; त्याच्या वार्षिक तनख्यांत चार हजार पौंडाची भर घातली, व त्याचें जाहीर आभार मानून त्यास हॅम्पटन् कोर्ट् हा राजवाडा राहण्यास दिला. एवंच पार्लिमेन्ट्‌नें जरी प्रत्यक्ष लेखानें नाहीं, तरी आपल्या करणीनें क्रॉम्वेल्‌ला ‘ सर्वाधिकारी मानिलें. ’

पार्लिमेन्ट्‌मध्यें आतां पुन्हां प्रेस्बिटेरिअन्, वगैरे पक्षाचा जोर होऊं लागला. युद्धाच्या निकडीचें संकट आतां नाहींसें होऊन राजपक्ष अगदीं नामोहरम झाला होता. तेव्हां आतां लष्करची सत्ता संपुष्टांत आणून कांहीं तरी समेटानें राजसंस्थेचा पुन्हां उद्धार करावा, असा बूट पार्लिमेन्टांत निघूं लागला, आणि कायद्याचे शाब्दिक वादविवादांना ऊत येऊन, प्रत्यक्ष राज्यव्यवस्थेचा प्रश्न मुळींच तडीस लागेना.

अशा स्थितींत क्रॉम्वेल्‌नें मनांत आणलें असतें, तर आपल्या लष्करी सत्तेच्या जोरावर त्यास सर्व पक्षांना धाब्यावर बसवून चुटकीसरशी राजसत्ता बळकावतां आली असती. परंतु त्यानें तसें करण्याचें मुळींच मनांत आणलें नाहीं.

लष्करांत नेमस्त स्वातंत्र्यवाद्यांची बहुसंख्या होती, त्यांना होतां होईल तों राजसत्ता नको होती; निदान पूर्वींच्या राजघराण्याचा त्यांस गंधही सोसत नसे. राजकारणांत कांहीं निर्बंधांनीं नियमित केलेली अशी सत्ता अवश्य आहे, हें त्यांस पटण्यासारखें होतें. परंतु धर्म-कारण, समाजकारण, न्यायदान, या बाबतींत लोकांचे हक्क व स्वातंत्र्य

यांत कोणत्याही सत्तेची लुडबुड असतां कामा नये, असें त्यांचें ठाम मत होतें.

क्रॉम्वेल् अर्थातूच या पक्षाचा पुढारी होता. त्याचें म्हणणें असें होतें कीं, "पार्लिमेन्ट् सभेनें राजसत्तेबद्दलचा नसता भानगडीचा प्रश्न उपस्थित करून शुष्क वादविवादांत आतां काळाचा अपव्यय करूं नये. हल्लींची वेळ शाब्दिक कोट्या व वकिली डावपेंच करण्याची नसून, राष्ट्रहिता-करितां प्रत्यक्ष कामगिरी करून दाखविण्याची आहे. लष्करी सत्तेच्याच जोरावर अरेरावीच्या पक्षाला चीत करून पार्लिमेन्ट् निश्चिंत झाली आहे. तेव्हां त्याच लष्कराला सोडचिठी देण्याला राष्ट्रसभेनें सज्ज व्हावें हें कृतघ्नपणाचेंच नव्हे, तर अविचाराचेंही आहे. आजमितीस सर्व देशभर अव्यवस्था माजली आहे. प्रान्तोप्रान्तीं पुंडावे चालू आहेत. जीव व जिनगी, हीं संशयित झालेलीं दिसतात. राजपक्ष आज कंबर मोडून पडला आहे, पण अनुकूल स्थिति येतांच तो पुन्हां उठाव करणार नाहीं, असें नाहीं. अशी स्थिति जोंपर्यन्त आहे, तोंपर्यंत लोकांना पार्लिमेन्ट्सभेचा विश्वास कसा येईल? त्यांचे उद्योगधंदे कसे चालतील? व्यापाराची अभिवृद्धि कशी होईल? लोकशिक्षणाचें गाडें सरळ मार्गाला कसें लागेल? सर्व खात्यांमध्यें सांवळा गोंधळ, लांचलुचपत, व जुलूम जबरदस्ती, यांचा सुळसुळाट चालला असतां त्यांचा नायनाट करण्याचा प्रयत्न न करतां, राष्ट्रसभेनें राजसत्तेच्या तात्विक छळ-वादांत दिवसगत करावी, हें राष्ट्राच्या दृष्टीनें अत्यन्त गर्हणीय आहे. ईश्वराच्या इच्छेनें व स्वाभाविक वस्तुगतीनें या सर्व गोष्टी, लष्कराची सत्ता अबाधित राखूनच, राष्ट्रसभेला करतां येण्यासारख्या आहेत, व तिचें असें करणेंच सयुक्तिक होईल लष्करची सत्ता हातची घालवून

देशाचा बंदोबस्त करूं पाहणें म्हणजे पाय तोडून प्रवासास निघण्या-सारखेंच आहे!"

पण हा सल्ला प्रेस्बिटेरिअन् पार्लिमेन्ट्ला कसचा रुचणार! त्यांना, या लष्करी पकडींतून केव्हां एकदां सुटतों, असें झालें होतें! लष्कर मोडत नाहीं, तेव्हां आरमाराची वाढ करून लष्करला एक प्रतिस्पर्धी सत्ता उभी करावी व लष्करशाहीला पायबंद द्यावा म्हणून त्यांनीं प्रयत्न केला. परंतु त्यानेंही कांहीं वळेना, तेव्हां त्यांनीं नवीनच डाव मांडला. त्यांनीं असा ठराव मंजूर करण्याचें योजिलें, कीं, "प्रस्तुतच्या राष्ट्रसभेचें विसर्जन करावें आणि नवीन निवडणूक करून नवी राष्ट्रसभा भरवावी; मात्र हल्लींच्या सभासदांना नव्या सभेंत निवडणुकीवांचूनच सभासद म्हणून बसण्याचा हक्क असावा!" यांतला कावा असा, कीं, नव्या पार्लिमेन्ट्चें सोंग करून सर्व सत्ता हल्लींच्या कंपूकडेच राहावी, आणि त्यानें नव्या प्रतिनिधिसभेच्या बळावर लष्कराला उधळून, क्रॉम्वेल्ला धाब्यावर बसवावें.

## पार्लिमेन्टची बोळवण.

क्रॉम्वेल्च्या लक्ष्यांत हा सर्व डाव आला, व त्यानें हा ठराव सभेनें विचारास घेऊं नये म्हणून सामोपचाराचे भगीरथ प्रयत्न केले. नवी निवडणूक करून प्रतिनिधि सभा बोलावण्यास तो अनुकूल होता. परंतु निवडणुकीस उभे न राहतां, चालू कंपूचें वर्चस्व राखणें म्हणजे राष्ट्राची वंचना व चेष्टा करणें आहे, असें त्यानें त्या कंपूला वारंवार बजावलें. परंतु सर्व उपड्या घड्यावर पाणी झालें. अखेर १६५३ सालच्या वीस एप्रिलच्या पार्लिमेन्ट्च्या बैठकींत हा प्रश्न विचारा-

करितां घेण्यांत आल्याची बातमी क्रॉम्वेल्ला समजली. तेव्हां त्याचें पित्त खवळलें, आणि आपल्या मनांत कांहींएक दृढ निश्चय करून, तो थोडेंसें सैन्य बरोबर घेऊन सभागृहाकडे गेला. सैन्य बाहेर उभें ठेऊन, तो सभागृहांत शिरला व गरिबासारखा स्तब्धपणें आपल्या जागेवर बसला. पार्लिमेन्ट्पुढें वर निर्दिष्ट केलेला ठराव निकालाकरितां निघाला, व कांहीं पुढारी मोठ्या रसाळ वक्तृत्वपूर्ण वाणीनें तो मंजूर करण्याला सभेस आळवूं लागले. तेव्हां मात्र क्रॉम्वेल्ला गप्प राहावेना. तो एकदम उठून सभागृहांत येरझारा घालूं लागला, व सभासदांना उद्देशून रागाच्या सपाट्यांत अगडधगड बोलूं लागला. अखेर, तो मोठ्यानें ओरडून गरजला, कीं, 'चला, तुम्ही सगळे चालते व्हा, आणि अधिक सच्चा प्रतिनिधीकरितां जागा रिकामी करा!' अशी गर्जना करून, त्यानें आपला पाय जमिनीवर जोरानें आपटला. तत्क्षणींच त्याचे सैनिक सभागृहांत घुसले. सभाध्यक्षाची अधिकार-सूचक गदा सैनिकांनीं उचलून नेली, सभा उधळण्यांत आली, सर्व सभासदांना जबरदस्तीनें बाहेर घालविलें, क्रॉम्वेल्नें सभागृहाचें दार बंद केलें, त्यास टाळें ठोकलें, आणि चावी खिशांत घालून, तो शांतपणें आपल्या वाड्याकडे परत गेला! अशा चमत्कारिक रीतीनें सन १६४० सालीं अस्तित्वांत आलेल्या राष्ट्रसभेची सन १६५३ सालीं क्रॉम्वेल्च्या हातून हकालपट्टी झाली! यानंतर पार्लिमेन्ट्च्या ऐवजीं क्रॉम्वेल्च्या पक्षाच्या १४० लोकांचें एक मंडळ जमलें. या मंडळानें क्रॉम्वेल्ला इंग्लिश् लोकसाम्राज्याचा "संरक्षक" म्हणून पुकारलें आणि सर्व अधिकार त्याला अर्पण करून स्वतांचें विसर्जन केलें!

## राष्ट्रसंरक्षक.

क्रॉम्वेल् 'राष्ट्र संरक्षकाच्या' पदवीला जो चढला, तो तेथेंच आपल्या मृत्यूपर्यन्त टिकून राहिला. लष्कराच्या बळावर त्याला हें स्थान मिळालें, हें कबूल आहे, पण राष्ट्राचा कारभार पहातांना त्यानें या बळाचा लष्करी अरेरावाप्रमाणें दुरुपयोग केला नाहीं, हेंही कोणाला नाकबूल करतां येणार नाहीं. शत्रूबरोबर युद्ध करणें, व राष्ट्राच्या कल्याणाला मारक असे दंगेधोपे व बंडाई पुंडाई मोडणें, याच कामीं त्यानें आपल्या लष्कराचा प्रयोग केला. आपल्या हातीं लष्करी सत्ता आहे म्हणून प्रजेचा वाटेल तसा छळ करावा, किंवा अत्याचार करावे, किंवा जुलूमजबरदस्ती करावी, असें दुष्कृत्य त्यानें कधींही आचरलें नाहीं. तो प्युरिटन् पंथाचा होता, व त्या पंथास साजेशीच त्याची राहणी साधी व काटकसरीची होती, नीति निर्मळ होती, न्यायबुद्धि सरळ होती, परोपकाररीति कळकळीची होती, आणि अन्तःकरणप्रवृत्ति दयाळू होती. तो दानधर्मानें आपल्या खिशाला खार लावून घेत असे, पण प्रजेचा पैसा फार कसोशीनें व राष्ट्रहिताकरितांच खर्च करी. त्यानें आपल्या नातलगांचा बडेजाव कधीं फारसा केला नाहीं. तो एवढ्या मोठ्या वैभवाला चढला, परंतु त्यानें आपल्या मुलांमुलींचे शरीरसंबंध खानदान घराण्यांशीं करण्याचा कधींही प्रयत्न केला नाहीं. तो गाण्याचा शोकी, मंडळीचा भोक्ता, बोलण्यांत कांहींसा रासवट पण प्रेमळ, गुणांचा पारखी, व मनाचा कनवाळू होता. न्याय, समता, धर्मस्वातंत्र्य, शांतता, व सुव्यवस्था, यांच्यावर कटाक्ष ठेऊनच राष्ट्राचा कारभार चालविण्याचा त्याचा निश्चय होता, आणि या निश्चयापासून तो कधींही ढळला नाहीं.

## क्रॉम्वेल्च्या कारभाराचें धोरण.

' राष्ट्र संरक्षक ' झाल्यावर क्रॉम्वेल्नें मनांत आणलें असतें, तर त्याला एकतंत्री, अनियन्त्रित, सुलतानी, सत्ता सहज बळकावतां आली असती व गाजवतांही आली असती. परंतु अशी आपमतलबी इच्छा त्याच्या मनाला कधींही शिवली नाहीं. अनिर्बंध जुलमी राजसत्तेचा बीमोड करून, अखेर आपणच ती बळकावणें म्हणजे राष्ट्राचा केवळ विश्वासघात करणें होय, हें तो जाणून होता. ' राष्ट्रसंरक्षकाच्या ' पदवीवर प्रतिष्ठित झाल्यावर क्रॉम्वेल्नें ' शासनपद्धतीचा ' एक खलिता तयार केला, आणि या खलित्यानें त्याला राष्ट्रसभा बोलावण्याचा अधिकार प्राप्त झाला. त्यानें सन १६५४ मध्यें आपली पहिली पार्लिमेन्ट् बोलावली. या पार्लिमेन्ट्नें एकदम त्याच्या राष्ट्रसंरक्षकत्वाच्या अधिकारावरच आक्षेप घेण्यास सुरवात केली. कायदेपंडित कायद्याचा कीस काढूं लागले. सनदशीरपक्ष अराजकतेच्या कल्पनेनें गांगरून गेला. कोणी वहिवाटीचें माहात्म्य गाऊं लागले. कोणी क्रॉम्वेलविषयीं मत्सरयुक्त होऊन उसळूं लागले. त्याच्या एकंदर अकांडतांडवाचा इत्यर्थ इतकाच होता, कीं, " इंग्लंडच्या पूर्वापार चालत आलेल्या राज्ययंत्राच्या राष्ट्रीय दंडकांत राजाला विशिष्ट व सर्वसंमत स्थान आहे, त्याचे अधिकार स्पष्ट उल्लेखिलेले आहेत, आणि त्याच्याशिवाय राज्ययंत्र साङ्ग होऊंच शकत नाहीं. पण या राष्ट्रीय राज्ययंत्रांत ' संरक्षकाचें ' स्थान कोठेंच नाहीं. त्याचा कोठें नामनिर्देशही नाहीं. तेव्हां आम्हीं त्याचा अधिकार कसा व कां मानावा ? "

या कायदेशीर शहाला क्रॉम्वेलचें उत्तरही बिनतोड व कुरेंबाज आहे. तो म्हणतो, " प्रथमतः, या राष्ट्रसभेपूर्वीं ' संरक्षकाचा '

अधिकार अस्तित्वांत होता, आणि त्याच अधिकारानें बोलावल्यावरून ही सभा अस्तित्वांत आली आहे. तेव्हां 'संरक्षकाच्या' सत्तेवर तुम्हांला आक्षेपच घेतां येत नाहीं. मुलानें आपलें अस्तित्व मान्य केल्यावर बापाचें अस्तित्व नाकारून चालेल तरी कसें? शिवाय, कोणतीही शासनपद्धति घेतली, तींत कोणीतरी तत्त्वतः सर्वश्रेष्ठ सत्ताधारी व्यक्ति कल्पावीच लागणार, मग या व्यक्तीस राजा म्हणा, अध्यक्ष म्हणा, कीं संरक्षक म्हणा, राष्ट्राच्या संमतीनें त्याला ती सत्ता प्राप्त झाली असली म्हणजे झालें. आतां ही सत्ता एकाच घराण्यांत चालली पाहिजे, किंवा तिला अमुक एकच नांव दिलें पाहिजे, हें म्हणणें तात्विक दृष्ट्या वायफळ आहे. मी कांहीं 'संरक्षकाच्या' अधिकाराला हापापलेला नाहीं, किंवा या अधिकारावर मी कांहीं आपल्या स्वेच्छेनें आलेलों नाहीं. ईश्वराची इच्छा, राष्ट्राची संमति, आणि राष्ट्रहिताकरितां शान्तता व व्यवस्था करण्याची निकड, या त्रिपुटीनें मला या पीठावर बसविलें आहे. राष्ट्राच्या संमतीनें दुसरा कोणी सच्चा व लायक इसम हा अधिकार चालविण्यास पुढें येईल, तर तो अधिकार मी त्याच्या स्वाधीन आनंदानें करीन, आणि एलाय् येथें आपला शेतकीचा व्यवसाय करीत आपल्या कुटुंबांत शेष आयुष्य सुखानें घालवीन. परंतु जोंपर्यन्त असा इसम पुढें आला नाहीं, जोंपर्यन्त ईश्वराची इच्छा व राष्ट्राची संमति यांचा भार माझ्यावर आहे, तोंपर्यन्त राष्ट्रसंरक्षणाच्या कामीं मला आपला अधिकार चालविलाच पाहिजे; तें माझें आद्य कर्तव्यच आहे. मी जें बोलत आहें, यांतील अक्षर नि अक्षर खरें आहे. मी हें ईश्वरसाक्षिक सत्य तुम्हांला सांगितलें आहे. हयात स्थितींत माझें व माझ्या अधिकाराचें अस्तित्व तुम्ही

मान्य करा, आणि सर्व राज्यकारभाराची अंमलबजावणी तुमच्याच संमतीनें व तंत्रानें केली जाईल."

परंतु क्रॉम्वेल्चें बोलणें पार्लिमेन्ट् सभेस पटलें नाहीं, आणि क्रॉम्वेल्चें व तिचें जमलें नाहीं. त्यानें तिची लागलीच बोळवण केली. यानंतर कांहीं दिवसांनीं त्यानें दुसरी पार्लिमेन्ट् बोलावली, पण तिचीही काहणी अशीच झाली. मग क्रॉम्वेल्नें पार्लिमेन्ट्चा नाद सोडला, व वेळोवेळीं फर्मानें काढून राज्यकारभार चालविला. त्यानें धर्मस्वातंत्र्य प्रस्थापित केलें; राष्ट्रीय खजिन्याची स्थिति सुधारली; शिक्षणसंस्थांनाही उत्तेजन देऊन ऊर्जित दशेस आणिलें; ज्यांत पशुपक्ष्यांचे हाल करण्यांत येत असत असे लोकांचे करमणुकीचे खेळ कायद्यानें बंद केले; अंमलदारांची लांचलुचपत नाहींशी करून, लोकांना लवकर न्याय मिळावा अशी तजवीज केली; एकंदरींत, सामान्य जनतेस क्रॉम्वेल्च्या कारभाराचा काळ सुखाचा झाला, यांत संशय नाहीं. मध्यन्तरीं कांहीं महिनेपर्यन्त त्यानें इंग्लंड् देशाचे बारा विभाग करून, आपण आंखून दिलेल्या पद्धतीनुसार राज्यकारभार चालविण्याकरितां प्रत्येक विभागांत एकएक लष्करी अंमलदार नेमण्याचा प्रयोग करून पाहिला. परंतु हे अंमलदार अरेरावीपणानें वागून प्रजेस छळतात व त्यांच्याजवळून जबरदस्तीनें पैसे उकळतात, असें आढळून आल्यावरून, त्यानें ती पद्धति मोडून टाकली. सन १६५६ सालीं त्यानें पुन्हां एकदा पार्लिमेन्ट् बोलावली. या सभेनें क्रॉम्वेल्ला 'राजा' हें उपपद धारण करण्याचा फार आग्रह केला व आपला वारस नेमण्याचाही त्याला अधिकार दिला. पण क्रॉम्वेलनें 'राजा' म्हणवून घेण्याचें साफ नाकारलें. आपल्या मुलाला वारस नेमण्याची इच्छा त्यानें दर्शवली असें म्हणतात, परंतु या बाबतींत त्यानें कांहीं खास निश्चित केलें होतें, असें दिसत नाहीं.

## परराष्ट्रांवर छाप.

क्रॉम्वेल्च्या कारकीर्दींत राष्ट्राच्या दृष्टीनें सर्व युरोपांत इंग्लंड्चा दर्जा बराच वाढला. डच् लोकांबरोबर सन १६५२ सालापासूनच युद्ध सुरू होतें, तें १६५४ सालांत तह होऊन समाप्त झालें. या आरमारी युद्धांत इंग्लंडनें दोनतीन ठिकाणीं डच् लोकांचा पराजय करून आपल्यास अनुकूल असा तह करून घेतला. त्यांत एक शर्त अशी होती, कीं, डच् लोकांनीं दुसऱ्या चार्लस्ला आपल्या राज्यांत आश्रय देऊं नये. भूमध्यसमुद्रांत चाच्यांचा फार उपद्रव होता, पण इंग्लंडच्या लढाऊ जहाजांनीं त्यांचा अगदीं पुरा बंदोबस्त करून टाकला, यामुळें इंग्लंडच्या आरमारी कीर्तींत चांगली भर पडली इतकेंच नव्हे, तर त्याच्या परदेशी व्यापारावरही याचा अनुकूळ परिणाम झाला. स्पेन् बरोबरही इंग्लंड्ला दर्यावर व जमिनीवर दोन हात करावे लागले; त्यांत स्पेन् हारीस येऊन त्यानें जमेका बेट इंग्लंडच्या कबज्यांत दिलें; युरोपांतील प्रॉटेस्टंट् लोकांनाही क्रॉम्वेल्नें सैन्याची मदत करून सुखी केलें होतें. फ्रान्सही क्रॉम्वेल्बरोबर तह करण्यास उत्सुक होतें. फ्लॅन्डर्समधील डंकर्क् हें बंदर इंग्लड्ची मर्जी सुप्रसन्न राखण्याकरितां फ्रान्स्नें आपण होऊन इंग्लंड्ला अर्पण केलें.

## अखेर.

अशा प्रकारें स्वदेशांत सुराज्य प्रस्थापित करून व परदेशांत इंग्लंडची मानमान्यता वाढवून, हा अलौकिक महापराक्रमी पुरुष, इ. स. १६५८ सालीं, डन्बार व वुरसेस्टर या लढायांच्या वार्षिक तिथीला म्हणजे तीन सप्टेंबरला मृत्युवश झाला.

# प्रकरण ३ रें.

## शिवाजी.

शिवाजीचा जन्म इ. स. १६२७ सालीं महाराष्ट्रांत जुन्नरजवळील शिवनेरी किल्ल्यांत भोंसले नांवाच्या क्षत्रिय मराठेवंशांत झाला.

### कुलवृत्तान्त.

भोंसल्यांचें कुळ मूळचें राजपुतान्यांतील. इसवी सनाच्या बाराव्या शतकापासून मुसलमानांच्या धाडी राजपुतान्यावर पडूं लागल्या, आणि वेळोवेळीं अनेक रजपूत घराणीं नष्ट झालीं, किंवा त्यांची पांगापांग होऊन परागंदा झालीं. अशाच घराण्यांपैकीं चितोड येथील शिसोद्यांचें घराणें होतें. या घराण्यांतील एक पुरुष देवराज हा महाराष्ट्रांत येऊन राहिला, व येथील क्षत्रिय मराठे समाजांत मिसळून त्यानें शिंगणापूरची पाटिलकी मिळविली. या मूळ पुरुषापासूनचा दहावा वंशज बाबाजी होय. याचे वेळीं हें कुळ भूसामन्त, किंवा भोंसावन्त, ऊर्फ भोंसले, या नांवानें ओळखलें जात असे. बाबाजीकडे वेरूळ, शिंगणापूर, देऊळगांव, जिंती, इत्यादि दहाबारा गांवच्या पाटिलक्या होत्या, व तो शेतीभाती करून वेरूळ येथें राहात असे. पण बाबाजीचे मुलगे मालोजी व विठूजी हे मोठे धाडसी व महत्वाकांक्षी निघाले. त्यांना जमीननांगरटीचें काम अगदींच मेमूळगाडें वाटून, त्यांनीं शिलेदारी करून आपलें नशीब उजवण्याचा दृढ निश्चय केला.

### सोळाव्या शतकांतील महाराष्ट्र.

यावेळीं, म्हणजे इ. स. च्या सोळाव्या शतकाच्या चतुर्थ चरणांत, महाराष्ट्राची राजकीय स्थिति बरीच गुंतागुंतीची, धकाधकीची, व धाल-

मेलीची होती. सन १५६५ मधील तालिकोटच्या लढाईत विजयानगरच्या हिंदु राज्याचा नायनाट झाल्यावर, महाराष्ट्रांत सर्वत्र मुसलमानांचा अंमल प्रस्थापित झाला. यांत अहमदनगरची निजामशाही व विजापुरची आदिलशाही, या दोन पातशाह्या फार प्रबळ होत्या. या दोन शाह्यांत वारंवार कटकटी होत, त्यामुळें त्यांना बरेंच सैन्य नेहमीं बाळगावें लागत असे. या लष्करांत व लष्करी अमलदारांतही मुसलमानांबरोबर हिंदूंचाही पुष्कळ भरणा असे. हिंदु व मुसलमान यांच्यांत संस्कृति, रीतभात, धर्माचार, नैतिक कल्पना, इत्यादि सर्वच गोष्टींत तफावत होती, आणि हिंदूंपेक्षां मुसलमान लोक जास्त कडवे व विलासी होते, हें कांहीं खोटें नाहीं. पण दख्खनच्या मुसलमानांचें रक्त बरेंच नरम होतें, आणि राजकीय परिस्थितीच्या निकडीमुळें हिंदूंशीं त्यांना नमतेंजमतें घेणें अवश्य झालें होतें. मधून मधून हिंदूंवर जुलूम जबरदस्ती व अत्याचार होत, धर्माचे बाबतींत त्यांचा छळ होई, त्यांच्या देवळादिकांचा विध्वंस होई, आणि मुसलमानी दिमाख्याच्या इंग्याखालीं त्यांना गुलामगिरीचा अनुभव घ्यावा लागे. मुसलमानांतही दिलदार, न्यायी नीतिवन्त, सज्जन पुष्कळ असत, पण हिंदूंचा व मुसलमानांचा खटका उडाला म्हणजे हे सज्जनही बहुधा सच्चा खोटा न पाहतां, आपल्या धर्मबंधूचीच कड घेत, आणि हिंदूंच्या हालअपेष्टांत भर घालीत. परंतु असे प्रकार नेहमींच व सर्वत्र घडत नसत. सामान्यतः हिंदूंचा राजकारणांत हात बराच चाले. सामान्य नोकरापासून तो दिवाणगिरी—सरदारकीपर्यन्त सर्व हुद्यांवर थोडेबहुत हिंदु दोन्हीं पादशाह्यांत होते. लष्करांत हिंदू शिलेदारांचा बोलबाला चांगलाच झाला होता, आणि शिलेदारांचीं पथकें बाळगणाऱ्या मराठे

सरदारांचें वजन व वचक सरकारदरबारीं पुष्कळ असे, इतकेंच नव्हे, तर कधीं कधीं सर्व राज्याचीं सूत्रेंही त्यांच्याच मुठींत असत. शिवाय, हिंदूंनां सांभाळून घेऊन त्यांची मर्जी प्रसन्न राखण्याची आवश्यकता या दख्खनच्या सुलतानांना वाटण्याचें आणखी एक जबरदस्त कारण होतें. हें कारण म्हणजे मोंगलांची भास्ती ! अकबर बादशहाचा दख्खनवर मोठा डोळा होता. इकडील सुलतानशाही मोडून हिमाचला-पासून सेतुबंधापर्यन्त मोंगलसत्ता ताणण्याचें त्याच्या मनांत फार होतें, व त्याच्या सैन्याच्या धाडी नर्मदा ओलांडून निजामशाहीवर वारंवार आपटत. अकबराचेंच व्रत पुढें त्याचा मुलगा, नातू, व पणतू, यांनीं कसून चालविलें, परंतु दख्खन इतकी चिंवट व चामट ठरली, कीं तिला गिळून पचविण्याचें मोंगलांना कधींच साधलें नाहीं ! महाराष्ट्राचें मोंगलांपासून संरक्षण करण्याची भावना दख्खनचे मुसलमान व मराठे या दोघांच्याही अन्तःकरणांत समान होती. दख्खन ही आमची आहे, आणि मोंगल हे परके हींत घुसूं पाहत आहेत, असें उभयतांही मानीत. याचा अर्थ असा, कीं, मराठ्यांच्या अन्तरंगांत त्या काळीं दख्खनविषयीं जो अभिमान व प्रेम वसत होतें, त्यांत, हिंदूंच्या राज-कीय स्वातंत्र्याविषयीं तळमळ किंवा धर्मभावनेची कळकळ यांचा गंधही नव्हता. दख्खनचे सुलतान हे आपले स्वामी—मालक—आहेत, त्यांची सेवा करणें आपला धर्म आहे, आणि त्यांच्याच कृपेनें व साह्यानें आपली होईल तेवढी भरभराट करून घ्यावी, असे सामान्यतः सर्व मराठे सरदारांचे विचार होते. असें नसतें, तर लखुजी जाधवासा-रखा, आपण देवगिरीच्या रामदेवरावाचे सरळ वंशज म्हणून तोरा मिरवणारा राजबिंडा पठ्ठ्या, ‘ जाऊं द्या. हिंदूंचें राज्य गेलें; आतां

यवनी चांदाची सदी आहे. वेळवखत पाहून वागलें पाहिजे, ' असे उद्गार काढून, निजामशाहाच्या चाकरीस स्वसंतोषानें राहताना.

## मालोजी भोंसले.

असो, अशा परिस्थितींत मराठ्यांच्या उत्साही तरुण बांडांना शिलेदार व्हावें, आणि, देशांत पुंडाई करून किंवा दख्खनच्या सुलतानांच्या लष्करांत चाकरी पत्करून, आपला भाग्योदय करून घ्यावा, अशा मतलबी महत्वाकांक्षेचा नाद लागावा, यांत आश्चर्य तें कसलें! याच उत्साहाचा संचार वेरूळच्या बाबाजी पाटलाच्या मालोजीच्या अंगांत झाला, आणि तो निजामशाहींतील सरदार लखुजी जाधव यांच्या आश्रयानें शिलेदारी करूं लागला. मालोजी भोंसल्याचें धाडसी शौर्य, चातुर्य, व धोरण, हीं पाहून जाधवरावाची मर्जी मालोजीवर सुप्रसन्न झाली, व लवकरच त्यांच्या दोघांमध्यें घरोब्याचा संबंध जडला इ. स. १५९९ मध्यें जाधवरावानें शिंदखेडास आपल्या वाड्यांत रंगपंचमीचा दरबार भरला. त्या प्रसंगीं जाधवरावाची तीन वर्षांची मुलगी जिजा व मालोजीचा पांच वर्षांचा मुलगा शहाजी, हीं दोघेंजणें गुलाल खेळत असलेलीं जाधवरावानें पाहिलीं. तेव्हां जाधवराव दरबारी मंडळीस उद्देशून सहज म्हणाले, “ हा जोडा मोठा नामी दिसतो, नाहीं ? ” यावर मालोजी तत्काळ उभा राहून, दरबारास साक्षी ठेवून, मोठ्यानें म्हणाला, “ जाधवराव आजपासून आमचे व्याही झाले, आणि जिजाऊ आमची सून झाली ! “ पण मालोजीनें आपणास सहजासहजीं उच्चारलेल्या शब्दांत धरावें याचें मानी जाधवरावास मोठें वैषम्य वाटलें, आणि दरबार उलगल्यांवर त्यानें मालोजीला स्पष्ट सांगितलें, कीं, “आम्ही देवगिरीच्या यादवांचे राजवंशीय. आमची तुमची योग्यता कुठें!

ज्यानें त्यानें आपल्या पायरीनें वागावें. आमच्याच तैनातींत असलेल्या पथक्याशीं आमच्या घराण्याचा शरीरसंबंध होईल तरी कसा ? ” हें बोलणें तापट मालोजीला मुळींच सहन झालें नाहीं, त्यानें ताबडतोब प्रत्युत्तर केलें, कीं, “ ठीक आहे, तुमच्या बरोबरीचा होईन, तेव्हांच जिजाऊस मागणी घालण्याकरितां येईन ! ” असें म्हणून मालोजी तिरमिरीसरसा शिंदखेडाहून निघाला, तो वेरुळास येऊन दाखल झाला. तेथें त्याला लवकरच शेत नांगरींत असतां द्रव्याचा ठेवा सांपडला, आणि या अवचित लाभाचा त्यानें चांगला उपयोग केला. त्यांतील कांहीं अंश त्यानें धर्मकार्यांत खर्चिला. ब्राह्मणफकिरांना अन्नदान दिलें, शंभुमहादेवीं तलाव बांधला, आणि वेरूळच्या घृष्णेश्वराच्या मंदिराची रचना केली. बाकीचें द्रव्य त्यानें हत्यारें पात्यारें व घोडीं खरेदी करून शिलेदार बनण्याच्या कामीं लाविलें.

## निजामशाहीचा डळमळणारा डोलहारा.

मध्यन्तरीं निजामशाहीला फार वांकडे दिवस आले. इ. स. १६०० पासून अकबरानें निजामशाही बुडविण्याचा मोठाच पेगम केला. शहाजादा मुराद हा मोठ्या फौजेनिशीं नर्मदा उतरून अहमदनगरावर चाल करून आला. यावेळीं मलिकंबरानें निजामशाही वांचविण्याची शिकस्त केली. पण यश आलें नाहीं. अहमदनगर पडलें आणि बहादूर निजामशहा मोंगलांच्या हातीं सांपडला. तरीपण मलिकंबरानें कंबर खचूं न देतां दरबारचें सदर ठाणें पारिंड्यास नेलें आणि पोरवयी मूर्तिजाला तक्तनशीन करून मरणाऱ्या निजामशाहीच्या तोंडांत पाणी घालून तिची धुगधुगी राखली. याच काळांत म्हणजे इ. स. १६०० ते १६०४ च्याा अवधींत मालोजीनें चांगलीच मुलुखगिरी केली व आपली पागा

मातबर वाढवली. त्याचा मेव्हणा फलटणाचा निंबाळकर याचाही त्याला चांगला पाठिंबा मिळाला. त्या धामधुमीच्या काळांत मालोजी आपल्या साहसानें व शौर्यानें अल्पावधींत उदयास येऊन त्याचें निजामशाहींत बरेंच प्रस्थ माजलें. मलिकंबराजवळ त्याचें बास्तान नीट बसल्यामुळें त्याला ' राजे ' हा किताब वंशपरंपरा मिळाला. शिवाय, पुणें, सुपें, चाकण, व इंदापुर, येथील देशमुखी व जुन्नरजवळील शिवनेरी किल्ला, यांचाही लाभ झाला. अर्थात् मालोजीला आतां लखुजी जाधवरावाच्या मांडीला मांडी लावून बसण्याचा अधिकार आला. यानंतर मालोजीनें मलिकंबरास आपलें वजन व भीड खर्चीं घालावयास लावून, जाधवरावास जिजाऊ व शहाजी यांच्या लग्नास संमति देण्याचें भाग पाडलें. जाधवराव जुलमानें मालोजीचे व्याही झाले खरे, पण त्यांच्या मनांतील तेढ सरळ न होतां तिला अधिकच अढी पडली! तरी पण मालोजीचा उत्कर्षच होत गेला. इ. स. १६२० मध्यें मालोजीचा काळ झाला. मालोजीच्यामागें त्याची सरदारकी त्याचा मुलगा शहाजी याजकडे आली. शहाजी तर जाधवरावाचा प्रत्यक्ष जांवई, पण या जांवयाचाही द्वेष सासरा करूं लागला!

मलिकंबरानें जवळजवळ दोन तपें निजामशाहीला सांवरून धरण्याकरितां जंगजंग पछाडले. पण त्याला माघारच येत चालली आणि अखेर तो अगदीं टेकीस आला. या निजामशाहीच्या पडत्या काळांत स्वार्थलोभानें व शहाजीविषयींच्या द्वेषानें जाधवरावही मोंगलास जाऊन मिळाले, आणि दखखनवर उलटले! ( १६२१ ) निजामशाहीचा डळमळणारा डोल्हारा सांभाळण्याची कामगिरी आतां मुख्यतः शहाजीवरच येऊन पडली.

## बाणेदार जिजाऊ.

इ. स. १६२७ मध्यें मोंगलाशीं झुंज करीत असतां, शहाजीस माघार आली, व बचावाकरितां त्यानें आपल्या सैन्यासह जुन्नरमार्गे फलटणकडे धूम ठोकली, आणि मोंगलांच्या तर्फे लखुजी जाधवराव हे त्यांचा पाठलाग करीत आले. या वेळीं शहाजीबरोबर जिजाऊही होती. ती गरोदर असून तिचे दिवस अगदीं भरले होते. तेव्हां या धांवपळींत तिला रखडवणें इष्ट नाहीं असें वाटून शहाजीनें जिजाईस जुन्नरास ठेऊन देऊन, तो आपण स्वतां पुढें झटकला. इतक्यांत जाधवराव पाठलाग करीत तेथें आले, आणि पाहतात तों जिजाऊ एकटीच आहे! अर्थात् तिची त्यावेळची अवस्था पाहून बापाचें अन्तःकरण पाझरलें! त्यानें तिला सांगितलें कीं, " आमचें भांडण शहाजीशीं आहे. तूं कशी झालीस तरी आमची लेंक. येथें आतां मोंगलांचा सुळसुळाट होईल, तरी तुला पालखींत घालून बंदोबस्तानें शिंदेखेडास पाठवितों, म्हणजे पुढील सर्व तजवीज नीट होईल." पण जिजाबाईनें त्याला झणझणीत उत्तर दिलें, कीं, " आपण जरी माझे जन्मदाते असलां, तरी हल्लीं मोंगलांचे पक्षपाती आहां. तुमचा आसरा मला नको. हा शिवनेरी किल्ला भोंसल्यांचा सत्तेचा आहे. मी येथेंच राहणार. तुम्हीं आपले राजांच्यामागें पाठलागाला जा! माझें काय होणें असेल तें होईल." हें ऐकून जाधवराव गपचूप चालते झाले. जीजाबाईस लवकरच यथाकालीं पुत्ररत्न झालें. हाच मुलगा म्हणजे प्रस्तुत चरित्राचा नायक शिवाजी होय.

## निजामशाहीचा इतिश्री.

मलिकंबर इ. स. १६२६ त वारला, आणि तेव्हांपासून तों सन १६३६ पावेतों निजामशाहीच्या बचावाकरितां शहाजी मोगल फौजेशीं

सारखा झुंजत होता. याकामीं विजापुरच्या आदिलशहाकडून त्यास कधीं साह्य होई, तर कधीं विरोध होई. या दहा वर्षांच्या मुदतींत शहाजीनें मुलुखगिरींत मोठी मर्दुमकी केली, अनेक वेळां मोंगलास पेंचांत आणलें, आणि रणांत उभें राहून दोन हात करणें अशक्य झाल्यावर गनिमी काव्याचें युद्ध मोठ्या शर्तीनें चालवून आपला बराच बचाव केला. १६२८ त शहाजहान बादशहा स्वतां दक्षिणेंत आला, आणि तेव्हांपासून निजामशाहीची शंभरी पुरी भरल्याचें ठरूनच गेलें होतें. बादशहाची दीडदोन लाख फौज सारखा हुतुतू घालून, निजामशाहीचा एकेक लचका ओढून तिच्या नाड्या आंखडीत होती. वेळ पडेल त्याप्रमाणें निजामशाहीचें सदर ठाणें अहमदनगराहून परिंड्यास; तेथून दौलताबादेस, तेथून भीमगडास, व अखेर १६३५ त माहुलीस असें हटत चाललें! १६३३ च्या सुमारास मलिकंबराचा मुलगा फत्तेखान हा शत्रूस सामील होऊन त्यानें दुसऱ्या मूर्तिजाचा खून केला आणि दौलताबाद मोंगलाच्या ताब्यांत दिली. तेव्हां शहाजीनें भीमगडास तिसरा मूर्तिजा या अर्भकास गादीवर बसवून निजामशाहीची पुन्हां प्राणप्रतिष्ठा केली व स्वतां राज्याधिकार आपल्या हातांत घेतले. पण यानंतर मोंगलांनीं चेपल्यामुळें शहाजीनें माघार घेऊन माहुली किल्ल्याचा आश्रय केला, व तेथें दरबार थाटला. परंतु तेथेंही मोंगलांनीं थोड्याच दिवसांत वेढा दिला, व शहाजीचा अगदीं कोंडमारा केला. यावेळीं जिजाबाई व शिवाजी हीं दोघेंजण शहाजीजवळच माहुलीस होतीं. असो, आतां आपली तग लागत नाहीं, आणि निजमाशाहीच्या प्रेताला मिठी मारून बसल्यास आपल्या सर्वस्वाचा नाश होईल, हें ध्यानीं आणून सन १६३६ त शहाजीनें मोंगलाचा

सरदार खानजमान याजबरोबर तहाचें बोलणें लावलें, आणि बाळ-निजामशहा आणि निजामशाहीचे शिल्लक असलेले सहा किल्ले त्याचे स्वाधीन करून, आपण स्वतां विजापुरच्या आदिलशहाची नोकरी करण्याचें ठरविलें.

## शहाजी, अदीलशाईचा सरदार.

आदिलशहानें शहाजीकडे निजामशाहींतून आलेली पुणें व सुपें प्रांताची जहागीर कायम केली; शिवाय, आदिलशहानें निजामशाही बुडविण्याचे कामीं मदत केल्यामुळें शहाजहानाकडून त्याला निजामशाहीच्या प्रांतांतील ८० लाख उत्पन्नाची जी वांटणी मिळाली होती, त्या नव्या प्रान्ताची व्यवस्था करण्याच्या कामगिरीवर शहाजीचीच नेमणूक करण्यांत आली! शहाजीनें ही कामगिरी चोख बजावलयामुळें त्याची आदिलशहानें लगेच सन १६३८ सालीं कर्नाटक प्रान्तांत रणदुल्लाखानाच्या हाताखालीं नेमणूक केली. कर्नाटकांतल्या मोहिमेंत शहाजीनें अशी हुशारी, मर्दुमकी, व कार्यकुशलता दाखविली, कीं महंमद आदिलशहानें त्यास कर्नाटकांतले पांच प्रान्तांची जहागीर दिली. याच जहागिरीवर शहाजीनें आपलें बाकीचें बहुतेक आयुष्य घालविलें. तो येथें जवळजवळ स्वतंत्र रीतीनेंच अंमल चालवीत असे. विजापुर दरबारचा वार्षिक ऐवज पोंचविला म्हणजे आपण दरबारचे कांहीं लागत नाहीं अशा थाटानें शहाजीनें कर्नाटकांत सत्ता भोगली. तो विजापुरदरबारींही स्वतां फारसा येत जात नसे. एकंदरींत कर्नाटकांत गेल्यापासून शहाजीचा महाराष्ट्राबरोबरचा संबंध तुटल्या सारखाच झाला.

## शहाजी व जिजाबाई.

अशा प्रकारच्या घालमेलीच्या स्थितींत इ. स. १६२७ सालीं जन्मलेल्या शिवाजीस आपल्या पुढील वैभवशाली राष्ट्रीय कामगिरीचें शिक्षण शाहाजीकडून मिळणें शक्यच नव्हतें. शिवाजीच्या जन्मानंतर तिसऱ्या वर्षीं शहाजीनें दुसरें लग्न केलें व त्यानें जिजाबाईचें नांवच बहुतेक सोडलें. शिवाजी हा जिजाबाईचा दुसरा मुलगा तिचा पहिला मुलगा संभाजी हा शहाजीचा फार आवडता होता, व तो नेहमीं बापाबरोबरच असे. संभाजीचा जन्म १६२३ सालीं झाला. याच्या पूर्वींच एक दोन वर्षें जिजाईचा बाप लखुजी जाधव हा मोंगलास मिळून निजामशाहीचा शत्रू बनला होता, व यानंतर शहाजीचे व लखुजीचे उघड उघड रणांगणांत दोन हात होऊं लागले. या कटकटीमुळें जिजाबाई शहाजीच्या मनांतून उतरूं लागली होती, आणि १६३० मध्यें शहाजीनें दुसरें लग्न केल्यावर ही अढी अगदीं पक्कीच झाली. शिवाजी सहासात वर्षांचा होई पर्यन्त शहाजीनें त्याची व जिजाईची कधींच गांठ घेतली नाहीं. पुढें १६३४त पुणतांब्याजवळ वैजापुरास या दोघांस शहाजीनें कांहीं दिवस ठेवल्याचें आढळतें. त्यानंतर पुढील वर्षीं तीं शहाजीजवळ माहुलीच्या किल्ल्यांत होतीं. १६३६ सालीं शहाजी निजामशाहीची वासलात लागल्यामुळें आदिलशाहींत नोकरी धरून कांहीं दिवस आपल्या पुण्याच्या जहागिरीवर येऊन राहिला, परंतु एक वर्षाच्या आंतबाहेर त्याची बोळवण कर्नाटकाच्या मोहिमेवर करण्यांत आली. म्हणजे बाल शिवाजीला कांहीं विशिष्ट तऱ्हेचें शिक्षण शहाजीकडून मिळालें असेल, असें म्हणतांच येत नाहीं.

## शिवाजीचें शिक्षण.

शिवाजीला खरें खरें शिक्षण त्याच्या आईकडूनच लाभलें. ही बाई मोठी करारी, अभिमानी, तेजस्वी, धर्मनिष्ठ, व धोरणी होती. शिवाजी मोठा होईपर्यन्तचा तिचा सर्व काळ चिंता, दुःख, व कष्ट, यांतच गेला. बापाचें व नवऱ्याचें हाडवैर असल्यामुळें तिला माहेरीं व सासरींही खरें सुख कधीं लाभलें नाहीं. आपला बाप, भाऊ, व नवरा, हे सारे केवळ व्यक्तिविषयक स्वार्थानें प्रेरित होऊन मुसलमानांच्या सेवेंत राबत आहेत, ह्या देखाव्याचा तिला अगदीं तिटकारा आलेला होता. या रणगाजींची मर्दुमकी नुसती अनाठायीं वेंचत आहे, याबद्दल तिच्या जिवाला रात्रंदिवस तळमळ लागली होती त्यांत दौलताबादेस जेव्हां तिच्या बापाचा व भावाचा बळि हुसेन निजामशहानें सन १६२९ त घेतला, आणि निजामशाहीकरितां झगडतां झगडतां अखेर जेव्हां तिचा नवरा निजामशाही बुडविण्यांत मदत करणाऱ्या आदिलशहाचा सरदारी नोकर बनला, तेव्हां, ह्या सर्व खटपटी व लटपटी आम्ही मराठे कशाकरितां करतों, हा विचार या बाईच्या मनांत येऊन तिला मरणप्राय दुःख होत असे. या मराठ्यांना शुद्धीवर आणून त्यांना कोणीतरी खऱ्या कल्याणाची दिशा दाखवली पाहिजे, अशी चुटपूट तिच्या जीवाला लागली होती. भोंसल्यांच्या कुळांत कोणीतरी शककर्ता राजा होईल, असा साक्षात्कार आपला सासरा मालोजी यास झाला असल्याची गोष्ट तिनें ऐकिली होती व ती तिच्या अन्तरंगांत पूर्णपणें बिंबली होती; आणि तिच्या मनानें असेंही घेतलें होतें, कीं, आपला शिवाजी हाच तो शककर्ता होणार ! माहेराला मुकलेली आणि नवऱ्यानें हेळसांडलेली अशी ही जिजाबाई केवळ आपल्या शिवाजीच्या

पुढील अलौकिक चरित्राच्या आशेवर भिस्त ठेवून स्वस्थ बसली होती असें नाहीं, तर लहानपणापासून तिनें शिवाजीला याच हेतूनें शिक्षण देण्यास सुरवात केली. कोणतेंही मोठें कार्य नेटानें सिद्धीस नेण्यास शारीरिक, मानसिक, व आत्मिक, असें तिहेरी बळ मनुष्यास लागत असतें, आणि जिजाबाईच्या शिकवणीनें हें बळ शिवाजीच्या अंगीं आलें. तालीम, मर्दानी खेळ, स्वारीशिकारी, यांविषयींची आवड कोणाच्याही मनांत साहजिक उत्पन्न होण्यासारखी त्या काळची परिस्थिति होती. शिवाय, शिवाजीपुढें आपल्या प्रौढप्रताप वडिलांची कीर्ति व कामगिरी प्रत्यक्षच होती. तेव्हां वडिलांप्रमाणें आपण पराक्रमी व्हावें, क्षत्रिय-विद्येंत निपुण होऊन अचाट मुलुखगिऱ्या कराव्या, शत्रुमित्रावर दाब ठेऊन अंमल गाजवावा, इत्यादि विचार शिवाजीच्या अन्तरंगांत बाळ-पणापासून उसळत असले तर त्यांत नवल मुळींच नव्हतें. परंतु या विचारांस व्यवस्थित व निश्चित दिशा लावण्याचें महत्वाचें कार्य जिजा-बाईनें केलें. ती त्याला रामायण व महाभारत या ग्रंथांतील वीरमणींच्या कथा मोठ्या आदरानें, रसाळपणानें, व वेधक वाणीनें सांगे. तसेंच पुराणकीर्तनश्रवण त्याला घडवी. त्याच्याकडून मराठी पौराणिक ग्रंथही वाचवून घेई. पुराणप्रसिद्ध वीरांच्या पराक्रमाच्या कथांनीं, आपण असेच कांहीं तरी पराक्रम केले पाहिजेत, हें बाल शिवाजीच्या मनानें घेतलें. पण पराक्रम करावयाचे ते सत्कार्याकरितां, देवाधर्माकरितां, सर्व समाजाच्या हिताकरितां असले पाहिजेत, हें तत्त्व शिवाजीच्या मनांत जिजाबाईनें आरंभापासूनच ठसविलें. ती त्याला महाराष्ट्राच्या पूर्व इति-हासांतले कांहीं प्रसंग व दन्तकथा वारंवार सांगे. ती म्हणे, "महाराष्ट्र हा पूर्वीं देवगिरीच्या यादवांचा होता. हे यादवच आमच्या

जाधव घराण्याचे पूर्वज. पण कोठें ती यादवांची साम्राज्यसत्ता आणि कोठें आमची आजची गुलामगिरी ! मुसलमानांची धाड उत्तरेकडून कोसळली आणि त्यांनीं यादवांचें राज्य हिरावून घेतलें. त्यांनीं यादवांना व इतर मराठ्यांना स्वदेशांतच दास बनविलें. जेथें फुलें वेंचलीं, तेथेंच गोंवऱ्या वेंचण्याकरितां हे मराठे आतां लठ्ठालठ्ठी करीत आहेत. ज्यांनीं स्वतंत्रता भोगली, तेच आतां परकी राजांच्या मर्जी संभाळून त्यांच्या आश्रयानें जीवन्त राहण्यांत आनंद मानीत आहेत. आम्हां मराठ्यांत पराक्रम नाहीं, बुद्धि नाहीं, साहस नाहीं, भावना नाहीं, अशांतला भाग नाहीं. परंतु आमच्यापुढें योग्य व विशाल असें कोणतेंच साध्य नाहीं. जो तो आपला मानमरातब, आपलें कुटुंब, आपलें स्वास्थ्य, आपलें वतन, आपली जहागीर, इतक्या पुरताच पाहणार ! याच्यापलीकडे कोणाचीच नजर जात नाहीं. आपल्या मतलबाकरितां आपल्याच देशबांधवांच्या, आपल्याच जातगोताच्या, गळ्यास तात लावण्यास ते मागेंपुढें बघत नाहींत ! स्वार्थाशिवाय कोणतेंच निश्चित ध्येय समोर नसल्यामुळें आज निजामशाहीची पाठ राख, उद्यां मोंगलांना शरण जा, परवां आदिलशाहीचा नोकर हो, असें वर्तन मोठमोठ्या प्रतिष्ठितांच्याही हातून घडतें. मग इतरांची कथा कशाला हवी ? देव, देश, व धर्म, यांकरितां कोणीही मराठा वीर एकनिश्चयानें दंड थोपटून पुढें आलेला दिसत नाहीं. समाजाची जूट व आपलेपणा नाहींसा झाला आहे. गोमाजीवर कांहीं अत्याचार घडला, तर त्यानें आपला बचाव वाटेल तसा करावा, नाहीं तर मरावें, पण शेजारचा तिमाजी त्याच्या मदतीकरितां धांवणार नाहीं, असा अविचारी उदासी-

नपणा लोकांच्या अन्तरंगांत घुसला आहे. तो उदासीनपणा झाडून टाकून त्यांस देशहिताचा खरा मार्ग दाखविणारा नायक लाभला पाहिजे. त्यांचीं आपसांतलीं भांडणें, मत्सर, तंटेबखेडे, मोडून काढून, त्यांची एकजूट करून, त्यांच्या हातून देशकार्य व देवकार्य घडवून आणणारा पुरुष उत्पन्न झाला पाहिजे." अशा प्रकारचा उपदेश जिजाबाईनें लहानपणापासूनच शिवाजीच्या अन्तःकरणावर ठसविला, आणि हा ठसा तेथें अखेरपर्यन्त ठरला. शिवाजीनें आपल्या राष्ट्रीय कामगिरीचा उपक्रम केल्यावर प्रसंगानुसार त्यालाही वेळोवेळीं पड घेण्याची, मोंगल आणि विजापुरकर यांच्याशीं परस्पर विरोधी संधानें बांधण्याची, किंवा आपल्याच जातगोतांतील माणसांस गोत्यांत आणण्याची, पाळी आली, पण या सर्व गोष्टी करतांना त्यानें आपल्या राष्ट्रीय ध्येयाचा विसर कधींही पडूं दिला नाहीं. आपल्या एकट्याच्या स्वार्थाचा त्याच्यावर कधींच पगडा बसला नाहीं. आपण जें कांहीं करीत आहों, तें देवाकरितां, देशाकरितां, धर्माकरितां, गोब्राह्मणप्रतिपालनाकरितां करीत आहों, अशीच त्याची बुद्धि होती, व या कामीं देवाचें आपल्यास साह्य आहे, किंबहुना याच कामगिरीकरितां देवानें आपल्यास जन्मास घातलें आहे, तेव्हां कांहीं झालें तरी या कर्तव्यापासून आपण पराङ्मुख होतां कामा नये, अशी त्याची दृढ श्रद्धा होती. या सर्वांचें बीज आपल्या मातुःश्रींच्या शिक्षणांत होतें, हें शिवाजी निरन्तर स्मरत असे. या मायलेकांत निर्मल प्रेमादर होता. शिवाजीला जेव्हां जेव्हां रिकामपण सांपडे, तेव्हां तेव्हां तो नेहमीं आपल्या आईच्याच सहवासांत राही, व सर्व राजकीय उलाढालींत तो तिचा सल्ला घेत असे. शिवाजीच्या राज्याभिषेकानंतर एक पंधरवड्याच्या आंतच या

राजमातेचा अन्त झाला. आयुष्याचा पूर्व भाग जिला अत्यन्त कष्टांत व मानहानींत काढावा लागला, तिलाच मृत्यूपूर्वी आपला आवडता मुलगा महाराष्ट्रांत सर्वपरीनें यश संपादन करून शककर्ता राजा झालेला पाहण्याचें अपूर्व भाग्य लाभलें !

### दादो कोंडदेव कुळकर्णी

सन १६३७ चे सुमारास शहाजीची विजापुरकरांनीं कर्नाटकाच्या मोहिमेवर रवानगी केली, त्यावेळींच पुण्याकडील जहागीर त्यानें जिजाबाईस तोडून दिल्यासारखी केली. शहाजीच्या आतां दोन बायका असल्यामुळें कुटुंबांत तंटाफिसाद होऊं नये म्हणून जिजाबाईची स्वतंत्र व्यवस्था करण्याचें त्यानें मनांत योजिलें होतें, असें दिसतें. नंतर कर्नाटकांत नवी मोठी जहागीर मिळाल्यावर हा विचार त्यानें कायमच केला, आणि पुण्याकडील जहागीर सर्वस्वींच शिवाजीच्या नांवानें करून दिली. असो. कर्नाटकांतील कामगिरीवर जातांना शहाजीनें पुण्याकडील जहागिरीची व्यवस्था पाहण्याकरितां जिजाबाईच्या मदतीस दादो कोंडदेव कुळकर्णी याची नेमणूक केली. हा दादाजी मुलकी व न्यायमुनसफीच्या कामांत फारच हुशार होता. त्यानें पुणें प्रान्ताची सुव्यवस्था लाविली, योग्य जमीनधारापद्धति अमलांत आणून शेतकऱ्यांना संतुष्ट केलें, आणि पुष्कळ सवलती देऊन ओसाड जमिनी लागवडीस आणल्या. त्यानें देशमुख, देशपांडे, इत्यादिकांचे आपआपसांतील वांटपांचे वगैरे दावे योग्य निकालीं लावून तंटेबखेडे मोडले. शेतीचा विध्वंस करणाऱ्या रानटी पशूंचा नाश करण्यासाठीं बक्षिसें देण्याचा त्यानें उपक्रम सुरू केला, व आपापल्या गांवचा बंदोबस्त राखण्याचे अधिकार रहिवाशांस दिले. याचा परिणाम असा झाला, कीं,

पुण्याखालचीं व जुन्नराखालचीं जीं बारा मावळें भिकार, नापीक, व कर्जेदलाल म्हणून गणलीं जात असत, तोच प्रान्त आतां दादो कोंडदेवाच्या अमदानींत बराच सुखी, सुपीक, व व्यवस्थित झाला, व वसूलही वाढून बिनहरकत येऊं लागला. ही मावळची जहागीर जिजाबाई व शिवाजी यांस शहाजीनें तोडून दिल्यासारखी केली आहे, आणि वयांत आल्यावर शिवाजीला हिची व्यवस्था उत्तम रीतीनें राखतां येईल असें शिक्षण त्यास दिलें पाहिजे, ही जाणीव दादाजीस पूर्ण होती, व त्यानें हें कर्तव्य आरंभापासूनच उत्तम प्रकारें बजावलें. तो फिरतीवर निघाला कीं शिवाजीस आपल्याबरोबर नेई, यामुळें शिवाजीला आपल्या प्रान्ताच्या कोनाकोपऱ्याचीही उत्तम माहिती झाली. सर्व डोंगरी किल्ले, हमरहदारीचे मार्ग, रानांतील आडवाटा, खोऱ्यादऱ्यांतील रहाट्या, वगैरे गोष्टीचा खडान् खडा शिवाजीला तेराचवदा वर्षांच्या उमरींतच ठाऊक झाला. न्यायमुनसफीचीं कामें, वसुलातीचा हिशोब, गांवकीचे इनसाफ, शेतकऱ्यांच्या तक्रारी, भाऊबंदकीचे तंटे, इत्यादि सर्व बाबींचा खल व निकाल दादाजी शिवाजीच्या समक्ष करीत असे. यामुळें शिवाजीला या सर्व गोष्टींचें उत्तम ज्ञान झालें, इतकेंच नव्हे, तर आपल्या प्रान्तांतील लोकांची राहणी, त्यांच्या भावना, आकांक्षा, त्यांच्या स्वभावांतील खुब्या, त्यांचीं मनें अंकित करून घेण्याचे उपाय, इत्यादि गोष्टीही त्याच्या आपोआप लक्ष्यांत येऊन तो अल्पकाळांतच चतुरस्त्र झाला. त्यानें जागोजागीं आपल्या वयाचे मित्र जोडले, आणि हेच त्याच्या पुढील कामगिरींत फार उपयोगास आले. मोठ्यांशीं समवयस्कांशीं, आणि लहानांशीं, कसकसें वागावें हें शिवाजीला जणूं काय उपजतच कळत होतें.

## स्वराज्याची कल्पना.

असो, अशाप्रकारें शिवाजीचें धार्मिक, नैतिक, व व्यावहारिक शिक्षण चालू असतां, १६४१-४२ च्या सुमारास शहाजी विजापुरास आला होता व त्याच्याजवळ कांहीं दिवस राहण्याकरितां शिवाजीही विजापुरास गेला. विजापुरास मोठमोठ्या मराठे बहादुरांना शहापुढें कुर्निसाद कर-तांना पाहून, आणि शहरांत भररस्त्यांत गोहत्या घडतात ह्याचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन, शिवाजीच्या मनांत खेळत असणाऱ्या राष्ट्रकार्याच्या विचारास चांगलीच चालना मिळाली. त्या वेळीं त्याचे शब्द, विचार, व वर्तन, हीं शहाजीस इतकीं भयंकर वाटलीं, कीं, बापलेकांत बरीच बोलाचाली झाली, आणि शहाजीनें शिवाजीमुळें कांहीं नसतें विघ्न उत्पन्न होईल या भीतीनें त्याची स्वारी कशीतरी पुण्यास एकदाची पाठवून दिली ! हें शिवाजीच्या मनाजोगतेंच झालें. पुण्यास परत आल्यावर तो आतां स्वतंत्रपणें वागूं लागला, व त्यानें आपल्या आयुष्यांतील पुढील काम-गिरीचा उपक्रम सुरू केला, व मुसुलमानांची सत्ता उखळून महाराष्ट्रांत देवाधर्माचें मराठी स्वराज्य स्थापण्याचा प्रयत्न करावयाचा असा त्यानें आपल्या मनाचा धडा केला. या मसलतींत त्यानें आपल्या वयाचे तरुण मराठे प्रथमतः सामील केले. त्यांचे मार्फत वरील पिढीमध्येंही त्यानें या विचारांचा आस्ते आस्ते फैलाव केला. ज्याची ज्याची शिवाजीशीं गांठ पडे, त्याच्यावर त्याच्या डोळ्यांतील तेजाची, अन्तःकरणापासून निघालेल्या कळकळीच्या शब्दांची, प्रखर आत्मविश्वासाची, आणि निःस्वार्थी देशहितेच्छेची तत्काळ छाप पडे. लवकरच परधर्मीयांच्या जुलमानें गांजलेल्या जुन्नर-पुणें प्रांतांच्या दऱ्यांखोऱ्यांतून स्वराज्याचा, धर्मरक्षणाचा, व ईश्वरी अवताराचा, बोलवा घुमूं लागला. शिवाजीनें

आपल्या जहागिरीच्या प्रान्तांतील लोकांची आपापसांतील तंटेबखेड्यांची प्रवृत्ति मोडून, सर्वांच्या उत्साहाला, पराक्रमाला, व कर्तव्यबुद्धीला, एका नव्याच दिशेला लावलें. आपल्या लोकांचें संघटण करतांना शिवाजीनें जातीपातीचा भेद मनांत आणला नाहीं. आपलें कार्य हें देवकार्य व देशकार्य आहे, तेव्हां याला सर्वांनींच आपलें कार्य मानून, एकजुटीनें, आपापल्या शक्त्यनुसार, कचर किंवा शाठ्य न करतां, हातभार लावलाच पाहिजे, अशी स्फूर्ति त्यानें सर्वांच्या अन्तरंगांत उसळू दिली. शिवाजीनें या कामीं मराठ्याचें शौर्य, प्रभूंची कर्तव्यनिष्ठा, ब्राह्मणांची चाणाक्षता, इतरांची इमानइतबारी, इत्यादि सर्वांच्याच गुणांचा सारखा उपयोग करून घेतला. प्रत्येकाच्या गुणकर्मानुसार त्याचें चीज केलें, व सर्वांस कर्तव्योन्मुख राखलें. त्यानें आपल्या प्रान्तांतील डोंगरी किल्ल्यांचें महत्व तत्काळ ओळखलें व त्यांची दागदुजी करून नीट व्यवस्था लावण्यास सुरवात केली. तरुण मराठे वीरांचें सैन्य पदरीं बाळगण्याचीही त्यानें जुळवाजुळव केली. शिवाजीचें हें सैन्य म्हणजे 'देणावळ तशी धुणावळ,' किंवा 'वारा येईल तशी पाठ दे,' या तत्वावर वागणारें भाडोत्री सैन्य नसून, तें खऱ्या स्वयंसेवकांचें दळ होतें. त्यांना आपलें ध्येय काय आहे याविषयीं निश्चित कल्पना होती, त्यांनीं आपले सर्व जीवभाव त्याच ध्येयाला अर्पण केले होते, व तें ध्येय गांठण्याच्या प्रयत्नांत कोणताही स्वार्थत्याग करावा लागला, किंबहुना धनदौलत, बायकामुलें, यांस मुकावें लागलें, प्रत्यक्ष प्राणाची आहुति द्यावी लागली, तरी माघार घ्यावयाची नाहीं, असा त्यांच्या अन्तःकरणाचा कृतसंकल्प होता. अर्थात् भाडोत्री अफाट सैन्यापेक्षां अशा स्वयंस्फूर्तीच्या एका पथकाकडूनही अधिक मोलाची

कामगिरी घडते; शिवाय, भाडोत्री शिपायांच्या हातून जे अत्याचार वारंवार होतात, तसे अत्याचार—अनैतिक वर्तन—करण्यास असे कर्तव्यदक्ष वीरगडी सहसा प्रवृत्त होत नाहींत.

**कल्पनेचा फैलाव.**

दादो कोंडदेवाला पहिल्याप्रथम हे शिवाजीचे विचार फारसे मानवले नाहींत. त्याचें वय या वेळीं सत्तरीच्या वर होतें, म्हणून हे नवे विचार, नव्या कल्पना, स्वतंत्रतेचें वारें, हीं एकदम त्याच्या पचनीं पडलीं असतीं, तरच आश्चर्य होतें. तो शिवाजीला सांगे, कीं, ‘हे विचार मोठे मोहक दिसतात, परंतु यांत फार साहस आहे. हे शक्य कोटींतील दिसत नाहीं. वडिलांनीं पराक्रम करून मिळवलेली दौलत घालवूं नका म्हणजे झालें!’ पण त्यास शिवाजी उत्तर देई, ‘वडिलांची दौलत चघळीत बसण्यांत काय पुरुषार्थ ? नवी मिळवूं तर वडिलांची कीर्ति राखली असें होईल. आम्ही आपल्या राष्ट्रकार्याला हात घालणारच, यश देणें ईश्वराधीन आहे !’ अखेर वयोवृद्ध दादाजीवरही शिवाजीच्या विचारसरणीचा पगडा बसला, व त्यानें आपल्या अन्तकाळीं ( स. १६४७ ) शिवाजीला ‘आपली कामगिरी अशीच नेटानें चालवावी, ईश्वर तींत चांगलें यश देईल,’ असा मनोभावानें आशीर्वाद दिला. जी गोष्ट दादाजीची, तीच मावळांतील वृद्ध वृद्ध देशमुखदेशपांड्यांची व सरदारांची. प्रथम प्रथम त्यांस, शिवाजीचा उपक्रम म्हणजे निव्वळ आत्मघातकी पोरखेळ आहे, असें वाटे. परंतु थोड्याच दिवसांत ते आस्ते आस्ते त्याच्या कार्यास अनुकूळ झाले; आणि जे हटेलपणानें विरोधच करीत राहिले, त्यांचा शिवाजीनें कसा बंदोबस्त केला हें पुढें दिसून येईलच.

### हिंदवी राज्याची कल्पना कधींची ?

कांहीं लेखकांचें असें म्हणणें आहे, कीं, "शिवाजीच्या मनांत आरंभापासून स्वराज्याची कल्पनाच नव्हती. प्रथमतः त्याचा हेतु बरीचशी पुंडाई करून दौलत मिळवावी इतकाच होता. पुढें आस्तें आस्ते जेव्हां बराच मुलुख त्यानें आपल्या हाताखालीं घातला, तेव्हां त्यानें आपल्या दरोडेखोर बंडाळीलाच 'स्वराज्य स्थापनेचा उपक्रम' असें भपकेदार नांव देऊन 'हिंदवी राज्याची' सोंगसंपादणी केली." परंतु हें म्हणणें सपशेल खोटें आहे, असें सिद्ध करणारा अस्सल लेखी पुरावा उपलब्ध आहे. शिवाजीनें आपल्या कार्याच्या उपक्रमाची जुळवाजुळव करण्यास विजापुरहून आल्याबरोबरच आरंभ केला. या कामीं त्यास जे पुण्याखालील मावळांतील लोक मिळाले, त्यांत रोहिड खोऱ्यांतील देशपांडे दादजी प्रभु व त्याचा वृद्ध बाप नरसप्रभु हे होते. कांहीं दिवसांनीं शिवाजीच्या या चळवळीची बातमी विजापुर दरबारीं पोंचली. तेव्हां दरबारानें नरसप्रभूस हुकूमयादी लिहून तंबी दिली. ही गोष्ट दादजीनें शिवाजीस कळविली. त्यानंतर शिवाजीनें दादजीला जें पत्र पाठविलें तें प्रसिद्ध झालेलें आहे. या स. १६४५ च्या पत्रांत शिवाजी लिहितो, कीं, " तुम्हांस मेहेरबान वजीराचा विजापुराहून हुकूम आला, तो ठाणें शिरवलीहून अमिनांनीं तुम्हांकडे पाठविला. त्यावरून तुमचे बाप नरसीबावा फार हवालदील झाले, वगैरे कित्येक मजकूर लिहिले. त्यास शहाशीं बेमानगिरी तुम्ही व आम्ही करीत नाहीं; श्रीरोहिरेश्वर तुमचे खोऱ्यांतील आदि कुलदेव, डोंगरमाथा पठारावर सह्याद्रीलगत तुमचा स्वयंभू आहे, त्यांनीं आम्हांस यश दिलें व पुढें तो सर्व मनोरथ **हिंदवी स्वराज्य** करून पुरविणार आहे. त्यास बावास

हवाल होऊं देऊं नये........हें राज्य व्हावें हें श्रींचे मनांत फार आहे. ह्याप्रमाणें बावांचे मनाची खात्री करून तुम्हीं येणें." या अस्सल पत्रावरून शिवाजीची 'हिंदवी स्वराज्याची' रूपरेखा आरंभापासूनच कायम झाली होती, व आपण हें सर्व देवाकरितां व देशाकरितां ईश्वरीप्रेरणेनेंच करीत आहों, अशी त्याची निर्मळ श्रद्धा होती, हें उघड सिद्ध होतें. एकाद्या कुशल कारागिराप्रमाणें शिवाजीनें पुढील धर्मराज्याच्या मंदिराचा आराखडा आधींच तयार केला होता, व त्या मंदिराचा पाया खणून भरून काढण्यास त्यानें स. १६४२ चे सुमारास सुरवात केली. पायाभरणीचें काम पुंडाईच्या अनगड गोट्यांनीं—दगडांनीं करणें भागच होतें; परंतु त्यावरून वर उभारण्यांत येणाऱ्या मंदिराची कल्पना आगाऊ त्याच्या डोक्यांत नव्हती, असें म्हणणें अगदींच चूक आहे, हें वर उल्लेखलेल्या पत्रावरून स्पष्टच होत आहे. शिवाय, शिवाजीची ही आरंभींची चळवळ विजापुरकरांच्या प्रस्थापित सत्तेशीं विरोधक होती म्हणून तिला 'पुंडाई' असें नांव द्यावयाचें, नाहीं तर वास्तविक पहातां त्याची चळवळ मोठी व्यवस्थित व निर्मळ होती. त्यानें प्रजेला कधींही नाहक छळलें नाहीं, सज्जनांची विटंबना केली नाहीं, किंवा नीतीच्या मर्यादेला उल्लंघिलें नाहीं. उलट त्यानें आपल्या जहागिरीच्या पुण्याखालील मावळांत जे पुंड होते, त्यांचा पूर्ण नाश करून, शांतता प्रस्थापित केली. विजापुर दरबारचें मन शिवाजीच्या चळवळीविषयीं बरेंच साशंक होतें, तरीपण पुणें प्रान्त दरबारच्या ठाण्यापासून बराच लांब असल्यामुळें व पुंडांना वठणीस आणून प्रान्ताची सुव्यवस्था लावण्याचें काम शिवाजी आपण होऊन परस्पर करीत आहे, हें एकार्थीं बरेंच आहे असें वाटत असल्या-

मुळें, विजापुर दरबारानें त्याला आटकाव केलेला आढळत नाहीं. एकादे वेळीं दरबारनें संशयानें तंबी दिलीच, तर शिवाजीही 'मी हें सर्व राज्याच्या अबादानीसाठीं व जहागिरीच्या सुस्थितीसाठींच करीत आहें,' अशी बतावणी करून तेंवढी हूस संभाळीत असे व आपला उद्योग अखंड चालू ठेवीत असे.

### जहागिरीबाहेर पाऊल.

असो, अशाप्रकारें आपल्या जहागिरीच्या प्रांतांत अनुकूल व्यवस्था केल्यावर शिवाजीनें आपली दृष्टि सन १६४६ च्या सुमारास आपल्या प्रांताभोंवतालच्या प्रदेशाकडे व डोंगरी किल्यांकडे वळवली. त्यावर्षीं त्यानें तोरणा किल्ला भेदयुक्तीनें आपल्या कबजांत घेतला, आणि त्यांत सांपडलेल्या गुप्त ठेव्याच्या जोरावर जवळच 'राजगड' नांवाचा किल्ला[1] बांधला. शिवाय याच पैशाच्या साह्यानें त्यानें पोर्चुगीझ व्यापाऱ्यांपासून दारूगोळा, तोफा, बंदुका, व इतर हत्यारें मुबलक खरेदी केलीं. या सालापर्यंत शिवाजीच्या पदरीं बरेंचसें पायदळ होतें, पण यापुढें त्यानें घोडदळही बाळगण्यास सुरवात केली, आणि लवकरच शिवाजीचें हें शिलेदारी घोडदळ आपल्या भरारीनें व शौर्यानें फार प्रसिद्धीला आलें. सन १६४७ त दादो कोंडदेव वारला आणि शिवाजीनें जहागिरीचें उत्पन्न शहाजीकडे पाठविण्याचें अजी बंद केलें. शहाजीही शिवाजीच्या उपक्रमाची एकंदर वार्ता ऐकून जरा वचकून व चमकून गेला; आणि "मुलाशीं किंवा त्याच्या कृत्याशीं आपला कांहीं एक संबंध नाहीं; तो जें कांहीं करतो तें स्वतंत्र आपल्याच जबाबदारीवर करतो," अशी विजापुर दरबारची खात्री व्हावी म्हणून तो पार तंजावरकडे

१ हा किल्ला पुण्याच्या नैऋत्येस २० मैलांवर आहे.

निघून गेला. इकडे शिवाजीचा कार्यक्रम अव्याहत चालू होता. शहाजीच्या दुसऱ्या बायकोचा भाऊ संभाजी मोहिते याजकडे शहाजीच्या जहागिरीपैकीं सुपें महाल होता. त्याचा वसूल शिवाजीस देण्याचें त्यानें नाकारलें व तो शिवाजीच्या चळवळीच्या आड येऊं लागला. शिवाजीनें एक रात्रीं मोहित्यावर छापा घालून त्यास दस्त केलें, आणि मामासाहेबांची स्वारी शहाजीकडे रवाना करून सुपें महाल आपल्या ताब्यांत घेतला. यानंतर किल्लेदाराजवळ भेद करून शिवाजीनें चाकण किल्ला हस्तगत केला. सन १६४८ त पुणें–बारामती रस्त्यावरील पुरंदर किल्ल्याच्या किल्लेदारीसंबंधें किल्लेदाराच्या घराण्यांत भाउबंदकी सुरू झाली होती; तेव्हां शिवाजीनें एक दिवस सैन्यासह जाऊन किल्ला आपल्या हातीं आणला, व भाउबंदकी करणाऱ्या तीन्ही भावांना वतनें करून देऊन गप्प बसविलें.

## कल्याणचा सुभा.

याच सालीं म्हणजे सन १६४८ त शिवाजीनें एक मोठीच साहसाची व हिंमतीची कामगिरी केली व विजापुरच्या अदीलशाहीचें दाबें दणाणून सोडलें. भिवंडीपासून नागोठण्यापर्यन्त पसरलेला कल्याणचा सुभा फार महत्वाचा होता. या सुभ्यांतून बराच मोठा खजिना एक दिवस विजापुरास जात होता. तो शिवाजीनें मध्येंच मारून लुटून नेला, आणि शिवाजीचा एक सेनापति आबाजी सोनदेव यानें कल्याण सर केलें. याच वेळीं कल्याणचा सुभेदार मुल्ला अहंमद याची सून आबाजीच्या हातीं लागली व आबाजीनें ती शिवाजीस अर्पण केली. तिला पाहून शिवाजी आबाजीस उद्देशून म्हणाला, "आबाजी, आमच्या मासाहेब इतक्या सुंदर नाहींत ! हिचें लावण्य इतकें; असेंच

आमच्या मातोश्रींचें असतें, तर आमचेंही स्वरूप असेंच झालें असतें. पुण्यास गेल्यावर आम्ही मासाहेबांना सांगतों, ' पुढच्या जन्मीं तुम्ही अशाच सुंदर व्हा !' " हें ऐकून आबाजीनें खालींच मान घातली. शिवाजीनें त्या बाईला साडीचोळी देऊन, तिचा सासरा त्यावेळीं विजापुरास होता, त्याच्याकडे मोठ्या इतमामानें तिची रवानगी केली. शिवाजीची नीति व शील नेहमींच निर्मळ होतीं, आणि तो आपल्या लोकांना नीतीची शिस्त लावण्यांत फार कडक होता. निष्कारण रक्तपात करणें, बायकांची अब्रू घेणें, मुलाबाळांचे हाल करणें, गरीब प्रजेला नागवणें, दुसऱ्याच्या धर्ममंदिराचा नाश करणें, कोणाच्याही धर्मग्रंथाचा उपमर्द करणें, इत्यादि अत्याचार आपल्या सैनिकांकडून घडूं नयेत म्हणून तो अत्यन्त काळजी घेत असे.

### कोंकणची स्वारी.

यानन्तर लगेच विसावा न घेतां शिवाजीनें तळकोंकणाकडे व दक्षिण कोंकणाकडे मोर्चा फिरविला. कल्याण सुभा पडल्याची वार्ता विजापुरास पोंचल्यावर आपल्यावर मोठी तोहमत येईल, दरबार जागें होऊन आपल्या गमजा बंद करून आपल्यास चिरडण्याचे प्रयत्न जोमानें करूं लागेल, हें शिवाजीस कळून चुकलें होतें. तेव्हां असा जोराचा प्रयत्न विजापुराकडून होण्याच्यापूर्वीं टिपरघाई करून जेवढा मुलुख ताब्यांत येईल तेवढा घेऊन पुढील संकटाला तोंड देण्याकरितां मोठ्या बंदोबस्तानें सिद्ध होऊन राहिलें पाहिजे, हें शिवाजी जाणून होता. तेव्हां आपल्या बाजूला बळकटी आणण्यासाठीं व आरबी समुद्रांतून पोर्तुगीजांकडून दारूगोळा, तोफा, बंदुका, हत्यारें, इत्यादि युद्धोपयोगी सामान बिनबोभाट व अखंड मिळत राहावें

म्हणून कोंकणप्रान्त काबीज करणें शिवाजीस अवश्यच होतें. शिवाय शिवाजीच्या मावळांतील हिंदवी राज्याची कल्पना कोंकणांतही उतरली होती, व तळकोंकणांतील लोकांचीं त्यास कोंकणांत येऊन तिकडील मुलुख स्वराज्यांत सामील करण्याबद्दल बोलवणींही लिहून गेलीं होतीं. या तापलेल्या तव्यावर पोळी भाजण्यास चुकणारा शिवाजी नव्हता. त्यानें तांतडीनें तळकोंकणांत जाऊन तळें व घोंसाळें हे किल्ले घेतले, आणि आसपासच्या प्रान्ताच्या मजबुतीसाठीं बिरवाडी येथें किल्ला बांधला. याच मोहिमेंत गोवळकर सांवत हा कोंकणचा पटाईत वीर शिवाजीस गांठला. शिवाजीनें सांवताचा चांगला मानमरातब ठेवून त्याला आपल्या कार्यांत सामील करून घेतलें. याच सांवतापासन शिवाजीस नामांकित ‘ भवानी ’ तलवार लाभली. या वेळीं तळकोंकणाचा बराचसा भाग व समुद्रपट्टीचा रेवदंड्यापासून राजापुरापर्यन्तचा टापू जंजिऱ्याचे सिदीचे ताब्यांत होता. परंतु जमिनीवर शिवाजीचे धडाडीपुढें जरी सिदीचें कांहींच चाललें नाहीं असें दिसतें, तरी समुद्रावर सिदी प्रबळच राहिला. या मोहिमेंतच रायरीचा डोंगर शिवाजीनें सिदीच्या हातून हिसकून घेतला, आणि तेथें ‘ लिंगाणा ’ नांवाचा किल्ला बांधला. हाच पुढें ‘ रायगड ’ नांवानें प्रसिद्धि पावून राजनिवासाचें ठाणें बनला. ही सन १६४८ तली मोहीम शिवाजीनें थेट राजापुरापर्यन्त नेऊन भिडविली. हरणई, रत्नागिरी, खारेपाटण, राजापुर, मालवण, वगैरे बरींच दर्याकांठचीं बंदरें शिवाजीनें सिदीच्या हातचीं हिसकावून घेऊन तेथें आपला अंमल बसविला. परंतु दर्यावर सिदीची सत्ता अचुंबित चालते, ही गोष्ट शिवाजीच्या ध्यानीं आल्यावांचून राहिली नाहीं. तेव्हां दर्यावरही सिदीबरोबर

दोन हात करण्याकरितां जलदुर्ग बांधणें व तरांड्याचें आरमार ठेवणें अवश्य आहे, या गोष्टीचा ध्यास शिवाजीस लागला व थोड्याच काळांत त्यानें ही उणीव चांगली भरून काढली.

## जिंकलेल्या प्रान्ताची व्यवस्था.

याप्रमाणें सन १६४८ त शिवाजीनें पुण्याखालील बारामावळें व त्याभोंवतालचा प्रान्त व गड, कल्याण सुभा, तळकोंकण, व दक्षिण कोंकण, एवढा मोठा मुलूख आपल्या ताब्यांत आणला. परंतु नुसता मुलूख जिंकण्यांत कांहीं तात्पर्य नाहीं, कारण आज जिंकलेला मुलूख उद्यां गेला, तर त्यांत अर्थ काय झाला? तेव्हां जिंकलेल्या मुलुखांत प्रजेला उपद्रव होणार नाहीं अशी तजवीज करणें, पुंड लोकांचा बंदोबस्त करणें, शहाणे, हुशार, व कर्तव्यदक्ष कामगार नेमणें, नवे किल्ले बांधणें अगर जुन्यांची दागदुजी करून मजबुती करणें, कोणाच्याही धर्मकृत्यांना आडथळा येणार नाहीं किंवा धर्मसंस्थांना ढका लागणार नाहीं अशी काळजी कसोशीनें घेणें, इत्यादि कामें शिवाजी ताबडतोब करीत असे, त्यामुळें त्यानें जिंकलेला मुलुख आबाद राही व त्यांत बंडें-बखेडे सहसा उद्भवत नसत. कल्याणचा सुभा सर केल्यावर शिवाजीनें आबाजी सोनदेवासच तेथील सुभेदारी दिली, व त्यास अशी आज्ञा केली, कीं, “ या प्रांतांत देवस्थानें असतील त्यांची पूजा, नैवेद्य, नंदादीप, यांची व्यवस्था करा. मशिदी, दरगे, असतील त्यांची काळजी घ्या. देवांचे उच्छाव व पिरांचे उरूस चालू ठेवा. तुमच्या सुभायतींत जे किल्ले असतील, त्यांवर विश्वासू माणसें ठेवा. त्यांत दारूगोळा, लांकुडफाटा, अडेसरी, यांचा धारा बांधून द्या. किल्ल्याचे तट जेथें सोपे असतील, तेथें तपासून सुरुंग लावून बेलाग करा. रय-

तेला कौल देऊन जमिनीची लागवड करा." जें कल्याण सुभ्यांत शिवाजीनें केलें, तेंच अंमलांत येणाऱ्या प्रत्येक नवीन प्रान्तांत त्यानें केलें. यामुळें शिवाजीनें जिंकलेल्या प्रांतांतील प्रजा, मग ती हिंदू असो वा मुसलमान असो, मोठ्या सुखांत व आनंदांत असे, आणि सर्व लहान-मोठे लोक राजी राहून त्याच्या कार्यास हातभार लावण्यास नेहमीं तयार असत. कोणतीही कामगिरी निघाल्यास शिवाजीला माणसांची वाण म्हणून कधींच पडत नसे. याचें एक कारण असें होतें, कीं, कोण-त्याही संकटाला साहसानें तोंड देण्याला शिवाजी स्वतःच तयार असे, त्यामुळें त्याचें उदाहरण पाहून तशा प्रकारें संकटाचीं व साहसाचीं कामें करण्याला त्याच्या अनुयायींत सारखी स्पर्धाच सुरू होई ! दुसरें कारण असें, कीं, शिवाजी जेथें जाई, तेथें तो गुणी मनुष्याचे गुण ओळखून त्यास आपल्या पदरीं ठेवी, व त्याच्या गुणानुरूप कामगिरी हरहमेष सांगून त्याच्या कर्तबगारीचें योग्य कौतुक करी. शिवाजीला मनुष्यस्वभा-वाची पारख व गुणांची ओळख तत्काळ होत असे. गुणी मनुष्य निवडा-वयाचा व त्याच्याकडून कामगिऱ्या करून घेऊन त्यास योग्यतेस चढवाव-याचें, हें निरन्तरचें व्रत होतें. त्यानें निवडलेले हुजरे, सरदार, सुभेदार, सेनापति, चिटणीस, मंत्री, किल्लेदार, ठाणेदार, वगैरे कोणीही विश्वासघातकी किंवा कमकुवत निघाल्याचें उदाहरण सहसा सांपडत नाहीं. शिवा-जीच्या प्रजेंत व सैन्यांतही अनेक मुसलमान होते, परंतु त्यानें त्यांची कोणत्याही प्रकारें छळणूक किंवा मानहानि केली नाहीं. ज्यानें त्यानें आपापल्या धर्माप्रमाणें, दुसऱ्यास पीडा न देतां, सुखानें राहावें, हाच शिवाजीचा दंडक होता. राजकारणामुळें व प्रबळ शत्रूंशीं टक्कर देण्याचा प्रसंग पडल्यामुळें, शत्रूच्या पक्षपाती लोकांचा उच्छेद करणें व शत्रूच्या

प्रांतांतील लोकांची संपत्ति हरण करणें शिवाजीला अवश्यच होतें. तरी त्यांतही तो कोणतीही गोष्ट अविचारानें करीत नसे. होतां होईल तों शत्रूकडील गड, शहरें, वगैरे रक्तपात न करतां भेदयुक्तीनेंच हस्तगत करून घ्यावीं, अशी त्याची आज्ञा असे. साम, दाम, व भेद, यांनीं काम वळत नाहीं असें झालें, तर दंडाचा निःसंशय प्रयोग करावा, अशी शिवाजीची आपल्या कामगारांस ठाम आज्ञा होती. बखरकार स्पष्ट लिहितात, कीं, शिवाजीची आपल्या अंमलदारांस सदर परवानगी अशी होती, कीं, "आपणास राजी राहून आज्ञेप्रमाणें वागतील, त्यांचें संगोपन करावें. उन्मादेंकरून हेळणा करतील त्यांचा नाश जसा कळेल त्या रीतीनें करणें..........यवनांचा उत्कर्ष यास्तव त्यांचीं मोठमोठीं शहरें, तेथें द्रव्य बहुत आहे, त्याची पाळद राखून आणावें. द्रव्यवान ते जेरदस्तींत आणून त्यांजपासून खंड अगर कर्ज म्हणून घ्यावें."

### विजापुर जागें झालें.

सन १६४८ मधील शिवाजीच्या या धडाक्याची वार्ता विजापुरास पोंचली, तेव्हां दरबार खडाडून जागें झालें. पण या वेळीं महमूद अदीलशहा हा आजारी होता; शिवाय तो बराचसा शांतस्वभावाचाही होता. तेव्हां या दूरच्या डोंगराळ प्रदेशांत शिवाजीच्या बंदोबस्ताकरितां सैन्य पाठवून हें प्रकरण वाढवण्यापेक्षां त्यानें शिवाजीस पेंचांत आणण्याची निराळीच युक्ति काढली. शिवाजीच्या या हालचालीला व बंडखोरपणाला शहाजीचीही संमति असावी असेंही दरबारला वाटूं लागलें होतें. त्या दोघांचाही एकदम नक्षा उतरण्याकरितां अदीलशहानें कर्नाटकाकडील आपला दुसरा सरदार बाजी घोरपडे याजकडून शहाजीला पकडून विजापुरास आणवलें आणि त्यास कैदेंत ठेऊन अशी तंबी दिली, कीं, " अमुक मुदतींत शिवाजी ताब्यावर आला नाहीं तर जिताच्या

जिताच भिंतींत चिणून टाकूं!" ही हकीकत शिवाजीला कळली, तेव्हां तो मोठ्या कैचींत सांपडला. पण हा पेंचही त्यानें मोठ्या अजब युक्तीनें उलगडला. त्यानें शहाजहान बादशहाकडे वकीलामार्फत विनंति केली, कीं, " आपण बादशहाचे नोकर होण्यास तयार आहों, तरी शहाजीस सोडून देण्याबद्दल विजापुर दरबारकडे लिहून जावें." आतां-पर्यन्त शिवाजीचा धुमाकूळ विजापुरच्या मुलखांत चालला होता; त्यानें अजून मोंगलांना कोठेंही त्रास दिला नव्हता. शहाजहानचा डोळा अदील-शाही व गोवळकोंड्याची कुत्बशाही यांवर फार होता व त्यांस बुड-विण्याची तो संधि पहात होता. शिवाजीची अदीलशाहीच्या मुलखां-तील पुंडाई ऐकून त्यास एकप्रकारें संतोषच होत होता. तेव्हां शिवा-जीनें हें बोलणें केल्याबरोबर तें त्यानें मोठ्या उत्सुकतेनें कबूल केलें आणि ताबडतोब अदीलशहासही शहाजीस सोडून देण्याबद्दल लिहून पाठविलें. अर्थात् शहाजहान बादशहाचा हुकूमवजा खलिता विजापुरकरास धाब्यावर बसविण्याची छाती झाली नाहीं. त्यानें त्यास जामिनावर खुलें केलें आणि पुढें सन १६५३ मध्यें त्यास कर्नाटकांत आपल्या जहागिरीवर जाण्याचीहि परवानगी झाली. शहाजी कैदेंत असेप-र्यन्त सन १६४८ ते १६५३ पावेतों शिवाजीनें विजापुरकरांस चिड-विण्यासारखें कांहींही नवें काम केलें नाहीं. हा काळ त्यानें शांतपणें आपल्या मुलखाची मजबुती करण्यांत, व अन्तर्गत व्यवस्था लावण्यांत घालविला, असें दिसतें.

## जावळीचा कबजा.

शहाजीची पूर्णपणें मोकळीक होऊन तो विजापुरांतून निसटल्यावर शिवाजीनें आपला पूर्वींचा क्रम पुन्हां सुरू केला. त्यानें आपल्या अम-

लाखालीं जो मुलूख आणला होता, त्याच्या लगतचा प्रान्त आस्ते आस्ते काबीज करणें अवश्य होतें. महाडच्या बाजूस लागूनच वाई प्रान्तांतील जावळीच्या चंद्रराव–मोऱ्याचा मुलूख होता. हे मोरे मोठे प्रतिष्ठित व शूर असून विजापुरकराशीं जरा शिरजोरपणानेंच वागत. पण ते शिवाजीशीं संगनमत करण्यास तयार नव्हते. शिवाजीला चंद्रराव–मोऱ्यास आपल्या कार्यांत सामील करून घेणें किंवा त्यांना चीत करणें, यांपैकीं कांहींतरी एक करणें अगदीं अवश्य होतें. म्हणून त्यानें रघुनाथ बल्लाळ कोरडे व संभाजी कावजी यांस त्या वेळचा चंद्रराव-मोरे कृष्णाजी बाजी याजकडे सामोपचाराचें बोलणें करण्यासाठीं सन १६५५ सालीं पाठविलें. याच वेळीं विजापुरचा एक बाजी सामराज नांवाचा सरदार शिवाजीस पकडून आणण्याची प्रतिज्ञा करून फौजेसह आला होता व कृष्णाजी बाजी मोरे त्यास मदत करीत होता. असो. रघुनाथ बल्लाळ व संभाजी कावजी कृष्णाजी बाजीकडे बोलणें करण्यास आले, तेव्हां त्या गर्विष्ठ कृष्णाजी मोऱ्यानें शिवाजीसंबंधें अत्यन्त क्षुद्रतेचे व तुच्छतेचे उद्गार काढले; तेव्हां संभाजीही मोऱ्यांस कांहीं उपमर्दकारक शब्द बोलला. लागलीच चंद्रराव मोऱ्यानें तरवार उपसली व संभाजीनें कट्यार काढली. दोघांची झटापट झाली, त्यांत चंद्रराव–मोरे प्राणास मुकला. लागलेच रघुनाथ बल्लाळ व संभाजी पळून गेले व त्यांनीं शिवाजीस एकंदर हकीकत सांगितली. ती ऐकून शिवाजीला फारसें बरें वाटलें नाहीं. असा मोठा सरदार असा कापला जाण्यापेक्षां आपल्या बाजूस वळला असता, तर देशकार्य सुकर झालें असतें, असें त्याच्या मनांत येऊन जरा खेदच झाला. पण झाल्या गोष्टीस इलाज नव्हता. यानंतर शिवाजीनें जावळी घेतली, बाजी सामराजाच्या फौजेची चांदी आटवली, आणि लवकरच, म्हणजे

स. १६५६ त, या प्रान्ताचें रक्षण करण्यासाठीं पारघाटाचे नाक्यावर प्रतापगड नांवाचा किल्ला बांधला. याच किल्ल्यावर तुळजापुरच्या भवानीची एक नवी प्रतिमा करून तिची स्थापना केली. या किल्ल्याची कामगिरी मोरोपंत पिंगळे यांच्या नजरेखालीं झाली, व फार उत्तम काम केल्याबद्दल शिवाजीनें मोरोपंताची वाहवा केली. यानंतर लवकरच शिवाजीनें हिरडसच्या माजोरी देशमुखाचा रोहिडा किल्ला सर केला, आणि त्या झटापटींत मारल्या गेलेल्या देशमुखाचा दिवाण बाजी प्रभु यास आपल्या नोकरींत ठेवलें.

**मोंगलांशीं संबंध.**

शिवाजी अशा प्रकारें स. १६५५ पासून एकेक पाऊल पुढें टाकीत चाल करीत होता, परंतु १६५९ पर्यन्त विजापुरकरांना त्याचें पारिपत्य करण्याला फुरसदच मिळाली नाहीं. १६५२ मध्यें शहाजहाननें आपला मुलगा औरंगझेब यास दक्षिणच्या सुभेदारीवर पाठविलें. या बापलेकांचीं मनें एकमेकांविषयीं शुद्ध नव्हतीं. औरंगझेबास अदीलशाही व कुत्बशाही बुडवून दक्षिणेंत स्वतंत्र राज्य स्थापण्याची आकांक्षा होती, व त्या दिशेनें तो थोडाबहुत प्रयत्न चालवीत होता. परंतु शहाजहानाचे उलटेसुलटे हुकूम येऊन त्याच्या सर्व बेतांवर पाणी पडत असे. सन १६५६ अखेर महमूद अदीलशहा वारला, आणि त्याची बेगम बडीसाहेबा हिनें त्याचा मुलगा अली यास गादीवर बसविलें. परंतु औरंगझेबानें शहाजहानाकडे अलीसंबंधें कांहीं अद्वातद्वा लिहून विजापुरावर स्वारी करण्याचा हुकूम मिळविला. या युद्धावर जाण्याचे तयारींत औरंगझेब असतां, शिवाजीनें त्याला वकिलामार्फत कळविलें, कीं, “ कोंकणाचा मुलुख माझ्याकडे ठेवण्याचें वचन

असेल, तर मी अदीलशाहीविरुद्ध मोंगलांस मदत करण्यास सिद्ध आहें." पण औरंगझेबानें यास नीटसा जबाबच दिला नाहीं. तेव्हां शिवाजीनें हा नाद सोडून दिला, आणि मोंगलांचा जुन्नर प्रान्त लुटला. या लुटींत सोनें, जवाहीर, कापड, घोडे, अशी विपुल संपत्ति शिवाजीस मिळाली. इकडे औरंगझेब बेदरच्या बाजूस विजापुरकरांच्या मुलखांत घुसून शहरें व किल्ले सर करीत चालला. परंतु १६५७ सप्टेंबरमध्यें लढाई बंद ठेवून तह करण्याबद्दल शहाजहानचा एकाएकीं हुकूम आला, आणि औरंगझेबाचा सर्व डाव फसला. याच सुमारास शहाजहान भयंकर आजारी झाल्याची बातमी आली. तेव्हां औरंगझेब एकदम दिल्लीकडे निघून गेला व शिवाजीचें जुन्नरच्या लुटीबद्दल पुरें उट्टें काढण्याचें तसेंच राहिलें. तरीपण जातां जातां त्यानें विजापुरकरांस लिहून पाठविलें, कीं, "शिवाजी किल्ले बळकावून बसला आहे, त्यास हुसकावून द्या. ह्या डोंगरी मुलखांत त्यास ठेवूं नका !"

### अफझलखानाचें प्रकरण.

या सर्व भानगडीमुळें विजापुरकरांना शिवाजीकडे लक्ष्य देण्यास अवसरच सांपडला नाहीं. औरंगझेब उत्तरेंत १६५८ सालीं गेला. त्यानंतर राज्यांत जरा थावराथावर झाल्यावर, दुसऱ्याच वर्षीं विजापुरकरांनीं वाईचा सुभेदार अफझलखान यास भली मोठी फौज देऊन शिवाजीवर पाठविलें. हा खान शिवाजीस 'जीवंत अगर मेलेला कसा तरी पकडून आणतों' अशी भीष्मप्रतिज्ञा करून आला होता. शिवाय, विजापुराहून येतांना हिंदूंच्या धर्मभावना दुखवून त्यांना चीड आणण्यासारखे अत्याचारही खानानें बरेच केले. पंढरपुरच्या विठोबास उपद्रव केला. तुळजापुरच्या भवानीस जात्यांत घालून भरडलें. एकं-

दरींत, या अफझलखानाच्या मोहिमेला थोडेंसें धर्मयुद्धाचेंही स्वरूप आलें होतें. खानाला या डोंगरी मुलखाचा चांगला अनुभव होता, म्हणून त्याच्याजवळ जरी पंधरा हजार फौज होती, तरी युद्धाची यातायात न करतां, केवळ दग्याफटक्यानें आणि मुत्सद्दीपणाच्या पेंचानें शिवाजी हातीं आला, तर खानाला तें इष्टच होतें. शिवाजीही प्रत्यक्ष युद्धाला खूष नव्हता. युद्धानें देशाची खराबी करणें व मनुष्यबळ आणि द्रव्यबळ संपविणें, हें टाळतां येईल तर बरें, असें त्यास वाटत होतें. वाईस आल्यावर रोहिड खोऱ्यांतील देशमुखांस भुलावण दाखवून वश करून घेण्याचा उपक्रम खानानें केला. तेव्हां खंडोजी खोपडे देशमुख हा खानाचा अंकित होऊन शिवाजीस पकडून देण्याचें त्यानें अंगावर घेतलें. शिवाजी या वेळीं प्रतापगडीं होता. तेव्हां त्याला कसातरी गडांतून बाहेर काढून पकडावा असा खानाचा कट होता, पण याची बित्तम बातमी शिवाजीस हेरांमार्फत लागली होता. तोडीस तोड म्हणून खानालाच फूस लावून डोंगरकपाटींत आणावा व पेंचांत पकडावा, असा डाव शिवाजीनें मांडला. आतां, शिवाजीनें आपण खानास फार भ्यायलों आहों, तरी अभय असेल तर आपण शरण येऊन स्वाधीन होतों, असें बोलणें वकीलमार्फत खानाजवळ सुरू केलें. खान कपटी खरा, पण हें सर्व बोलणें खरेंच आहे, असें त्याला आपल्या सामर्थ्याच्या घमेंडीनें वाटलें. तेव्हां या संधीचा उपयोग करून शिवाजीला भेटीस बोलवावें व भेटीच्या वेळींच त्यास गिरफदार करावें अगर जरूर पडल्यास ठार करावें, असा खानानें बेत केला. शिवाजीचा बेत कांहीं फारसा निराळा नव्हता; मात्र, खान आपल्या धिप्पाड शरीराच्या ताठ्यानें बराच गाफील

झाला होता, तर शिवाजी आपल्या नेहमींच्या धोरणानें फार सावधपणें वागत होता. कांहीं दिवस बोलणीं चालतां चालतां अखेर भेटीचें नक्की ठरलें. भेटीची जागा प्रतापगडाच्या पायथ्याशीं मुक्रर झाली. तंबूची वगैरे कडेकोट व्यवस्था शिवाजीनें केली. भेटीच्या वेळीं फारसे लोक कोणीही बरोबर आणूं नये असें ठरलें होतें. खानाची फौज गडापासून दूर उघडी पसरलेली होती. शिवाजीची फौज दिसण्यासारखी कोठेंच नव्हती, पण दऱ्याखोऱ्यांतून व आसपासच्या झाडींतून ती जय्यत तयारीनें लपवून ठेवली होती. मोरोपंत पिंगळे व नेताजी पालकर हे दोन शिवाजीचे सरदार आपल्या सैन्यासह घाटावरून आले होते, व गडावर तोफा डागल्याबरोबर त्यांनीं कोयना नदीच्या कांठच्या खानाच्या तळावर तुटून पडण्याचें निश्चित केलें होतें. आजच्या कामगिरींत किती यश येईल, याची शिवाजीसही खात्री वाटत नव्हता. भेटीस जाण्याकरितां त्यानें साध्या पोशाखाखालीं चिलखत व जिरेटोप हीं घातलीं होतीं. वाघनखें व बिचवा हीं हत्यारेंही गुप्तपणें बाळगलीं होतीं. पण पोटांत धागधुगी असल्यामुळें भेटीस जातांना त्यानें निरवानिरव केली होती. ‘ माझें कांहीं झालें तरी कार्याचा नाश करूं नका. माझ्या जागीं माझा पुतण्या उमाजी राजे यास धनी समजून कारभार चालवावा.शिस्त व धोरण सोडूं नये.” असें त्यानें सर्वांस बजावून ठेवलें. इकडे खान मात्र आपल्या तालेवारपणाच्या तोऱ्यांत बेफिकीर होता. असो, भेटीच्या वेळीं शिवाजीनें आपल्याबरोबर जिवा महाल्या व संभाजी कावजी यांस घेतलें होतें, आणि खानाच्या सोबतीस बडा सय्यद होता. भेट होतांच खान व शिवाजी दोघेही अगदीं जिवलग आप्तांप्रमाणें एकमेकांस गळामिठींत बिलगले ! तेव्हांच खानानें शिवाजीची मुंडी बगलेंत दाबून धरली व कमरेची तरवार काढून शिवा-

जीच्या पाठीवर वार केला, परंतु चिलखतामुळें शिवाजीस इजा झाली नाहीं. त्याच संधीस शिवाजीनें डाव्या हातानें वाघनख खानाच्या पोटांत खुपसलें व उजव्या हातानें बिचव्याचा मारा कुशींत केला. खानानें ओरडा केला. तेव्हां बडा सय्यद धांवून आला, पण त्याचा समाचार जिवा महाल्यानें घेतला. खानाचें प्रेत मेण्यांत घालून भोई नेत होते, तों संभाजी कावजीनें भोयांचे पाय तोडले, आणि खानाचें शिर शिरोभूषणासह कापून घेतलें. हें मुंडकें यानंतर प्रतापगडाच्या एका बुरुजावर लावलें, व तेव्हांपासून त्याला 'अफझल बुरूज' ही संज्ञा मिळाली. खानाचा वध करून शिवाजी गडावर गेला व तोफा डागण्यांत आल्या. भांड्याचा आवाज ऐकतांच भोवतालीं झाडींत दडून असलेले शिवाजीचे लोक व मोरोपंत आणि नेताजी यांची फौज यांनीं खानाच्या फौजेचा नुसता धुव्वा उडवून दिला.

अफझलखानाच्या वधानन्तर लगोलग शिवाजीनें कोल्हापुर प्रांतांत शिरून पन्हाळा, पवनगड, खेळणा (ऊर्फ विशाळगड), रांगणा, इत्यादि किल्ले, कांहीं भेदयुक्तीनें व कांहीं लढून, असे काबीज केले, व लूटफाट करीत तो थेट विजापुरापर्यन्त गेला व माघारा स्वराज्यांत सुखरूप आला. हा प्रकार सन १६५९–१६६० या सालीं घडला.

**सीदी जोहार व महाराष्ट्राची थर्मॉपिलि.**

यानंतर शिवाजीचा एकदाचा पुरा समाचार घेण्याविषयीं उत्सुक झालेल्या अली अदीलशहानें सीदी जोहार या सरदारास घोडदळ व पायदळ मिळून एकंदर पाव लाख सैन्यासह रवाना केलें. याच संधीस कोंकणांत जंजिरेकर सीदी व वाडीकर सांवत शिवाजीविरुद्ध चुळबूळ करूं लागले. पण शिवाजी पुऱ्या दमाचा होता. इतकें काहूर उठलें,

तरी तो आपलें काम अगदीं शांतपणें व सावधपणें चालवीत होता. राघो बल्लाळ अत्रे व बाजी पासलकर यांस सीदी व सांवत यांचा बंदोबस्त करण्याकरितां शिवाजीनें रवाना केलें. मावळ प्रान्ताची राखण मोरोपंत पिंगळ्याकडे सोंपवली. आबाजी सोनदेव कल्याण प्रान्तीं मजबूत होता. शिवाजी स्वतां कोल्हापुर प्रान्त सांभाळून राहिला. या वेळीं शिवाजीचा मुक्काम पन्हाळगडीं होता. सीदी जोहार आपल्या अफाट सैन्यानिशीं थेट पन्हाळ्यावर चालून आला व गडास वेढा देऊन बसला. शिवाजीचा त्याच्यापुढें कांहींच इलाज चालेना. अखेर शिवाजीनें तहाचें बोलणें लावलें, आणि एक दिवस त्याची व सिदीची एका मोर्चाजवळ भेट होऊन 'शिवाजीनें, दुसऱ्या दिवशीं किल्ला खाली करून सिदीच्या स्वाधीन व्हावें' असें ठरलें. आतां तह झालाच, अशा समजुतीनें सिदीचें सैन्य रात्रीं बरेंच बेसावध झालें, आणि ही संधि साधून अपरात्रीं पहारेकऱ्यांचीं नाकीं चुकवीत चुकवीत शिवाजी मावळे लोकांच्या एका टोळीसह किल्ला उतरून पसार झाला, तो विशाळगडच्या खिंडीजवळ आला. या सुमारास पाठलाग करीत येणारें मुसुलमानांचें सैन्य दृष्टी पडलें. त्यांना खिंडींत थोपवून न धरल्यास शिवाजीचा बचाव होणें दुरापास्त होतें. या वेळीं सरदार बाजी प्रभु हा स्वामिसेवेला पुढें झाला. हिरडसच्या देशमुखाचा नाश करून त्याचा जो दिवाण शिवाजीनें सन १६५६ मध्यें आपल्या चाकरीस ठेवला, तोच हा बाजी प्रभु. इमानें इतबारें व हिंमतीनें स्वामिकार्य बजावित गेल्यामुळें तो लवकरच सरदारीला पात्र झाला. बाजीनें मावळ्यांच्या एका लहानशा टोळीच्या साह्यानें विशाळगडची खिंड शिवाजी गडावर पोंचेपर्यन्त लढविण्याचें आपल्या शिरावर घेतलें. लवकरच मुसलमानांचें सैन्य येऊन खिंडीच्या तोंडाशीं थडकलें. त्यांनीं

एकामागून एक असे लागोपाठ तीन हल्ले केले, परंतु बाजीनें ते सारे शौर्याची व धाडसाची शर्थ करून माघारे परतवले. अखेर, मुसलमानांनीं चवथा हल्ला केला. या वेळीं बाजीचे बरेच लोक कामीं आले होते, व तोही स्वतां जखमांनीं मरणोन्मुख झाला होता. तरी तशाही स्थितींत ही महाराष्ट्राची थर्मापिली लढविण्याचें काम त्यानें चालविलेंच होतें! इतक्यांत शिवाजी गडावर सुखरूप पोंचलयाचे भांड्यांचे आवाज कानीं पडले. ते ऐकून या शूरवीर बाजीनें 'माझें कर्तव्य संपलें, माझ्या देहाचें सार्थक झालें!' असे उद्गार काढून, शांतपणें अखेरचे डोळे मिटले. या खिंडींतील युद्धांत मुसलमानांचें अगणित माणूस गमावलें, आणि सीदी जोहार इतका नाउमेद झाला, कीं, ताबडतोब उरलेलें सैन्य घेऊन कर्नाटकांतील कर्नूलकडील आपल्या जहागिरीकडे तो चालता झाला. विजापुरकरांनाही सिदीनें लांच खाऊन शिवाजीस हातचा निसटूं दिला असा संशय आल्यावरून, त्यांनीं सिदीस महाराष्ट्रांत राहण्याचा हुकूम केला नाहीं. ही हकीकत सन १६६० त घडली.

### वाडीकर व जंजीरकर

यावर अली अदीलशहानें शिवाजीवर स्वतांच चालून येण्याचा संकल्प केला, पण इतक्यांत कर्नाटकांत अतिशय बंडावा माजल्यामुळें तो तिकडे वळला. या वेळींच कोंकणांत वाडीकर लखम सावंत व जंजिरेकर सीदी यांनीं विजापुर तर्फेनें शिवाजीविरुद्ध उठाव केला, आणि त्यांच्या मदतीकरितां प्रथमतः विजापुरचा सरदार बाजी घोरपडे व नंतर खवासखान आले. बाजी घोरपडे मुधोळास असतां शिवाजीनें तेथें छापा घालून बाजीला पूर्वीं शहाजीला पकडून विजापुरास पाठवल्याबद्दल देहान्त प्रायश्चित्त दिलें. खवासखान व इतर सरदारांचेही

शिवाजीनें नाकीं नव आणले, आणि अदीलशहानेंही त्यांना कर्नाटकाच्या कामगिरीवर परत बोलावलें. राहतां राहिले सांवत व सिदी. अफझलखानाच्या मामल्यापूर्वींच या दोघांची शिवाजीनें बरीच रग मोडली होती. तरीपण ते मधून मधून दुष्टावा साधीत. सन १६४८ त कोंकण प्रांतावर पहिली स्वारी करून तिकडील बऱ्याच मुलखावर आपला अंमल बसविल्यापासूनच समुद्रकिनाऱ्याचें महत्व शिवाजीच्या लक्ष्यांत आलें होतें. सिदीचा जमिनीवर मोड झाला, तरी तो दर्यावर प्रबळ होता, ही गोष्ट ध्यानीं घेऊन शिवाजीनें जलदुर्ग बांधण्यास सुरवात केली व आरमाराचा आखाडाही व्यवस्थित रीतीनें मांडला. सन १६९२ सालीं त्यानें सिदीच्या जंजिऱ्यास तोड म्हणून विजयदुर्ग जंजिरा ( जलदुर्ग ) बांधला. यानंतर आस्ते आस्ते मालवणचा सिंधुदुर्ग, हरणैचा सुवर्णदुर्ग, मुरूडचा पद्मदुर्ग, अलीबागचा कुलाबा, मुंबईबंदराच्या तोंडावरचा खांदेरी किल्ला, इत्यादि समुद्रदुर्गांची मालिकाच त्यानें तयार केली, व बरेंचसें आरमारही या किल्ल्यांभोंवतीं सिद्ध करून दर्यासारंग व मायनाक भंडारी यांस मुख्य सरदार नेमलें. या बंदोबस्तानें सर्व कोंकणपट्टीवर व समुद्रमार्गें व्यापार करणाऱ्या परदेशीयांवरही शिवाजीचा चांगलाच वचक बसला. असो, विजापुरकडील चेप उडाल्याबरोबर शिवाजीनें सांवताकडे मोर्चा फिरवला व त्यास जेरीस आणिलें. यानंतर शिवाजीविरुद्ध चळवळ करण्याचें सांवतांनीं सोडून दिलें. जंजिरेकर सिदींसही शिवाजीनें हैराण करून जंजिऱ्यांत त्यांचा कोंडमारा केला. त्यास जंजिऱ्यांतून हुसकावण्यासाठीं प्रथमतः शामराजपंत पेशवे, नंतर मोरोपंत पिंगळे, वगैरे सरदारांना पाठवून शिवाजीनें जंगजंग पछाडले, परंतु त्या कामीं त्यास पूर्ण यश कधींच आलें नाहीं; तरीपण सीदी बरेच नरम झाले.

## विजापुराशीं तह.

शिवाजीचें हें वाढतें प्रस्थ थांबवण्याला अली अदीलशहानें आतां एक नाजूक युक्ती योजिली व तिचा तत्काळ गुण आला. त्यानें सन १६६२ सालीं शिवाजीबरोबर विजापुरदरबारतर्फे तह करण्याकरितां शहाजीलाच रवाना केला ! पितापुत्र दोघेही परस्परांस भेटण्याबद्दल फार उत्सुक झाले होते, तेव्हां पडत्या फळाच्या आज्ञेप्रमाणेंच हा हुकूम शहाजीनें झेलला, आणि तो या कामगिरीकरितां पुण्यास आला. वडिलांच्या स्वागतार्थ शिवाजीनें मोठा उत्सवसमारंभ केला आणि त्यांच्याशीं नम्रतेनें वागून त्यांची कृपा व आशीर्वाद भाकले. शहाजीलाही आपल्या वैभवशाली, यशवन्त, पराक्रमी मुलाला पाहून फार धन्यता वाटली. असो, यानंतर जो तह झाला, त्यानें कल्याण ते गोव्यापर्यन्तची कोंकणपट्टी आणि भीमेपासून वारणेपर्यन्तचा मुलूख म्हणजे सुमारें १५० मैल दक्षिणोत्तर लांबीचा व १०० मैल रुंदीचा टापू शिवाजीचें स्वतंत्र स्वराज्य झाला. शहाजीच्या हयातीपर्यन्त तरी शिवाजीनें विजापुरकरांबरोबर यापुढें कटकट करूं नये, असेंही वचन शहाजीनें शिवाजीजवळून मिळविलें. यानंतर दोनच वर्षांनीं शहाजी कर्नाटकांत घोड्यावरून पडून वारला.

## मराठे व मोंगल.

यापुढील काळांत शिवाजीला दिल्लीच्या बादशाही सत्तेबरोबर प्रचंड झुंज खेळावी लागली. या झगड्यांत जिंक व हार हीं एकामागून एक येतां येतां, अखेर यशाची माळ शिवाजीच्या गळ्यांत कशी पडली हें आतां पाहण्याचें आहे. अचाट शक्तीबरोबर सामना करण्याचा असल्यामुळें शिवाजीला कधीं धाडसाचा, कधीं शौर्याचा, कधीं युक्तीचा, तर

कधीं नम्रतेचा, आश्रय करावा लागला, तर त्यांत नवल कसलें ? पण हें सर्व करूनही त्यानें आपलें साध्य कधींही नजरेआड केलें नाहीं, यांतच त्याची थोरवी आहे.

## शाएस्तेखानाचें प्रकरण.

शहाजहानचा मुलगा व दक्षिणचा सुभेदार औरंगझेब हा बाप आजारी असल्याचें ऐकून सन १६५८ त उत्तरेस गेला, हें मागें आलेंच आहे. त्यानें तेथें गेल्यावर उलट्या काळजाचीं राक्षसी कृत्यें करून आपल्या लहानमोठ्या भावांचे कांटे आपल्या वाटेंतून उपटून काढून आणि प्रत्यक्ष बापास बंदींत ठेऊन सन १६५९ त दिल्लीचें सिंहासन हस्तगत केलें. पण त्याला अनेक शत्रू होते; शिवाय, बाप बंदिखान्यांत जीवंत असेपर्यंत त्याच्या मनाला स्वस्थता नव्हती. या परिस्थितीमुळें औरंगझेबास दक्षिणेकडे लक्ष्य देतां आलें नाहीं. पण सन १६६६ त शहाजहान एकदाचा गुदरला आणि औरंगझेबाचा जीव हायसा झाला. असो, सन १६५९ त औरंगझेब तख्तनशीन झाला तेव्हां शिवाजीनें आपल्यास दक्षिणची सुभेदारी देण्याबद्दल बोलणें लाविलें. परंतु त्यास उत्तर मिळालें, कीं, ‘ आमचे मामा शाएस्तेखान यांस सुभेदार नेमलें आहे, तरी तुम्हीं त्यांच्या ताब्यांत वागावें. ’ विजापुरकरांबरोबर तह झाल्यावर शिवाजीनें मोंगलांचा मुलूख लुटण्यास सुरवात केली. तेव्हां औरंगझेबानें शिवाजीला धुळीस मिळवण्याचा जरबेचा हुकूम शाएस्तेखानास पाठविला आणि कांहीं दिवसांनीं जसवंतसिंगासही त्याचे मदतीस रवाना केला. शाएस्तेखानानें औरंगाबादेहून निघून एकेक ठिकाण घेत घेत पुणें गांठलें आणि शिवाजीच्या वाड्यांत सन १६६३ सालीं मुक्काम दिला. शिवाजीनें आपलें सदर ठाणें पुण्याहून उठवून

रायगडाला नेलें होतें, व तेथें सर्व प्रकारच्या सोई त्यानें केल्या होत्या. शाएस्तेखान पुण्यांत असतां, शिवाजी सिंहगडास होता. त्यानें एक रात्रीं लग्नाच्या वरातींत सामील होऊन पुणें शहरांत प्रवेश केला व शाएस्तेखान राहत होता त्या आपल्या वाड्याच्या भिंतीस भोंक पाडून तो काळोखांत कांहीं लोकांसह नेमका खानाच्या शय्यागृहांत घुसला. हें पाहतांच बायकांनीं किलकिलाट केला. खानाचा मुलगा अंगावर धांवून आला, पण तो गारद झाला. बायकांनीं भीतीनें दिवे मालवले. तोंच खान खडबडून आला, पण तो झटापटींत सांपडला. त्याच्या हाताचीं बोटें कापलीं गेलीं, तथापि तो जीवन्त निसटला. एवढें अचाट साहसाचें कृत्य करून शिवाजी आपल्या लोकांसह पसार झाला, व सिंहगडच्या रस्त्याला लागल्यावर त्यानें खुणेचा कर्णा फुंकला, तोंच कात्रजच्या वाटेकडे शेकडों दिवट्या दिसूं लागल्या. इकडे आरडाओरडा झाल्यावर गनिमाचा पाठलाग करण्यासाठीं खानाचे लोक घाईघाईनें तयार झाले, व या दिवट्या पाहून त्या धोरणानें त्यानीं धांव ठोकली. अखेर असें आढळलें, कीं, तो शिंगांना दिवट्या बांधलेल्या बैलांचा रिकामाच तांडा होता!

### औरंगझेबाचा तळतळाट.

औरंगझेबानें ही गोष्ट ऐकतांच शाएस्तेखानाची बंगाल्यांत बदली केली, आणि शहाजादा मुअझम यास सुभेदार नेमून दक्षिणेंत पाठविलें. यानंतर पुण्याकडील मोंगल फौजेचा चेप जरा कमी व्हावा व सुरतेहून जंजिरेकर सिद्दींना मदत मिळते तिला आळा पडावा, म्हणून शिवाजीनें मोंगलाला हुलकावणी दाखवून सन १६६४ एकदम सुरत शहरावर घाला घातला व तें शहर एक आठवडाभर लुटून तेथील अपरंपार संपत्ती रायगडावर आणून भरली. याच

सुमारास शिवाजीच्या आरमारानें एक मक्केच्या यात्रेकरूंचें जहाज गांठून लुटलें. नेताजी पालकर मोंगल मुलखास सारखा उपद्रव देतच होता. या सालीं मराठ्यांचे व मोंगलांचे उघड्या मैदानांतही एकदोन वेळां सामने झाले, पण त्यांतही शिवाजीचा जय झाला. औरंगझेब हें ऐकून फारच तडफडला. त्यानें जसवंतसिंगाला जरब लावली, आणि विजापुरकरांनाही शिवाजीस चिरडण्याच्या कामीं मदत करण्याबद्दल लिहिलें. आतां, एका बाजूनें जसवंतसिंग व एका बाजूनें विजापुरकरांचा खवासखान, अशा कैचींत शिवाजी सांपडला. पण त्यानें खवासखानाचा कोंडमारा केला व त्याच्यावर मराठे घसरले. मुसलमानांचे पुष्कळ सैनिक व अमलदार धारातीर्थीं पडले, पण अखेर खवासखानानें निर्वाणीचा हल्ला केला, तेव्हां मराठे सैन्य माघार घेऊन पळून गेलें. असो. मध्यंतरीं औरंगझेबानें शहाजादा मुअझम व जसवंतसिंग यांस परत बोलावून, जयपुराचा मिर्झाराजा जयसिंग व दिल्लीरखान या प्रतापी सरदारांची शिवाजीच्या बंदोबस्ताच्या कामगिरीवर योजना केली.

## मीर्झा राजा जयसिंग

दक्षिणेंत आल्याबरोबर राजा जयसिंगानें शिवाजीच्या मुलखावर रोख धरून चाल केली. औरंगझेबानें या मोहिमेंत राजा जयसिंगाला सर्वाधिकारित्व दिलें होतें. दिल्लीरखान वगैरे सर्व सरदार व प्रत्यक्ष दक्षिणचा सुभेदारही इतक्यापुरता दुय्यमच होता. राजा जयसिंगानें युद्धाबरोबर युक्तीचाही प्रयोग सुरू केला होता. विजापुरकरांस तो शिवाजीविरुद्ध उठवीत होता. शिवाजीच्या लोकांसही लांचलुचपतीनें फोडण्याचा त्याचा प्रयत्न चालूच होता. पोर्तुगिजांशीं संधान बांधून समुद्रकिनाऱ्यानें शिवाजीला पायबंद देण्याची योजना तो करीत होता. इतकें सर्व तारायंत्र आंतून चालतें

ठेऊन, त्यानें शिवाजीचे किल्ले घेण्याचें कामही नेटानें आरंभिलें. पुणें, सासवड, वगैरे ठिकाणें सर करून, त्यानें दिल्लीरखानास पुरंदर काबीज करण्यास पाठविलें. हा किल्ला मुरार बाजी प्रभूनें मोठ्या शर्तीनें लढविला व स्वामिसेवेला आपल्या देहाचा बळी दिला. मुरार बाजी पडला, तरी दिल्लीर-खानाच्या हातीं केवळ खालचाच कोट आला, वरचा कोट त्याला दाद देईना. या किल्ल्यांत मोठमोठे मराठे सरदार सकुटुंब राहत होते. इत-क्यांत कोंकणपट्टींतील समुद्रकांठची व्यवस्था पाहण्याकरितां शिवाजी गेला होता, तो १६६५ च्या जून महिन्यांत परत आला. त्याला जेव्हां ही परिस्थिति दिसून आली, तेव्हां राजा जयसिंगाशीं लढत राहून आत्मघात करणें शहाणपणाचें नाहीं, असें ठरवून त्यानें जयसिंगाबरोबर तहाचें बोलणें लाविलें. जयसिंगानें कळविलें, 'कीं, तुम्हीं आपले किल्ले बादशहाचे ताब्यांत देऊन, केल्या अपराधाबद्दल माफी मागून बादशहास शरण जाण्याचें व त्याचे नोकरींत राहण्याचें शपथपूर्वक कबूल करीत असाल, तर मीही तुम्हांला रजपुताचें अभयवचन देतों, आणि तुम्ही निःशस्त्र होऊन आमचे भेटीस यावें.' शिवाजीनें हें सर्व कबूल केलें. पुरंदर, तुंग, तोरणा, विसापुर, राजगड, कोंडाणा, वगैरे बरेच किल्ले त्यानें मोंगलांना खाली करून दिले. नंतर ही सर्व हकीकत जयसिंगानें बादशहास लिहून, त्याच्याकडून ताबडतोबीनें तहाची मंजुरी आणविली. थोडेच दिवसांनीं जयसिंगानें विजापुरावर स्वारी केली, या स्वारींत शिवाजीनें आपल्या फौजेसह औरंगझेबाचा सरदार म्हणून मोठी बहादुर कामगिरी केली. ती ऐकून बादशहा अगदीं खूष झाला, व त्यानें शिवाजीस बहुमोल बक्षीस पाठविलें व शिवाजीस ताबडतोब भेटीस घेऊन यावें म्हणून जयसिंगास लिहिलें. शिवाजीनें, आपणास या कार्यांत कांहीं धोका आला,

तरीही मागें आपल्या राज्यांत कांहीं गोंधळ उडूं नये म्हणून रायगडीं सर्व कारभार पाहण्याकरितां एक मंत्रिमंडळ नेमलें व त्यानें जिजाबाईच्या संमतीनें कारभार करावा असें ठरवलें. आपणास दगाफटका किंवा अपाय झाल्यास आपला दुसरा मुलगा राजाराम यास स्वामी करून राज्याचें रक्षण करावें, असें शिवाजीनें सर्वांस बजावून ठेविलें. इतकी व्यवस्था करून शिवाजी आपला मोठा मुलगा संभाजी, तानाजी मालुसरे, बाळाजी आवजी, प्रतापराव गुजर, वगैरे जीवलग सरदार मंडळी, फौज, सरंजाम, खजिना, वगैरे इतमाम बरोबर घेऊन राजा जयसिंगासंगती दिल्लीस जाण्यास निघाला.

### आग्र्यांतील प्रसंग.

शिवाजी व औरंगझेब यांची भेट आग्र्याच्या दरबारांत ता. १२ मे सन १६६६ रोजीं झाली. त्यापूर्वीं असा करार झाला होता, कीं, बादशहानें शिवाजीस स्वतंत्र राजाप्रमाणें दरबारांत मान द्यावा. परंतु बादशाहानें आपलें वचन मोडून शिवाजीस राजा जयसिंगाचे खालीं उभें राहण्यास जागा दिली. तेव्हां शिवाजी चिडून जाऊन, त्यानें भर दरबारांत जरा गडबड केली. तेव्हां औरंगझेबानें लागलाच दरबार बंद करून, शिवाजीला जयसिंगाचा मुलगा रामसिंग याच्या बागेंत नजरकैदेंत टेवलें. त्याच्या वाड्याभोंवतीं सशस्त्र लोकांचा रात्रंदिवस पाहरा होता, व शहरफौजदार पोलादखान हा रोज वर्दी देण्यासाठीं खास बादशहाकडे जात असे. शिवाजीवर आजपर्यन्त आलेल्या प्रसंगापेक्षां हा प्रसंग फारच बिकट, आणीबाणीचा, व जवळजवळ बिनतोड होता. परंतु यांतूनही तो मोठ्या शिताफीनें बचावला. त्याच्याच संमतीनें त्याच्या जवळचे सर्व लोक व सैनिकही, हवा मानवत नाहीं, अशासारख्या

कांहीं तरी सबबीवर हळूहळू आग्रा सोडून गेले; कांहीं दक्षिणेंत आले व कांहीं आग्र्यांतच वेष पालटून जरूर पडल्यास स्वामींस साह्य करण्यास राहिले. इकडे शिवाजीनें मोठमोठ्या अमीर–उमरावांस मिठाईचे प्रचंड हारे व पेटचा नजराणे म्हणून पाठविण्यास सुरवात कशी केली, व एक दिवस अशाच दोन हाऱ्यांतून तो स्वतः व त्याचा मुलगा संभाजी कसे पसार झाले, हें सर्वत्रांस ठाऊकच आहे. यानंतर मथुरेंत मोरोपंत पिंगळ्याचे मेहुणे सहकुटुंब राहत असत, त्यांच्याकडे संभाजीस ठेऊन, शिवाजी वेष पालटून प्रयाग, काशी, वगैरे यात्रा करीत जगन्नाथाच्या मार्गे गोंडवणांतून विजापुरावरून रायगडास सन १६६६ च्या डिसेंबरांत सुखरूप परत आला. या आगऱ्याच्या अद्भुत सफरेंत शिवाजीचे एकंदर दहा महिने मोडले, आणि मोंगलांशीं फटकूनच राहिलें पाहिजे, औरंगझेबावर पुन्हा मुळींच विश्वासून राहतां कामा नये, अशी खूणगांठ त्यानें आपल्या मनाशीं बळकट बांधली. यमाच्या दाढेंतून शिवाजी सुरक्षितपणें निसटून आल्याबद्दल मराठी स्वराज्यांत आनंदोत्सव दुमदुमून गेला, यांत नवल नाहीं.

### शिवाजीचा व्यवस्थित कारभार.

शिवाजीच्या गैरहजेरींत त्याच्या मुलखाचा बंदोबस्त कडेकोट होता व कारभार सुरळीत चालला होता. कोठेंही बखेडा कीं बंड झालें नाहीं, किंवा जुलूमजबरदस्ती झाल्याचेंही आढळत नाहीं. शिवाजीनें सन १६४५ त **स्वराज्य** किंवा **हिंदवी राज्य** स्थापिण्याचा संकल्प केला, तेव्हांपासूनच हातीं येणाऱ्या मुलखाची नीट व्यवस्था राहावी, प्रजा सुखी व संतोषी असावी, न्याय निर्मळपणें व्हावा, सर्वांचे हक्कसंबंध अबाध

राखले जावे, कोणाच्या धर्मभावना दुखविण्यांत येवूं नयेत, अशा गोष्टींबद्दल तो फार काळजी घेत असे. अर्थात्, असा कारभार चालविण्याकरितां त्याला योग्य कारभारी व अमलदार आरंभापासूनच नेमावे लागले होते, आणि स्वराज्याचा व्याप जसजसा वाढत गेला, तसा या अधिकारिमंडळाचाही विस्तार झाला. शहाजीनें आपल्या जहागिरीची व्यवस्था राखण्याकरितां कारभारी नेमलेलेच होते, परंतु शिवाजीचा जेव्हां नव्या साध्याला अनुसरून उपक्रम सुरू झाला, तेव्हां नव्या दमाचीं व नव्या विचाराचीं माणसें नेमणें त्याला अवश्य झालें. उदाहरणार्थ, १६४६ चे सुमारास शिवाजीनें श्यामराज नीलकंठ प्रधान व बाळकृष्णपंत हणमंते मुझुमदार यांच्या नेमणुका केलेल्या आढळतात. शिवाजीची गोड वाणी, निर्मल चारित्र्य, संकटास स्वतः तोंड देण्याची तयारी, बुद्धिचातुर्य, उदार विचार, धर्मनिष्ठा, आणि राष्ट्रोद्धाराविषयीं कळकळ, यांचा संस्कार लोकांवर इतका दृढ झाला होता, कीं त्याला गुणी व विश्वासू माणसें भराभर मिळत गेलीं. शिवाजीचा आपल्या अधिकारी वर्गावर व प्रजेवर जितका दाब असे, तितकेंच त्यांचें शिवाजीवर प्रेम असे. यामुळें त्याच्या अमलांतील मुसलमान प्रजेंत व नोकरांतही फंदफितूर झालेली सहसा आढळत नाहीं. असो, शिवाजीनें आरंभींच नेमलेल्या मुझुमदार, सेनानायक, वगैरे कारभारी मंडळीला पुढें नियमबद्ध स्वरूप येऊन अष्टप्रधानात्मक मंत्रिमंडळ पूर्ण दशेस आलें. मुलुख जिंकून स्वराज्याची वाढ करण्याचें काम सारखेंच सुरू असल्यामुळें या सर्वच मंत्र्यांना कालावश्यकतेप्रमाणें लष्करी कामगिऱ्या कराव्या लागत, यांत आश्चर्य वाटण्याचें कारणच नाहीं. मालोजीपासून परंपरेनें आलेलें ‘ राजे ’ हें बिरुद शिवाजीच्या नांवापुढें अगदीं बालपणा-

पासूनच लावण्यांत येत असे, परंतु १६६४ त शहाजीच्या मृत्युनंतरच शिवाजीनें तें रीतसर धारण केलें. पण शिवाजीनें १६४५ चे सुमारास हिंदुपदशाहीचा हेतु मनांत ठाम करून जो कार्याला आरंभ केला, तो त्याच्या वेळच्या बऱ्याच लोकांना इतका पटला, कीं, त्या वेळच्या दफ्तरी लिखणांतही शिवाजीसंबंधें 'छत्रपति' हें बिरुद योजल्याचा क्वचित् ध्वनि उठलेला आढळांत येतो. असो.

**मोंगलांचा पेच ढिला पडतो.**

शिवाजीला औरंगझेबानें कैदेंत ठेवल्याची वार्ता स्वदेशीं आल्यापासूनच मोरोपंत पिंगळे व प्रतापराव गुजर यांनीं मोंगलांकडे गेलेले किल्ले परत मिळविण्याचा आरंभ केला होता. इतक्यांत शिवाजीही परत आला, आणि त्यानें तोच क्रम पुढें चालविला. परंतु युद्ध न करितां जर आपला हात चालेल, तर तूर्त बरें असें त्यास वाटत होतें. या वेळीं महाराणा जसवन्तसिंग व शहाजादा मुअझम यांजकडे दक्षिणचा कारभार होता. ते दोघेही युद्धास कंटाळलेले होते. औरंगझेबाला, आपण स्वतः दक्षिणच्या सुभ्यावर असतांना बापापासून स्वतंत्र होण्याची कशी महत्वाकांक्षा धरली होती, याची आठवण असल्यामुळें, तोच कित्ता मुअझम वळवील या धास्तीनें औरंगझेब त्यास सैन्य वाढविण्याला परवानगी देत नसे. या कारणास्तव दक्षिणच्या सुभेदाराचें तेज पडत नाहींसें होऊन, लढाईचा मामला नको असें शहाजादा व महाराणा यांस झालें होतें. याच संधीस अफगाणिस्थानांत काहूर उठून त्याचा धक्का दिल्लीपर्यन्त पोचण्याचीं लक्षणें दिसूं लागलीं होतीं व राजपुतान्यांतही खळबळीचा ध्वनि गाजणार असें वाटूं लागलें होतें. तेव्हां उत्तरच्या बिकट प्रसंगामुळें दक्षिणचें राज-

कारण तूर्त कसें तरी चालढकलीवर न्यावें, असें औरंगझेबाचें मनोगत असावें. ही सर्व परिस्थिति शिवाजीच्या लक्ष्यांत आली, व त्यानें जसवन्तसिंगाजवळ तहाचें बोलणें लावलें, व अखेर सन १६६८ त औरंगझेबानें पुरंदरचा तह मंजूर केला. या तहान्वयें शिवाजीस "राजा" हा किताब बादशहानें दिला. पुरंदर व सिंहगड हे दोन किल्ले वगळून बाकीचे किल्ले शिवाजीस परत मिळाले. त्याचा मुलगा संभाजी यास वऱ्हाडप्रांतांत नवी जहागीर देण्यांत आली, आणि वऱ्हाडांत सैन्य ठेवावयाला या जहागिरीचें संरक्षण ही आयतीच सबब शिवाजीस लाभली. शिवाय, कुतुबशाही व अदीलशाही यांच्या प्रांतांतून चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचे हक्कही बादशहानें दिले. पण हा तह सरासरी दोन वर्षें टिकला, नंतर १६७० त पुन्हां युद्धाला तोंड लागलें.

### पुन्हां युद्ध व सिंहगडचा विजय.

शिवाजीनें मोंगलमुलखांतील खानदेशांत वगैरे लूट चालविली आहे, अशा तऱ्हेच्या बऱ्याच कागाळ्या औरंगझेबाच्या कानावर गेल्यावरून, त्यानें शहाजाद्याला जरबेनें लिहिलें, कीं, शिवाजीबरोबर एकदम लढाई पुकारून त्यास नरम करावा. शिवाजीला ही बातमी कळतांच, त्यानें प्रथम आपल्या किल्ल्यांपैकीं मोंगलाच्या ताब्यांत असलेले सिंहगड व पुरंदर हे किल्ले घेण्याची मसलत केली. सन १६७० त आरंभींच तानाजी मालुसरे यानें मोठ्या शर्तीनें रात्रीचा हल्ला करून सिंहगड काबीज केला, पण ऐन वेळीं किल्लेदाराचा घाव मर्मीं लागून शिवाजीचा बालसंवगडी व स्वराज्याचा भरंवशाचा मोहरा तानाजी प्राणास मुकला. त्या वेळीं मराठे कच खाऊन पळण्याच्या बेतांत होते. परंतु तानाजीचा भाऊ सूर्याजी हा पुढें सरसावला, व त्यानें

मराठ्यांच्या अभिमानाला व शौर्याला उत्तेजित करून हातींतोंडीं आलेला किल्ल्याचा घास फुकट जाऊं दिला नाहीं. शिवाजीनें सूर्याजीसच सिंहगडचा किल्लेदार केलें. यानंतर माहुली किल्ला व कल्याण प्रांत मोरोपंत पिंगळे व आबाजी सोनदेव या सरदारांनीं सर केला. लगोलग शिवाजीनें आपला मोर्चा सुरतेवर वळविला व हें शहर त्यानें आक्टोबर महिन्यांत तीन दिवसपर्यन्त यथेच्छ लुटलें! सुरतची लूट रायगडीं नेत असतां, चांदवड येथें मोंगल फौज शिवाजीस आडवी आली. पण या समोरासमोर लढाईंत शिवाजीनें मोंगल फौजेचा फन्ना उडविला, व सुरतची लूट रायगडीं पोंचली. पुन्हां लगेच मोरोपंत पिंगळे व प्रतापराव गुजर हे सरदेशमुखी व चौथाई मोंगल मुलखांत वसूल करीत वऱ्हाडांत कारंज शहरापर्यन्त हुतुतू घालीत गेले. सन १६७१ च्या आरंभींच मोरोपंतांनीं बागलाणांतील अनेक शहरें व किल्ले घेतले.

## साल्हेरची लढाई.

आतां मात्र औरंगझेब रागानें वेडा झाला. त्याला शहाजाद्याचाही अधिकाधिक संशय येऊं लागला. म्हणून त्यानें जसवंतसिंगास परत बोलावून, मोहबतखान सरदाराची सर्वाधिकार देऊन दक्षिणच्या कामगिरीवर नेमणूक केली. याच्या हाताशीं दिलीरखानही देण्यांत आला. हे नव्या दमाचे खान आल्याबरोबर त्यांनीं एकएक किल्ला घेण्यास सुरवात केली. दिलीरखानानें साल्हेर किल्ल्यास वेढा दिला. किल्ल्याच्या मदतीस मोरोपंत व प्रतापराव फौजेसह धांऊन आले, त्यांस मोहबतखानाच्या हुकमानें एखलासखान आडवा गेला. तेव्हां साल्हेर नजीक सन १६७२ त मोंगल व मराठे यांची उघडाउघड लढाई झाली. हींत मोंगलांनीं पक्की हार खाल्ली. एखलासखान

कैद झाला व दिल्लीरखान पळून गेला. मराठ्यांना लूट चापून मिळाली. ही बातमी औरंगजेबास लागल्याबरोबर त्यानें मोहबतखानास परत बोलावलें, आणि गुजरातचा सुभेदार खानजहान यास दक्षिणचा सुभेदार नेमलें. परंतु नव्या सुभेदारानें शिवाजीशीं लढा न चालवितां सलोखाच केला.

**बैलोल्खानाचा पेगम.**

याच संधीस विजापुरचा अली अदीलशहा निवर्तला आणि दरबारांत पोरोंडा होऊन गोंधळ माजला. या बजबजपुरींत बैलोल्खानाचें प्रस्थ फार वाढलें. हा दिल्लीरखानाचा स्नेही व मराठ्यांचा द्वेष्टा होता. यानें बरीचशी फौज घेऊन पन्हाळ्यास वेढा दिला. वेढा सैल पडावा म्हणून प्रतापराव गुजरानें विजापुरच्या मुलखांत लूटफाट करीत राजधानीपर्यन्त चाल केली. अर्थात् पन्हाळ्याचा वेढा सैल करून बैलोल्खान प्रतापरावाला आडवण्यास गेला. दोघांची गांठ जतजवळ उंबराणी येथें झाली. या चकमकींत बैलोल्खानाची अगदीं दुर्दशा उडाली. तेव्हां त्यानें मराठ्यांची पुन्हां खोड न काढण्याच्या अटीवर प्रतापरावापासून आपल्या सैन्याचा कसाबसा बचाव केला. परंतु शिवाजीस हा प्रतापरावाचा गोडेपणा आवडला नाहीं. 'विजापुरकरांची पुरी खोड मोडल्याशिवाय मला तोंड दाखवूं नये,' असा खरमरीत निरोप त्यानें प्रतापरावास पाठविला. इकडे प्रतापराव सैन्यासह दूर गेला असें पाहून बैलोल्खानही उलटला आणि त्यानें पुन्हां पन्हाळ्यास वेढा दिला. तेव्हां रागातमाच्या तिरमिरींत प्रतापराव एकदम त्याच्यावर चालून आला. या झटापटींत प्रतापराव ठार झाला, आणि मराठे पळता पाय घेऊं लागले. परंतु त्या वेळीं हंसाजी मोहिते नांवाच्या सरदारानें मराठ्यांना धीर देऊन लढाईची बाजू विजापुरकरावर उलटविली. ही लढाई जसरीची लढाई म्हणून

प्रसिद्ध आहे. या वेळच्या मर्दुमकीबद्दल मोहित्यास ' हंबीरराव ' हा किताब मिळाला.

## अभिषेक.

यानंतर चारपांच महिन्यांनीं म्हणजे सन १६७४ च्या जून महिन्यांत शिवाजीनें आपणांस रायगडीं शास्त्रोक्त रीतीनें राज्याभिषेक करवून ' क्षत्रियकुलावतंस गोब्राह्मणप्रतिपालक छत्रपति महाराज ' हें बिरुद धारण केलें. शिवाजीनें हा जो राज्यारोहणाचा टोलेजंग समारंभ केला, त्यांत त्याला आपला दिमाख दाखवावयाचा होता किंवा एक मनाची हौस पुरवावयाची होती असें नाहीं, तर हा समारंभ, त्यानें जें राष्ट्रकार्य हातीं घेऊन रंगारूपास आणलें होतें, त्याच्या महत्वाला अवश्य होता. शिवाजीचा हेतु हिंदवी राज्य स्थापण्याचा होता, आणि सर्वमान्य, कर्तव्यदक्ष, व श्रेष्ठसत्ताधारी, व्यक्ति व्यवस्था ठेवण्यास असल्यावांचून कोणत्याही राज्याची सुस्थिति राहात नाहीं, हें शिवाजीस ठाऊक होतें. भारतरामायणांत अराजक राष्ट्रांची विपन्न अवस्था कशी वर्णिली आहे, हें त्याला अवगत होतें. आतां शिवाजीनें राज्य कमाविलें होतें, त्याचा विस्तार कांहीं लहानसहान नव्हता. त्याच्या मुलखाची उत्तर सीमा खानदेश, औरंगाबाद, व वऱ्हाड, येथपर्यन्त भिडली होती. दक्षिण व पूर्व सीमांनीं हुबळी, बेदनूर, विजापुर, व गोवळकोंडा यांच्याशीं गांठ घातली होती. पश्चिमेस बहुतेक किनारा त्याचा झाला असून, आरबी समुद्रावर त्याचें आरमार प्रौढीनें संचार करीत होतें. शिवाय मोंगल, अदीलशहा, व कुत्बशहा, यांच्या मुलखांत चौथाई व सरदेशमुखी यांचा वसूल शिवाजी करीतच असे. तेव्हां एवढ्या पसाऱ्याचा आवर करणारा सर्व सत्ताधिकारी शास्त्रोक्त रीतीनें अभिषिक्त

असावा ही भारतीय कल्पना शिवाजीच्या मनांत बिंबली होती. शिवाय, शिवाजीला 'पुंड, बंडखोर, चोर, लुटारू, डोंगरांतील चुवा,' इत्यादि नांवें देऊन, प्रतिस्पर्धी मुसलमान राजे त्याला क्षुद्र मानीत असत, तेव्हां 'आपलें कार्य पुंडाईचें नसून राष्ट्रघटनेचें आहे, व त्यास क्षुद्र लेखणें हें खुळेपणाचें लक्षण आहे,' हें स्वजनांस व परकीयांसही पटविण्याकरितां मूर्धाभिषिक्त होणें शिवाजीस अवश्य होतें. ज्यांच्या सेवेंत आपण आहों, ते अलबत्तेगलबत्ते नसून शास्त्रोक्त अभिषिक्त राजवंशीय आहेत, ही कल्पनाही आपल्या प्रजाजनास उत्तेजक व अभिमानास्पद होईल, अशीही शिवाजीला खात्री वाटत होती. शिवाजी मूळचा इतर लहानमोठ्या जहागीरदारांसारखाच असल्यामुळें सामाजिक व्यवहारांत त्याचा दर्जा निराळा मानण्यास कांहीं मराठे कुरकुरत असत, आणि याचा परिणाम कधीं काळीं राजकारणावरही घडल्यावांचून राहणार नाहीं, ही गोष्ट शिवाजीच्या करड्या नजरेस आल्यावांचून राहिली नाहीं. एकदा कोठें भोजनसमारंभांत शिवाजीचें पात्र उच्चासनावर मांडण्यांत आलें होतें, तेव्हां या व्यवस्थेस कित्येकांनीं हरकत घेतली. 'असे काय हे सिंहासनस्थ राजे आहेत, कीं सामाजिक बाबतींतही यांना उच्चासन मिळावें?' असेही उद्गार कांहींनीं काढले. याला उपाय अर्थातच शास्त्रोक्त रीतीनें स्वतांस अभिषिक्त करून घेणें हाच होता.

### राज्यव्यवस्था

शिवाजीनें राज्यारोहण केल्यावर त्या दिवसापासून 'राज्याभिषेक शक' नवाच सुरू केला. आपल्या नांवाचें नाणें त्यानें यापूर्वींच पाडलें होतें. रायगड ही आतां मराठी राज्याची कायमची राजधानी झाली. शिवाय अष्टप्रधानात्मक अधिकारिमंडळ स्थापन करण्यांत आलें,

आणि निरनिराळ्या मंत्र्यांकडे निरनिराळीं खातीं सोंपविण्यांत आलीं. शिवाजीनें स्वीकारलेल्या बिरुदांत भारतीय संस्कृति, धर्माभिमान, व कर्तव्यदक्षता, हीं प्रतिबिंबित झालेलीं आहेत. 'गोब्राह्मणप्रतिपालक' हें बिरुद धर्मसंरक्षणाचें व कर्तव्यपरतेचें पूर्णपणें द्योतक आहे. शिवाजीला जसा देशाभिमान व धर्माभिमान होता, त्याप्रमाणेंच भाषाभिमानही होता. राजव्यवहारांतील मराठी भाषेवर फार्सीचें किती अवजड दडपण पडलें आहे, हें पाहून भाषाशुद्धीकडेही त्याचें लक्ष्य वेधलें. फार्सी भाषेचा तो द्वेष करीत नसे. तो मुसुलमानी धर्माचाही द्वेष करीत नसे. मात्र जशी त्याला मुसुलमानी धर्माची व राजसत्तेची दडपशाही हिंदुधर्मावर व हिंदुप्रजेवर नको होती, त्याचप्रमाणें फार्सीची दडपशाहीही मराठीवर नको होती. त्यानें आपल्या आठ मुख्य अधिकाऱ्यांचीं नांवें फार्सी न ठेवतां, जुन्या ग्रंथांत आढळणारीं संस्कृत ठेविलीं व तीं व्यवहारांत आणलीं. त्यानें एका पंडिताकडून 'राजव्यवहारकोश' हा तयार करविला. या कोशांत व्यवहारांत चालू असलेल्या बऱ्याच फार्सी शब्दांना संस्कृत प्रतिशब्द दिलेले आहेत. शिवाजीचें अष्टप्रधानमंडळ जवळजवळ इंग्लंडमधील प्रधानमंडळासारखेंच होतें, परंतु हें साम्य केवळ खात्याच्या वांटणीपुरतेंच होतें. इंग्लंडमधील प्रधानमंडळ लोकपक्षाच्या बहुमतानुसार बनलेलें असतें. परंतु शिवाजीच्या प्रधानमंडळांत लोकमताचा संबंधच नसे. प्रधान शिवाजीनेंच निवडावयाचे व त्यांनीं शिवाजीच्या हाताखालींच काम करावयाचें. शिवाजी खरोखरच राष्ट्रहितकर्ता असल्यामुळें त्यानें केलेली निवड उत्तमच असे, यांत संशय नाहीं. पण प्रातिनिधिक शासनपद्धतीचा प्रश्न त्या वेळीं कधींच उद्भवला नव्हता. लोकांना स्थानिक, सामाजिक, व धार्मिक, बाबतींत वहि-

वाटीनें पुष्कळ हक्क मिळालेले होते. प्रत्येक गांवांत गोतगंगा किंवा गांवपंचायत ही एक स्वतंत्र शासनसंस्थाच असे, व तिला बऱ्याच बाबतींत फौजदारी व दिवाणी अधिकार असे. परंतु एकंदर राष्ट्राची एकादी प्रातिनिधिक शासनसंस्था असावी, असें ध्येयच त्या वेळीं लोकांपुढें नव्हतें, तेव्हां तें तत्त्व शिवाजीच्या अष्टप्रधान मंडळाच्या घटनेंत सांपडलें नाहीं, तर त्याबद्दल आश्चर्यही वाटावयास नको व शिवाजीला महत्वाकांक्षी म्हणून दोषही यावयास नको.

## कर्नाटकाची मोहीम.

राज्याभिषेकानंतर दोन वर्षांनीं शिवाजीनें कर्नाटकावर स्वारी केली. या स्वारींत शिवाजीनें कोपल, बल्लारी, जिंजी, वगैरे प्रान्त काबीज केले. इकडे मोंगल सरदार दिल्लीरखान व विजापुरचा कर्ता सरदार बैलोलूखान यांनीं एक होऊन शिवाजीस बुडविण्याचा घाट घातला. पण इतक्यांत बैलोलूखान वारला. औरंगझेबानें खानजहान बहादूरशहा याची दक्षिण सुभ्यावरून बदली करून याच वेळेस शहाजाद्याला पुन्हां नेमिलें व विजापुरकरांचा नाश करण्याचा हुकूम दिला. या संकटांत विजापुरच्या सीदी पक्षांतील पुढारी मसाऊदखान यानें शिवाजीला शेजारी म्हणून गौरवून त्याची कुमक मागितली. शिवाजीनेंही या प्रसंगीं कसर न करतां विजापुरास मनःपूर्वक मदत करून बचाविलें आणि दिल्लीरखानाची दाणादाण केली व मोंगल मुलखांत लुटालूट करून औरंगाबादेपर्यन्त कहर उसळून दिला. यानंतर मोंगलाचा पेगम ढिला पडला. इकडे शिवाजीनें गोंवळकोंडेकरांशीं तह करून, कर्नाटकांतली मोहीम पुढें चालू ठेविली. यावरून दिल्लीरखान फारच चवताळला व त्यानें गोवळकोंड्याकडे मोर्चा फिरविला. पण तेथील दिवाण मादण्णा यानें

त्यास चोप देऊन मागें परतविलें. शिवाजीही आपल्या मुलखाच्या संरक्षणासाठीं परत आला व कर्नाटकची मोहीम त्यानें आपल्या सरदारांवर सोंपवली. या सरदारांत संताजी भोसले, हंबीरराव मोहिते, आणि धनाजी जाधव, हे प्रमुख होते. कर्नाटक प्रांतांतील जमीनदार लोक विजापुरच्या अस्मानीसुलतानी कारभारास फार कंटाळले होते. त्यांनीं आपलें संरक्षण करण्याबद्दल शिवाजीच्या सरदारांस विनविलें, आणि ती विनंति अर्थात्च मान्य करण्यांत आली. त्यावरून विजापुरकरांचा कृष्णा व तुंगभद्रा याच्यामधील अन्तर्वेदीचा सरदार यूसफखान मायणा हा चवताळून मराठ्यांवर चालून आला. परंतु हंबीररावानें थोड्याशाच सैन्यानें त्याची भंबेरी उडवली. तेव्हां मायणाच्या बचावासाठीं विजापुराहून एक मोठी फौज आली, आणि सावनूरनजीक फार निकराची लढाई झाली. मराठ्यांनीं विजापुरकरांचा पुरा मोड करून, राजधानीपर्यन्त त्यांची लांडगेतोड केली. अशा रीतीनें सन १६७८ त बहुतेक कर्नाटक म्हैसूरप्रान्तासकट शिवाजीच्या कबजांत आलें.

### व्यंकोजीचा लढा.

आतां शिवाजीनें तंजावरच्या व्यंकोजीजवळून वडिलांच्या तिकडील जहागिरींतला अर्धा हिस्सा घेण्याचें ठरविलें व ताबडतोब त्या मोहिमेस सुरवात केली. या मोहिमेचें हें कारण केवळ दिखाऊ होतें, शिवाजीचा खरा हेतु हिंदवी राज्याचा पाया मजबूत व निर्दोष करण्याचा होता. व्यंकोजीच्या पदरीं रघुनाथपंत हणमंते नांवाचे पिढीजाद मंत्रि होते. त्यांना हिंदूंचा अभिमान होता व शिवाजीविषयीं त्यांच्या मनांत गाढ आदर वसत असे. परंतु व्यंकोजी हा शिवाजीचा द्वेषमत्सर करी. तो शिवाजीला बंडखोर म्हणत असे, व शिवाजीविरुद्ध

विजापुरकरांची सेवा करण्यांत मोठें भूषण मानीत असे. रघुनाथपंतांना हें धोरण अगदींच नापसन्त असे, पण व्यंकोजी त्यांचें मुळींच ऐकत नाहींसा झाला व त्यांचा अपमानही करूं लागला. तेव्हां त्या मानी पुरुषानें तंजावर सोडलें व तो महाराष्ट्रांत येण्यास निघाला. येतांना वाटेंत रघुनाथपंतांनें गोवळकोंडेकरांनीं शिवाजीशीं सख्य करावें असें संधान कुत्बशहाचा दिवाण मादण्णा याच्याशीं बांधलें व त्या हिंदू दिवाणाचा हिंदुत्वाभिमानही जागा केला. असो. यानंतर रघुनाथपंत शिवाजीस भेटला. त्यानें तंजावरची कच्ची हकीकत सांगितली. त्यावरून व्यंकोजीस ताळ्यावर आणण्याकरितां शिवाजीनें कुत्बशहाशीं सख्य करून कर्नाटकची मोहीम काढिली होती. ती मोहीम यशस्वी झाली, आणि आतां व्यंकोजीबरोबरचा मामला सुरू झाला. पहिल्या प्रथम शिवाजीनें व्यंकोजीशीं गोडीगुलाबीचें बोलणें लाविलें. परंतु व्यंकोजीनें उद्धटपणाचें उत्तर दिलें व युद्धाची तयारी चालविली. व्यंकोजीनें शस्त्राचा घणघणाट केला, पण अखेर पदरीं अपयशाचेंच वाण आलें, आणि बायकोच्या सांगण्यावरून तो रघुनाथपंतामार्फत शिवाजीस शरण आला. त्यावरून दोन्ही भावांचा सल्ला झाला. याप्रसंगीं जे करार व्यंकोजीनें पाळावयाचे ठरले, त्यापैकीं कांहीं असे आहेत—( १ ) सोयरे मानकरी यांचा बंदोबस्त माफक करून, अपमान होऊं न देतां आदर ठेवावा, पण कामांत वागवूं नयेत. ( २ ) दुष्ट हिंदुद्वेषी यांस आपले राज्यांत ठेवूं नये, व बंदोबस्त राखावा. ( ३ ) लहानथोरांशीं तह वगैरे करतांना तंटे न पाडतां गोरगरीब अनाथ यांचा अभिमान धरून चालावें. ( ४ ) देवस्थानें वगैरेंचा बंदोबस्त चांगला ठेऊन उच्छेद करूं नये. ( ५ ) फिर्यादीचा इनसाफ तोडतांना पैशाचा लोभ न धरतां, गोरगरीबांचा अभिमान धरून

चालावें. ( ६ ) विजापुरकरांचा व आमचा ( म्हणजे शिवाजीचा ) वडिलांमार्फत तह झाला, त्यांत विजापुरकरांची चाकरी आपण अगर व्यंकोजी करणार नाहीं, प्रसंग पडेल तेव्हां इमानें इतबारें मदत करूं, त्यास अंतर पडणार नाहीं, इतकेंच ठरलेलें आहे. त्याप्रमाणें चालावें. हे करार नीट रीतीनें लक्ष्यांत घेतले म्हणजे शिवाजीचें राजकारणी धोरण कोणतें होतें व व्यंकोजीवरची स्वारी कोणत्या हेतूनें काढण्यांत आली, याचा तत्काळ उलगडा होतो.

### संभाजीचें घातकी वर्तन.

तंजावरची मोहीम तडीस नेऊन शिवाजी स्वदेशीं आल्यावर थोड्याच दिवसांनीं त्याचें अन्तःकरण विदारून जाईल व स्वराज्याच्या भावी काळाबद्दल भयंकर चिंता उत्पन्न होईल, असा एक लाजीरवाणा प्रसंग घडून आला. हा प्रसंग म्हणजे युवराज संभाजी याचें दुर्वर्तन. महाराष्ट्राचें धर्मराज्य स्थापणाऱ्या महाप्रतापी शिवाजीचा मुलगा भ्रष्ट मनाचा व दुर्वर्तनाचा निघावा, ही गोष्ट वाचूनच आपल्या अन्तःकरणाला पीळ पडून अंगाला शिसारी येते, मग त्या अभिमानी बापाला यानें काय वाटलें असेल, याची केवळ कल्पनाच करावी ! संभाजीचें बेढंगी वर्तन सुधरावें म्हणून त्यास कांहीं दिवस रामदासस्वामींच्या शिक्षेंत ठेविला होता, परंतु त्याचाही कांहीं परिणाम झाला नाहीं. अखेर गोष्टी इतक्या थराला गेल्या, कीं शिवाजी बापाविरुद्ध बंडावा करून मोंगलांस सामील झाला व त्यानें दिल्लीरखानाशीं सख्य जोडलें. नंतर खानानें संभाजीला पुढें करून शिवाजीचा एकेक किल्ला घेण्यास सुरवात केली. संभाजीला पुढें पहातांच मराठे शस्त्र चालविण्याचें बंद करीत व किल्ला स्वाधीन करून चालते होत ! पण औरंगजेबास जेव्हां

ही वार्ता कळली, तेव्हां त्याचें मन फारच संशयाकुल झालें. आधींच विजापुर व गोवळकोंडें इकडील मामले बिनसल्यामुळें दिल्लीरखान त्याचे मनांतून उतरला होता. तशांत त्यानें संभाजीला आश्रय दिला, यांत कांहीं तरी कपटकारस्थान आहे, असें त्याच्या मनानें घेतलें. म्हणून त्यानें शहाजाद्यास सुभेदारीवरून माघारें बोलाविलें व दिल्लीरखानाचे अधिकार काढून घेतले. आतां दक्षिणच्या सुभ्यावर पुन्हां खानजहान बहादूर याची नेमणूक झाली, आणि संभाजीस लगोलग कैद करून दिल्लीस पाठवावें असा त्यास हुकूम सुटला. याची कुणकुण लागतांच दिल्लीरखानानें संभाजीस बापाकडे पळून जाण्याची सवड दिली. याप्रमाणें संभाजीची स्वारी हात हालवीत शिवाजीकडे परत आली. पण शिवाजीला या मुलाचा विश्वास येईना. त्यानें त्याला फारसें दुखावलें नाहीं, परंतु कांहीं विश्वासू मंडळीच्या नजरेखालीं पन्हाळा किल्ल्यांत डांबून ठेविलें.

### अखेर.

यानंतर एक वर्षाचे आंतच म्हणजे सन १६८० च्या एप्रील महिन्यांत तिसऱ्या तारखेस या प्रौढप्रतापी सर्वगुणसंपन्न क्षत्रियावतंस श्रीशिवाजी छत्रपतीचें लहानशा दुखण्यानें एकाएकीं रायगडीं देहावसान झालें.

# प्रकरण चवथें.

## जॉर्ज् वॉशिंग्टन्.

### कुलवृत्त.

जॉर्ज वॉशिंग्टन् याचा जन्म अमेरिकेंतील व्हर्जिनिआ नांवाच्या वसाहतींत इ. स. १७३२ सालीं झाला.

सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धांत म्हणजे एलिझाबेथ् राणीच्या कारकीर्दींत इंग्लंडचा समुद्रसंचाराचा व्याप बराच वाढूं लागला, व त्याच संधीस व्हर्जिनिआ व मेरिलँड् या दोन वसाहती अमेरिकेंत अस्तित्वांत आल्या. पुढें पहिला जेम्स् व चार्लस् यांच्या काळीं धार्मिक छळाला कंटाळून अनेक प्यूरिटन् व इतर धर्मस्वातंत्र्येच्छु लोकांनीं वैतागानें मातृभूमीचा त्याग करून आपल्या कुटुंबांसह अमेरिकेच्या नव्या जगांत जुन्या वसाहतींच्या उत्तरेस बऱ्याच नव्या वसाहती वसविल्या; यांनाच 'न्यू इंग्लंड् स्टेट्स्' म्हणत. यानंतर पहिल्या चार्लस्बरोबर पार्लिमेंटचा बेबनाव होऊन जेव्हां युद्धास सुरवात झाली आणि राजपक्षाचा चुराडा होऊन ऑलिव्हर् क्रॉमवेल्च्या नेतृत्वाखालीं स्वातन्त्र्याभिमान्यांचा विजय झाला, त्या वेळीं बरीच राजपक्षीय कुलीन व नामांकित घराणीं जुन्या वसाहतींत येऊन राहिलीं. अमेरिकेंत सुपीक जमीन मुबलग असल्यामुळें व तेथें स्वारीशिकारीची सोय व स्वतंत्रता असल्यामुळें कित्येक सरदार लोकही हजारों एकरांचे कौल घेऊन इस्टेटी करीत, इमले बांधीत, आणि मधून मधून येऊनही रहात. असो, सन १६५७

सालीं यॉर्क् परगण्यांतल्या वॉशिंग्टन् घराण्यांत दोन भाऊ, जॉन् व लॉरेन्स्, व्हर्जिनिआ वसाहतींत वेस्ट्मोर्लंड् टापूमध्यें येऊन राहिले. लॉरेन्स् याला विश्वविद्यालयांतील शिक्षण मिळालें असून, तो कायदेपंडित होतो, आणि जॉन् हा श्रीमन्त जमीनदार होता. परंतु क्रॉम्वेल्च्या अमदानींत इ. स. १६५५ सालीं इंग्लंडांत बराच बंडावा उद्भवला, आणि बंडांत सामील झाल्याच्या वहिमानें बऱ्याच घरंदाजांवर तोहमती आल्या. त्याच संकटामुळें जॉन् व लॉरेन्स् यास इंग्लंडास रामराम ठोकून अमेरिकेचा आश्रय करावा लागला असावा, असें म्हणतात. हें वॉशिंग्टन् घराणें शूर व राजनिष्ठ म्हणून नांवाजलेलें होतें. जॉन् वॉशिंग्टन्चा नातू ऑगस्टाइन् यास पहिलया बायकोपासून तीन मुलगे झाले, पैकीं लॉरेन्स् हा चांगला गुणी व कर्ता निपजून लौकिकास चढला. पहिली बायको वारल्यावर ऑगस्टाइन्नें मेरि बॉल् नांवाच्या तरुणीबरोबर सन १७३० सालीं लग्न केलें. या द्वितीय पत्नीच्या पोटीं या चरित्राचा नायक जॉर्ज वॉशिंग्टन् याचा जन्म १७३२ सालीं झाला.

### मातापितरें.

ऑगस्टाइन् वॉशिंग्टन् व त्याची बायको, हीं दोघेंही फार सज्जन, प्रेमळ, धार्मिक व सद्गुणी होतीं. जॉन् जो पुढें आपल्या राष्ट्रांत अत्यंत महनीय पदवीला चढला, त्याला त्याच्या अंगचे जे गुण कारण झाले, त्यांचें बीजारोपण व संगोपन, या मातापितरांनीं अत्यन्त काळजीनें केलें होतें, यांत शंका नाहीं. जॉर्ज्चा बाप आपल्या मुलाच्या अन्तरंगांत उन्नत विचार, शुद्ध वृत्ति, व उदात्त तत्वें, हीं कशा प्रेमळ युक्तीनें ठसवीत असे, तें लक्ष्यांत घेण्यासारखें आहे.

## गृहशिक्षण.

जॉर्ज् पांच वर्षांचा असतांना एकदा वसंत ऋतूंत कोणा शेजारच्या आप्ताच्या मुलांनीं त्याला एक भलें मोठें इरसाल सफरचंद दिलें. तेव्हां बापानें तें आपल्या भावंडांत विभागून सर्वांनीं मिळून खा, असें जार्ज्ला सांगितलें. जार्ज्नें बापाच्या सांगण्याप्रमाणेंच केलें, पण तसें करतांना त्याला बरेच कष्ट वाटले, ही गोष्ट बापाच्या नजरेस आल्या· वांचून राहिली नाहीं. यानंतर शरद् ऋतूंत ऑगस्टाइन्नें जॉर्ज्ला सफरचंदाची बाग दाखविण्याकरितां आपल्याबरोबर नेलें. वाटेंत त्या शेजारच्या आप्ताचीं मुलेंही त्यानें सोबत घेतलीं. या वेळीं सफरचंदें अगदीं पाडाला आलीं होतीं, त्या वर्षीं फळांचा बहारही अतोनात उप-ळला होता, आणि त्या दिवशीं जरासा जोराचा वारा सुटल्यामुळें झाडांखालीं लालुंग्या फळांचा नुसता पेर पसरला होता. बागेंत शिरल्या-बरोबर, 'अबबब! काय हीं सफरचंदें!' असें म्हणून जॉर्ज् तर आनं-दानें टाळ्या वाजवून नाचूंच लागला! तेव्हां ऑगस्टाइन् म्हणाला, "खरेंच, इतका भर एका शेतांत क्वचित् येतो. बरें, जॉर्ज्, जा, आतां फळें पोट भरून खा." नंतर फळें खात खात व मौजेनें गोष्टी बोलत बोलत फिरत असतां, बाप एकदम जॉर्ज्ला म्हणाला, "मुला, या मुलांनीं गेल्या वसन्तांत तुला एक सफरचंद दिलें होतें, त्याची आठवण आहे का? त्यांतली एक एक खाप आपल्या भावंडास देणें तुझ्या जिवावर आलें होतें! पण आतां ईश्वरानें तुला केवढी रास दिली आहे, पहा बरें." हे शब्द ऐकतांच जॉर्ज् अगदींच वरमला, आणि तो खालीं मान घालून म्हणाला, "बाबा, मला एकवार क्षमा करा, आणि पहा पुन्हां मी असा अप्पलपोटेपणा कधीं करतों का!" ऑगस्टाइन्चें कार्य झालें आणि जॉर्ज्च्या अन्तःकरणांत उदारपणाचें बीज कायमचें रुजलें.

एकदा ऑगस्टाइन्नें आपल्या बागेंत पायवाटेच्या बाजूस लहानशा दळ्यांत ' जार्ज् वाशिंग्टन् ' हीं अक्षरें मातींत रेखाटून, त्या अक्षर-रेखांस धरून सारखें कसलेसें बीं पेरलें. दहापंधरा दिवसांनीं त्या दळ्यांत पाचेचे खडे बसविल्यासारखीं जॉर्ज्च्या नांवांचीं अक्षरें हिरवीं गार चमकूं लागलीं. एकदा जॉर्ज् बागेंत फिरत असतां, तो एकदम वाऱ्यासारखा घरीं धांवत आला, आणि दम छाटीत छाटीत ह्मणाला, " बाबा, चला, चला, तुम्हांला मौज दाखवितों. " बाप म्हणाला, " चल, कसली एवढी मौज आहे तरी ! " जॉर्ज्नें बापाला त्या दळ्याजवळ नेलें व त्या अक्षरांकडे बोट दाखवून म्हटलें, " पहा, पहा, काय चमत्कार तो ! " बापानें विचारलें, " जॉर्ज्, हीं सुंदर अक्षरें आपोआप रुजलीं असतील, नाहीं ? " जॉर्ज् म्हणाला, " छत्. छत् ! तीं आपोआप रुजणारच नाहींत ! "

' कां बरें ? '

' अहो आजपर्यन्त असें कोठेंतरी घडलें आहे का ? आणि हीं एकदोन अक्षरें नाहींत. अगदीं सबंधच्या सबंध नांव बिनचूक, वळणदार, वठलें आहे ! बाबा, हीं तुह्मींच काढलीं असलीं पाहिजेत !'

" जॉर्ज्, तुझा अंदाज बरोबर आहे. आतां, असें पहा, जर ही आपल्याला आनंद वाटणारी गोष्ट आपल्या बाबांनींच केली आहे, या अंदाजानें तुला इतकें माझ्याविषयीं प्रेम व कौतुक वाटत आहे, तर ज्यानें हें असंख्य उपयोगी वस्तूंनीं थाटलेलें विश्व व अनेक ज्ञानसाधनांनीं व सोईनीं सजविलेलें हें तुझ्या शरीराचें यंत्र निर्माण केलें, त्या विश्वपित्याविषयीं, त्या ईश्वराविषयीं, तुला किती बरें प्रेम, कौतुक, व विश्वास वाटला पाहिजे ? जर हीं हिरवीं अक्षरें आपोआप झालीं नाहींत असें

तूं मानतोस, तर ही सृष्टींतली व्यवस्था, ही आपल्या शरीराची रचना आपोआप झाली असेल, असें, बाळ, तुला वाटतें का ? "

जॉर्ज्नें उत्तर केलें, " नाहीं, बाबा, मला तसें वाटत. हें ईश्वरानेंच केलें आहे, असें मी समजतों. "

अशा रीतीनें ऑगस्टाइन्नें आपल्या मुलाच्या मनांत ईश्वराविषयीं श्रद्धा उत्पन्न केली. हीच श्रद्धा जॉर्ज्च्या मनांत सतत जागी राहून त्याच्या पुढील आयुष्यक्रमांत त्याला पडेल तें कर्तव्य करण्यास धीर व उत्साह देती झाली.

जॉर्ज्च्या कुऱ्हाडीची गोष्ट सर्व लहानमोठ्यांस माहीतच आहे. एकदा बापानें जॉर्ज्ला एक चिमुकली कुऱ्हाड दिली. या कुऱ्हाडीच्या लाभानें जॉर्ज्ला परमानंद झाला, आणि पोरवयांतील उल्हासाच्या हुशींत तो तिची धार कशी चालते हें ज्या त्या वस्तूवर तिचा प्रयोग करून पाहूं लागला. या नादांत त्यानें बागेंतल्या आपल्या बापाच्या एका आवडत्या फळझाडावर एकदोन घाव जोरानें घातले, आणि आपल्याच रंगांत दंग होऊन तो पुढें चालता झाला, आपण काय केलें याचें त्यास भानही नव्हतें. दुसऱ्या दिवशीं तें कोमजलेलें झाड पहातांच ऑगस्टाइन्च्या अंगाची आग झाली, आणि तो तिडकीसरसा घरांत येऊन, हें कृत्य कोणीं केलें ह्मणून कठोर स्वरानें चौकशी करूं लागला. इतक्यांत चिमुकला जॉर्ज्ही बाहेरून आला, व बापानें त्याला झाडासंबंधें सवाल केला. तो प्रश्न ऐकतांच जॉर्ज्ला आपल्या आदल्या दिवशींच्या कृत्याचें भान झालें, व तो जरासा गोंधळला, तेव्हां बापानें त्याला छेडलें, कीं, ' जॉर्ज्, झाड कोणीं दुखावलें, हें तुला ठाऊक आहे काय ? ' तेव्हां जॉर्ज् एकदम उद्गारला, " बाबा, मला कोणताही

दंड केलात, तरी तो मी सोशीन, पण मला खोटें बोलवतच नाहीं. मीच तें झाड आपल्या कुऱ्हाडीनें दुखावलें!" हें ऐकतां ऑगस्टाइन् चकित होऊन क्षणभर अगदीं स्तब्ध राहिला, पण दुसऱ्या क्षणीं आपल्या मुलाला पोटाशीं धरून म्हणाला, "शाबास, जार्ज्! तुझ्या या वर्तनानें त्या झाडाबद्दलचें माझें दुःख दूर झालें आहे. अरे, तूं आज खरें बोलण्याचें जें धैर्य दाखविलेंस, त्यावरून अशीं हजारों झाडें नुसतीं कुरवंडून टाकावीं."

याप्रमाणें ऑगस्टाइन्नें आपल्या मुलाला नीतीचें शिक्षण मोठ्या प्रेमानें व आस्थेनें देऊन, त्याच्या दानतीचा व शीलाचा पाया मजबूत व निर्मळ केला.

## मातुःश्री.

जॉर्ज्ला पितृसौख्य १४–१५ वर्षेंच लाभलें, परंतु त्याचें मातृसौख्य मात्र त्याची पन्नाशी उलटून जाईपर्यंन्त टिकलें. मिसेस् मेरि वॉशिंग्टन ही मोठी कर्तबगारीची व करारी, पण प्रेमळ, धार्मिक, व सद्गुणी होती. नवऱ्याच्यामागें ती ४२–४३ वर्षें जगली, आणि आपलीं मुलें लहान असतांना तिनें त्या अफाट जमीनजुमल्याची जातीनें व्यवस्था पाहून आणि करारी सद्वर्तन ठेऊन ती सर्वांच्या आदरास पात्र झाली. सन १७४७ सालीं नवरा वारल्यावर ती कांहीं काळपर्यंत भग्नहृदय होऊन, तिला घर, सारें जग, ओकेंओकें—अगदीं शून्य–भासूं लागलें. परंतु हें संकटही माझ्यावर आणण्यांत ईश्वराचा हेतु असलाच पाहिजे, आणि त्याच्या इच्छेस अनुसरून प्राप्त कर्तव्य मला केलेंच पाहिजे, अशा विचारानें तिनें आत्मनिग्रह केला, व ती धैर्यानें कर्तव्यमार्गाला लागली. "तुमची स्थावर मिळकत

अफाट आहे, तिची व्यवस्था सामान्य पुरुषालाही करण्यास अवघड आहे, मग तुम्हांला तें कसचें झेंपणार ? तेव्हां तुम्ही अमक्याला व्यवस्थापक नेमा, किंवा तमक्याला मुखत्यार करा," वगैरे गोष्टी तिचे हितचिंतक, शेजारी, आप्त, इत्यादि सांगूं लागले, तेव्हां तिनें एकच जबाब दिला, कीं, "त्यांनीं आपल्या मृत्युपत्रांत सर्व पेगार सांभाळण्याचा भार माझ्यावर टाकला आहे, तेव्हां त्याप्रमाणें वागणें हें माझें निश्चित कर्तव्य आहे, आणि कांहीं झालें तरी तें मी टाळणार नाहीं. जोंपर्यन्त ईश्वराच्या मनांत मला जीवन्त ठेवणें असेल, तोंपर्यन्त माझ्या दृष्टीस दिसणारें माझें कर्तव्य मी करीत रहावें, अशीच माझी निरन्तर बुद्धि असो म्हणजे झालें ! तुम्हीं सर्व मनापासून माझें कल्याणच इच्छितां, व त्याबद्दल मी तुमची आभारी आहें. तुमचा सल्ला पुष्कळ वेळां उपयोगीं पडेल, पण मला आपल्या कर्तव्याचा भार दुसऱ्यावर टाकतां येत नाहीं; तसें केलें असतां, मी ईश्वराची अपराधी होईन." या माउलीनें जॉर्ज्‌ला नैतिक व धार्मिक शिस्त फारच कसोशीनें लाविली. मुलांनीं आज्ञाधारक असलेंच पाहिजे, आज्ञाधारक मुलेंच पुढें उत्तम नागरिक, सुशील सज्जन, व कर्तबगार राष्ट्रवीर, निपजतात, असें तिचें ठाम मत होतें. जॉर्ज् तिचा मोठा मुलगा होता, तो तिला जीव कीं प्राण वाटे, पण तिनें त्याचे उगाच लाड किंवा चोंचले कधींही केले नाहींत. ती त्याला प्रेमानें वागवी, पण शिस्तही कडकपणें लावी. ती दयाळू होती, तरी पण नोकरचाकरांवर व मुलांबाळांवर तिची छापही चांगली होती. तिनें एकादी गोष्ट करा म्हणून सांगितलें, कीं, तींत कोणी अळंटळं अगर कुचराई केली, तर तें तिला मुळींच खपत नसे. जॉर्ज्‌ला आपली आई

म्हणजे मोठें दैवत वाटे, आणि अखेरपर्यन्त तो तिच्या संमतीशिवाय कोणतीही गोष्ट हातीं घेत नसे. आईचा करारीपणा, सोशिकपणा, ईश्वरनिष्ठा, कर्तव्यपरता, सत्यप्रीति, व देशाभिमान, हे सर्व गुण जॉर्ज्च्या अंगीं तन्तोतन्त उतरून विकास पावले, म्हणूनच त्याच्या हातून पुढें देशाचें अप्रतिम कार्य घडलें. जॉर्ज् यानें साहसांत किंवा कष्टसायासांत न पडतां, आपल्याजवळ सुखांत राहावें असें कधीं कधीं या माउलीस वाटे, पण हा वेडा विचार ती विवेकबुद्धीनें तत्काळ झिडकारी, आणि आपल्या मुलास कठिण देशकार्य करण्यास उत्तेजन देई व त्याला आयुरारोग्य व यश देण्याबद्दल रात्रंदिवस परमेश्वराची अनन्य भावानें प्रार्थना करी. जॉर्ज्ही कितीही मोठ्या कामगिरींत गुंतला असला तरी आपल्या प्रेमळ व भाविक मातेचें नेहमीं स्मरण ठेवीत असे. कोणतेंही बिनतोड धाडसाचें काम तो मोठ्या हिय्यानें व हिकमतीनें करी, आणि 'कर्तव्य म्हणून केलेल्या धाडसांत मला यश येणारच, कारण माझ्याकरितां एक भावनिष्ठ मूर्ति निरन्तर परमेश्वराची प्रार्थना करीत आहे, हें मला माहीत आहे. मी जोंपर्यन्त आपल्या शीलाला सोडलें नाहीं, तोंपर्यन्त त्या प्रेममूर्तीची ती प्रार्थना माझी खास पाठराखण करील." असें तो म्हणे. ही प्रेममूर्ति म्हणजे जॉर्ज्ची मातुःश्री हें सांगणेंच नको.

## विद्याभ्यास.

जॉर्ज्चा सावत्र भाऊ लॉरेन्स् हा जॉर्ज्पेक्षां १४ वर्षांनीं मोठा होता. त्याचें प्राथमिक शिक्षण व्हर्जिनिआंतच झालें. नंतर पंधराव्या वर्षीं त्याला आईबापांनीं वरिष्ठ शिक्षण घेण्याकरितां इंग्लंडास पाठविलें, इंग्लंडमध्यें सात वर्षें राहून उच्च शिक्षणाचा लाभ घेतल्यावर तो स्वदेशीं परत आला. या वेळीं जॉर्ज् सुमारें आठ वर्षांचा होता, आणि तो गांवां-

तल्या हॉबि नांवाच्या पंतोजीजवळ लिहिणें, वाचणें, व हिशोब करणें, इतकें शिकून तयार झाला होता. हॉबीच्या शिकविण्याची मर्यादा येथेंच संपली होती व जॉर्ज्च्या पुढील शिक्षणाची कांहीं तरी निराळी व्यवस्था लावणें अवश्य होतें. हॉबि जरी गांवठी पंतोजी होता, तरी त्याचें वर्तन फार शुद्ध असून, मुलांच्या शीलाच्या जोपासनेकडे तो फार लक्ष्य देत असे. जॉर्ज्चें शाळेंतलें वर्तन अगदीं नमुनेदार असे. जॉर्ज्ला तालीम करणें, धांवणें, उड्या मारणें, घोड्यावर बसणें, वगैरे गोष्टींचा पुष्कळ शोक असे, पण तो आपल्या अभ्यासांतही फार मेहनती, टापटीप राखणारा, बुद्धिवान्, व चलाख होता. शिवाय, त्याची वागणूकही नेहमीं आज्ञाधारकपणाची, गोड, सच्चेपणाची, असे. यामुळें तो पंतोजींचा मोठा प्यारा झाला होता, व ते त्याला नेहमीं ‘ नमुनेदार विद्यार्थी ’ म्हणत. मुलांमुलांचे तंटे लागले असतां, ते जॉर्ज्ला सर्वानुमतें पंच नेमीत, आणि जॉर्ज्नें दिलेला निकाल तीं सर्व मुलें मोठ्या आनंदानें मान्य करीत. हॉबिमास्तरला मुलांच्या तंट्याची चौकशी करतांना पुष्कळ वेळां खरें काय आहे याबद्दल शंका येई. अशा प्रसंगीं तो जॉर्ज्ला त्या तंट्याची कांहीं खास माहिती आहे का म्हणून विचारी, आणि तो जी माहिती देई, तिच्या आधारावर निर्णय करी, कारण जॉर्ज्नें सांगितलेली माहिती खोटी असेल अशी त्याला कधीं शंकाही येत नसे, आणि मुलांचाही जॉर्ज्वर पूर्णपणें विश्वास असे.

### लष्करी पेशा.

असो. लॉरेन्स् इंग्लंड्हून सन १७४० सालीं परत आला, त्याच संधीस इंग्लंड् व स्पेन् यांच्यामध्यें आरमारी युद्ध सुरू झालें. या वेळीं लॉरेन्स्चें वय बावीस वर्षांचें होतें, व त्यानें आरमारी लष्करांत आपलें

नांव नोंदविलें व त्यास सनदी अमलदाराची जागा मिळाली. सैन्यभरतीची धांदल व्हर्जिनिआंत सुरू झाली. जिकडे तिकडे लष्करी वाद्यें, कवाईत, व परेडी, यांचा तडाखा सुरू झाला. लॉरेन्स्‌ला लष्करी पोशाखांत पाहून, जॉर्ज्‌ला मोठें कौतुक वाटलें, आणि आपणही असा पोशाख करून लष्करांत केव्हां जाऊं, असें त्यास वाटूं लागलें. लवकरच भरती केलेलें सैन्य लष्करी कामगिरीवर रवाना झालें, आणि जॉर्ज्‌चें मन जरा खट्टू झालें. पण लष्करच्या देखाव्यानें त्याच्या अंगांत क्षात्रतेज मुसमुसूं लागलें, आणि यानंतर तो आपल्या सोबत्यांबरोबर लष्करी खेळ खेळूं लागला! लुटुपुटीच्या कवाईती व लढाया सुरू झाल्या! हातांत धरण्याची काठी किंवा केरसुणीचे दांडे तोफा बनले, आणि घराजवळचें मैदान ही सैन्याच्या तळाची जागा झाली! या ठिकाणीं बरेच छोटे वीर कूच दर कूच करीत मागेंपुढें हिंडूं लागले, आणि जॉर्ज् त्यांच्यावर सेनापतीचा अंमल गाजवूं लागला! या लढायांत जे स्पॅनिअर्ड् होत, त्यांचा जॉर्ज् अगदीं धुव्वा उडवीत असे, हें सांगणेंच नको.

ॲड्मिरल् व्हरनॉन्‌च्या हाताखालीं लॉरेन्स् वाशिंग्टन्‌नें दोन वर्षें आरमारी लष्करांत नोकरी केली. कार्टिजीना शहराच्या वेढ्यांत त्यानें नांवाजण्यासारखी कामगिरी केली. यानंतर तो घरीं परत कांहीं दिवस विश्रान्तीसाठीं आला. पण थोड्याच दिवसांनीं शेजारच्या वुलिअम् फेअर्फॅक्स् नांवाच्या जमीनदाराची मुलगी ॲनि हिच्यावर त्याचें प्रेम जडलें व त्यांचें लवकरच लग्न झालें. मग लॉरेन्स्‌नें लष्करांत जाण्याचा बेत रहीत केला, आणि तो आपल्या बापाच्या इस्टेटीच्या एका भागांत माउंट् व्हॅरनान् येथें स्वतंत्र संसार थाटून राहूं लागला.

लॉरेन्स् मुलुखगिरीहून परत आल्यावर लढाईच्या व शौर्याच्या ज्या

गोष्टी सांगत असे, त्यांचा जॉर्ज्च्या मनावर खोल ठसा उमटूं लागला, व त्यानें त्याच्या लुटुपुटीच्या लढायांना विशेषच रंग चढूं लागला. हे जॉर्ज्चे उमदे खेळ, त्याची निर्भय मुद्रा, त्याची चालण्याबोलण्याची सरदारी ऐट, व खेळांतील लढाया खेळण्याचें चातुर्य, हीं पाहून लॉरेन्सला फारच मौज वाटे आणि हा मुलगा पुढें विख्यात सेनापति होईल ह्मणून तो भविष्य करीत असे.

## जमीनमापणीचा अभ्यास.

जॉर्ज्चें हॉबिमास्तरजवळ प्राथमिक शिक्षण झाल्यावर त्याला पुढील शिक्षणाकरितां इंग्लंडास पाठवावें असा ऑगस्टाइन्चा विचार होता. परंतु जॉर्ज्च्या आईनें व लॉरेन्स्नेंही या विचारास मोडता घातला, व जवळच वुलिअम्स् नांवाच्या एका पंडितानें मध्यम शिक्षणाची शाळा उघडली होती, तेथें जॉर्ज्ला विद्याभ्यासाकरितां पाठविण्याचें ठरलें. वुलिअम्सच्या शाळेंत जॉर्ज् विशेषतः जमीनमापणीचें काम शिकला. या कामाचा त्याला चांगलाच नाद लागला. आजूबाजूच्या टापूंत वारंवार फिरावयास जावें, नदीचीं वांकणें व उतार यांची पाहणी करावी, टेकडचा व मैदानें यांची ठेवण लक्ष्यांत घ्यावी, जरूर असतील तीं अन्तरें मापावीं, आणि घरीं येऊन एकंदर टापूचा नीट काळजीपूर्वक प्रमाणशीर नकाशा काढावा, व निरनिराळ्या देखाव्यांची व स्थळांची वर्णनें लिहावीं, असा त्यानें आतां क्रम सुरू केला. त्याचें काम इतकें टापटिपीचें व प्रमाणशुद्ध असे आणि त्याचीं वर्णनें इतकीं अचूक असत, कीं, सर्वजणें हा पुढेंमागें इन्जिनिअर होणार असें वर्तवूं लागलीं. या शाळेंतही शिस्त, उमदा स्वभाव, सत्यप्रीति, धार्मिक बुद्धि, पापभीरुता, व मानसिक धैर्य, या गुणांबद्दल जॉर्ज्ची फारच वाहवा झाली.

त्याच्या बरोबरचे मुलगे त्याचा फार आदर करीत, आणि गुरुजन त्याच्यावर अपरंपार प्रेम करीत.

## बापाच्या मृत्यूनन्तर.

जॉर्ज् या शाळेंत असतां, सन १७४८ सालीं त्याचा बाप वारला आणि सोळा वर्षांच्या वयाच्या आंतच जॉर्ज्चें शिक्षण आटोपलें. जॉर्ज्चा जन्म झाल्यावर लवकरच ऑगस्टाइन् वेस्ट् मोरलंड् येथील आपलें राहण्याचें घर सोडून, फेडरिक्स्बर्ग गांवासमोर नदीकांठीं आपल्या बागमळ्यांत राहूं लागला होता. मरणसमयीं तो येथेंच होता. त्यानें आपलें मृत्युपत्र केलें होतें. त्यांत त्यानें आपली स्थावर मिळकत आपले तीन मुलांत वांटून दिली होती. लॉरेन्स्ला माउंट् व्हर्नान् येथील घर व बरीचशी जमीन मिळाली. जुनें राहण्याचें घर व तेथील जमीन लॉरेन्स्चा सख्खा भाऊ ऑगस्टाईन् याला देण्यांत आली. आणि नदीकांठचें हल्लींचें घर व जमीन जॉर्ज्च्या वांटणीस आली. अर्थात् अज्ञानपालक म्हणून जॉर्ज्च्या मिळकतीची व त्याच्या इतर सख्ख्या भावंडांच्या वांटण्यांची वहिवाट जॉर्ज्च्या आईकडेच आली. तिची स्वतंत्र स्थावर मिळकतही बरीच होती. पण या बाईनें हा सर्व पेगार मोठ्या हिमतीनें, करारीपणानें, धोरणानें, व टापटिपीनें कसा आवरला याचा मागें उल्लेख आलाच आहे.

लॉरेन्स् हा माउंट् व्हर्नान् येथें स्वतंत्र राहात असे. त्याचें वय या वेळीं सुमारें तीस वर्षांचें होतें. त्याचा हल्लीं चांगला जम जमला होता व त्याचें लोकांत वजनही वाढलें होतें. तो लोकसभेचा प्रतिनिधि निवडला गेला होता व आपल्या टापू पुरता त्याला लष्करी अधिकारही देण्यांत आला होता. शिवाय, त्याची सासुरवाड ज्या फेअर्फॅक्स् घराण्यांत होती, तें

घराणें चांगलें सुखी, सुशिक्षित, व सरदारी बाण्याचें होतें. लॉरेन्स्चा चुलतसासरा लॉर्ड् फेअर्फॅक्स् यानें व्हर्जिनिआ प्रान्तांत अगदीं ओहिओनदीपर्यन्त हजारों एकर जमिनीचा पट्टा संपादन केला होता, व या जमिनीची व्यवस्था लॉरेन्स्चा सासरा पहात असे. अर्थात् लॉरेन्स्कडे व त्याच्या सासऱ्याकडे वारंवार बडेबडे पाव्हणे व मोठमोठे अमलदार येत, आणि सुशिक्षित व सभ्य लोकांच्या गांठी पडण्याचा योग तेथेंच येण्याचा संभव होता. लॉरेन्स्चा जॉर्ज्वरती मोठा लोभ होता, आणि जॉर्ज्लाही लॉरेन्स् फार आवडत असे. शिवाय, जॉर्ज् हा आपल्या हुशारीनें, मेहनतीनें, आणि कल्पकतेनें मोठ्या पदवीस चढेल, पण त्याला योग्य संधीमात्र मिळाली पाहिजे, असें लारेन्स्च्या मनानें घेतलें होतें, आणि 'जॉर्ज् माझ्या घरीं राहिल्यास त्याला अशी संधी खास मिळेल,' असेंही त्यास वाटत असे. म्हणून त्यानें हा प्रश्न आतां आपल्या सावत्र आईजवळ काढला, आणि सर्व गोष्टीची नीट फोड करून सांगितली. वाशिंग्टन् बाईला सर्व गोष्टी पटल्या आणि तिनें मन घट्ट करून जॉर्ज्ला माउंट् व्हर्नान् येथें राहण्यास पाठविलें. जॉर्ज्लाही आईपासून दूर जातांना बरेंच वाईट वाटलें, पण आपल्यास लॉरेन्स् भाऊजवळ राहण्यास सांपडणार, या विचाराच्या आनंदानें तें दुःख बरेंच हलकावलें.

### तरुण मोजणीदार.

जॉर्ज् माउंट् व्हर्नान् येथें राहण्यास आल्यावर त्याची फेअर्फॅक्स् घराण्याकडे अर्थात्च जा ये सुरू झाली. लॉरेन्स्चा चुलत सासरा व त्या अफाट जमीनजुमल्याचा मालक लॉर्ड् फेअर्फॅक्स् हा अलीकडे स्वतः तेथें राहण्याकरितां इंग्लंड्हून आला होता. त्याची व जॉर्ज्ची गांठ झाली आणि हा मुलगा त्या लॉर्ड्ला फारच आवडला. जॉर्ज्

या वेळीं सुमारें अठरा वर्षांचा होता. त्याचा ढबदार चेहरा, मोहक बोलणें, सभ्य वर्तन, हुशारी, धोरण, व धैर्य, हीं पाहून त्या लॉर्ड्‌ची मर्जी त्याच्यावर अगदीं सुप्रसन्न झाली. तो जॉर्ज्‌बरोबर मोठ्या प्रेमानें तासचे तास बोलत राही, व मधून मधून त्याला स्वारीशिकारीलाही आपल्या संगती नेई. या लॉर्डाची जमीन व्हार्जिनिआच्या वसाहतींत पश्चिमेस ओहिओ नदीच्या तटापर्यन्त पसरलेली होती. परंतु तिची नक्की हद्द त्याला माहीत नव्हती व जमीनीचा नकाशाही काढलेला नव्हता. अलीकडे फ्रेंच् लोक ओहिओच्या थडीला इंग्लिशांच्या हद्दींत आस्ते आस्ते हातपाय ताणीत होते, म्हणून थोडथोडी कुरकूर सुरू झाली होती. शिवाय, तद्देशीय रानटी तांबडे इंडियन् लोकही वाटेल तेथें आपलीं पालें थाटीत आणि मग ही जमीन आमच्याच मालकीची म्हणून हुज्जत घालीत. तेव्हां या गोंधळाचा निकाल लावण्याकरितां आपल्या एकंदर जमिनीची पाहणी करून व नकाशे काढून घेतले पाहिजेत, असें लॉर्ड् फेअर्फॅक्स् यास वाटूं लागलें होतें. जॉर्ज् जमीन पाहणीचें काम चांगलें शिकला आहे, हें त्यानें ऐकिलें होतें, आणि आतां त्याच्याशीं निकट परिचय झाल्यावर त्याची तरतरी व हुशारी प्रत्यक्ष पाहून, आपल्या जमीन मापणीचें काम याच्यावरच सोंपवावें, असें त्याच्या मनानें घेतलें, व त्याप्रमाणें त्यानें जॉर्ज्‌जवळ ही गोष्ट काढली. तेव्हां, आईला विचारून काय तें नक्की उत्तर देतों, असें जॉर्ज्‌नें सांगितलें. यानंतर जॉर्ज् लागलाच आपल्या आईकडे गेला, व सर्व हकीकत सांगून त्यानें तिच्या अनुज्ञेची याचना केली. वॉशिंग्टन्‌बाईला हें मोठेंच संकट वाटलें. कारण, हें जमीनपहाणीचें काम फारच बिकट होतें. एक तर या कामाकरितां

जॉर्ज्‌ला सतत सात आठ महिने प्रवास करावा लागणार होता, आणि तो प्रवासही मनुष्यवस्तीच्या राबत्या सुरक्षित प्रांतांतून नव्हता. जिकडे तिकडे घनगर्द झाडी, दऱ्या खोरीं, भयंकर नदीनाले, आणि वारीं वादळें, यांच्याशीं टक्कर देत एकेक पाउल टाकणें अवश्य होतें. शिवाय, ठिकठिकाणीं क्रूर रानटी इंडियनांच्याही राहट्या होत्या. हे लोक बिथरले म्हणजे सूड घेतल्याशिवाय कधींही राहत नसत. हल्लींची पाहणी या लोकांचा बंदोबस्त करण्यासाठींच करावयाची असल्यामुळें ते बिथरण्याचा संभव फार होता, आणि जॉर्ज्‌च्या प्राणावर बेतल्यावांचून राहणार नव्हतें. हें सर्व चित्र त्या माउलीच्या डोळ्यापुढें उभें राहिलें व तिच्या तोंडून होकार येईना. परंतु जॉर्ज्‌ची हें काम हातीं घेण्याची किती उत्सुकता आहे, त्याचा उल्हास व आत्मविश्वास केव्हढा दांडगा आहे, शिवाय, त्याची कर्तव्यतत्परता व ईश्वरनिष्ठा कशी अढळ आहे, हें लक्ष्यांत आणून तिनें आपलें मन घट्ट केलें व त्याला अनुमति दिली. जॉर्ज्‌नें आपल्या कामास लागलीच सुरवात केली. त्यानें आपल्याबरोबर कांहीं वाटाडे, मजूर, व सोबती घेऊन प्रवासाचा आरंभ केला. त्यानें आपल्या प्रवासाची रोजनिशी ठेऊन तींत तो इत्थंभूत तपशीलवार हकीकत लिहीत असे. मार्गांत त्याला अनेक अडचणी व संकटें आलीं. पण त्यांतून तो कधीं युक्तीनें, तर कधीं साहसानें, तर कधीं कांटक शक्तीनें, निभावून गेला. सर्व प्रदेशाची अगदीं कसोशीनें पहाणी करून त्यानें नकाशे काढले. त्यानें सर्व जमिनीचे निरनिराळे विभाग पाडून, प्रत्येक विभागांतील जमिनीचें क्षेत्रफळ, मातीचा कस, डोंगरांची व टेंकड्यांची उंची, झाडांझुडपांची माहिती, दऱ्यांखोऱ्यांची मापें, नदीनाल्यांचे प्रवाह, वगैरे बाबींचीं सविस्तर टिपणें तयार केलीं. त्याचें अक्षर अगदीं मोत्याचे

दाण्यासारखें होतें, आणि त्याच्या लिखाणांत स्वच्छता व टापटीप पराकाष्ठेची असे. हें जमीनमापणीचें काम जॉर्ज्नें इतकें समाधानकारक केलें कीं, पहाणीदार म्हणून त्याचें नांव लवकरच सर्वतोमुखीं झालें, व व्हर्जिनिआच्या वसाहतींत त्याला सरकारी सर्व्हेअर् म्हणून नेमण्यांत आलें. या कामामुळें वसाहतींतील सर्व भागाची त्याला फार उत्तम माहिती झाली व पुढील लष्करी कामगिरींत या माहितीचा जॉर्ज्ला अत्यन्त उपयोग झाला.

## लष्करी अंमलदारी.

सन १७५१ सालीं लॉरेन्स् वॉशिंग्टन्ची प्रकृति बिघडली व त्याला लष्करी अंमलदारीचें काम होत नाहींसें झालें. तेव्हां त्यानें आपल्या जागेचा राजिनामा देऊन, आपल्या जागीं जॉर्ज्ला नेमण्याबद्दल शिफारस केली. या शिफारसीचा उपयोग झाला, आणि आपल्या वयाच्या एकोणिसाव्या वर्षीं जॉर्ज् आपल्या टापूंतील स्थानिक सैन्याचा अंमलदार बनला. १७५२ च्या जुलै महिन्यांत लॉरेन्स् वारला, आणि त्याच्या जमीनजुमल्याच्या वहिवाटदार पंचांत जॉर्ज् हा एक होता. लॉरेन्स्ला एकच मुलगी होती, आणि तिच्यामागें ही सर्व मिळकत जॉर्ज्ला मिळावयाची होती. एकंदर पंचांत जरी जॉर्ज् हा सर्वांत लहान होता, तरी त्या मातबर मिळकितीच्या व्यवस्थेचा सर्व भार मुख्यतः त्याच्याच अंगावर कोसळला. असे नवे नवे खासगी गुन्ते जरी उत्पन्न होऊं लागले, तरी जॉर्ज् आपल्या सार्वजनिक कर्तव्यांत तिळभरही चुकवाचुकव करीत नसे. सन १७५२ सालीं डिन्विडी नांवाचा गृहस्थ इंग्लंड्हून व्हर्जिनिआचा गव्हर्नर् ( सुभेदार ) होऊन आला. यानें व्हर्जिनिआच्या वसाहतीचे चार विभाग केले व, उत्तरच्या विभागाचा लष्करी अंमलदार

जॉर्ज् वाशिंग्टन् नेमण्यांत आला. आतां लष्कराची भरती, कवाईत, हत्यारांची व सरंजामाची पाहणी, आणि इतर सरकारी कामें, यांत जॉर्ज्चा बहुतेक वेळ जाऊं लागला.

### वसाहतींचा वकील.

या वेळीं अमेरिकेंत फ्रेंच् व इंग्रज यांच्यामध्यें बरीच तेढ उत्पन्न होऊं लागली होती, असा मागें ओझरता उल्लेख आलाच आहे. हल्लींचा कानडा प्रान्त त्यावेळीं फ्रेंचांच्या ताब्यांत होता, आणि हल्लींच्या संयुक्त संस्थानांचा टापू इंग्रजांच्या हातीं होता. या दोनी भागांच्या मधील सरहद्दीवर लॉरेन्स् नदी व सरोवरें हीं होतीं. सन १७५२ सालीं सरदार डचुकेन् हा फ्रेंच् वसाहतींचा सुभेदार नेमला गेला व त्यानें मोठ्या तडफेनें फ्रेंच् सत्तेला अघळपघळ करण्यास सुरवात केली. कानडा प्रान्त व दक्षिणेकडील मिसिसिपीनदी यांच्या मधील सर्व व्यापारव्यवहार फ्रेंचाच्या हातांतच राहिला पाहिजे, असा डचुकेन्चा डूक होता. हा साधण्याकरितां मध्यन्तरींच्या ओहिओनदीच्या कांठाकांठानें आणि आलेघानी डोंगराच्या रांगेस धरून किल्लेकोटांची माळच्या माळ उभी करण्याची त्यानें तयारी चालविली होती. ओहिओ आणि मोनोंगाहेला या नद्यांच्या संगमावर एक इंग्रजांचा अर्धवट बांधलेला किल्ला होता, तो फ्रेंचांनीं हिसकावून घेऊन, तेथें एक मेढेकोट उभा केला व त्याला ‘ फोर्ट् डचुकेन् ’ हें नांव दिलें. या टापूंतले तांबडे इंडिअन् लोक सामान्यतः फ्रेंचापेक्षां इंग्रजांना जास्त अनुकूल असत. पण आतां फ्रेंचांनीं बऱ्याच इंडिअन् टोळयांना लांच देऊन व आणखी पुष्कळ बक्षिसें देण्याचीं वचनें देऊन, इंग्रजांच्या विरुद्ध फितविलें होतें. यामुळें ओहिओ नदीच्या थडीप्रांतांत इंग्रजांना मोठाच धोका उत्पन्न

होऊं लागला होता. तेव्हां ओहिओ नदीच्या बाजूला खरी परिस्थिति नक्की काय आहे आणि फ्रेंचाचें म्हणणें तरी काय आहे, हें आधीं वकील पाठवून समजावून घ्यावें, आणि मग लढाई पुकारावयाची कीं काय या प्रश्नाचा निकाल लावावा, असें गव्हर्नर् डिनूविडी यानें ठरविलें. पण उडत्याउडत्या ज्या बातम्या येत, त्यावरून हें वकिलीचें काम फार धोक्याचें आहे, असें सर्वांस कळून चुकलें होतें, यामुळें या कामगिरीवर जाण्याला कोणीच आपखुषीनें तयार होईना. हें पाहून जॉर्ज्‌ला अगदीं चेव आला, आणि तो आपण होऊन गव्हर्नर्‌कडे गेला, व आपण ही कामगिरी पतकरण्यास तयार आहों, म्हणून त्यानें सांगितलें. गव्हर्नर्‌ला आपल्याला ईश्वर पावल्यासारखें झालें. त्यानें लागलीच जॉर्ज्‌ची नेमणूक केली. ही वार्ता ऐकतांच जॉर्ज्‌ची आई पहिल्या प्रथम भयानें अगदीं गांगरूनच गेली. पण ती विचारीच होती. हिंमतीचीं कामें अंगावर घेतल्याशिवाय मनुष्याच्या शक्तीचा विकास होत नाहीं, आणि ईश्वरानें दिलेल्या देणग्यांचाही योग्य उपयोग होत नाहीं. तेव्हां जॉर्ज्‌नें अशीं जबाबदारीचीं कामें पतकरणें अगदीं इष्ट आहे, असें तिनें ठरविलें. या कामगिरीवर जाण्यास जॉर्ज्‌ला संमति देतांना ती म्हणाली, “मुला, एवढ्याशा वयांत तुझ्याकडे इतकी मोठी कामगिरी सोंपविणें फार धाडसाचें आहे. पण तूं जर ईश्वराचें स्मरण ठेऊन नेहमीं वागशील, तर तो नेहमीं तुझा पाठिराखा होईल आणि तुला कार्य तडीला लावण्यास बुद्धि व शक्ति देईल. तूं कामगिरी पार पाडून परत येईपर्यन्त, तुझ्या कल्याणाकरितां मीं सारखी प्रार्थना करीत राहीन.” असो, मातुःश्रीचा निरोप घेऊन जॉर्ज् १७५३ चे आक्टोबरअखेर

फ्रेड्रिक्स्बर्ग, अलेक्झँड्रिया, वुइन्चेस्टर, वगैरे ठिकाणीं आपल्याला अवश्य तेवढ्या मनुष्यबळाची व सामानसुमान, अन्नसामग्री, घोडे, इत्यादिकांची जुळवाजुळव करून, या कामगिरीवर निघाला. वास्तविक जॉर्ज्चें काम म्हणजे सुभेदार डिनूविडीचा खलिता फ्रेंच् सरदाराला पोंचवावयाचा व त्याचें परत उत्तर आणावयाचें, इतकेंच होतें. परंतु जॉर्ज् कांहीं सांगकाम्या नव्हता, किंवा तो पैशाकरितां कामगिरी अंगावर घेणारा भाडोत्री खप्या नव्हता. तो खराखरा देशभक्त, राष्ट्रसेवक, कर्तव्यजागरूक, व फार दूरदृष्टि, असा मुत्सद्दी व वीर होता. फ्रेंचांबरोबर केव्हांतरी युद्ध पुकारावें लागणार, हें तो निःसंशय जाणून होता; आणि युद्धाच्या यशापयशाचा कांटा तांबड्या इंडियन् लोकांच्या धरसोडीप्रमाणें इकडून तिकडे आणि तिकडून इकडे झोके खात डोलत राहील, हेंही त्याच्या मनाला पटलें होतें. त्या डोंगराळ व नदींनाल्यांनीं व्यापलेल्या जंगली प्रदेशांत रानटी इंडियन् लोकांशीं स्नेहसंबंध अबाधित राखणें, हें या वेळीं अत्यन्त हिताचें व जरूरीचें होतें. या इंडियन् लोकांचे निरनिराळ्या टापूंत निरनिराळे संघ होते व प्रत्येक संघाचा एक मुख्य नायक असे. अशा संघांचे त्या वेळीं सहा स्वतंत्र गण केलेले होते, व त्यांना राष्ट्रें ही संज्ञा लावण्यांत येत असे. हें राष्ट्रषट्क बहुशः इंग्लिश् लोकांना अनुकूल असे, कारण फ्रेंचापेक्षां इंग्रजलोक त्यांच्याशीं जास्त मिळूनमिसळून वागत, त्यांना मौजेच्या चिजा बक्षीस देत, व्यापाराच्या सौलती दाखवीत, व त्यांना मोठ्या आदरानें वागवून खूष ठेवीत. परंतु अलीकडे हें प्रकरण बरेंच बिनसूं लागलें होतें. फ्रेंचांनीं आपल्या मतलबाकरितां इंडियन् लोकांना व्यापाराच्या सौलती, अंमली पेयाचा

मुबलक पुरवठा, मोठ्या मुलखाचा स्वतंत्र कबजा, आणि लुटालुटीची संधी, या गोष्टींची लालूच दाखवून, पश्चिमेकडील व उत्तरेकडील बऱ्याच संघांना इंग्रजाविरुद्ध उठविलें होतें. ओहिओ नदीच्या थडी-प्रांतांतील इंग्रजांच्या अगर त्यांच्या इंडियन् गुमास्त्यांच्या फुटकळ राहाट्यांची फितलेल्या इंडियनांनीं जाळपोळ व लूटफाट करावी आणि लगोलग फ्रेंचांनीं तेथें येऊन कबजा करावा, लष्करी सरंजाम थाटावा, मेढेकोट बांधावे, असा अलीकडे क्रम सुरू झाला होता. तेव्हां स्वतांचा प्रवास सुरक्षित व्हावा आणि पुढें युद्धप्रसंग ठेपल्यास सर्वच इंडियन् इंग्रजावर उठूं नयेत, म्हणून जॉर्ज्‌ला त्यांचा लोभ संपादन करणें अगदीं अवश्य होतें. त्यानें ड्युकेन् किल्ल्याकडे जातांना वाटेंत शक्य तेवढ्या इंडियनांच्या गणाध्यक्षांच्या गांठीभेटी घेऊन व त्यांच्याजवळ गोडी-गुलाबीनें बोलून चालून, त्यांच्याशीं स्नेहसंबंध जोडला. तो जसाजसा पश्चिमेकडे जाऊं लागला तसतसे चोरटे व भुरटे इंडियन् लोक त्याच्या नजरेस मधून मधून येऊं लागले, त्यांनीं फ्रेंचांच्या नादानें लूटफाट केल्याच्या गोष्टीही त्याच्या कानीं आल्या, कांहीं इंग्रज लोकांना फ्रेंचांनीं पकडून नेल्याच्या कागाळ्याही खऱ्या ठरल्या, व कित्येक इंग्रजांचीं व त्यांच्या गुमस्त्यांचीं ठाणीं फ्रेंच्यांनीं बळकावलेलीं आढळलीं. परंतु जॉर्ज्‌नें कोणाबरोबरही कटकट उपस्थित न करतां, आपली छाप व वजन राखून, मिळेल तेवढी एकंदर परिस्थितीची व प्रदेशाची माहिती गोळा करीत, अखेर डिसेम्बरच्या अकरा तारखेस तो ड्युकेन् येथें दाखल झाला. परंतु फ्रेंचाचा तेथील सरदार पीरी पॉल् हा नुकताच मयत झाला होता, व त्याच्या जागीं सरदार रिपार्टी याची नेमणूक झाली होती. नव्या सरदाराला आपल्या नेमणुकीच्या जागीं येऊन रुजू

होण्याला अद्याप तीनचार दिवसांचा अवधि होता. यामुळें जॉर्ज्ला तेथेंच इतके दिवस कुचंबत राहणें भागच होतें. पण त्यानें हे दिवस फुकट दवडले नाहींत. त्या किल्ल्याची पुरी पाहणी करून त्यानें त्याचें खुलासेवार वर्णन केलें व नकाशेही काढले. फ्रेंच लोकांचे बेत व त्यांचा इंडियनाशीं असलेला संबंध यांविषयींही नक्की माहिती मिळवून ती त्यानें टिपून ठेविली. किल्ल्यांतील लष्करी सरंजामाचीही त्यानें नोंद केली. असो. जॉर्ज्च्या वकीलीनें समाधानकारक असें कांहींच उत्पन्न झालें नाहीं. फ्रेंच् सरदाराचें उत्तर केवळ उडवाउडवीचें व जरासें धमकीचेंही होतें. यामुळें प्रत्यक्ष लढाई पुकारणें अवश्यच होतें. जॉर्ज् १७५४ च्या जानेवारीच्या सोळा तारखेस परत येऊन, त्यानें फ्रेंच सरदाराचें उत्तर व आपलीं प्रवासाचीं टिपणें सुभेदार डिन्विडीच्या स्वाधीन केलीं. फ्रेंचांच्या उत्तरांतून कांहींच निष्पन्न होण्यासारखें नव्हतें, पण जॉर्ज्चीं प्रवासांतील टिपणें सुभेदाराला इतकीं आवडलीं व इतकीं ताबडतोब महत्वाचीं वाटलीं, कीं, तीं त्यानें छापविलीं, व त्याच्या प्रति लवकरच भरणाऱ्या प्रतिनिधिसभेच्या सभासदांच्या हातांत पडल्या. इंग्लंडांतही त्यांचा फैलाव झाला. यामुळें जॉर्ज्चें नांव सर्वतोमुखीं झालें, आणि जो तो त्याच्या साहसाची व लष्करी धोरणाची प्रशंसा करूं लागला.

### लढाईचा पुकारा.

वॉशिंग्टन्च्या टिपणानें अमेरिकेंतील इंग्रज वसाहतींत मोठी गडबड उडून गेली. जो तो लढाई पुकारलीच पाहिजे असें म्हणूं लागला. सुभेदार डिन्विडीनें राजेसाहेबांकडे तसेंच लिहून पाठविलें. इंग्लंडच्या अंगांततर युद्धाची लहर फार जोरानें उसळली, आणि इंग्लंडच्या इभ्रतीखातर फ्रेंच्यांबरोबर संग्रामांत दोन हात केलेच पाहिजेत, असें

राष्ट्राचें मत स्पष्ट दिसून आलें. थोड्याच दिवसांत ब्रिटिश सरकारकडून लढाई पुकारल्याचें लिहून आलें, व युद्धाकारितां सर्व वसाहतींनीं एक जूट करावी आणि फ्रेंच्यांची अमेरिकेंतून पार हकालपट्टी करावी, असे हुकूम येऊन धडकले. वसाहतवाल्यांत आधींच वीरश्रीचा उल्लास संचारला होता, व आतां हे हुकूम येतांच त्याला पारावार नाहींसा झाला. सुभेदार डिन्‌विडीनें वॉशिंग्‌टन्‌ची सैन्यभरतीच्या कामावर नेमणूक केली. न्यूयॉर्क् व दक्षिण कारोलिना या वसाहतींनीं प्रत्येकीं एक एक तुकडी तयार करण्याचें ठरविलें. वॉशिंग्टन् सैन्यभरतीचें काम करूं लागला, पण तें त्याच्या अपेक्षेप्रमाणें समाधानकारक झालें नाहीं. खाऊनपिऊन सुखी लोक किंवा हिंमती व मेहनती शेतकरी वर्ग लष्करी नोकरीची जिकीर व दगदग सोसण्यास तयार होत ना. कांहीं रिकामटेकडे, उनाडटप्पू, लोक सैन्यांत शिरले. परंतु त्यांची अगदींच भिकारदशा होती. कोणाला टोपी आहे, तर बूट नाहीं, कोणाला कोट आहे तर सदरा नाहीं, आणि सदरा आहे तर कोट नाहीं, अशी त्यांची कंगाल अवस्था होती. नुसत्या साध्या कपड्यालत्त्याची ही गोष्ट, मग हत्यारापात्यारांचें नांवच काढावयास नको ! एकंदरींत भरतीच्या कामीं जॉर्ज्‌ची निराशाच झाली, व त्यानें सुभेदारास लिहिलें की आपखुशीनें लष्करांत दाखल होण्याइतका लोकांच्या अंगीं देशाभिमानच दिसत नाहीं. तेव्हां सुभेदार डिन्‌विडीनें असा जाहीरनामा काढला, कीं, "जे लष्करांत नांवें नोंदून घेतील, व लढाई चालू आहे तोंपयन्त लष्करी नोकरींत टिकतील, त्यांच्यामध्यें ओहिओ नदीच्या थडीची दोन लाख बिघे जमीन वांटण्यांत येईल." या जाहीरनाम्याचा तत्काळ इष्ट परिणाम झाला, आणि एक तुकडी लवकरच सिद्ध होऊन ती कॅ. ट्रेन्ट् याच्या

हाताखालीं मोनोघेला व आलेघनी या नद्यांच्या संगमाचा कबजा करून तेथें एक कोट तयार करण्याकरितां पाठविण्यांत आली. सैन्यभरतीचें काम पुरें झाल्यावर, कर्नल् फ्राय् यास सेनानायकत्व देऊन वॉशिंग्टन् यास दुय्यम कर्नल् नेमण्यांत आलें. यानंतर लवकरच वॉशिंग्टन् पन्नासपन्नास इसमांच्या दोन तुकड्या घेऊन सरहद्दीच्या संरक्षणासाठीं व लष्कर जाण्याचा रस्ता तयार करण्यासाठीं निघाला. हें रस्ता तयार करण्याचें काम इतकें बिकट होतें, कीं, एका दिवसांत एक मैल मजल खेटणेंही मुष्किलीचें होत असे. १७५४ च्या एप्रीलअखेर वॉशिंग्टन् वुइल्स् क्रीक् या ठिकाणीं आला आणि तेथें कॅ. ट्रेन्ट्ची व त्याची आकस्मिक गांठ पडली. तेव्हां, किल्ला बांधण्याच्या कामासाठीं मजूर मिळविण्याकरितां आपण इकडे संगमाहून आलों आहों, असें ट्रेन्ट्नें सांगितलें. याप्रमाणें त्यांचें बोलणें चाललें आहे, तोंच संगमावर बांधीत असलेला किल्ला फ्रेंच्यांनीं सर केल्याची वार्ता एकाएकीं येऊन थडकली ! ताबडतोब ही बातमी कर्नल् फ्राय् यास कळविण्याकरितां एक स्वार पाठविण्यांत आला, आणि वॉशिंग्टन्नें आपल्या तुकड्या घेऊन संगमाच्या वरच्या बाजूस सुमारें तीस पसतीस मैल अंतरावर रेड् स्टोन् क्रीक् या ठिकाणीं तळ दिला व खंदक वगैरे खणून मोठ्या बंदोबस्तानें मदतीची वाट पहात तो राहिला.

## पहिली लढाई.

मे महिन्याच्या आरंभाला पन्नास मनुष्यांची एक तुकडी वॉशिंग्टन्च्या मदतीस आली. कर्नल् फ्राय् हा सदर ठाण्यावरच होता व लवकरच सर्व व्यवस्था करून व अन्नसामग्री वगैरे घेऊन येण्याचा त्याचा विचार होता. पण इतक्यांत तो एकाएकीं वारला, आणि सैन्याचें अधि-

पतित्व वॉशिंगटन्‌कडे आलें. असो, एक दिवस वॉशिंग्टन्‌ला अशी नक्की बातमी लागली, कीं, फ्रेंच्यांची एक टोळी पांच मैलांवर आली असून, तिचा रोख इंग्रज सैन्याच्या तळावर हल्ला करण्याचा आहे. हा वास लागतांच, वॉशिंग्टन्‌नें आपणच त्या टोळीवर अकस्मात् घाला घालण्याचें ठरविलें, व तावडतोब रातोरात चाळीस वसाहतवाले व थोडेसे इंडियन् सैनिक बरोबर घेऊन तो बाहेर पडला. फेंच्यांच्या तळाच्या आसपास आल्याचा सुमार लागल्यावर त्यानें दोन इंडियन् हेर शत्रूच्या तळाची टेहाळणी करून त्याच्या ठावाचा नक्की तलास लावण्याकरितां पुढें पाठवले. हे हेर परत आल्याबरोबर क्षणाचाही विलंब न लावतां, आपल्या दमल्याभागलेल्या सैनिकांना उत्तेजन देऊन, त्यानें एकदम पुढें चाल केली व शत्रूवर छापा घातला. शत्रु अगदींच बेसावध होते. छापा पडतांच ते अगदीं भेदरून गेले. कांहीं जणांनीं हत्यारें उचलून हल्ला परतवण्याचा अट्टाहास केला, पण तो व्यर्थ गेला. या चकमकींत फ्रेंच्यांचे दहा सैनिक कामास आले, एक जखमी झाला, आणि एकवीस कैद करण्यांत आले. वॉशिंग्टन्‌चा फक्त एक इसम प्राणास आंचवला आणि दोनतीन जखमी झाले. असा विजय संपादून जॉर्ज् आपल्या तळावर परत आला. कैदी केलेल्या इसमांचीं डोकीं मारावीं, असें इंडियन् लोकांच्या मनांत फार होतें. परंतु जॉर्ज्‌नें त्यांस तसा अत्याचार करूं दिला नाहीं. ते सर्व कैदी सुभेदार डिन्‌विडीकडे बंदोबस्तानें पाठविण्यांत आले, व त्यांस सौम्यतेनें वागविण्यांत यावें, अशा अर्थाची यादीही जॉर्ज्‌नें सोबत रवाना केली.

यानन्तर जॉर्ज्‌ला उत्तर कॅरोलिना वसाहतींतून मनुष्यांची मदत मिळाली. परंतु अन्नाचा तुटवडा पडून दुष्काळ भासूं लागला. सारे

सैनिक कंटाळलेले व नाखुष दिसूं लागले. पोटभर अन्न नाहीं, अंगभर वस्त्र नाहीं, दगदग फार आणि पगार भिकार, अशा कंगाल स्थितींत त्यांस समाधान तरी कसें वाटावें ? याच्यापेक्षां राष्ट्रकार्याकरितां स्वतांच्या खर्चानें स्वयंसेवक म्हणून लष्करांत दाखल होणें अधिक भूषणास्पद होईल, असें त्यांस वाटणें साहजिकच होतें. जॉर्ज्नें या बाबतींत सुभेदाराकडे स्पष्ट व निस्पृहपणें यादी लिहिली, पण त्यावेळीं तिचा कांहींच उपयोग झाला नाहीं. जॉर्ज् दिवसांतून दोन वेळां सर्व सैनिकांना प्रार्थनेकरितां एकत्र जमवीत असे. रविवारीं सर्व काम बंद ठेवून तो त्यांस नैतिक व धार्मिक उपदेश करीत असे. कोणाच्या हातून कांहीं गैरवर्तणूक घडली असल्यास, त्याचाही सामान्यतः उल्लेख तो आपल्या भाषणांत करीत असे. त्याचें भाषण इतकें प्रेमळ पण अधिकारयुक्त असे, कीं अपराध्यांना तत्काळ पश्चात्ताप होऊन त्यांचे डोळे अश्रूंनीं भरून येत. एकंदरींत तशा कष्टमय स्थितींतही सैन्याची शिस्त राखण्याचे आटोकाट प्रयत्न जॉर्ज् करीत असे व या कामीं परिस्थितीच्या मानानें त्याला यशही चांगलें आलें.

### लष्करी धोरण.

संगमावरील ड्युकेन् किल्ल्यांतील फ्रेंच् आपल्यावर हल्ला करण्याला लवकरच येतील, असा जार्ज्चा अंदाज होता. परंतु दोन महिने झाले, तरी त्यांच्या हालचालीचें कांहींच लक्षण दिसेना. अखेर ड्युकेन् किल्ल्यावर आपणच चाल करावी असें जॉर्ज्नें ठरविलें, आणि तळाच्या संरक्षणाकरितां उत्तर कॅरोलिनाचा सरदार कॅप्टन् मॅके यास ठेवून, तो स्वतः सैन्य घेऊन संगमाच्या रोखानें बाहेर पडला. जॉर्ज्नें बारातेरा मैल मजल खेटली नाहीं, तोंच इंडियन् हेरामार्फत त्याला नक्की बातमी सम-

जली, कीं, संगमावरून हजारबाराशें फ्रेंच् सैन्य व्हिलिअर्स् याच्या नेतृत्वा खालीं वसाहतवाल्यांच्या तळावर धाड घालण्याकरितां निघालें आहे. जॉर्ज्नें विचार केला कीं, आपल्या टोळीच्या संख्याबळानें चारपांच पट असलेल्या या सैन्यास वाटेंत आडवण्याचा प्रयत्न करणें म्हणजे आपल्या लोकांचे बळि देऊन कार्यहानि करणेंच होईल. तेव्हां, त्यानें मोठ्या धोरणानें व धिमेपणानें आपलें सैन्य परत तळावर आणलें, आणि तटबंदीचें व बंदोबस्ताचें काम मोठ्या नेटानें चालविलें. जुलई महिन्याच्या तिसऱ्या तारखेस शत्रु तटापुढें दत्त म्हणून उभा राहिला. जॉर्ज्नें आपल्या लोकांस सक्त ताकीद दिली होती, कीं, "दारू-गोळ्याचा वेंच बेसुमारानें करूं नका. शत्रूकडील लोक आपल्या टप्प्यांत बरोबर आल्यावरच गोळी सोडावयाची, आणि ती अशी अचूक कीं एका गोळीनें शत्रूकडील एकतरी मनुष्य लोळागोळा होऊन गळला पाहिजे!" ही लढाई रात्र पडेपर्यन्त चालली. फ्रेंच्यांची पुष्कळच खराबी झाली. व्हिलिअर्स्ला वाटलें, कीं, वसाहतवाल्यांना माणुसबळ फारच आहे, तेव्हां गोडीगुलाबीनें ही जागा हस्तगत झाली तर पहावें. म्हणून त्यानें आपला वकील जॉर्ज्कडे बोलणें करण्याकरितां पाठविला. अखेर बरीच घासाघीस होऊन जॉर्ज्नें आपल्याला अनुकूल अशा बऱ्याच अटी घालून, तळ सोडून जाण्याचा करार केला. लगेच दुसऱ्या दिवशीं आपल्या सर्व लष्करी सामग्रीसह लष्करी वाद्यें वाजवीत व जयघोष करीत जॉर्ज्चें सैन्य तळांतून बाहेर पडलें, व व्हिलिअर्स्नें त्याचा सर्वस्वीं नाश करण्याची संधी गमावली पण तळाची जागा कमावली! असो, या मोहिमेंत शत्रूच्या अधिक संख्याबळामुळें जरी वॉशिंग्टन्ला माघार घ्यावी लागली, तरी बचावाची कामगिरी त्यानें फारच धिमेपणानें व धोरणानें

पार पाडली, याबद्दल त्याचा सर्व वसाहतींत व इंग्लंडमध्येंही अतिशय लौकिक झाला व त्यानें सर्वांकडून वाहवा मिळविली. खंदक खणून बचावाचें काम किती उत्तम करतां येतें याचा जो धडा वाशिंग्टन् या मोहिमेंत शिकला, त्याचा त्यानें पुढें ब्रिटिश् सरकारशीं युद्ध करतांना चांगलाच उपयोग केला.

## ब्रॅडॉक्‌ची मोहीम.

पुढील वर्षीं म्हणजे सन १७५५ सालीं इंग्लंड्नें सेनापती ब्रॅडॉक् याच्यां नेतृत्वाखालीं फ्रेंच्यांना ओहिओ नदीवरून हांकलून लावण्याकरितां एक लष्कर इंग्लंड्हून अमेरिकेस पाठविलें. ब्रॅडॉक्नें वॉशिंग्टन्‌च्या शौर्याचा, साहसाचा, व लष्करी धोरणाचा बराच लौकिक ऐकिला होता, व त्याच्याविषयीं त्याचें मन अनुकूल झालें होतें. व्हर्जिनिआच्या वसाहतींत येतांच त्यानें कर्नल् वॉशिंग्टन् यास आपल्या खास मदतीस घेतलें, आणि लागलाच आपला सैन्याचा मोर्चा संगमावरील डचुकेन् किल्ल्याच्या दिशेला वळविला. वॉशिंग्टन्नें ब्रॅडॉक्‌ला सांगितलें, कीं, " इंग्लिश सैन्य जरी कवाईत शिकून तयार झालेलें व युरोपमधील संग्रामपद्धतींत मुरलेलें असलें, तरी त्याला अमेरिकेंतील युद्धभूमीचा सराव नाहीं, मार्गांत काय अडचणी व अडथळे येतील याची कल्पना नाहीं; व तांबड्या इंडियनांच्या युद्धपद्धतीचा अनुभव नाहीं. तेव्हां आघाडीला माझें वसाहतवाल्याचें पथक असूं द्या, आणि त्याच्यामागून तुमचें सैन्य जाऊं द्या. असें कराल तरच मोहीम फत्ते होईल." सरदार ब्रॅडॉक् याचा स्वभाव फार मानी व हट्टी होता. इंग्लिश् सैन्याविषयीं त्याची कल्पना भारी चढेल होती. त्यानें वॉशिंगटनास उत्तर केलें, कीं; " छत् छत्, तूं म्हणतोस यांत कांहींच अर्थ नाहीं. अरे, हे इंग्लिश् सैनिक किती

कमावलेले व कसलेले आहेत याची तुला कल्पना नाहीं. जें तुमचें वसाहतींतील बाजारबुणगें आणि अर्धकच्चे शिपाई करूं शकतात, तें यांस साधणार नाहीं, हें बोलणें शोभतें तरी का? तें कांहीं नाहीं, आघाडीला इंग्लिश् सैन्यच मी ठेवणार!" अर्थात् त्याप्रमाणेंच व्यवस्था झाली, पण 'गर्वाचें घर खालीं' या म्हणीचा ब्रॅडॉक्ला लवकरच प्रत्यक्ष अनुभव आला. थोडेच दिवसांनंतर हें सैन्य अगदीं गर्द रानांत एका अडचणीच्या जागेंत आलें, आणि एकाएकीं आसपासच्या झाडींतून चटाचट गोळ्या सुटूं लागल्या व इंग्लिश् सैनिकांचे प्राण त्यांस बळी पडूं लागले. शत्रु दृष्टीस न पडल्यामुळें इंग्लिश् शिपाई घाबरून गेले आणि वारेमाफ फैरी झाडूं लागले. परंतु त्याचा कांहींच उपयोग होईना, आणि आडून होणाऱ्या शत्रूच्या मारानें मात्र त्यांची प्राणहानि भयंकर होऊं लागली. तेव्हां अर्थातच त्यांची पांचावर धारण बसली. इतक्यांत आसपासच्या झाडींतून इंडियन् लोकांचीं सैतानें आक्राळ विक्राळ ओरडत बाहेर पडलीं व त्यांनीं इंग्लिशांवर गोळ्यांचा व शस्त्रांचा नुसता वर्षाव केला! इंग्लिशांनीं हीं इंडियन् चिन्हें पूर्वीं कधींच पाहिलीं नव्हतीं. त्यांच्या गोळ्यांपेक्षां त्यांच्या आरोळ्यांनाच ते जास्त घाबरले व भेदरून पळापळ करूं लागले. हें पाहतांच इंडियनांना दुप्पट स्फुरण चढलें, आणि त्यांनीं सबंद इंग्रज सैन्य गारद केलें असतें. परंतु ऐन वेळीं वॉशिंग्टन्चें व्हर्जिनिअन् पथक पुढें धडकलें व त्यांनीं इंडियनांचीं लाट आवरून धरली. प्रत्येक व्हर्जिनिअन् शिपाई मोठ्या शिताफीनें व धिमेपणानें एकेका झाडाच्या आड उभा राहून इंडियनावर गोळ्यांचा मारा करूं लागला. वॉशिंग्टन् त्यांना सारखें उत्तेजन देत अगदीं बिजलीप्रमाणें लवत होता. अखेर इंडियन् लोकांचे

जेव्हां बरेच मुडदे पडले, तेव्हां ते झाडींत पळून गेले. या झटापटींत वॉशिंग्टन्चे जवळ जवळ तीन चतुर्थांश लोक कामीं आले, परंतु त्या बलिदानानें इंग्लिश् सैन्याचा समूळ नाश टळला. ब्रॅडॉक्नें या मोहिमीची पुरीच धास्ती घेतली. वॉशिंग्टन्च्या सल्ल्याकडे आपण दुर्लक्ष्य केलें, याबद्दल त्याला आतां फारच पश्चात्ताप झाला. आपलें सैन्य व आपली अब्रू बचावल्याबद्दल त्यानें वॉशिंग्टन्चे मनःपूर्वक आभार मानले. परंतु या अनर्थानें ब्रॅडॉकला इतका धक्का बसला, कीं, तो चार-आठ दिवसांतच वारला.

ब्रॅडॉक्च्यानंतर ब्रिटिश् सैन्याचें अधिपतित्व कर्नल् डन्बार्कडे आलें. हा सेनापति बेहिमती होता. वाशिंग्टन्नें, ड्युकेन् किल्ल्यावर शक्य तितक्या लवकर धाड घालावी, असा सल्ला दिला. परंतु डन्बार्ला तो सल्ला पटेना. " सैन्यांत कांहींच ताकद व जोर राहलेला दिसत नाहीं, मग हें नसतें धाडस करून, आपला नाश व बेअब्रू करून घेण्यांत काय हंशील आहे ? याच्यापेक्षां आपला फिलाडेल्फिआ येथें तळ देऊन तेथेंच हिंवाळा काढावा, हें सर्वांत उत्तम; मग लोक कांहीं म्हणोत ! " असें त्यानें ठरविलें अर्थात्च मोहीम बंद झाल्यामुळें, वॉशिंग्टन् आपल्या घरीं निमूट परत आला.

## सरहद्दीचें संरक्षण.

इंग्लिश् सैन्यानें हार खाऊन व हातपाय गाळून बैठक मारल्यामुळें लढाईचा मामला अगदींच मंदावला, आणि त्यामुळें फ्रेंच्यांना व इंडियनांना आतां सर्व मैदान उघडें झालें. सरहद्दीच्या आसपासच्या खेड्यांत, वाड्यांत, व मळ्यांत, त्यांनीं कहर उसळून दिला. कोठेंतरी त्यांनीं अत्याचार केल्याची बातमी आली नाहीं असा सुना दिवस जात नाहींसा झाला.

तेव्हां सुभेदार डिन्विडीनें कर्नल् वॉशिंग्टन्ला बोलावून आतां पुढें काय करावें याबद्दल सल्ला विचारला. जॉर्ज्नें स्पष्ट सांगितलें, कीं, संगमावरील ड्युकेन् किल्ल्याचें ठाणें उधळल्यावांचून या भयंकर उपद्रवाचा बंदोबस्त होणार नाहीं. सुभेदारालाही ही गोष्ट पटली. लवकरच लोकप्रतिनिधींची सभा भरली, तींत हा प्रश्न विचाराकरितां निघाला. तेव्हां सभेनें असें ठरविलें, कीं, चढावाचा मामला न करतां, केवळ बचावाचें धोरण ठेवावें. सरहद्दीच्या संरक्षणाकरितां एक सैन्य सज्ज करावें. त्याचें अधिपतित्व जॉर्ज् वॉशिंग्टन्कडे असावें. इतर लष्करी अधिकारी नेमण्याचा अधिकार त्याला देण्यांत यावा. या कामाकरितां योग्य रकमही मंजूर करण्यांत आली. अर्थात् ही योजना जॉर्ज्च्या धोरणाहून अगदींच निराळी होती, आणि ही सर्व निष्फळ होणार आहे, हें त्यास नक्की माहीत होतें. तरी पण आपल्यावर सोंपवलेली कामगिरी आपण मनःपूर्वक यथाशक्ति केली पाहिजे, असेंही त्याचे मनानें घेतलें. तो लागलाच पुन्हां सैन्यभरतीच्या कामास लागला. थोडेच दिवसांनीं तो आपल्या सैन्यानिशीं सरहद्दीवरील विञ्चेस्टर् या शहरीं येऊन त्यानें तेथेंच तळ दिला. या सदर ठाण्याहून मधून मधून बाहेर पडून तो सरहद्दीच्या पाहणीचें व रक्षणाचें काम करूं लागला. परंतु त्याचें काम फाटलेल्या आकाशास ठिगळें लावण्यासारखेंच अशक्य होतें. दोन अडीचशें मैल लांबीच्या सरहद्दीचें संरक्षण या एका ठाण्यावरील सैन्यानें कसें होणार? एकीकडे शत्रूचा बंदोबस्त करूं लागावें, तों दुसऱ्या तीन बाजूंस त्यांचा उपद्रव सुरू होई. यामुळें सर्व प्रांतांतील रहिवाशी अगदीं हवालदील होऊन गेले. आजच्या दिवस आपण जीवंत आपल्या गांवीं व घरीं आहों, पण उद्यां काय

होईल याची शाश्वती कोणासही वाटत नाहींशी झाली. गांवोंगांवीं जाळपोळ, मारहाण, लटालूट, व रक्तपात केल्याच्या बातम्या दररोज येत. यांत कांहीं गप्पाही असत. एकदां एका हेरानें नक्की बातमी आणली, कीं, दोनतीन मैलांवर शत्रू आले आहेत, व त्यांच्या आरोळ्या व गोळीबार मी स्वतः ऐकला. तेव्हां वॉशिंग्टन्नें ताबडतोब त्यांच्यावर चालून जाण्याचें ठरविलें, व माझ्याबरोबर येण्यास कितीजण तयार आहेत ह्मणून विचारलें. पण एकजणही पुढें आला नाहीं. तेव्हां वॉशिंग्टन्ला फारच वाईट वाटलें. त्यानें आपल्या लोकांना, नामर्द होऊं नका, कर्तव्याला जागा, वगैरे उपदेश केला व जरा धाकदपटशाही दिला. तेव्हां चाळीस लोक कामगिरीला तयार झाले. मंडळी बाहेर पडून हेरानें सांगितलेल्या ठिकाणाजवळ आली. तों त्यांच्या कानीं बंदुकीचे बार व आरोळ्याही आल्या. मोठ्या सावधगिरीनें ते जरासे पुढें गेले, तों त्यांच्या नजरेस काय देखावा पडला ? दोन झिंगलेले शिपाई मोठमोठ्यानें ओरडतआरडत व मधून मधून हवेंत गोळ्या झाडीत असलेले दिसले ! त्यांना पकडून वॉशिंग्टन्नें योग्य शिक्षा दिली, हें सांगणेंच नको. एकंदरींत कधींकधीं भीतीची अशी हुल्लड उठे, हें खरें. पण अत्याचाराच्या बातम्या खोट्यापेक्षां खऱ्याच जास्त असत. एकदां एका खेड्यांत जॉर्ज् आला, त्यावेळीं एक घराला आग लावून पळून जाणारे इंडियन् त्याला दिसले. जॉर्ज्नें आपल्या लोकांकडून ती आग विझविली. पण त्या घरांत त्याच्या दृष्टीस काय प्रकार पडला ? एका खोलींत खाटेवर एक तरुण स्त्री डोकें फोडून मारलेली आढळली. तिच्या वक्षःस्थळावर तिचीं दोन जुळीं अर्भकें तशींच मारून टाकलेलीं होतीं. घराच्यामागें वाडकु-

त्यांत तिचा मोठा मुलगा मरून पडला होता व त्याच्याभोंवतीं रक्ताचें तळें झालें होतें. पलीकडच्या शेतांत त्याचा बापही तशाच स्थितींत पडलेला आढळला. असे प्रकार हरहमेष ठिकठिकाणीं घडत, व जॉर्ज्‌ला त्यांचा बंदोबस्त करणें अशक्य वाटूं लागलें. लष्करी खर्चाला तुटपुंजी रक्कम मंजूर झाली असल्यामुळें सामग्रीची वाण पडली व सर्व सैनिक अगदीं नाखुष व नामर्द झाले. अशा स्थितींत सुमारें दीड वर्ष काढल्यावर सन १७५७ सालीं जॉर्ज्‌ला विषमज्वर झाला व कांहीं दिवस त्याचें जीवित केवळ संशयित झालें. आजार फार वाढल्यामुळें अखेर त्यास माउंट् व्हर्नान् येथें नेण्यांत आलें. सन १७५८ च्या एप्रील महिन्यांत तो पुन्हां आपल्या कामावर रुजू होण्यासारखा बरा झाला. मध्यन्तरीं डिनूविडी याची सुभेदारी संपली आणि सेनापति ॲबर्‌क्रॉंबि याची अमेरिकेंतील मोहिमेवर नेमणूक झाली.

### ॲबर्‌क्रॉंबीची मोहिम.

नव्या सेनापतीनें डचुकेन् किल्लयावर हल्ला चढविण्याकरितां फौज सिद्ध करण्याचे हुकूम सोडले. हें ऐकून वॉशिंग्टन्‌ला फारच आनंद झाला. त्यानें व्हर्जिनिआच्या लोकसभेकडून या मोहिमेकरितां सैन्यभरतीची व खर्चाकरितां रकमेचीही मंजुरी मिळविली. उत्तर वसाहतींत कानाडाच्या सरहद्दीजवळ फ्रेंच् व इंग्लिश् यांचें गेल्या तीन वर्षें भांडण सुरू होतेंच, परंतु आजपर्यंत त्यांत इंग्लिशांना फारसें यश आलें नव्हतें. अलीकडे मात्र त्यांचें पाऊल चांगलेंच पुढें पडूं लागलें होतें, व फ्रेंच् हारीस येऊं लागले होते, अशा बातम्या येत होत्या. या बातम्यांनीं व्हर्जिनिअन् वसाहतींतील लोकांनाही आपल्याकडील मोहीम फत्ते करून दाखविण्याबद्दल साहजिकच चेव आला. सैन्य-

भरतीचें व युद्धसामग्री जुळविण्याचें काम मोठ्या झपाट्यानें व उल्हा-सानें करण्यांत आलें. जॉर्ज् बरा होऊन पुन्हां जेव्हां सरहद्दीवरील विंचेस्टर् येथील तळावर आपल्या व्हर्जिनिअन् सेनापतीच्या जागीं रुजू झाला, तेव्हां तेथें इंग्लिश् सैन्यही हजर होऊन, डचुकेन् किल्ल्यावर कोणत्या मार्गानें चाल करावी, याची वाटाघाट चालू होती. वॉशिंग्टन्चें मत असें होतें, कीं, " सरदार ब्रॅडॉक् ज्या रस्त्यानें दोन वर्षांपूर्वीं आपलें सैन्य नेत होता, त्याच रस्त्यानें जाणें बरें. पल्ला जरा लांबीचा खरा, पण नवा रस्ता काढण्याच्या दगदगीपेक्षां थोडासा लांबीचा पल्ला पत्करला. शिवाय ब्रॅडॉक्नें जी चूक केली, ती पुन्हां होऊं देणें योग्य नाहीं. इंग्लिश सैनिकांना या प्रदेशांतील अडचणीची व संकटाची माहिती नाहीं. इंडि-यन् लोकांबरोबर लढण्याचा त्यांना सराव नाहीं. तेव्हां आमचे व्हर्जिनिअन् लोक आघाडीला ठेऊन इंग्लिश् सैन्यानें त्यांचा पाठराखीपणा करावा, म्हणजे मोहीम यशस्वी होईल." परंतु या मोहिमेचें पुढारीपण सेनापति फ्रोब्स्कडे होतें. त्याला हा विचार मुळींच मानवला नाहीं. ब्रॅडॉक्चा मार्ग अपेशी ठरला, तेव्हां तो टाळणेंच चांगलें, असें त्यानें ठरविलें. शिवाय, व्हर्जिनिअन् लोकांना अघाडीस ठेवून त्यांच्या मागून आपलें सैन्य चालवणें, ही कल्पना त्याला अगदींच दुःसह झाली. रानांतून वाट काढण्याचें काम कठीण खरें, पण कसलेल्या इंग्लिश् शिपायांना त्यांत कांहींच कठीण वाटणार नाहीं, अशी त्यास घमेंड होती. आपल्या सैन्याकडून सर्व कामें करून घेऊन ब्रॅडॉक्च्या अपेशी मोहिमेचें उट्टें काढून इंग्लिश् शिपायाचें नांव उजळ केलें पाहिजे, असेही इभ्रतीचे विचार त्याचे मनांत घोळत होते. एकंदरींत वॉशिंग्टन्च्या सल्ल्याकडे लक्ष्य न देतां, इंग्लिश् सैन्याला आघाडीस ठेऊन नवा सरळ रस्ता

काढीत, डचुकेन् किल्ल्यावर चालून जाण्याचें त्यानें मुक्रर केलें. सन १७५८ च्या मे महिन्यांत या कामगिरीस सुरवात झाली. आघाडीची फौज मेजॉर् ग्रांट्च्या हाताखालीं होती. हा अमलदार मोठा चढेल होता. याचें सैन्य मोठा ओरडाआरडा करीत व वाद्यें वाजवीत रानांतून जात असेच. फ्रेंच् व इंडियन् लोक त्यांची पाळत राखीत होते, परंतु डचुकेन् किल्ल्याच्या आसपासच्या टापूंत येईपर्यन्त त्यांनीं इंग्लिशांना मुळींच त्रास दिला नाहीं. अशा प्रकारें ग्रांट्चें आघाडीचें सैन्य डचुकेन् किल्ल्यासमोरच एका टेकडीवर येऊन थडकलें, मागून बाकीचेंही सैन्य तेथें पोचलें. ग्रांट्ला आपण शतकृत्य केलेंसें वाटलें. डचुकेन् किल्ला तेथून स्पष्ट दिसत होता. त्याच्याकडे पाहून तो सेनापतीस म्हणाला, " हाच का डचुकेन् किल्ला तो ? हा काबीज करणें म्हणजे इंग्लिश् सैन्याला नुसता पोरखेळ आहे ! आतांच्या आतां मी किल्ला सर करून त्यावर इंग्लिश् निशाण फडकवतों ! " लागलीच इंग्लिश् कवाइती सैन्याला पुढें कूच करण्याचा हुकूम झाला, आणि मेजर लेविस्च्या हाताखालीं जे व्हर्जिनिअन् लोक होते त्यांनीं मागून सामानसुमान बंदोबस्तानें घेऊन यावें असें ठरलें. वॉशिंग्टन् या दिवशीं सैन्याच्या तळावर आलेला नव्हता. असो. ग्रान्ट्चें सैन्य जरासें पुढें जाऊन एका अडचणीच्या जागीं आल्याबरोबर आजूबाजूस दबा धरून बसलेल्या इंडियनांनीं त्यांच्यावर अचानक छापा घातला. भयंकर अक्राळविक्राळ आरोळ्या ठोकीत, गोळ्या सोडीत व फरशांचे प्रहार करीत, त्यांनीं विलक्षण मारझोड चालविली. इतक्यांत किल्ल्याकडूनही फ्रेंच् लोक धांवत आले व त्यांनींही गोळीबार सुरू केला. हा प्रकार पहातांच लेविस्च्या हाताखालचे व्हर्जिनिअन् लोक इंग्लिश्

शिपायांच्या संरक्षणाकरितां धांवून आले. त्यांनीं कांहीं बचाव केला ही गोष्ट खरी. पण इंग्लिश् सैन्याचें धैर्य अगदींच सुटलें, आणि त्यांनीं माघार घेतली. त्यांची फारच प्राणहानि झाली. मेजर् ग्रांट् स्वतःच शत्रूच्या हातीं सांपडला. या मामल्यांत इंग्लिशांचे एकवीस अंमलदार आणि दोनशें ञ्याहात्तर सैनिक कामीं आले. बचावलेले लोक जेव्हां टेकडीवरील तळावर आले, आणि ही भयंकर बातमी जेव्हां सेनापति फोर्बस्‌ला समजली तेव्हां त्याचीं मेटेंच बसलीं. डचुकेन् किल्ला सर करण्याचें आतां तूर्त मनांतही आणण्यास नको, असें त्यानें ठरविलें. इतक्यांत वॉशिंग्टन् तळावर येऊन हजर झाला. तेव्हां डचुकेन् किल्ला कबज्यांत आणण्याची कामगिरी आपण आपल्या शिरावर घेतों, असें त्यानें सेनापतीस सांगितलें. त्यानें तें लागलेंच बिनशर्त कबूल केलें. लागलेच एक दोन दिवसांत जॉर्ज् आपल्या व्हर्जिअन् लोकांस घेऊन तळ सोडून कामगिरीवर निघाला. त्याचे लोक मोठ्या सावधगिरीनें व धिमेपणानें मजल खेटीतखेटीत अगदीं किल्ल्याजवळ आले. तरी पण जिकडे तिकडे सामसूम होतें! कोठें हालचालीचें चिन्ह म्हणून दिसेना! अखेर ते किल्ल्यांत शिरले, तों काय सर्व किल्ला ओसाड! या विलक्षण प्रकाराचें कारण असें होतें, कीं, जॉर्ज् वॉशिंग्टन् आपल्या व्हर्जिनअन् लोकांनिशीं किल्ल्यावर हल्ला करण्यास येणार ही गोष्ट वॉशिंग्टन् तळावरून हालण्यापूर्वींच फ्रेंच् किल्लेदाराला हेरामार्फत कळली. इतक्यांत कॅनडामध्यें फ्रेंच्यांचा पूर्ण पराजय झाल्याचीही दुष्ट वार्ता येऊन धड-कली. तेव्हां तिकडून मदत येण्याची आशा खुंटल्यावर, जॉर्ज् वॉशिं-ग्टन्‌च्या लोकांशीं दोन हात करणें आत्मघातकी होईल असें त्यास वाटलें. इंडियन् लोकही या व्हर्जिनिअन् लोकांस फार डरत. तेव्हां त्या

फ्रेंच् किल्लेदारानें तत्काळ किल्ला खालीं करून निघून जाण्याचें मुक्रर केलें. आणि वॉशिंग्टन् किल्ल्यावर येण्याच्या आदल्याच दिवशीं त्यानें आपला निश्चय अमलांत आणला! जॉर्ज् वॉशिंग्टन्नें किल्ल्यांत शिरतांच इंग्लिश् निशाण किल्ल्यावर फडकावलें, आणि ओहिओच्या थडीप्रांतांचें फेंच्यांचें ग्रहण कायमचें सुटलें! ही गोष्ट सन १७५८ सालीं नोव्हेंबरच्या २५ व्या तारखेस घडली. वॉशिंग्टन्नें त्या वेळचा इंग्लंड्चा तडफदार व राष्ट्रभक्त मंत्री पिट् याच्याविषयीं आदर दर्शविण्याकरितां या किल्ल्याला 'पिट् किल्ला' हें नांव दिलें. येथेंच हल्लीं पिट्स्बर्ग हें शहर वसलेलें आहे.

## गृहसंसार.

यानंतर वॉशिंग्टन्नें लष्करी पेषाचा त्याग करून, जवळजवळ पंधरा वर्षें गृहसौख्याचा उपभोग घेण्यांत व आपल्या मालमत्तेची व्यवस्था पाहण्यांत शांततेनें घालविलीं. डचुकेन् किल्ल्याच्या मोहिमींची जुळवाजुळव करण्याच्या धांदलींतच वॉशिंग्टन्ची एका मित्राच्या घरीं मिसिस् क्यूटिस् या तरुण विधवेशीं गांठ पडली. तिचें रूपसौंदर्य, मधुर भाषण, उच्च बुद्धिमत्ता, व आचारसौष्ठव, या गुणांची मोहनी वॉशिंग्टन्वर तत्काळ पडली. वॉशिंग्टन्चाही सरळ उंच बांधा, तेजस्वी मुद्रा, पिळदार शरीर, गोड स्वभाव, शुद्ध वर्तन, आणि साहसशौर्यादि गुणांबद्दलची कीर्ति, यांनीं मिसिस् क्यूटिस्चें अन्तःकरण काबीज केलें. लढाईची धामधूम सन १७५८ च्या अखेर संपली, आणि लगोलग एकूणसाठच्या जानेवारी महिन्यांत या उभयतांचा विवाह झाला. यावेळीं जॉर्जचें वय २७ होतें; व त्याची पत्नी त्याच्याहून तीनचार महिन्यांनीं लहान होती.

वॉशिंग्टन्‌ची मूळचीच स्थावर मिळकत जवळजवळ पंधरा हजार बिघे होतीं. तींतच आतां त्याच्या बायकोच्या वीस हजार बिघ्यांची भर पडली. ह्मणजे उत्तर अमेरिकेंतील वसाहतवाल्यामध्यें तो आतां अगदीं बड्याबड्या जमीनदारांत मोडूं लागला. अर्थात् त्याच्याकडे बड्याबड्या पाहुण्यांची वारंवार आवजाव सुरू झाली व आपल्या लौकिकास व पदवीस साजेल असा इतमाम व थाटमाट राखणें वॉशिंग्टन्‌ला अवश्यच झालें. तरीपण त्याच्या कुटुंबाची रोजची खासगी राहणी अगदीं साधीच राहिली. फक्त खास कुटुंबाचा कपडालत्ता मात्र जरा तलम व उमदा वापरण्यांत येत असे, आणि तो सर्व इंग्लंड्हून आणविण्यांत येत असे. परंतु इतर सर्व आवश्यक वस्तू तो आपल्याच जमिनींत पिकवी किंवा आपल्याच कारखान्यांत तयार करवी. येवढ्या मोठ्या जमिनीवर कामकाजाचा पेगार प्रचंड असला तर मोठेंसें नवल नाहीं; पण तितक्याही सर्व पेगारावर वॉशिंग्टन्‌ची सारखी नजर असे. नवीन जमीन पाडणें, जुन्या जमिनींना खतें घालून त्यांचा मगदूर वाढविणें, धरणें बांधणें, पूल उठवणें, रस्ते आंखणें, नवे मळे, आगरें, फुलबागा, फळबागा, इत्यादि बनविणें, सुतारकी, लव्हारकी, वीणकाम, इत्यादिकाचें कारखाने चालविणें, जमिनीची मापणी करून सरहद्दीची बंदिस्ती करणें, वगैरे नानातऱ्हेचीं कामें सतत चालत असत. शिवाय शेतकीचीं नेहमींची कामें, माल आणणें व नेणें, गुराढोरांची पाळणूक करणें, यांस तर कधींच खंड नसे. पण वॉशिंग्टन् या सर्व कामावर मोठ्या दक्षतेनें व नियमितपणानें लक्ष्य ठेवीत असे. उन्हाळा असो कीं हिंवाळा असो, तो आपला नेहमीं लवकर उठावयाचा. दोन पेले चहा आणि तीन लहानलहान रोट्या

यांवर त्याची सकाळची न्याहारी भागत असे. सकाळीं सात—आठाला तो घोड्यावर स्वार होऊन बाहेर पडावयाचा आणि जेथेंजेथें कामें चाललीं असतील तेथें तेथें क्रमाक्रमानें नजर टाकावयाचा. कोठें चुकतें आहे; कोठें नडतें आहे, हें पाहून ताबडतोब उपाय सुचवून तो काम सुडाला लावून देत असे. जरूर पडेल तेव्हां अंगानें काम करण्यासही तो मागेंपुढें पहात नसे. मी एवढा मोठा, तेव्हां नांगर कसा धरूं, पावड्याला हात कसा लावूं, लांकडाला खांदा कसा घालूं, अशा प्रकारच्या खोट्या मोठेपणाच्या कल्पना त्याला कधींही शिवत नसत. यामुळें त्याचीं माणसें फार जपून, कसून, व मोठ्या उत्साहानें काम करीत. तो आपल्या माणसांकडून कसून काम करून घेई, पण त्यांना कुटुंबांतील माणसांप्रमाणें सांभाळी. वाशिंग्टन् व त्याची बायको पाव्हणेरावणे आले म्हणजे मोठ्या दिमाखानें व थाटमाटानें वागत, पण त्याचें नोकरचाकरांबरोबरचें नेहमींचें वर्तन फार साधें, ममतेचें, व गोड असे. त्याच्याकडे एकंदर सर्व पेगारावर दररोज जवळजवळ हजार मनुष्य कामावर असे. यांत बरेचसे निग्रो गुलामही होते. पण तेही आपल्या धन्यावरती नेहमीं खूष असत. वाशिंग्टन्च्या गोवळवाड्यांत शंभराच्यावर गाई असत, तरीपण घरखपाकरितां त्याला कांहीं लोणी खरेदी करावें लागत नसे. याचा अर्थ असा नव्हे, कीं, त्याच्या घरांत कारखाना अलिजा व अव्यवस्थित होता. मिसिस् वाशिंग्टन् घरांतल्या सर्व कामाकडे अगदीं नवऱ्याप्रमाणेंच डोळ्यांत तेल घालून लक्ष देत असे. परंतु लोण्याचा इतका खप होण्याचें कारण त्यांची कुटुंबाची व्याख्या फार व्यापक होती. आपल्या नोकरांना-गुलामांनाही—पौष्टिक अन्न पोटभर मिळावें अशी त्यांची नेहमींची इच्छा असे. आश्रितांचा संतोष हेंच घरंदाजाचें भूषण, हें तत्त्व तीं नवराबायको जाणून होतीं.

## लोकसभेकडून बहुमान.

डयुकेन् किल्ला घेण्याच्या पूर्वींच वॉशिंग्टन्चा व्हर्जिनिआच्या लोकसभेंत प्रवेश झाला होता. परंतु लढाईच्या गोंधळांत त्या सभेच्या कामांत त्याला मुळींच भाग घेतां आला नाहीं. डयुकेन् किल्ल्याच्या मोहिमेंत यश संपादल्याबद्दल वॉशिंग्टन्चे जाहीर आभार मानण्याचें लोकसभेनें ठरवलें, आणि सन १७५९ च्या पहिल्याच बैठकींत हा योग जुळवून आणला. वॉशिंगटन् आपल्या जागेवर येऊन बसल्या-बरोबर अध्यक्ष रॉबिन्सन् यानें त्याच्या स्वदेशाभिमानाचा व सद्गुणाचा मोठा गौरव केला, आणि समरांगणांतील त्याच्या पराक्रमाचें मोठें रसभरित वर्णन केलें. सर्व सभेनेंही टाळ्यांच्या गजरानें या स्तुतिस्तोत्रास आपली संमति दिली. यानंतर वॉशिंग्टन् सर्वांचे आभार मानण्यास उभा राहिला, पण रणांगणावर शत्रूच्या गोळ्यांच्या दणक्याला न डगमगणारा तो संग्रामसिंह या स्तुतिपर बोलांच्या श्रवणानें इतका चकित झाला, कीं, त्याची बोबडीच वळली ! ‘ अध्यक्षसाहेब, अध्यक्षसाहेब ! ’ यापलीकडे त्याच्या तोंडून शब्दच फुटेना ! अखेर रॉबिन्सन् त्याच्या मदतीस सरसावला; तो मोठ्या मधुर विनोदानें म्हणाला, ‘ बसा, वॉशिंग्टन्साहेब, तुमच्या पराक्रमापेक्षांही तुमचा विनय जास्त आहे, हें आमच्या आज प्रत्ययास आलें ! ”

## युद्धानन्तर.

सन १७५८ मध्यें व्हर्जिनिआच्या बाजूचें जरी युद्ध संपलें, तरी उत्तरेस कॅनाडाच्या हद्दींत, हिंदुस्थानांत, भूमध्यसमुद्रांत, वगैरे बऱ्याच ठिकाणीं इंग्लंड् व फ्रान्स् यांची कटकट चालूच होती. या युद्धाला ‘ सप्तवार्षिक युद्ध ’ ( १७५६–१७६३ ) हें नांव आहे. या युद्धांत

इंग्लंड्चा अखेर सर्वत्र विजय होऊन भांडण तुटलें. अमेरिकेंतील वसाहतीच्या उत्तरेस असलेला प्रचंड कॅनाडाप्रांत इंग्लिशांच्या मालकीचा झाला व तो अद्याप ब्रिटिश् साम्राज्याचा एक महत्वाचा भाग आहे. ही लढाई चालू असतां इंग्लड्नें बरेच व्यापारविषयक कायदे केले, ते अर्थात् इंग्लड्ला फायदेशीर होते, पण अमेरिकेंतील वसाहतींना जाचक व नुकसानीचे होते. इंग्लंडनें असा कायदा केला होता, कीं, वसाहतींच्या बंदरांत परदेशांतील गलबतांना शिरूं देऊं नये, वसाहतींतून निर्गत होणारा माल फक्त ब्रिटिश् साम्राज्यांतील मुलुखासच पाठविण्यांत यावा, आणि वसाहतींनीं मालाची आयात करणें ती फक्त इंग्लंडांतून आणि इंग्लिश् गलबतांतूनच केली पाहिजे. शिवाय, ज्या कारखान्यांची इंग्लिश् कारखानदारांशीं चढाओढ होईल व त्यांच्या किफायतीस बाध येईल, असे कारखाने वसाहतवाल्यांनीं मुळींच सुरू करतां कामा नये. अर्थात्च या निर्बन्धांनीं वसाहतीच्या व्यापाराला धक्का बसूं लागला; आणि आमच्या संमतीवांचून आमच्यावर इंग्लंड्नें असे निर्बन्ध कां घालावे, असा ध्वनि उठूं लागला. पण लढाई जोंपर्यन्त चालू होती, तोंपर्यन्त वसाहतवाल्यांनीं ते निर्बन्ध निमूट सहन केले. पुढें लढाई संपल्यावर इंग्लंड्च्या लक्ष्यांत आलें, कीं, या लढाईनें पुष्कळ विजय मिळाले, साम्राज्याच्या क्षेत्रफळांत भरपूर भर पडली, इंग्रजांची इभ्रत वाढली, परंतु इंग्रजांच्या तिजोरींत मोठाच खळगा पडला; तो कसा भरून काढावा ? तेव्हां कांहीं मुत्सद्यांनीं सुचविलें कीं अमेरिकन् वसाहातवाले फार गबर आहेत. तेव्हां त्यांच्यावर कर बसवून उत्पन्न वाढवावें. असा कर बसविण्याचा इंग्लंड्ला हक्कच आहे. या वसाहती इंग्लंड्नेंच वसविल्या, त्यांचें पालनपोषण इंग्लंड्नेंच केलें, त्यांच्या

संरक्षणाचे कष्ट इंग्लंड्नेंच घेतले. मग याची भरपाई कर लादून इंग्लंड्नें कां करून घेऊं नये? यावर विरुद्ध पक्षाचें ह्मणणें असें पडलें, कीं, या वसाहती इंग्लंड्नें वसविल्या नाहींत, तर इंग्लंड्च्या जाचाला व जुलमाला कंटाळून परागंदा झालेल्या लोकांनीं त्या वसविल्या आहेत. इंग्लंड्नें त्यांचें पालनपोषण केलें नाहीं, तर इंग्लंड्नें त्यांच्याकडे पूण दुर्लक्ष्य केल्यामुळेंच त्यांना स्वतंत्रपणें आपली उन्नति करून घेतां आली. इंग्लंडनें बेपर्वाई दाखविल्यामुळें त्यांना आपल्या कष्टाचें फळ उपभोगतां आलें व त्या भरभराटीस चढल्या. त्यांचें संरक्षण करण्याचा आव इंग्लंड्नें घातला, पण त्या कामींही वसाहतींनाच जास्त कष्ट करावे लागले आहेत, आणि त्यांनीं जर पैसा व युद्धसामग्री पुरवली नसती तर इंग्लंड्च्या हातून कांहींच झालें नसतें. पण इंग्लिश् पार्लिमेन्ट्ला पहिली विचारसरणी मान्य झाली व सन १७६५ सालीं 'स्टँप् ॲक्ट्' पसार करण्यांत आला.

### कराचा लढा.

या कायद्यानें, वसाहतींतील लोकांनीं देवघेवींचे सर्व व्यवहार सरकारी ठशाच्याच कागदावर करावे, अशी सक्तीची नियंत्रणा झाली. परंतु व्हार्जीनिआच्या उत्तरेस ज्या 'न्यू इंग्लंड् स्टेट्स्' नांवाच्या बऱ्याचशा प्यूरिटन् वसाहती होत्या, त्यांनीं या कायद्याचा तत्काळ जोरानें निषेध केला. "जोंपर्यन्त आमचे प्रतिनिधि ब्रिटिश् पार्लिमेन्ट् मध्यें नाहींत, तोंपर्यन्त आमच्यावर इंग्लंड्ला कर बसवितां येत नाहीं, आणि आम्हीही कोणताही कर देणार नाहीं. सरकारी ठशाचे कागद आम्ही मुळींच खरेदी करणार नाहीं." असें या वसाहतींनीं उत्तर दिलें. यांत मॅसॅच्यूझेट्स या वसाहतीनें सर्व पुढाकार घेतला होता. या वसाहतींच्या

लोकसभा भरून त्यांनीं एक संघ बनविला व डॉ. बेंजामिन् फ्रँक्लिन् यास त्या संघानें आपला वकील म्हणून इंग्लंडास पाठविला. इकडे बोस्टन् शहरीं इंग्लिश् सरकारनें एक स्टँप् विकण्याची कचेरी उघडली. परंतु चवताळलेल्या लोकांनीं कचेरीवर हल्ला केला, खिडक्यांच्या काचा फोडल्या, आणि कचेरींतील सर्व सामानाची रास करून त्याची होळी केली. स्टँप् ॲक्ट् पसार होऊन दोन महिने झाले नाहींत तोंच व्हर्जिनिआ वसाहतीची लोकसभा भरली व तींत पॅट्रिक् हेन्री यानें असा ठराव मांडला कीं, " या वसाहतींवर कोणताही कर लादण्याचा अधिकार फक्त या वसाहतीच्या लोकसभेलाच आहे, आणि याविरुद्ध ज्याचें मत असेल तो वसाहतीचा शत्रु गणला जाईल. " या ठरावाचें समर्थन करतांना त्यानें अत्यन्त आवेशपूर्ण भाषण करून वसाहतवाल्यांच्या देशाभिमानाला व स्वातंत्र्यप्रीतीला खडबडून जागें केलें. व्हर्जिनिआ ही वसाहत अगदीं जुनी असून तिच्यांत कांहीं बड्या घराण्यांचीं खुटें होतीं व त्यांच्या मनावर इंग्लिश् राजनिष्ठेचा छाप अद्याप थोडाबहुत शाबूद होताच. या वर्गांतले कांहीं लोक म्हणूं लागले कीं, " अशी आडदांड भाषा वापरणें म्हणजे निव्वळ वणवा पेटवणें आहे. आपल्या हक्काचें रक्षण अलबत केलें पाहिजे, पण तसें करतांना इंग्लंड्विषयीं बेमुर्वतपणाची बुद्धि दाखवण्याचें कारण नाहीं." कोणी म्हणत, "पॅट्रिक् हेन्रीचें तत्त्व आम्हांला मान्य आहे, पण त्याची भाषा फारच जहाल आहे. इंग्लंड्च्या राजाकडे आपण अर्ज करावेत आणि एकंदर प्रकरण सामोपचारानें मिटवावें, हेंच बरें." अशा प्रकारें सभेंत बरीच भवती न भवती झाली, पण अखेर ठराव मंजूर झाला. वॉशिंग्टन्नें ठरावाच्या बाजूनें मत दिलें. परंतु लेफ्टनन्ट् गव्हर्नर् फॉकीअर् यानें ती लोक-

सभा उधळून टाकली व लोकप्रतिनिधींची नवी निवडणूक व्हावी म्हणून हुकूम सुटले. तेव्हां वॉशिंग्टन् वगैरे मंडळींनीं अशी चळवळ केली, कीं, लोकांनीं या ठरावाला अनुकूल असणारेच प्रतिनिधि निवडावे, आणि प्रतिकूळ असतील त्यांस घरीं चुरमुरे खात ठेवावे. ही चळवळ यशस्वी झाली आणि ले. गव्हर्नर्चा डाव अजीबात फसला. डॉ. फ्रँक्लिन् इंग्लंड्मध्यें वसाहतींचा वकील म्हणून गेला होता. त्यानें इंग्लिश् मन्त्र्यांना स्पष्ट सांगितलें कीं वसाहती कोणताही कर देणार नाहीं, आणि कराचा प्रतिकार करण्याला जरूरच पडेल तर हातीं शस्त्र घेण्यालाही त्या मागें-पुढें पहाणार नाहींत. या सर्व गोष्टींचा पार्लिमेन्ट्वर इतका परिणाम झाला, कीं, सन १७६६ सालीं स्टँप् ॲक्ट् रद्द करण्यांत आला.

**वसाहतींचा संघ.**

वसाहतींच्या संघाची काँग्रेस् न्यू यॉर्क् शहरीं भरली आणि तिनें असा ठराव केला, कीं, “वसाहतींच्या स्वातंत्र्यावर गदा येत असतां त्या कधींही स्वस्थ बसणार नाहींत, तर सशस्त्र होऊन जुलुमाचा प्रतिकारच करतील.” व्हर्जिनिआतील नव्या लोकसभेची यानंतर जी बैठक झाली तिच्यावर वरील ठरावाचा फारच परिणाम झाला. त्यामुळें व्हर्जिनिआच्या गव्हर्नरला इतकी भीति वाटली, कीं त्यानें लोकसभा ताबडतोब उधळून लावली. परंतु सभासद खासगी रीतीनें जमले आणि वाशिंग्टन्नें एक प्रतिज्ञालेख तयार केला, कीं, “अमेरिकेपासून पैसा उकळण्याच्या उद्देशानें इंग्लिश् पार्लिमेन्ट्नें ज्या पक्क्या अगर कच्च्या मालावर कर लादला असेल, तो माल खरेदी न करण्याची आम्ही शपथ घेतों.” या करारनाम्यावर बहुतेक सर्व सभासदांनीं सह्या केल्या. अशाच प्रकारचे करारनामे उत्तरेकडील संघानेंही तयार केले होते. कारण

इंग्लंड्नें स्टँप् ॲक्ट् रद्द केला खरा, पण चहा, शिसें, कांच, कागद, व रंग, यावर नवीन कर बसविले; आणि वसाहतवाल्यांचा विरोध केवळ स्टँप् ॲक्टालाच होता असें नाहीं, तर कोणत्याही स्वरूपाच्या कराला होता. या सर्व धडपडीचा असा परिणाम झाला, कीं, कर बसविलेला इंग्लिश् कारखानदारांचा पुष्कळच माल गिऱ्हाइकाच्या अभावीं धूळ खात पडला. असें नुकसान पोंचतांच त्यांनीं ओरड सुरू केली. इकडे वसाहत-वाल्यांनींही जुलुमाचा प्रतिकार करण्यासाठीं व आपल्या हक्कांचें आणि स्वातंत्र्याचें रक्षण करण्यासाठीं राष्ट्रीय सैन्य सिद्ध करावें, म्हणून पुकारणी केली. याप्रमाणें दुहेरी पेंच पडल्यावर इंग्लिश् पार्लमेन्ट्नें सर्व वस्तूंवरचे कर उठविले, मात्र 'आम्हांला वसाहतींवर कर बसविण्याचा अधिकार आहे,' हें सिद्ध करण्यासाठीं व आपली इभ्रत राखण्यासाठीं चहावरचा कर तेवढा उठविला नाहीं. पण वसाहतींना हें सहन होणें शक्यच नव्हतें. वसाहतवाले कांहीं पैशाकरितां भांडत नव्हते, तर तत्त्वाकरितां झगडत होते. "एका वस्तूवर कां कर असेना, पण तो जोंपर्यन्त आमचें मत न घेतां इंग्लंड् बसवीत आहे, तोंपर्यन्त तो आमच्या स्वातंत्र्यावरच घाला आहे आणि त्याचा नेटानें प्रतिकार केलाच पाहिजे," असें त्यांनीं ठरवलें. अखेर चहानें भरलेलें एक गलबत बोस्टन् बंदरांत आलें. तेव्हां सुमारें सतरा साहासी इसम इंडियनासारखे वेष करून त्या गलबतावर गेले आणि त्यांनीं चहाच्या पेट्या समुद्रांत फेंकून दिल्या. ही बातमी इंग्लंड्ला पोंचतांच इंग्लिश् सिंह रागानें नुसता चवताळून गेला आणि त्यानें रणगर्जना केली! लागलेंच इंग्लंड्चें आरमार बोस्टन् बंदरांत दाखल झालें. बोस्टन् बंदराचा व्यापाराचा हक्क सर्वस्वीं नष्ट करण्यांत आला, व त्याची नाकेबंदी झाली. स्टँप् ॲक्टाचा दिवस

म्हणजे १७६९ च्या नोव्हेंबरचा पहिला दिवस वसाहतींत सुतकाचा पाळण्यांत आला होता, त्याचप्रमाणें बोस्टन्च्या नाकेबंदीचा सन १७७३ च्या डिसेंबरांतील दिवसही पाळण्यांत आला. बोस्टन्ची नाकेबंदी झाली, त्याच वेळीं व्हर्जिनिआंतील लोकसभेची बैठक चालू होती. त्या सभेनेंही तो दिवस उपासाचा पाळण्याचा ठराव केला, शिवाय सर्व वसाहतींचा संघ करून एक राष्ट्रीय सभा भरवावी असाही ठराव पसार झाला. अशाच तऱ्हेचे ठराव इतर वसाहतींतील लोकसभांनीं मंजूर केले, आणि संयुक्त अमेरिकेची पहिली राष्ट्रीय सभा फिलाडेल्फिआ या शहरीं सन १७७४ च्या सेप्टेंबरच्या पांचव्या तारखेस भरली. या सभेंत वाशिंग्टन्नें बराच पुढाकार घेतला, आणि कर बसविण्याबद्दल हट्ट न धरण्याविषयीं एक खरमरीत खलिता इंग्लंड्च्या राजाकडे पाठविण्यांत आला. पण त्याचा कांहींच विचार झाला नाहीं. पिट्, अर्ल आव् चॅथॅम्, यानें लार्डांच्या सभेंत स्पष्ट इशारा दिला कीं हातांत शस्त्र घेऊन तयार झालेल्या राष्ट्रावर कर लादण्याचा हट्ट करणें हें मुत्सद्दीगिरीचें नाहीं. कॉमन्सच्या सभेंत बर्कनें प्रतिनिधींना बजावलें, कीं, “वसाहती व मायभूमि (म्हणजे इंग्लंड्) यांच्या परस्पर नात्याची ग्रंथि लोखंडाप्रमाणें घट्ट पण हवेप्रमाणें नाजूक आहे. तेव्हां ती तोडण्याचा अविवेक आपल्या हातून होणार नाहीं, अशी खबरदारी आपण घेतली पाहिजे.” परंतु मंत्रिमंडळानें या सरळ धोरणाच्या सल्ल्याकडे मुळींच लक्ष्य दिलें नाहीं, आणि बोस्टन्ची नाकेबंदी उठली नाहीं. त्या ठिकाणीं सेनापति गेज् हा पांच हजार इंग्लिश् सैन्यासह ठाणें देऊन राहिला होता.

### स्वातंत्र्ययुद्धाची तयारी.

न्यू इंग्लंड् स्टेट्स्नीं आतां युद्ध सुरू होणारच असें समजून

सैन्याची जमवाजमव चालविली होती, व हत्यार आणि दारूगोळा यांचाही संग्रह केला होता. ही बातमी सेनापति गेज्ला लागली. तेव्हां १७७५ च्या एप्रिल महांत हा संग्रह लुटून आणण्याकरितां त्यानें एक टोळी सकाळींच रवाना केली. या टोळीचा वाटेंतच लेक्झिन्टन् येथें अमेरिकन् बंदुकींनें चांगला समाचार घेतला, आणि या वेळपासून अमेरिकन् स्वातंत्र्याच्या युद्धास तोंड लागलें.

सन १७७५ च्या मे महिन्यांत १५ तारखेस फिलाडेल्फिआ येथें राष्ट्रीय परिषदेची दुसरी बैठक झाली. या सभेनें अखिल राष्ट्रीय सैन्यावर जॉर्ज् वॉशिंग्टन् याची मुख्य सरदार म्हणून नेमणूक केली. वॉशिंग्टनला ही जबाबदारी फार मोठी आहे याची जाणीव होती. परंतु त्याचा देशाभिमान व स्वातंत्र्यप्रीति, हीं जाज्वल होतीं, आणि आपल्या बाजूला न्याय, नीति, व व्यवहार, हीं आहेत, तेव्हां ईश्वर या कामांत आपल्याला यश देईलच अशी त्याची मनोदेवता सांगत होती. यामुळें त्यानें ही जबाबदारी मोठ्या उत्साहानें आपल्यावर घेतली, आणि पत्नीला अगर मातुःश्रीला भेटण्याकरितांही घराकडे न वळतां, तो एकदम बोस्टन्च्या रणक्षेत्राकडे सैन्याचीं सूत्रें हातांत घेण्याकरितां निघाला. वाटेंतच त्याला बंकर टेकडीवरील युद्धाची हकीकत कळली. बोस्टन्च्या उत्तरेस चार्लस् टाउन् हें शहर आहे. त्याच्या उत्तरेस दोन टेकड्या आहेत. या टेकड्यांवरून शहरावर मारा करतां येण्यासारखा असल्यामुळें अमेरिकन् सैन्यानें त्यांपैकीं एका टेकडीवर चढून १६ मे रोजीं तेथें खंदक वगैरे खणून बंदोबस्त करण्याला आरंभ केला. ही टेकडी अमेरिकनांपासून हिसकावून घेण्याकरितां सेनापति गेज्नें कांहीं सैन्य पाठविलें. या सैन्याचे दोन हल्ले अमे-

रिकनांनीं मोठी मारागिरी करून परतविले. परंतु इंग्लिशांनीं जेव्हां तिसरा निकराचा हल्ला केला, तेव्हां अमेरिकनांचा दारूगोळाच संपल्यामुळें त्यांनीं इंग्लिशांवर शेवटची गोळी झाडून, खालीं मैदानांत धांव ठोकली, आणि इंग्लिशांनीं टेकडीचा कबजा घेतला ! या लहानशा झटापटींत अमेरिकनांचे $\frac{1}{3}$ लोक कामास आले, पण इंग्लिशांचे $\frac{1}{2}$ लोक गारद झाले. इंग्लिश सैन्य कसलेलें व कवाईती होतें. अमेरिकन् सैन्य बिन-कवाइतीचें व जवळजवळ बिनसामग्रीचें होतें. पण अशाही अर्ध्या कच्च्या, बाजारबुणग्या अमेरिकनांनीं इंग्लिश सैन्याला बरेंच खेळवलें व लोळवलेंही, हें ऐकून वॉशिंग्टन्नें उद्गार काढले, कीं, " ईश्वरी कृपेची धन्य आहे ! आमच्या देशाचें स्वातंत्र्य खास टिकणार ! "

### सेनापति वॉशिंग्टन्.

वॉशिंग्टन्नें बोस्टन्च्या रणक्षेत्रांत येऊन सैन्याचें निरीक्षण केलें, तों त्यास आढळलें कीं अमेरिकन् सैन्य नुसतें अनघड बाजारबुणगें आहे. बहुतेक सर्व शिपाईगडी शेतांतल्या नांगराचा दांडा सोडून बंदुकीची हडलहप्पी करण्याला धांवून आले होते. लढाई कशाशीं खातात याचीही त्यास माहिती नव्हती. पण हेंही एका अर्थीं पथ्यावरच होतें, कारण ते अज्ञानामुळें वाटेल तें साहस करण्यास एका पायावर तयार होते ! वस्त्रप्रावरणाची हलाखी, हत्यारांची वाण, आणि दारू-गोळाही तुटपुंजा ! पण अशा दुःस्थितींत एक मोठी आशाजनक गोष्ट ही होती, कीं, आपण स्वातंत्र्याकरितां शिर हातावर घेऊन लढत आहों, याची त्या सर्वांस पूर्ण जाणीव होती. यामुळें त्यांच्या अंगांत उत्साह व आवेश भरपूर होता.

याच सालीं म्हणजे १७७५ त अमेरिकनांनीं कॅनाडावरही स्वारी

केली होती. पण तींत फारसें यश आलें नाहीं. आक्टोबर महिन्यांत गेज्च्या जागीं सेनापति हॉव् यांची नेमणूक झाली. इंग्लिशांनीं जर्मनींतून कांहीं भाडोत्री सैन्यही अमेरिकेंत पाठविलें. आतां इंग्लिश सैन्याचें संख्याबल अर्ध्या लाखावर गेलें.

वॉशिंग्टन्नें सैन्याचीं सूत्रें हातांत घेतल्याबरोबर सर्व सैनिकांना उद्देशून एक जाहीरनामा काढला, कीं, " वसाहतीच्या संघाच्या राष्ट्रीय सभेनें अखिल अमेरिकन् वसाहतींचें सैन्य आपल्या ताब्यांत घेतलें आहे. तेव्हां आतां निरनिराळ्या वसाहतींतील सैन्यांनीं एकमेकांविषयीं परकेपणाची भावना आपल्या मनांत बिलकूल राहूं देऊं नये. सर्वांनीं एक मनानें, एक वृत्तीनें, एक विचारानें, या राष्ट्रीय कामाला जीवाभावांनीं लागावें. आपआपसांतील मतभेद, चुरस, वितुष्ट, स्पर्धा, या सर्व कोत्या विकारांना या घटकेस मूठमाती मिळाली पाहिजे. लष्करी शिस्त सर्वांनीं कसोशीनें पाळली पाहिजे व वरिष्ठांचे हुकूम बिनतक्रार मानले पाहिजेत. या मुख्य बाबतींत कसूर अगर चालढकल केल्यास बेबंदशाही व सांवळा गोंधळ माजेल, आणि कार्याचा नाश होऊन देशाचा घात होईल. कोणाही सैनिकानें अंमल करतां कामा नये, अभद्र भाषण बोलतां कामा नये, किंवा कोणताही भ्रष्टाचार करतां कामा नये. प्रत्यक्ष समरांगणांवरील कामगिरींत जे अंमलदार व सैनिक गुंतले नसतील, त्यांनीं ईश्वरप्रार्थनेकरितां अवश्य जमलें पाहिजे व आपल्या संरक्षणासाठीं त्यांनीं नेहमीं दयाघन परमेश्वराशीं कृपेची याचना करावी. "

अमेरिकन् सैन्यांत दारूगोळ्याची फारच टंचाई होती. बोस्टन्मधील इंग्लिश् सैन्यानें हिय्या करून जर आपल्यावर हल्ला केला,

तर दारूगोळ्याच्या तुटवड्यामुळें आपली अगदीं त्रेधा उडेल, हें वॉशिंग्टन् समजून होता. त्यानें हरप्रयत्न करून वसाहतींच्या निरनिराळ्या भागांतून मिळेल तेवढा दारूगोळा मिळविण्यास सुरवात केली. शिवाय, कांहीं लढाऊ जहाजें अमेरिकेच्या किनाऱ्यावर सतत फिरतीं ठेविलीं, व लष्करी सामग्रीचीं इंग्लिशांचीं गलबतें पकडून लुटावीं, असे त्यांना हुकूम देण्यांत आले. या कामीं त्यांना थोडें यशही आलें. एकदोन भलीं मोठीं जहाजें त्यांच्या तावडींत सांपडलीं व बरीच लष्करी सामग्री अमेरिकनांच्या हातीं लागली. वॉशिंग्टन्ला सेनापतित्व स्वीकारून सहा महिने झाले, आणि सैन्यांत कांहीं मुदतीकरितां दाखल झालेल्या लोकांची मुदत खलास होऊन, ते परत आपल्या घरीं जाऊं लागले. आतां सैन्यांत नवी भरती करावयाची, पण नव्या माणसांना बंदुका कोठच्या पुरवावयाच्या ? तेव्हां वॉशिंग्टन्नें असें ठरवलें कीं परत जाणाऱ्या इसमानें आपली बंदूक योग्य मोबदला घेऊन सैन्यास द्यावी, आणि नव्या इसमांनीं स्वतांची बंदूक न आणल्यास सरकारी बंदूक वापरण्याकरितां एक डॉलर् भाडें द्यावें. ही गोष्ट सर्वांना मान्य झाली, आणि बंदुकांचा प्रश्न थोडक्यांत सुटला.

असो, अशा रीतीनें सन १७७६ साल उजाडलें. बोस्टन् येथील इंग्लिश् सैन्याची नाकेबंदी जवळजवळ दहा महिने वॉशिंग्टन्नें चालविली. परंतु इंग्लिश् सैन्य कांहीं हल्ल्याकरितां बोस्टन्मधून बाहेर पडण्याचें चिन्ह दिसेना. आतां वाशिंग्टन्ची स्वतांच बोस्टन्वर हल्ला करण्यासारखी तयारी झाली होती. शिवाय, कॅनाडांतील स्वारींत अमेरिकनांचा पुरा मोड झाला होता, ठिकठिकाणच्या थोड्याशा राजनिष्ठांनीं चळवळ करण्यास सुरवात केली होती, आणि इंग्लिशांचा एक

सेनापति क्लिन्टन् हा अमेरिकेच्या किनाऱ्यावर वारंवार धाडी घालीत होता. अशा स्थितींत आपण बोस्टन्‌ला वेढा देऊन स्वस्थ बसलों, तर त्याचा लोकांच्या मनावर विपरीत परिणाम होईल; आज लोकांत जो उत्साह दिसत आहे, तो जर निराशेनें नाहींसा झाला, तर राष्ट्रकार्य डुबलेंच म्हणून समजावें! असा विचार वॉशिंग्टन्‌च्या मनांत आला. त्यानें बोस्टन् येथील इंग्लिश् सैन्यावर घाला घालण्याचें धाडस करण्याचें मुक्रर केलें.

## बोस्टन्‌चा वेढा.

मार्चच्या तिसऱ्या तारखेस संध्याकाळीं अमेरिकेन् सैन्यानें दोन ठिकाणीं बोस्टन् येथील इंग्लिश् सैन्यावर तोफांचा भडिमार सुरू केला. अर्थात् त्याच बाजूला सर्व इंग्लिश् सैन्याचें लक्ष्य गुंतलें. या संधीस वॉशिंग्टन् कांहीं सैन्य घेऊन गुपचूप बोस्टन्‌जवळ पण खाडीच्या अलीकडे असलेल्या डॉर्चेस्टर् टेकडीवर चढला आणि रातोरात तेथें बोस्टन्‌च्या बाजूला छातीभर कोट बांधण्याचें काम सुरू केलें. या टेकडीवरून बोस्टन् येथील इंग्लिशांच्या सबंध छावणीवर सहज मारा करतां येण्यासारखा होता. चार तारखेस सकाळीं इंग्रज पहातात, तों टेकडीवरील तटबंदी त्यांच्या दृष्टीस पडली. ती पाहतांच त्यांची बरीच घाबरगुंडी उडाली. अमेरिकनांनीं ही भुताटकी कशी केली, हेंच त्यांना कळेना! सेनापति हाव्‌नें त्या टेकडीवर तोफांचा मारा करण्यास सुरवात केली. पण या भडिमारानें अमेरिकनांचें कांहींच नुकसान झालें नाहीं. अशा रीतीनें दिवस मावळल्यावर हॉव्‌नें रात्रीं आपलें कांहीं सैन्य टेकडीच्या पायथ्याशीं उतरून हातघाईचा हल्ला करून टेकडी सर करण्याचा बेत केला. पण त्याच रात्रीं ईशान्य

दिशेकडे इतकें भयंकर वादळ आलें कीं, इंग्लिश् सैन्याला लागीला लागणेंच शक्य झालें नाहीं. दुसऱ्याही दिवस हें वादळ चालूच राहिलें. त्यानें इंग्लिशांना मात्र बोस्टन्मध्यें डांबून टाकलें, आणि वॉशिंग्टन्ला आपली तटबंदी पुरी करण्यास सवड दिली ! यानंतर हॉव्नें बोस्टन् सोडून जाण्याची आपली तयारी दाखविली; त्यावर वॉशिंग्टन्नें त्यास असा निरोप पाठविला कीं, " बोस्टन् शहराला यत्किंचितही धका न लावतां तुह्मी खुशाल निघून जा. आह्मीं तुमच्यावर एकही गोळी झाडणार नाहीं. परंतु तुमच्या सैन्यानें रहिवाशांस लुटण्याचा अगर त्यांचीं घरेंदारें जाळण्याचा जरा कोठें प्रयत्न केलेला दिसला, तर आह्मीं या टेकडीवरून तुमच्यावर भडिमार करून तुमची राखरांगोळी उडवूं ! " सेनापति हॉव्नें ही शर्त कबूल केली व आपलें ठाणें बोस्टन्हून बिनतक्रार उठवलें.

इंग्लिशांनीं बोस्टन् शहर सोडल्याची बातमी इंग्लंड्ला पोंचतांच ब्रिटिश सरकारला जितकी नामोशी वाटली, त्याच्यापेक्षां कितीतरी पट उत्साह व अवसान या बातमीनें अमेरिकनांना आलें. फिलॅडेल्फिआ येथें सन १७७६ जुलैच्या चवथ्या तारखेस राष्ट्रीय सभेनें 'स्वातंत्र्याचा जाहीरनामा' प्रसिद्ध केला. हा दिवस अद्यापही अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांत 'स्वातंत्र्यदिन' ह्मणून मोठ्या उल्हासानें व इतमामानें दरसाल साजरा केला जातो.

### न्यूयार्कचे डावपेंच.

सेनापति हाव्नें बोस्टन् सोडलें, तेव्हांच वॉशिंग्टन्चा होरा होता कीं, आतां इंग्लिश् आरमार व लष्कर न्यूयॉर्क् शहरावर धाड घालण्यास जाणार, आणि त्याचें भविष्य अगदीं खरें ठरलें. न्यूयॉर्क्

शहरासमोरच ॲटलॅन्टिक् महासागरांत अगदीं थोड्या अन्तरावर लॉङ्ग् आयलंड् नांवाचें बेट आहे, तें इंग्लिशांनीं काबीज केलें आणि, लवकरच अमेरिकेच्या किनाऱ्याजवळ आरमार आणून व लष्कर उतरून न्यूयॉर्क्वर हल्ला चढवला. यापूर्वीच वॉशिंग्टन्ला या गोष्टीचें स्वप्न पडलें असल्यामुळें, तो थोडेंसें सैन्य हडसन् नदीच्या टापूंत बोस्टन्च्या संरक्षणाकरितां ठेवून, बाकीची सर्व फौज घेऊन न्यूयॉर्क्-मध्यें हजर झाला होता. मध्यन्तरीं इंग्लिश् सेनापति सर् हेन्री क्लिन्टन् यानें दक्षिण कॅरोलिना वसाहतीची राजधानी चार्लस्टन् या शहरावर आरमारी धाड घातली, आणि राजधानीच्या खालच्या बाजूस सहा मैलांवर असलेल्या मोल्ट्री किल्ल्यावर हल्ला चढविला. इंग्लिशांनीं किल्ल्यावर तोफांचा भयंकर धडका उडवला, परंतु अमेरिकनांनीं किल्ला इतका शौर्यानें लढविला कीं, अखेर क्लिन्टन् साहेब आपलें आरमारी व लष्करी चंबूगवाळें आटोपून, हात हालवीत परत न्यूयॉर्क् बंदरीं सेनापति हावच्या आरमारांत मिसळले. ही हकीकत सन १७७६च्या जून-जुलै महिन्यांत घडली. या विजयाची वार्ता वॉशिंग्टन्ला व त्याच्या फौजेला फार उत्साहक झाली. अलीकडे शिपाई लोकांचा पगार वाढवण्याविषयीं वॉशिंग्टन्नें बरीच खटपट केली होती, व तींत त्याला थोडेसें यशही आलें होतें. तरीपण त्याच्या फौजेची स्थिति अजूनही पुष्कळच हलाखीची होती. परंतु वॉशिंग्टन् सर्व शिपायांशीं मोठ्या गोडेपणानें वागे. न्यूयॉर्क् बंदराभोवतीं तीन्ही दिशांना नाकेबंदी होऊन इंग्लिश् सैन्याला किनाऱ्यावर उतरण्याला वावच मिळूं नये म्हणून त्यानें सैन्याचे विभाग करून ठिकठिकाणीं ठाणीं बसविलीं होतीं. या सर्व ठाण्यावर लक्ष्य ठेवण्याकरितां तो भिंगरीसारखा फिरत असे. जेथें

जेथें कांहीं उणें दिसे, तेथें तत्काल योग्य व्यवस्था तो लावीत असे. त्याचा उत्साह, आवेश, राष्ट्रप्रेम, ईश्वरनिष्ठा, पाहून सर्व सैनिकांस मोठें उत्तेजन येई. सैनिकांनीं शिस्तीनें व कर्तव्यास जागून वागावें, आणि ईश्वरी कृपेसाठीं नेहमीं निर्मळ मनानें प्रार्थना करावी, अशाबद्दल तो फार जपे. कोणतेंही काम—मग तें कितीही हलकें असो वा कष्टाचें असो— करण्यास तो नेहमीं तयार असल्यामुळें त्याच्या लष्करांतील लोक आळस अगर ऐदीपणा सहसा दाखवीत नसत. एकदा तो सैन्याची पहाणी करीत एके ठिकाणीं आला, तों तेथें कांहीं लोक एक लांकडाचा मोठा सोट उचलीत होते व त्यांच्यावरील अंमलदार ‘ भले शाबास ! करा एकदा जोर ! उचला!’ अशा नुसत्या आरोळ्या ठोकीत उभा होता. वॉशिंग्टन् अगदीं साध्या पोशाखांत त्या वेळीं होता. त्यानें त्या अंमलदाराला विचारलें, “ तुम्हीं त्यांना हातभार कां लावीत नाहीं ? ” त्यावर तो इसम तोऱ्यानें बोलला, “ मी हात लावणार ! मी तर अंमलदार ! अशा हलक्या लोकांबरोबर मी कसें मिसळावें ? ” यावर वाशिंग्टन् कांहींच न बोलतां, आपल्या घोड्यावरून उतरला व त्यानें त्या लोकांना तें अवजड बहाल उचलण्याला मदत केली. काम पुरें झाल्यावर तो घोड्यावर बसतांना त्या अंमलदारास म्हणाला, ‘ मला जॉर्ज् वाशिंग्टन् म्हणतात. तुमची व माझी गांठ तुमच्या वरिष्ठाच्या ठाण्यावर पडेलच ! ’ हें ऐकतांच तो इसम किती खजील झाला असेल व किती घाबरला असेल, याची कल्पना वाचकांस सहज करतां येईल.

१७७६ च्या ऑगस्ट १७ रोजीं इंग्लिशाकडे कांहीं चळवळ सुरू आहे असें वॉशिंग्टन् यास दिसून आलें. इंग्लिशांचा बेत किनाऱ्यावर

उतरून ब्रुकलिन् टेकडीचा कब्जा करण्याचा आहे, हें वॉशिंग्टन्नें तत्काळ ताडलें. वॉशिंग्टन्नें सेनापति पुटमन् याच्या हाताखालीं या टेकडीवर पांच हजार फौज पाठविली. परंतु इंग्लिशांनीं २८ तारखेस आपले पंधरा हजार सैनिक तेथें उतरले. कांहीं वेळ भांडण मोठें मातबर झालें. पण अमेरिकनांना लवकरच माघार घ्यावी लागली व त्यांची फळी साफ फुटली. नुसती पळापळ सुरू झाली ! इंग्लिश् तसेच नेटानें पुढें घुसले असते, तर न्यूयॉर्क् त्याच दिवशीं त्यांच्या हातीं येऊन, सर्व सैन्याचा चेंदा झाला असता. परंतु या वेळीं पुन्हां वॉशिंग्टन्च्या साह्याला वादळ आलें. त्या दिवशीं एकदम वादळ सुटलें, आणि ब्रुकलिन् टेकडीवर इतकें धुकें उठलें, कीं, त्यांना टेकडी घेण्यापलीकडे त्या दिवशीं कांहींच करतां आलें नाहीं. न्यूयॉर्क्च्या बाजूला मात्र हें धुकें कमी कमी होत गेलें, त्यामुळें वॉशिंग्टन्ला आपल्या सैन्याच्या बचावाच्या हालचाली निर्धास्तपणें करतां आल्या.

**बचावाचें धोरण व गनिमी कावा.**

इंग्लिशांच्या अवाढव्य फौजेपुढें आपल्या चिमुकल्या सैन्याचा खड्या समरांगणांत मुळींच टिकाव लागणार नाहीं, हें पक्कें जाणून वॉशिंग्टन्नें त्याच्या बचावासाठीं माघार घेण्याचें मुक्रर केलें, आणि यापुढें एवढ्या मोठ्या सैन्याबरोबर गनिमी काव्यानेंच लढलें पाहिजे, असेंही त्यानें ठरविलें. अमेरिकन सैन्य एकत्र गोळा करून त्यानें मोठ्या धिमेपणानें न्यूयार्क् शहर सोडलें. शहर सोडतांना त्याचा नाश करावा असें कांहींचें ह्मणणें होतें. पण तें वॉशिंगट्ननें कबूल केलें नाहीं. शहरांत शत्रूला चांगला आसरा मिळेल हें खरें, पण शहराचा नाश केल्यानें आपल्याच लोकांचें अपरंपार नुकसान होईल. तेव्हां नाश न

करणेंच बरें, असें वॉशिंग्टन्नें ठरविलें. यानंतर वॉशिंग्टन्नें एक ठिकाण सोडावें, इंग्लिशांनीं तें ताबडतोब व्यापावें, असा सारखा क्रम सुरू झाला. वॉशिंग्टन्नें आपलें चिमुकलें सैन्य बचावून ही माघार इतक्या शांतपणें व शिताफीनें चालविली, कीं, युरोपमध्यें त्याची जिकडे तिकडे वाहवा होऊं लागली. आतां वॉशिंग्टन्चें सैन्य इंलिशांच्या लोखंडी कड्यांत सांपडलेंच असें प्रत्येकास वाटावें, आणि इतक्यांत सैन्यानिशीं वॉशिंग्टन् सुखरूप निसटला अशी बातमी येऊन सर्वांनीं चकित व्हावें, असें वारंवार घडलें. वॉशिंग्टन्नें न्यूयॉर्कहून काढता पाय घेतला, व तो आस्तेआस्ते जर्सीच्या वसाहतीच्या हद्दीवरील डिलावेर् नदी ओलांडून पेन्सिल्व्हॅनिआ वसाहतींत शिरला. मागून इंग्लिश् त्याला चेपीत येतच होते. आतां अशी माघार घेण्याची शिळपेटलेली युद्धपद्धति कोठपर्यंत चालवावयाची ? असा एकदा एकानें वॉशिंग्टन्ला प्रश्न केला. वॉशिंग्टन्नें लगेच जबाब दिला, कीं, " जोंपर्यंत अमेरिकेंत ओलांडण्याला एकादी नदी अगर डोंगर आहे, तोंपर्यंत मी माघार घेणार आणि ती व्यवस्थेनें घेणार, पण मी आपलें मूठभर सैन्य यमाच्या मुखकुंडांत स्वाहा म्हणून टाकणार नाहीं." वॉशिंग्टन्नें आपल्याला पाठिंबा देण्याकरितां फौजा घेऊन येण्याचे हुकूम ठिकठिकाणच्या सेनापतींना पाठविले, पण म्हणण्यासारखी कुमक त्यास न मिळाल्यामुळें जर्सीची वसाहत त्यास सोडावी लागली. आतां पेन्सिल्व्हॅनिआच्या वसाहतींत बरी मदत मिळेल असें त्यास वाटलें होतें, पण तेथेंही बहुतेक निराशेचा प्रसंग आला. इंग्लिश् तर आतां नेटानें पाठलाग करूं लागले व राष्ट्रीय परिषदेचें ठाणें जें फिलाडेल्फिआ त्यावर त्यांचा रोख

आहे, असें स्पष्ट झालें. परिषदेची त्रेधा उडून तिनें आपलें ठाणें तेथून उठविलें. वॉशिंग्टन्लाही त्या ठिकाणाचें संरक्षण करणें अशक्य होऊन त्यानें आपल्या फौजेचा बचाव करीत तेथून मागता पाय घेतला. सन १७७७ च्या हिंवाळ्यांत इंग्लिशांनीं आपला तळ फिलाडेल्फिआ येथें ठेवला, आणि वॉशिंग्टन्चें ठाणें त्या शहरापासून सुमारें वीस मैलांवर फोर्ज् खोऱ्यांत होतें. या वेळीं वॉशिंग्टन्ची फौज अगदींच निराशाजनक स्थितीमध्यें होती. दुष्काळाचीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं. एकदां वॉशिंग्टन् आपल्या राहत्या जागेंतून जेऊनखाऊन बाहेर पडला, तो पाहऱ्यावरील पाहरेकरी अगदीं भुकेनें कळवळलेला आहेसें त्याला वाटलें. त्यानें त्याला लागलेंच सांगितलें, कीं, "जा, माझ्या मकाणांत जा, आणि जेऊन ये."

तो म्हणाला, "छे! मला तसें करतां येणार नाहीं."

"कां?"

"कारण, मी पाहऱ्यावर आहे."

लागलीच वॉशिंग्टन्नें त्याची बंदूक घेतली, व त्याच्याऐवजीं देवडीवर पहारा करण्याचें कबूल करून त्याला जेवावयाला पाठविलें. लवकरच तो शिपाई पोटभर जेऊन संतुष्ट होऊन पहारा करण्यास आला. तोंपर्यन्त वॉशिंग्टन् त्याचें काम अगदीं शांतपणें करीत होता. पराभव, माघार, हलाखी, दुष्काळ, अशी संकटपरंपरा सारखी चालू असतां, अमेरिकन् सैन्य जें इतके दिवस टिकाव धरून राहिलें, त्याला मुख्य कारण वॉशिंग्टन्ची प्रेमळ वर्तणूक, सरळ स्वभाव, एकनिष्ठ कर्तव्यबुद्धि, व ईश्वरावर भरंवसा, हे गुण होत; यांत मुळींच शंका नाहीं.

## बरगॉयनेची शरणागति.

मध्यन्तरीं सन १७७७ च्या आक्टोबर महिन्यांत अमेरिकनांना एक मोठा जय मिळाल्याची वार्ता आली. कॅनडामधून इंग्लिश् सेनापति बर्‌गॉय्‌ने हा एक मोठी फौज आणि जर्मनांच्या व इंडियनांच्या भाडोत्री टोळ्या घेऊन येत होता. वाटेंत अमेरिकन सेनापति स्टार्क् यानें बेनिंग्टन् येथील चकामकींत या इंग्लिश् सन्याचा बराच समाचार घेतला. या वेळीं इंग्लिशांचे पांच सहाशें सैनिक कैदी झाले व कांहीं पितळेच्या तोफा व बरीचशीं हत्यारें आणि दारूगोळा अमेरिकनांचे हातीं लागला. यानंतर हळूहळू अमेरिकन् लोकांनीं बर्‌गॉय्‌नेला असा घेरून कोंडींत पकडला, कीं, त्याला परत जाण्याला अगर पुढें जाण्याला तिळमात्रही वाव राहिला नाहीं. तेव्हां तो नाइलाज होऊन ता. १२ आक्टोबर रोजीं अमेरिकनांना शरण येऊन सर्व फौजेसह व सामानसुमानासह त्यांचे स्वाधीन झाला. हा मोठा विजय अमेरिकन सेनापति गेट्स् यानें संपादिला.

## सेनापतीचा लौकिक.

याच वर्षी वॉशिंग्टन्‌च्या लष्करी कौशल्याची कीर्ति ऐकून कांहीं युरोपांतील लढवय्ये त्याच्या स्नेहासाठीं व मदतीसाठीं आपण होऊन अमेरिकेस आले. यांपैकींच डी लाफेट् हा फ्रेंच सरदार एक होता. यानें आपल्या खर्चानें एक लढाऊ जहाज अमेरिकेच्या मदतीला आणलें, आणि स्वतः स्वयंसेवक म्हणून वॉशिंग्टन्‌च्या असामींत राहिला. याच डी लाफेट्‌च्या मध्यस्तीनें सन १७७८ सालीं अमेरिका व फ्रान्स् यांचा तह होऊन, फ्रान्स्‌नें अमेरिकेच्या कुमकेकरितां थोडेसें

आरमार व सैन्यही पाठविलें. आतां मात्र अमेरिकन् लोकांना या युद्धांत पुरोपूर यश मिळण्याची आशा वाटूं लागली. सन १७७८ त सेनापति हॉव्च्या जागीं सर् हेन्रि क्लिन्टन् याची नेमणूक झाली, आणि त्यानें फिलाडेल्फिआ शहर खालीं करण्यास सुरवात केली. हें पहातांच वॉशिंग्टन्नें त्याचा पाठलाग करण्यास सुरवात केली. जूनच्या मध्याला इंग्लिश् सैन्य पेन्सिलव्हॅनिआ वसाहत सोडून, डिलावेर् नदी परत ओलांडून जर्सीच्या वसाहतींत आलें, व तसेंच सरळ न्यू यॉर्क्ला परत गेलें. परंतु न्यू यॉर्क्ला पोंचण्यापूर्वीं त्याच्यावर मन्माउथ् कोर्ट हाउस् येथें वॉशिंग्टन्नें हल्ला केला. या हल्ल्यांत अमेरिकन सेनापति ली याच्या हरामखोरीपणानें प्रथमतः अमेरिकनांची पळापळी सुरू झाली. पण ऐन प्रसंगीं वॉशिंग्टन् तेथें येऊन ठेपला, व त्यानें त्या पळपुट्या लोकांना परत फिरवून इंग्लिशांवर असा आवेशानें घाला घातला, कीं, विजयश्रीनें त्याला माळ घातली. समरभूमि अमेरिकनांच्या हातांत आली, आणि रात्र झाल्यामुळें युद्ध बंद झालें. वॉशिंग्टन्च्या मनांतून दुसऱ्या दिवशीं पुन्हां हल्ला चढवून शत्रूला अगदीं चीत करावयाचें होतें, पण दिवस उजाडतां तो पाहतो तों शत्रु कोठेंच दिसेना ! रात्रींच्या रात्रींच इंग्लिशांनीं मोठ्या तातडीनें न्यू यॉर्ककडे कूच केलें ! या युद्धांत दोन्ही बाजूंचे सुमारें अडीचशें अडीचशें सैनिक धारातीर्थीं सुस्नात झाले.

सन १७७९ सालीं इंग्लंडनें निव्वळ भुरटी लढाई चालविली. दक्षिण वसाहतींच्या किनाऱ्यावर कोठें तरी लष्करानें उतरावें, जाळपोळ लुटालूट करावी, आणि चालतें व्हावें, असें इंग्लिशांनीं चालविलें. त्यांच्या

हेरांनीं इंडियन् लोकांनाही चिथाविलें व त्यांच्याकडून वसाहतींच्या पश्चिम भागांत अघोर अत्याचार घडविले. पुढील वर्षीं सर हेन्रि क्लिन्टन् यानें दक्षिण कॅरोलिनाची राजधानी चार्लस्टन् हिच्यावर हल्ला चढविला. ह्या ठिकाणीं सेनापति आर्नोल्ड् याची नेमणूक वॉशिंग्टन्नें केली होती. पण आर्नोल्ड् हा निमकहराम निघाला. त्यानें क्लिन्टन्बरोबर मेजर् ॲण्ड्रीच्या मध्यस्थीनें गुप्त पत्रव्यवहार सुरू केला व हें ठिकाण शत्रूच्या आयतें हस्तगत करण्याचें ठरविलें. मेजर् ॲण्ड्री हा क्लिन्टन्च्या दिमतींतील अंमलदार होता. हा आर्नोल्ड्चीं गुप्तपत्रें बुटांत लपवून नेत असतां, कर्मधर्मसंयोगानें अचानक पकडला गेला. गुप्त कट प्रसिद्ध झाला. आर्नोल्ड् इंग्लिशांकडे पळून गेला, व त्यांच्या सैन्यांत कांहीं दिवस सेनापति म्हणून मिरविला, परंतु त्याची दोन्ही देशांत अगदीं छीथू झाली. वॉशिंग्टन्नें मेजर् ॲण्ड्रीला देहान्त प्रायश्चित्त दिलें.

ही सन १७७९-८० मधली इंग्लिशांची धडपड म्हणजे लढाईचें आयुष्य संपण्यापूर्वीची पायझाडणीच ठरली. सन १७८१ चे जुलई महिन्यांत लॉर्ड् कॉर्न्वॉलिस् हा व्हर्जिनिआ वसाहतींत यार्क्टाऊन् येथें होता. वॉशिंग्टन् हा जर्सी—पेन्सिल्व्हॅनिआमधून आपलें सैन्य घेऊन तातडीनें व्हर्जिनिआंत आला आणि वुलियम्स्बर्ग् येथें डी लाफेट याला मिळाला, आणि या दोघांनीं यार्क्टाउन्ला गुरफटण्याची योजना केली. सप्टेंबर महांत लॉड् कॉर्न्सवालिस्ला मुळींच दाद लागूं न देतां, वाशिं-ग्टन्नें आपली फौज व तोफखाने यॉर्क्टाउन्च्या सभोंवार असलेल्या डोंगरांवर नेऊन सर्व बाजूंनीं मोर्चे लावून नाकेबंदी केली. लॉर्ड् कॉर्नवालिसला हें काम पुरें झाल्यावर त्याची बातमी

लागली. तो अगदीं आश्चर्यमूढ होऊन गेला. अखेर शहर सोडून आरमाराचा आश्रय करण्याचें त्यानें ठरविलें. परंतु बंदराचें तोंड फ्रेंच् आरमारानें अडविलें असल्याचें त्याच्या आढळांत आलें. तेव्हां-मात्र त्याच्या तोंडचें पाणी पळालें. आपण पूर्णपणें सांपळ्यांत सांपडलों हें त्यानें जाणलें. इतक्यांत आक्टोबर सहाला डोंगरावरून तोफांचा गडगडाट सुरू झाला. पहिली तोफ स्वतः वॉशिंग्टन्नें आपल्या हातानें डागून सुमुहूर्त सावधान केलें ! झालें, सात ऑक्टोबरला लॉर्ड् कॉर्न्-वॉलिस् वॉशिंग्टन्ला सात हजार फौजेनिशीं शरण आला, आणि व्यव-हारदृष्ट्या ‘ स्वातंत्र्ययुद्धाचा ’ शेवट झाला. अमेरिकेंतील इंग्लिश् वसाहतींच्या संघाचा इंग्लंड्पासून व इंग्लिश् साम्राज्यापासून कायमचा संबंध तुटला. उभय पक्षांमध्यें तडजोडीचें बोलणें जवळ जवळ वर्ष दीडवर्ष चाललें, आणि फ्रान्स्मध्यें दोन्ही बाजूचे जबाबदार वकील एकत्र जमून सन १७८३ सालीं तहनामा झाला आणि अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांचें स्वातंत्र्य इंग्लंडनें कबूल केलें.

## प्रजासत्ताक राज्याची स्थापना.

यानंतर संयुक्त संस्थानांनीं लोकशाही स्थापन करून, ठरावीक मुदतीपुरतीं राज्यसूत्रें लोकांनीं निवडलेल्या अध्यक्षाच्या हातीं देण्याचें ठरविलें. सर्व वसाहतवाल्यानीं एकमतानें वॉशिंग्टन् यास संस्थानसंघाचा पहिला अध्यक्ष सन १७८९ सालीं निवडिलें. या अध्यक्षपदाची मुदत १७९३ सालीं खलास झाल्यावर लोकांनीं आणखी सालांकरितां एकमतानें त्याचीच पुन्हां निवडणूक केली. हीही मुदत १७९७ सालीं संपली, तेव्हां त्याला तहाहयात कायमचा अध्यक्ष निवडण्याचा बूट निघाला. परंतु

याबद्दल वॉशिंग्टन्‌ला आनंद न वाटतां, उलट खेदच झाला. लोकांनीं आपल्याला कायमचा अध्यक्ष निवडणें आणि आपण कायमचें अध्यक्षपण स्वीकारणें म्हणजे राष्ट्राच्या स्वातंत्र्यावरच बोळा फिरविणें आहे, असें त्याच्या मनाला वाटलें. तेव्हां असें आपण करणें म्हणजे राष्ट्राचा विश्वासघात होईल, म्हणून तिसऱ्या वेळीं तो मुळीं उमेदवार म्हणून उभाच राहिला नाहीं. यानंतर त्यानें दीड दोन वर्षांचें शेष आयुष्य माउंट् व्हर्नॉन् येथें स्वस्थपणांत व मिळकितीची व्यवस्था पहाण्यांत घालविलें.

## पहिला अध्यक्ष.

अध्यक्ष असतांना वॉशिंग्टन्‌नें राज्यकारभाराला उत्तम शिस्त लावून लोकांचा आशीर्वाद घेतला. वक्तशीरपणाविषयीं तो फारच चोखट असे. तो नेहमीं म्हणत असे, कीं, "मी लवकर झोंपीं जातों, व लवकर उठून दिवसाच्या कामाला लागतों, म्हणून माझीं सर्व कामें वक्तशीर होतात." गोंधळ्या, अव्यवस्थित, व वेळाविषयीं निष्काळजी, असा अंमलदार किंवा नोकर आढळला, कीं, त्याला खजील केल्यावांचून तो कधींही राहात नसे. सरकारी सदर ठाणें न्यू यॉर्क् येथें असतांना, अध्यक्ष वॉशिंग्टन् हा एकदा न्यू इंग्लंड् स्टेट्‌स्‌मध्यें दौऱ्यावर निघाला. बोस्टन्‌हून सॅलेम्‌ला अध्यक्षाला नेण्याकरितां एक लष्करी स्वयं-सेवकांचा संघ सिद्ध झाला होता. निघण्याची वेळ सकाळचे आठ ही ठरली होती. आठाचा टोल पडला, पण स्वयंसेवक दरवाज्याशीं हजर नव्हते. तेव्हां वॉशिंग्टन् तसाच उठला आणि तडक वाटेला लागला! सुमारें अर्धीवाट तो चालून गेला, तेव्हां कोठें स्वयंसेवकांनीं

त्याला गांठलें. तेव्हां वॉशिंग्टन्नें त्या संघाच्या अंमलदाराकडे वळून म्हटलें, " अंमलदारसाहेब, तुम्ही लष्करांत इतकीं वर्षे आहां, तेव्हां आठ केव्हां वाजतात हें तुम्हांस माहीत नसेल, असें मला वाटलें नव्हतें ! "

अध्यक्षाच्या वाड्यांत मेजवानींचे वगैरे समारंभ होत, त्या वेळीं आमंत्रित पाहुण्यांकरितां कधींही तिष्ठन्ती करण्यांत येत नसे. निश्चित केलेला वेळ झाला, कीं यजमान टेबलाजवळ येऊन बसलेच म्हणून समजावें, आणि पुढील कार्याला ताबडतोब सुरवात व्हावयाचीच ! एकदा अशा प्रसंगीं खान्याला सुरवात होऊन दहा मिनटें झाल्यावर एक बडे आमंत्रित पाहुणे आले. त्यांना पाहून वाशिंग्टन् म्हणाला, " आम्हीं अगदीं वेळेवरच आरंभ केला ! "

एका सौदागराबरोबर घोडेखरेदीचा सौदा व्हावयाचा होता. त्याच्या भेटीची वेळ ठरली. परंतु सौदागराला येण्याला दहा मिनिटें उशीर झाला. सौदागर आला तेव्हां अध्यक्षाचें दुसऱ्या व्यापाऱ्यांबरोबर बोलणें चाललें होतें. यानंतर त्या सौदागराला एक आठवड्यापर्यन्त अध्यक्षाची भेट मिळाली नाहीं, आणि अखेर त्याला असें समजलें, कीं, आपल्या दहा मिनिटांच्या उशिरानें आपला किफायतशीर सौदा फसला.

वॉशिंग्टन्चा अविश्रान्त उद्योग आणि निःपक्षपाती कारभार यांचा लोकांना मोठा दरारा वाटे. तो अंमलदारांच्या नेमणुका करतांना, स्नेह, लोभ, नातें, वगैरे कांहींएक लक्ष्यांत न घेतां केवळ गुणांकडेच लक्ष्य देई. एकदा एक मोठ्या अधिकाराची जागा भरावयाची होती व तिला दोन

उमेदवार होते. पैकीं एक वॉशिंग्टन्च्या बैठकींतला व लोभांतला स्नेही होता, आणि दुसरा त्याचा प्रतिस्पर्धी म्हणून सर्वश्रुत होता. पण वॉशिंग्टन्नें आपल्या प्रतिस्पर्ध्याचीच निवड केली. असें कां केलें म्हणून कोणीं प्रश्न केल्यावरून, वॉशिंग्टन्नें उत्तर दिलें, "अहो, माझा मित्र उत्तम आहे. त्याच्यावर माझा लोभ आहे. त्यानें माझ्या घरीं वाटेल तेव्हां यावें आणि संकोच न धरतां खुशाल रहावें, त्यांत मला आनंदच होईल. पण तो व्यवहारी मनुष्य नाहीं. उलट पक्षीं दुसरा उमेदवार जरी माझा विरोधक असला, तरी खराखरा व्यवहारी आहे, आणि या जागेला असाच मनुष्य पाहिजे होता. माझ्या खासगी संबंधांची लुडबूड सार्वजनिक कामांत मुळींच उपयोगाची नाहीं. माझा स्नेही हा वॉशिंग्टन्चा आवडता असेल, पण तो अमेरिकेच्या अध्यक्षाचा नाहीं !"

वॉशिंग्टन् मोठा दयाळू व दानशूर होता. तो आपल्या दानधर्माचा कधीं गाजावाजा करीत नसे. राष्ट्रीय परिषदेनें त्याला वेळोवेळीं दिलेल्या देणग्या व अध्यक्षाच्या जागेचा पगार तो बहुतेक सर्व वॉशिंग्टन् कॉलेज्सारख्या सार्वजनिक कार्याकडे खर्चीत असे. त्याला गुलामगिरीचा तिट्कारा असे आणि दीनदुबळ्यांना तो सढळ हातानें पण गुपचूप मदत करी. व्हर्जिनिआ वसाहतींत एका मनुष्याच्या लक्ष्यांत असें आलें, कीं, आपल्या गांवचा रोटीवाला निग्रो गुलामांना पैसे न घेतांच रोटी देत असतो ! तेव्हां तो त्या रोटीवाल्याला म्हणाला, "गड्या, तूं गिऱ्हाइक तर पुष्कळ मिळविलें आहेस ! पण काय रे, ह्या एवढ्या उधारीची तूं उग्राणी तरी कशी करणार ? मला तर वाटतें, कीं, तुझी आंतसवाईच होणार !"

" त्याची नको तुला काळजी ! माझी एक दमडीही थकायाची नाहीं ! "

" हें नुसते मनचे मांडे आहेत. या भांबरभुंड्या निग्रोंचें तूं उद्यां काय घेणार ? खातेवह्या कोळून पिण्याची तुला पाळी येईल ! "

" वेड्या, माझा पैन् पै वसूल दर तिमाहीला बिनतक्रार होत असतो. हा सर्व पैका मला वॉशिंग्टन् साहेबांकडून मिळतो ! "

स्वातंत्र्य युद्ध चालू असतां, एकदा इंग्लंड्च्या आरमाराचा कांहीं भाग व्हर्जिनिआंत घुसला व त्यानें माऊंट् व्हर्नॉन्ला शह देण्यासाठीं नदीवाटे त्याच्याकडे रोंख लाविला. वॉशिंग्टन्चा जो वहिवाटदार होता, त्यानें आपल्या धन्याची मिळकत जाळपोळीनें व लुटालुटीनें मातीस मिळूं नये, म्हणून मोठ्या धोरणानें इंग्लिशांच्या गलबतावर मुबलक अन्नसामग्री स्वतः नेऊन पोंचविली व त्यांची कशीतरी समजूत करून वॉशिंग्टन्च्या मिळकतीस उपद्रव होऊं दिला नाहीं. ही हकीकत जेव्हां वॉशिंग्टन्ला कळली, तेव्हां त्यानें आपल्या कारभाऱ्यास लिहिलें, कीं, " तूं माझी मिळकत बचावलीस याबद्दल मला आनंदच वाटतो, परंतु शत्रूला तूं आपण होऊन नाक मुठींत धरून अन्नसामग्री पुरविण्यापेक्षां त्यांनीं माझी मिळकत जाळूनपोळून रसातळास पोंचविली असती तर मला जास्तच आनंद झाला असता ! "

यावरून वॉशिंग्टन्चा देशाभिमान, स्वातंत्र्यप्रेम, कर्तव्यबुद्धि, व स्वार्थत्याग, हे गुण किती जाज्वल व निर्मल होते, हें स्पष्ट दिसतें.

या महात्म्याचें देहावसान माऊंट् व्हर्नान् येथें ता. १४ डिसेंबर १७९९ रोजीं झालें, आणि सर्व अमेरिकनांस आपल्या स्वतांच्याच कुटुंबांतलें जिव्हाळ्याचें माणूस गेलें असें तीव्र दुःख झालें.

## प्रकरण पांचवें.

# नेपोलिअन् बोनापार्ट.

### कुलवृत्त.

इटलीच्या पश्चिमेस व फ्रान्स्च्या दक्षिणेस असणाऱ्या कॉर्सिका नांवाच्या बेटांत अजॅशिओ शहरीं नेपोलिअन् बोनापार्टाचा जन्म इ. स. १७६९ सालीं झाला.

नेपोलिअन्च्या जन्मापूर्वीं सुमारें सहा महिने हें बेट फ्रेन्च् सरकारनें इटलीपासून खरेदी घेतलें होतें, व तेथील रहिवाशांना फ्रेन्च् राष्ट्राविषयीं आपलेपणा वाटूं लागावा म्हणून फ्रान्स्ची खटपट चालू होती. कॉर्सिकन् लोकांमध्यें यासंबंधानें बरीच खळबळ उडून एक कट्टा राष्ट्रीय पक्ष उदयाला आला होता, व फ्रान्स्शीं फटकून राहण्याचें त्याचें धोरण होतें. पण 'दाम करी काम' हें तत्त्व लक्ष्यांत ठेऊन फ्रेन्च् सरकारनें पदव्या, वर्षासनें, अमलदाऱ्या, वगैरेंची खैरात करून कॉर्सिकन् लोकांची राष्ट्रीय फळी फोडली व बरींच प्रतिष्ठित व शिष्ट घराणीं आपल्या पक्षाला ओढलीं. अशा घराण्यापैकींच एक बोनापार्टाचें घराणें होतें. नेपोलिअन्चा बाप फ्रेन्च् सरकारापासून सरदारकीची पदवी व लहानसें वर्षासन मिळवून त्याचा मिंधा बनला होता.

### आईबाप.

नेपोलिअन्चा बाप बराच उडाव व चैनी होता. तो नेहमीं पैशाच्या अडचणींत असे. तो जेव्हां इ. स. १७८५ सालीं वारला,

तेव्हां त्याचा मोठा मुलगा जोसेफ् सुमारें सतरा वर्षांचा व दुसरा मुलगा नेपोलियन् सोळा वर्षांचा होता. यांची कमाई फारच तुटपुंजीची होती, घरांत दुसरीं पांचसहा लहान मुलें होतीं, व कुटुंबाची सांपत्तिक स्थिति फारच हलाकीची व केंविलवाणी झाली. परंतु नेपोलियन्‌ची आई फार धीराची, उद्योगी, खटपटी, व काटकसरी होती. मुलें चांगलीं कर्तींसवर्तीं होईपर्यन्त तिनें सगळा पोरांडा कसाबसा अब्रूनें सांभाळला. पुढें नेपोलियन् मोठ्या राजवैभवास चढला, तरी ही राजमाता पूर्वींप्रमाणेंच गृहकार्यांत दक्ष राही व काटकसरीची कातर कसोशीनें चालवी. तिच्या आयुष्यांत चार स्थित्यन्तरें घडून आलीं. पहिली नवऱ्याच्या अमदानींतील मध्यम स्थिति, नन्तर पोरकी हलाकीची अवस्था, नन्तर राजवैभवाची प्राप्ति, आणि नेपोलियन्‌च्या अधःपातानन्तरची अखेरची मरणाहून दुःसह अशी वृद्धापकाळांतील कष्टावस्था; पण या सर्व स्थित्यन्तरांत या बाईचा उद्योगी, निग्रही, व काटकसरी, स्वभाव अगदीं कायम टिकून होता. हे तीन गुण तिचा दुसरा मुलगा नेपोलियन् याचे अंगीं अगदीं तन्तोतन्त उतरले होते.

### शिक्षण व नौकरी.

आपला वडील मुलगा जोसेफ् याला धर्मोपदेशकाचें शिक्षण व दुसरा मुलगा नेपोलियन् याला लष्करी शिक्षण देण्याचा नेपोलिअन्‌च्या बापाचा हेतु होता. म्हणून, ते अनुक्रमें १० व ९ वर्षांचे असताना, त्यानें त्यांना फ्रान्सला पाठविलें. जोसेफ् अतून येथील विद्यालयांत व नेपोलिअन् ब्रीन् येथील लष्करी शाळेंत इ. स. १७७९ सालीं दाखल झाला. नेपोलिअन्‌ची गणितांत गति चांगली चाले व इतिहासाचाही तो

मोठा भोक्ता होता. त्याची विलक्षण बुद्धिमत्ता पाहून त्याच्या शिक्षकांची त्याच्यावर मोठी मेधा बसली. ब्रीन् शाळेचा अभ्यासक्रम पुरा झाल्यावर, नेपोलिअन्नें दहा महिनेपर्यन्त पॅरिस् येथील लष्करी शाळेंत मखलाशीचें शिक्षण घेतलें आणि इ. स. १७८५ सालीं तो लष्करी परीक्षा उत्तीर्ण झाला. यानन्तर तो लागलाच फ्रान्स्च्या राजसैन्यांत दाखल झाला. इतक्यांत नेपोलिअन्चा बाप वारल्यामुळें, तो आईस व भावंडांस भेटण्याकरितां घरीं परत आला.

नेपोलियन् फ्रान्स्च्या सरकारी लष्करांत दाखल झाला खरा, पण त्याचें मन त्या नोकरीकडे चांगलेंसें लागेना. पगार फार थोडा असल्या-मुळें तो नेहमीं पैशाच्या विवंचनेंत असे. घरप्रपंच चालणें फार धका-कीचें झालें होतें. तशांत तो वारंवार कांहींतरी निमित्तानें कॉर्सिकाला येऊन राही. तेव्हां या हलगर्जीपणानें व अव्यवस्थित वर्तनानें त्याची अखेर नोकरीही सुटली.

### फ्रान्स्मधील क्रान्ति.

या सुमारास फ्रान्स्मध्यें मोठी खळबळ सुरू झाली होती. फ्रान्स्-मध्यें बड्याबड्या लोकांना बरेच विशेष हक्क होते. त्यांना बहुतेक कर माफ होते. कायद्याची पकडही त्यांच्या बाबतींत सैलच होती. कराचा सारा भार सामान्य जनतेवर पडे. शेतकरी मरमर शेतांत खपत, पण ऐन पिकाच्या वेळीं त्यांच्या तोंडचा घांस बडे वतनदार लोक हिरावून घेत. न्यायाचें स्वरूपही अत्यन्त पक्षपाताचें असे. बडे लोकांचीं दुष्कृत्यें खपून जात, पण निरपराधी सामान्य लोकांना चौकशीवांचूनसुद्धां तुरुं-गांत वर्षानुवर्ष खितपत पडावें लागे. या सर्व गोष्टींचा साहजिक परि-

णाम असा झाला, कीं, दारूनें ठास भरलेल्या सुरुंगाप्रमाणें त्या असंतुष्ट राष्ट्राची अवस्था झाली होती. ठिणगी पडण्याचाच अवकाश, तों भयंकर स्फोट होऊन एकदम सर्वस्वाचा बळीं पडावा ! राजसत्तेला नियन्त्रण घालून लोकशाही सुरू केल्याचें इंग्लंड्चें जागतें उदाहरण फ्रेन्च् लोकांच्या अगदीं डोळ्यांसमोर होतें. नुकतेंच स्वातंत्र्यप्रेमानें प्रेरित होऊन, अमेरिकेंतील इंग्लंड्च्या वसाहतींनीं ब्रिटिश् राजसत्तेचें जूं झुगारून, निर्भेळ लोकशाहीची स्थापना केली, ही गोष्टही फ्रेंच् राष्ट्राच्या लक्ष्यांत ताजीच होती. यामुळें जुलुमानें चिरडलेल्या असहाय जनतेस राजाविरुद्ध दंगेधोपे करण्याला बरेंच उत्तेजन आलें. अशा स्थितींत सरकारी तिजोरींत ठणठणाट पडल्यामुळें राजा सोळावा लुई यानें सल्लामसलतीकरितां इ. स. १७८९ मध्यें लोकसभेला आमंत्रण दिलें. परंतु या सभेनें " राष्ट्रीय सभा " हें नांव धारण करून राज्यकारभारच आपल्या हातीं घेण्याचा आविर्भाव केला. पण इतक्यांत पॅरिस शहरांतील सामान्य जनतेनें उसळी घेऊन विलक्षण दंगल केली, पॅरिसच्या बॅस्टिल् किल्ल्याला सुरुंग लावले; आणि सर्वत्र राज्यक्रान्तीचा पुकारा झाला. राजा व राणी यांना कैद करण्यांत आलें आणि आजपर्यंत बडे लोकांनीं सामान्य जनतेचा जो अनेक वर्षे छळ चालविला होता, त्याचें उट्टें आतां लोकांनीं सरदारी रक्ताचे पाट वाहवून पुरतें काढलें. फ्रान्समध्यें लोकशाही म्हणण्यापेक्षां सैतानशाही सर्वत्र बोकाळली. राजा लुईची सासुरवाड ऑस्ट्रिआचें राजघराणें होतें, आणि त्याच्या राणीनें माहेरीं पत्रें धाडून ऑस्ट्रिआ, प्रुशिआ, वगैरे भोंवतालच्या राष्ट्रांनीं आपल्या मदतीकरितां फ्रान्सवर चालून यावें असा

बनाव बनविला. याची बातमी फ्रेन्च् लोकांस लागली, तेव्हां त्यांचा अगदीं विलक्षण संताप झाला. इतक्यात परकीय राष्ट्रांचीं सैन्येंही फ्रान्स्च्या सरहद्दीवर डोकावूं लागलीं. त्यामुळें फारच चिडून जाऊन, लोकांनीं राजाराणीला देशद्रोही ठरवून, इ. स. १७९३ सालीं सुळावर चढविलें. आतां मात्र बेबंद लोकशाहीचा नुसता कहर झाला. 'हा राजपक्षाचा आहे,' अशा वासाचा नुसता भास कोणाच्या अंगास आल्याचा संशय आला कीं, याला देहान्त प्रायश्चित्त मिळालेंच ! पॅरिसमध्यें या वेळीं मुंगी चिरडण्यापेक्षांही माणूस मारणें जास्त सोपें झालें होतें. बोर्बाँ राजघराण्याचा मुकुट मातीस मिळाला इतकेंच नाहीं, तर धर्मबुद्धिही सर्वस्वीं रसातळास दडपून, समता व स्वातन्त्र्य यांच्या नांवाखालीं वाटेल तीं अनन्वित कृत्यें बेताल झालेली जनता करूं लागली. असो, या बेबंदशाही अंदाधुंदीला आळा घालण्याच्या इराद्यानें परकी राष्ट्रांचीं सन्यें या वेळीं राजपक्षाच्या मदतीकरितां फ्रान्स्मध्यें ठिकठिकाणीं घुसण्याचा प्रयत्न करूं लागलीं.

### कॉर्सिका बेटाचा त्याग.

ह्या अंधाधुंदीच्या काळांत ( १७८९–१७९२ ) नेपोलिअन् बहुतेक कॉर्सिकांतच होता. कॉर्सिकन् लोकांतही राष्ट्रीय चळवळ धुमसत होती व आतां ती जरा अधिक रंगाला चढली. प्रथमतः नेपोलिअन्चें या चळवळींत थोडेंबहुत अंग होतें. परंतु लवकरच त्याचें मन उलटलें व त्याला असें वाटूं लागलें कीं, कॉर्सिकाचें स्वतंत्र होऊन भागावयाचें नाहीं. अशा चिमुकल्या बेटानें कोणत्यातरी मोठ्या राष्ट्राच्याच आश्रयानें राहिलें पाहिजे; असें त्यानें केलें तरच त्याचा टिकाव

लागेल. म्हणून त्यानें असें ठरविलें कीं, कॉर्सिकानें फ्रान्सलाच चिकटून रहावें. त्यानें आपल्या मताचा उघड पुकारा केला, व तो फ्रेन्च् नागरिक म्हणून दिमाख्यानें मिरवूं लागला. यामुळें तो कॉर्सिकन् लोकांत अत्यन्त अप्रिय झाला. अखेर त्याला व त्याच्या कुटुंबाला कार्सिकांत राहणें फारच धोक्याचें वाटूं लागलें आणि स्वतःच्या बचावाकरितां तें सर्व कुटुम्ब कार्सिकाला रामराम ठोकून इ. स. १७९३ सालीं फ्रान्समध्यें कायमचें राहण्यास आलें.

## फ्रान्स्मध्यें पहिली कामगिरी.

नेपोलियन् फ्रान्स्मध्यें आल्याबरोबर जहाल क्रान्तिकारक पक्षांत सामील झाला व त्यानें राष्ट्रीय लष्करांत असामी पत्करली. राजपक्षाच्या वतीनें फ्रान्सांत शिरण्याचे इतर युरोपीअन् राष्ट्रांचे प्रयत्न चालू होते, हें मागें सांगितलेंच आहे. अशाच एका खटपटींत इंग्लंडच्या आरमारानें फ्रान्स्च्या दक्षिण टापूंतील टुलोन् नांवाचें बन्दर, तेथील राजपक्षाशीं संधान बांधून, आपल्या ताब्यांत घेतलें. हें बन्दर परत हिसकावून घेण्याच्या कामगिरीवर नेपोलियन्ची कार्टो नांवाच्या सेनापतीच्या हाताखालीं दुय्यम म्हणून नेमणूक झाली. नेपोलियन्नें प्रथमतः आसपासच्या सर्व किनाऱ्याची नीट पहाणी केली, आणि त्याच्या मनानें असें निश्चित झालें, कीं, टुलोन्पासून कांहीं अन्तरावर समुद्रांत घुसलेली जी टेकडी आहे, त्या टेकडीवर तोफखाना चढविला तरच टुलोन् शहर व बन्दर या दोहोंवरही मारा करतां येऊन, इंग्लिश् आरमाराचा धुव्वा उडवितां येईल. इंग्लिश् आरमाराची चांदी आटविल्यावांचून टुलोन् हातीं येणार नाहीं, आणि वर लिहिल्याप्रमाणें मोर्चेबंदी करून मार-

गिरी केल्यावांचून इंग्लिश् आरमार निकामी होणार नाहीं. परंतु कार्टोला नेपोलियन्चें हें धोरण फार साहसाचें किंबहुना चुकीचेंही वाटलें. अखेर नेपोलियन्नें स्वतःच्या जबाबदारीवर ही कामगिरी हातीं घेतली व मोठ्या बहाद्दरीनें पार पाडली ( १७९३ ). या पराक्रमानें नेपोलिअन्चें नांव एकदम प्रख्यातीस आलें.

## रॉब्स्पीएर्.

या वेळीं फ्रान्स्मध्यें एक तात्पुरतें शिष्टमंडळ राजकारभार चालविण्याकरितां नेमण्यांत आलें होतें, आणि या मंडळाचें चालकत्व रॉब्स्पीएर् नांवाच्या एका राक्षसी क्रूरकर्म्याच्या हातीं गेलें होतें. या रॉब्स्पीएर्च्या पुठ्ठ्यांत नेपोलियन् शिरला व त्याचा योगक्षेम आतां बरा चालूं लागला. पण रॉब्स्पीएर्नें आपल्या जुलुमी कृत्यांनीं कहर उडविण्यास सुरवात केली, तेव्हां तो सर्वच पक्षांना असह्य होऊं लागला. राजपक्ष गुप्तपणें दबा धरून त्याच्या विरुद्ध खटपटी करीत होता, नेमस्त पक्ष त्याच्या क्रौर्यानें भेदरून गेला, आणि जहाल क्रान्तिकारकांचा–जॅकोबिन्चा–पक्ष, ‘ हा नवाच सुलतान होऊं पहात आहे ’ म्हणून अगदींच चिडून बिथरला. अखेर उघडपणें शासनमंडळाच्या सभेंत रॉब्सपीएर्, त्याचा भाऊ, व त्याचे एकवीस हस्तक, यांच्यावर देशद्रोहाचा आरोप करण्यांत आला, आणि गुरूची विद्या गुरूस फळली, या न्यायानें त्या सर्वांस देहान्त प्रायश्चित्त घ्यावें लागलें. ( १७९४ ) रॉब्सपीएर्चा हस्तक म्हणून नेपोलियन्लाहीं यानंतर कांहीं दिवस कारागृहवास भोगावा लागला. परंतु त्याची लवकरच सुटका झाली. तरीपण सैन्याधिकाऱ्यांनीं

त्याची तोफखान्यावरील पूर्वीची जागा देण्याचें नाकारल्यामुळें तो फार रुसला आणि त्यानें नोकरीवर तुळशीपत्र ठेवलें. याच संधीस त्याचा मोठा भाऊ जोसेफ् याचीही नोकरी सुटली. एवंच दोघांनाही बेकार बसावें लागलें, आणि बोनापार्ट् घराण्याला पुन्हां हलाकीचे दिवस आले.

## दुसरी कामगिरी.

रॉब्स्पिएर् व त्याचे साथीदार यांची यमलोकीं पाठवणूक झाल्यावर, एक नवें तात्पुरतें शिष्टमंडळ अधिकारसंपन्न झालें. परंतु या मंडळाविरुद्ध त्या झोटिंगपादशाहींत एक मोठाच कट उत्पन्न झाला व कटवाल्यांनीं बहुतेक उघडपणेंच पॅरिस् शहरावर हल्ला करून राजतन्त्र आपल्या हातीं बळजबरीनें घेण्याची कडेकोट तयारी चालविली. या कटांत कित्येक लष्करी लोकही सामील झाले. हत्यारें, दारूगोळा, तोफा, यांचीही जमवाजमव करण्यांत आली. या प्रचण्ड कटाच्या वार्तेनें शिष्टमंडळाची पांचावर धारण बसली व तें अगदींच गांगरून गेलें. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं एकानें 'या अडचणींत नेपोलियन् आपल्या कामीं येईल' असें सुचविलें, आणि 'अडला नारायण गाढवाचे पाय धरी,' या न्यायानें शिष्टमंडळानें नाक मुठींत धरून नेपोलियनच्या साह्याची याचना केली. नेपोलियन्नें ही मोलाची संधी फुकट जाऊं दिली नाहीं. त्यानें 'या कामीं सर्वाधिकार मजकडेच असावेत,' या अटीवर ही कामगिरी तत्काळ पत्करली, आणि एका रात्रींत तोफखान्यांतल्या तोफा पॅरिस् शहरांत नाक्यानाक्यावर रोखून ठेवल्या. पंचवीस आक्टोबर किंवा क्रांतिकारकांच्या नव्या पंचांगाप्रमाणें तेरा व्हेन्डेमेयर् ( १७९५ ) रोजीं बंडखोरांचे जमाव पॅरिस् शहरांत जमू

लागले. नेपोलियन्‌नें त्यांच्यावर तोफा डागण्याचा ताबडतोब हुकूम केला. तोफांचे गोळे अंगावर येतांच लोकांचे जमाव फुटून त्यांची पळापळ सुरू झाली आणि कटवाल्यांचा बाजा उडाला. दुसऱ्या दिवशींही असाच प्रकार घडला आणि अधिकारी शिष्टमंडळाची अब्रू बचाऊन त्यांचा जीव हायसा झाला. एव्हांपासून पॅरिस्‌मध्यें लष्करशाहीची प्राणप्रतिष्ठा झाली आणि तिच्यांतील चैतन्यतत्त्व नेपोलियन् ही व्यक्ति झाली. यानन्तर मिंध्या झालेल्या अधिकारी मंडळानें १७९६ सालीं नेपोलियन्‌ची इटलीच्या स्वारीवर सेनापति म्हणून नेमणूक केली. या स्वारीवर जाण्याच्या आदल्याच दिवशी नेपोलियन्‌नें जे सेफाइन् नांवाच्या एका विधवेबरोबर लग्न केलें. ही वधू नवरदेवापेक्षां थोड्याशा वर्षांनीं मोठी होती.

## युद्धाचें धोरण.

इटलीवरील स्वारीनें नेपोलियन्‌च्या लष्करी कामगिरीस आरंभ झाला, आणि अल्प अवकाशांतच त्यानें यूरपमधील ‘मी मी’ म्हणणाऱ्या सर्व बलाढ्य राष्ट्रांना समरांगणावर धुळीचे वडे चारून, दिग्विजयी अद्वितीय योद्धा म्हणून कीर्ति मिळविली. नेपोलियन्‌च्या संग्रामविजयाचें मर्म विशेषतः पुढील गोष्टींत होतें. ( १ ) ज्या प्रदेशांत झुंज व्हावयाचें असेल, त्याचे नकाशे मिळवून तो तपशीलवार माहिती करून घेई. शक्य असल्यास थोडेंबहुत साहस करूनही तो स्वतःच त्या प्रान्ताची पाहणी करी. यानंतर शत्रूला कोंडींत पकडण्याला योग्य, पण आपल्याला सोइस्कर, अशी जागा कोणती हें तो ठरवून टाकी. ( २ ) इतकें नक्की झालें, कीं, त्या धोरणानें लष्कराच्या हालचाली करून तो

डाव खेळण्यास लागे. कांहीं फुसलावीनें, कांहीं हुलकावण्यांनीं, व कांहीं भुरट्या हल्ल्यांच्या चेपानें, शत्रूला नेमक्या आपल्या सोईच्या स्थळीं जाणें भाग पाडावयाचें, आणि अशा प्रकारें तो चापांत सांपडला, कीं, त्याच्यावर निकरानें सर्व सैन्यासह धाड घालून त्यास चीत करावयाचें. (३) शत्रूचीं निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळीं सैन्यें अगर सैन्याच्या तुकड्या असून त्यांचा एकत्र होण्याचा संभव असेल, तर तडकाफडकी चाल करून त्यांना एकत्र होण्यापूर्वींच निरनिराळ्या ठिकाणींच नामोहरम करून टाकावयाचें. ( ४ ) शत्रूची एकदा फळी फुटली किंवा त्यानें किंचित् माघार घेतली, कीं, लागलेंच चढावाचें धोरण स्वीकारून त्याच्याशीं लगट करावयाची व त्याची त्रेधा तिरपीट उठवून त्यास मेटाकुटीस आणावयाचें. ( ५ ) आपल्या बेताची शत्रूला दाद लागूं द्यावयाची नाहीं, परंतु त्याच्या मात्र पाळतीवर राहून त्याच्या हालचालीची व धोरणाची बित्तम माहिती मिळवावयाची. ( ६ ) जिकडून फ्रेंचांचें सैन्य येईल असें शत्रूस वाटत नसेल, त्याच दिशेनें हरप्रयत्न करून शत्रूला धक्का द्यावयाचा, हेंही नेपोलियनूचें नेहमींचें धोरण असे. ( ७ ) नेपोलियनूची भरारी मोठी विलक्षण असे. नेपोलियन् अद्याप आठवड्याच्या पल्ल्यावर आहे, अशा गोड समजुतींत शत्रु बेसावध आहे, तोंच नेपोलियनूचा हल्ला आला, अशी बातमी त्याच्या कानावर येऊन थडके आणि त्यामुळें शत्रु अगदीं भेदरून जाऊन त्याचा दम खचे, आणि शत्रूचा दम खचला, कीं, नेपोलियनूला स्फुरण चढलेंच म्हणून समजावें. अशा प्रकारें समराङ्गणावरचे खेळ नेपोलियन् कांटेतोल हिशोबानें खेळूं लागल्यामुळें, मोठमोठ्या बलाढ्य राष्ट्रांचे नाणावलेले अनु-

भवी सरदारही गांगरून गेले व जवळजवळ दीड तपापर्यन्त त्याच्यापुढें कोणाचाही टिकाव लागला नाहीं.

### सैन्याशीं वर्तन.

नेपोलियन्‌चें आपल्या सैनिकांशीं वर्तन मोठें विश्वासाचें व प्रेमाचें असे. त्याची शिस्त कडक असून कदरही जरब होती, परंतु तो सैनिकांशीं मिळून मिसळूनही वागे. आपल्या सैनिकांच्या जीवावर आपल्या सर्व उड्यांची मदार आहे, हें तो जाणून होता, म्हणून त्यांचा योगक्षेम नीट वाहणें हें तो आपलें आद्य कर्तव्य समजे. गुण दृष्टीस पडले, कीं, तो त्या गुणी मनुष्याची वाहवा करून योग बक्षीस देण्यास कधींही चुकत नसे. यामुळें त्याचे सैनिक त्याच्यावर नेहमीं खूष असत, व त्याच्याकरितां वाटेल तें साहस व वाटेल तो स्वार्थत्याग करण्यास नेहमीं एका पायावर तयार असत, किंबहुना अशी कांहीं तरी ठळक सेवा करण्याला ते निरन्तर हपापलेले असत.

### स्वभाववर्णन.

नेपोलियन् जबर उद्योगी, अचाट पराक्रमी, विलक्षण साहसी व अलौकिक बुद्धिवान् होता, याबद्दल मतभेद नाहीं. त्यानें आपल्या कर्तबगारीनें यूरपला खडबडून जागें केलें व जगाला आश्चर्यमूढ केलें, याबद्दलही वांधा नाहीं. त्याच्या अंगीं अशी कांहीं विलक्षण जादू होती, कीं, त्याच्या सद्दीच्या काळांत ज्याचा ज्याचा म्हणून त्याच्याशीं संबंध येई, त्याच्यावर त्याची तत्काळ छाप बसे. परंतु त्याच्याठायीं एक मोठी गोम होती, ती ही, कीं, त्याच्यापुढें कोणतेंही निश्चित उदात्त ध्येय नव्हतें. त्याच्या अंगीं धर्मभावना मुळींच नव्हती, किंबहुना

प्रसंग पडल्यास तो धर्माची कुचेष्टाच करी. त्याची नीतिही निर्मळ नव्हती. लोककल्याणाविषयीं किंवा प्रजेच्या हक्काविषयीं निःस्वार्थवृत्तिही त्यानें कधीं दाखविली नाहीं. 'मी कर्ता, मी श्रीमान्, मी सत्ताधारी,' अशी त्यास मोठी घमेंड होती. फ्रेंचांपुढें सर्व युरपनें गोगलगाय व्हावें, आणि फ्रेन्चांनीं आपल्या पुढें गोगलगाय व्हावें, ही त्याची खरी महत्वाकांक्षा आणि ही पुरी करण्याकरितां त्यानें आपली सारी अक्कल, कर्तबगारी, तडफ, व हिंमत खर्चून जिवापाड खटपट केली! असो.

## इटलीची मोहीम.

नेपोलियन्च्या हातीं इटलीवरील स्वारीचीं सूत्रें इ. स. १७९६ च्या मार्च महिन्यांत आलीं, आणि यत्किंचित्ही विलंब न लावतां, तो गरुडासारख्या भरारीनें त्या देशांत घुसला. आज पुष्कळ वर्षें इटली देश ऑस्ट्रिआच्या लोखंडी पंजाखालीं दडपलेला होता, आणि या स्वारीचा हेतु ऑस्ट्रिआला इटलींतून हुसकावून त्या देशाला फ्रान्स्प्रमाणें लोकशाहीचा लाभ करून देण्याचा होता. ऑस्ट्रिआचे इटलींतील सरदार समरचातुर्याविषयीं नांवाजलेले व लष्करी कामगिरींत मुरलेले होते. तेव्हां नेपोलियन्सारखा सत्तावीस—अठ्ठावीस वर्षांचा उपटसुंभ्या तरणा बांड आपल्या भांबरभुंड्या सैन्यानें आमचें काय वांकडें करणार, याच भ्रमांत ते होते. परंतु नेपोलियन्नें आपल्या विलक्षण भरारीनें आणि हिशोबी समरक्रीडेनें एक दोन महिन्यांतच त्यांच्या भ्रमाचा निरास केला. त्यानें मॉन्टेनॉट्, मेलेसिम्, व डिगो, या तीन ठिकाणीं लागोपाठ तीनदा आस्ट्रिआचा धुव्वा उडविला, आणि त्यांना मदत करण्यासाठीं

चाल करीत येणाऱ्या सार्डिनियन् सैन्याचीही केवा व मान्डोवी येथें अशी कंबर मोडली, कीं, सार्डिनियनांना नेपोलियनाशीं एप्रिल महिन्यांतच तह केल्यावांचून गत्यन्तर उरलें नाहीं. सार्डिनियनांचा ससेमिरा मागचा सुटल्याबरोबर ऑस्ट्रिआचा पक्का समाचार घेण्यास नेपोलियन् आतां अगदीं मुक्तहस्त झाला. त्यानें ऑस्ट्रिआचा लोडी येथें अगदीं फन्ना उडविला व १९ मेला मिलान् शहराचा कबजा केला. यानन्तर मॅन्टुआ शहराच्या कबजाबद्दल आटापट सुरू झाला; आणि नेपोलियननें ऑस्ट्रियाचा पुन्हां कॅस्टिग्लिऑन्, आर्कोला, व रिव्होली या तीन ठिकाणीं नक्षा उतरून, फेब्रुआरीच्या ( १७९७ ) आरंभाला तें शहर आपल्या हस्तगत करून घेतलें, आणि ऑस्ट्रिआनें अखेर पक्की हार खाऊन कॅम्पो फॉर्मिओचा तह आक्टोबरमध्यें ( १७९७ ) मान्य केला. मिलान् शहरांत नेपोलियन् कांहीं दिवस मोठ्या राजवैभवाच्या थाटानें राहिला. इटलीमधील सुप्रसिद्ध पुतळे, चित्रें, ग्रन्थ व दुसऱ्या अनेक नामांकित पुराण वस्तु, त्यानें फ्रान्स्ला पाठवून दिल्या. नेपोलियन हा मोठा चतुर, रसिक, कलाभिज्ञ, होता, परंतु या वस्तूंचा बहुमोल संग्रह फ्रान्स्मध्यें करण्याचें मुख्य कारण रसिकतेहून निराळें होतें; तें कारण म्हणजे गर्व व चिरकाल कीर्तीची लालसा. इटालियन् लोकांनीं त्याच्या पायां पडून दीनवाणेपणानें विनवण्या केल्या, कीं, तुम्ही वाटेल तेवढी खंडणी घ्या, पण आमचीं हीं प्राचीन वैभवाचीं स्मारकें, त्याचे हे अवशेष, उखळून नेऊं नका. परंतु नेपोलियन्नें तिकडे मुळींच लक्ष्य दिलें नाहीं. त्यानें स्पष्ट सांगितलें, कीं, उमद्या वस्तूंच्या संग्रहाला फ्रान्स्च पात्र

आहे, ती लायकी इटलींत नाहीं ! शिवाय, त्याच्या लक्ष्यांत हेंही होतें, कीं, असल्या वस्तूंच्या संग्रहाच्या दर्शनानें फ्रेंच् लोकांना आपल्या ( नेपोलियन्च्या ) नांवाचें स्मरण निरन्तर राहील. असो. नेपोलियन्नें इटलीपासून भल्या मोठ्या रकमा खंडणी म्हणून घेतल्या, व त्यांतील कांहीं भाग आपल्या सैनिकांस देणग्या म्हणून वांटून, बाकीची दौलत फ्रान्स्मध्यें अधिकारी मंडळाकडे पाठविली. अर्थात् हें त्याचें वर्तन बरेच अनधिकाराचें व जबरदस्तीचें होतें; परंतु, या स्वारींत नेपोलियन्नें पैशाची व माणसाची कुमक मिळण्याबद्दल अधिकाऱ्यांकडे निकडीचीं पत्रें पाठविलीं असतांही, त्यांनीं कांहीं तजवीज केली नव्हती, तथापि अशा स्थितींतही नेपोलियन्नेंही मुलुखगिरी यशस्वी करून दाखवली, तेव्हां तो देईल तो हिशोब व पाठवील ती खंडणी मान्य करून, केवळ मनांत मत्सरानें जळफळत बसणें अधिकाऱ्यांना प्राप्त होतें. इटलीचा उत्तरभाग लॉम्बर्डी यांत नेपोलियन्नें आतां लोकशाही स्थापन केली. रोम्च्या पोप्ची सत्ताही समूळ नष्ट करावी, म्हणून अधिकारी मंडळानें नेपोलियन्ला लिहून कळविलें. परंतु नेपोलियन्नें तें धाब्यावर बसून, उलट पोप्शीं तह केला व त्याचें सख्य जोडलें. हें नेपोलियन्चें अरेरावी कृत्यही अधिकाऱ्यांनीं निमूटपणें सहन केलें. इटलीची कामगिरी संपवून नेपोलियन् १७९७ च्या नोव्हेंबर महिन्यांत पॅरिस्ला परत आला. त्या वेळीं ठिकठिकाणीं आणि विशेषतः पॅरिस्मध्यें एकाद्या दिग्विजयी राजाप्रमाणेंच त्याचें लोकांनीं व अधिकाऱ्यांनीं मोठ्या थाटमाटानें स्वागत केलें.

### लोकप्रियता.

इटलींत मिलान् वगैरे शहरीं नेपोलियन्नें बादशाही थाटाचा उप-

भोग घेतला, पण, तो फ्रेन्च् लोकांस पुरतेपणें ओळखीत असल्यामुळें फ्रान्स्मध्यें आल्याबरोबर आपण एक सामान्य फ्रेन्च् नागरिक आहों, अशा साध्या रीतीनें तो वागूं लागला. भपका, डामडौल, किंवा तोरा, असा कांहींच नाहीं. यामुळें त्याच्या लोकप्रियतेंत आणखीच भर पडली. गांवोंगांवीं, शहरोंशहरीं, आणि रस्तोंरस्तीं, जो तो नेपोलियन्ची नांवाजणी करूं लागला. नेपोलियन्च्या लोकप्रियतेची ही चढतीवाढती कडी नजरेंत भरून, शासनमंडळांपैकीं बरेच जणांच्या अन्तरंगांत मत्सराची आगटी धुमूं लागली. हा बोंगा अंगापेक्षां लवकरच मोठा होऊन आपल्या आहारीं राहणार नाहीं, अशीं दुःस्वप्नें त्यांस पडूं लागलीं.

## मनोराज्य.

इकडे नेपोलियन्च्या मनाच्या उड्याही कांहीं निरनिराळ्याच दिशेनें भरारूं लागल्या. इटलीमधील यशानें त्याला नवीनच स्फुरण चढलें. आपण आपल्या शुद्धकौशल्यानें सर्व जगाला चकित करूं शकूं, असें त्याचें मन त्याला सांगूं लागलें. इंग्लंड्ची सत्ता व दरारा हीं जगांत चौफेर वाढीस लागलीं होतीं, तेव्हां इंग्लंड्ला आपल्या लष्करी धोरणानें व चातुरीनें चीत करणें, म्हणजे खरा दिग्विजय होईल, असें त्याच्या मनानें घेतलें. परंतु प्रत्यक्ष इंग्लंड्वर स्वारी करणें किंवा त्याच्या आरमाराशीं टक्कर देणें, अशक्य आहे, हें तो समजून होता. तरीपण इंग्लंड्च्या साम्राज्यविस्ताराला पायबंद घालून, जगांत फ्रेंचांच्या शौर्यानें नवीन साम्राज्य स्थापन करतां येण्यासारखें आहे, असें त्यास वाटूं लागलें. अखेर त्यानें अशी योजना मनाशीं बसविली, कीं, कांहींतरी निमित्तानें इजिप्तवर पंजा टाकून,

आशिआंतील सिरिआ, तुर्कस्थान, व अरबस्थान, हे देश पादाक्रान्त करून, जगज्जेत्या अलेक्झॅन्डरूच्या पावलावर पाऊल टाकीत फ्रेंचांचा गरुडध्वज हिंदुस्थानांत घुमवावा, आणि तेथें मराठ्यांशीं संधान बांधून, त्या देशांतून इंग्लिशांची हकालपट्टी करावी. फ्रेन्चांच्या शासनमंडळाचें व आपलें फार दिवस जमणार नाहीं, हें तो जाणून होता. तेव्हां त्यांच्याशीं आपला बेबनाव झालाच, तर या नव्या साम्राज्यांत आपल्याला खुशाल बादशाही वैभवानें व अनियन्त्रित सत्तेनें राहतां येईल, अशा प्रकारच्या राक्षसी महत्वाकांक्षेनें प्रेरित होऊन नेपोलियन्नें इजिप्तच्या मोहिमेचा विचार शासनमंडळापुढें मांडला. इजिप्तचे मामेलूक राजे प्रजेवर जुलूम जबरदस्ती करतात, तरी त्या अनाथ प्रजेच्या बचावाकरितां ही मोहीम काढण्यांत येत आहे, असें मानभावीपणानें दिखाऊ कारण सांगण्यांत आलें. शासनमंडळांतील बऱ्याच जणांना नेपोलियन्चें लष्करी बळ पाहून पोंटांत दुखूं लागलें होतेंच. तेव्हां ही ब्याद एकाद्या दूरच्या धाडसाच्या मुलुखगिरीवर गेली, तर सुंठीवांचून खोकला गेल्यासारखेंच त्यांस होणार होतें. त्यामुळें या मोहिमेला व तत्प्रीत्यर्थ कांहीं खर्चाच्या रकमेला ताबडतोब मंजुरी मिळाली. मंजूर झालेली रक्कम अपुरीच होती. परंतु नेपोलियन्नें इटाली-मध्यें मिळविलेली जी लूट मध्येंच दाबून ठेवली होती, ती सर्व त्यानें आतां या कामीं लावली. त्यानें जवळ जवळचाळीस हजार सैन्याची भरती केली. बरेंचसें आरमारही सज्ज केलें. हत्यारेंपात्यारें, दारूगोळा, अन्नसामग्री, यांचीही यथास्थित जमवाजमव केली. पण नेपोलियन्ला नुसती मुलुखगिरी करावयाची नव्हती, तर एका नमुनेदार

नव्या साम्राज्याची उभारणी करावयाची होती ! म्हणून त्या दृष्टीनेंही त्यानें अणुरेणुसुद्धां कमी पडणार नाहीं अशी कडेकोट तयारी केली ! “ उत्तम उत्तम शास्त्रज्ञ, उत्तम पंडित, उत्तम इंजिनियर्, उत्तम कारखानदार, अनेक भाषाभिज्ञ व कलाभिज्ञ लोक, चितारी, वगैरे सर्व हुशारांतले हुशार लोक, आणि अनुभवी व हुशार असे नांवाजलेले विद्वान्, हेही बरोबर घेतले होते. त्यानें बरोबर शोध करण्याचीं नवीं नवीं यन्त्रें, आणि तेथें उपयोगी पडण्यासारखे जुने जुने ग्रन्थही घेतले. बायबल् तर होतेंच, पण वेद आणि कुराण हेही धर्मग्रन्थ बरोबर घेतले होते. हिंदुस्थानासंबंधानें ऐतिहासिक व इतर माहितीचे ग्रन्थ, भूगोल, रस्तोरस्तींचे नकाशे व स्थलाचीं वर्णनें, हे ग्रन्थ नेपोलियन्नें मोहिमेला निघण्यापूर्वींच वाचून टाकले आणि बरोबर घेतले. होमर्, व्हर्जील्, वगैरे प्राचीन, व बेकन्, गेटी, वगैरे अर्वाचीन विद्वानांचेही ग्रन्थ घेण्याचे त्यानें वगळले नाहींत. छापखाने व छापण्याचें सामान आणि निरनिराळ्या लिपींचे नमुनेही करून बरोबर घेतले होते. सारांश या मोहिमेस निघतांना नवा संसार, नवें राज्य थाटण्याची सर्व तयारी त्यानें करून घेतली होती. ”[1]

### इजिप्तची मोहीम.

नेपोलियन्च्या पहिल्या लष्करी विजयाचें स्थळ जें टुलोन् बन्दर, त्याच बन्दरांतून नेपोलियन्ची स्वारी या मोहिमेवर ता. ९ मे १७९८ रोजीं बाहेर पडली. इंग्लंड्चें हुशार व चलाख आरमार नेलसन्च्या पुढारीपणाखालीं भूमध्यसमुद्रापासून तो इंग्लिश् खाडी-

---

१ चक्रवर्ती नेपोलियनचें चरित्र, वि० ल० भावे.

पर्यन्त अगदीं डोळ्यांत तेल घालून रात्रंदिवस टेहळणी करीत या वेळीं संचारत होतें, कारण नेपोलियन्‌चें भूत केव्हां कोठें व कसा घाला घालील याचा मुळींच नेम नव्हता. तरीपण नेपोलियन्‌नें कांहीं दिवस सर्व तयारी झाल्यावर इकडेतिकडे हुलकावण्या देऊन, अखेर वर लिहिल्याप्रमाणें नेल्सन्‌च्या आरमाराचा डोळा चुकवून, त्यास मुळींच दाद लागूं न देतां, जो आपला काफिला टुलोन्‌हून हांकारला, तो माल्टा बेटास आणला, आणि तें बेट जून ९ ला काबीज केलें. माल्टा बेट नेपोलियन्‌नें घेतलें, ही खबर नेल्सन्‌ला लागतांच तो मोठ्या तारांबळीनें तेथें आपलें आरमार घेऊन आला, पण त्यापूर्वींच नेपोलियन्‌चा काफिला तेथून पुढें झटकला होता. तेव्हां तो बहुशः इजिप्तच्या किनाऱ्यावरील ॲलेक्झॅन्ड्रिया बन्दरास गेला असेल, असा अंदाज बांधून नेल्सन् क्षणाचाही विलंब न करतां त्या बन्दराकडे वळला. वाटेंत नेपोलियन्‌च्या काफिल्यापासून अगदींच थोड्या अन्तरावरून नेल्सन्‌चीं गलबतें भरारत गेलीं; परंतु नेपोलियन्‌चें दैव त्यावेळीं चढतीवर होतें. अतिशय दाट धुकें पडल्यामुळें नेपोलियन्‌चा वासही इंग्लिश् आरमारास न येतां तें ॲलेक्झॅन्ड्रिआ बन्दरांत दाखल झालें. तेथें कांहीं नेपोलियन्‌चा मागमूस नाहीं, हें पाहतांच, नेपोलियन् सरळ सिरिआच्या किनाऱ्याकडे तुर्कस्थानावर स्वारी करण्यासाठीं सरसावला असावा, असा नेल्सन्‌नें होरा बांधला, व तो लगबगीनेंच सिरिआच्या किनाऱ्याच्या रोखानें चालता झाला. नेल्सन् निघून गेला आणि तिसऱ्याच दिवशीं म्हणजे ३० जून १७९८ रोजीं नेपोलियन्‌ची स्वारी ॲलेक्झॅन्ड्रिआ बन्दरीं दाखल झाली ! मोठें वादळ सुरू असतांही नेपोलिय-

नूनें आपलें सैन्य मोठ्या धाडसानें लागलेंच जमिनीवर उतरलें, आणि त्याच धडाक्याबरोबर ॲलेक्झॅन्ड्रिआ शहर जिंकून, आम्ही तुमच्या उद्धाराकरितां, तुह्मांला जुलमांतून सोडवण्याकरितां, आलों आहों, असा जाहिरनामा काढला व प्रजाजनांस स्वातंत्र्याचें आश्वासन दिलें. यानन्तर तसेंच कूच दरकूच करीत तो केरो राजधानीकडे वळला. वाटेंत रेताड रखरखीत वाळवंटांत त्याच्या लोकांचे फार हाल झाले. पण नेपोलियन् अशा हालअपेष्टांना हार जाणारा प्राणी नव्हता. केरो-जवळील पुरातन मनोऱ्यांकडे बोट दाखवून तो आपल्या पीडाग्रस्त सैनिकांना म्हणाला, ‘ पहा, वीर हो, या मनोऱ्यांतून चाळीस शतकांचे डोळे आज तुमच्या पराक्रमाकडे व शौर्याकडे टक लावून पहात आहेत!” अशा प्रकारच्या उत्तेजक शब्दांनीं त्या खंगलेल्या लोकांच्या अंगांत नवीन चैतन्याचा संचार करण्याची कला नेपोलियन्ला चांगली साधली होती. शिवाय, त्याचें धाडसी शौर्य, सैनिकांशीं उमदें वर्तन, आणि रुबाबदार देखावा, यांनीं त्याच्या उत्तेजक शब्दांस फारच रंग चढत असे. असो, २१ जुलै रोजीं त्यानें ‘मनोऱ्यांच्या लढाईत’ मामेलूक राजांचा पराजय करून केरो शहर हस्तगत केलें. ताबडतोब मामेलूक घराण्याचा मुकुट मातींत मिळाला, व नेपोलियन्च्या छायेखालीं लोकशाहीची स्थापना इजिप्तमध्यें करण्यांत आली. परंतु नेपोलियन् आपल्या आवडत्या भावी आशांना केरो राजधानींत कौतुकानें गोंजारीत होता, तोंच त्याच्या आरमारावर विलक्षण वज्राघात झाला! ॲलेक्झँड्रिआच्या पूर्वेस नीलनदीच्या मुखाशीं रॉझेट्टा शहराजवळ अबुकीर नांवाचें बन्दर आहे. तेथें फ्रेन्चाचें आरमार सुरक्षित नांगरलें होतें. परंतु उंदराला

शोधीत जसा बोका यावा, तसा नेलसन् फ्रेन्च् आरमाराचा माग काढीत काढीत अखेर १ ऑगस्ट्ला अबुकीर येथें दाखल झाला, व त्यानें फ्रेन्च् आरमाराचा अगदीं धुव्वा उडवून टाकला. त्याच्या तेरा मोठ्या लढाऊ जहाजांपैकीं नऊ इंग्लिशांच्या हातीं लागलीं व दोन जळून फस्त झालीं, व धाकट्या चारांपैकीं जेमतेम दोन बचावलीं! आरमाराच्या नाशानें नेपोलियन् इजिप्तमध्यें आडकल्यासारखा झाला. परंतु तो हात-पाय गाळून स्वस्थ बसणारा नव्हता. त्यानें आपल्या सैन्याला केरोपासून पॅलिस्टाइन्पर्यन्त रेताड वाळवंट तुडवीत नेलें, व जाफा शहर छापा घालून सर केलें. ( फेब्रुवारी १७९९ ). नंतर त्यानें एकर् शहराला वेढा दिला. पण यापूर्वी दोनच दिवस इंग्लिश् दर्यावर्दी सिड्नि स्मिथ् हा लहानशा काफिल्यासह एकर्च्या बन्दरांत शिरला. एकर्चा तुर्की किल्लेदार अगदींच भेदरून नेपोलियन्ला शरण जाण्याच्या बेतांत होता; परंतु स्मिथ्नें त्याला धीर दिला, व माणसें, तोफा, धान्य, आणि दारूगोळा, यांचाही पुरवठा केला. किल्ल्याची दुरुस्तीही करण्यांत आली. यामुळें किल्ला चांगलाच दमदारपणें लढविला गेला, दोन महिने-पर्यन्त नेपोलियननें किल्ल्यावर वारंवार चढाव केला, परंतु त्यास यश मिळून लाभलें नाहीं. अखेर एकर्चा नाद सोडून नेपोलियन्ची स्वारी हालेमालें करीत इजिप्तला परत आली. लवकरच तुर्कांचें सैन्य नेपोलियन्ला तोंड देण्याकरितां इजिप्तमध्यें आलें, पण नेपोलियन्नें १७९९ च्या जुलैमध्यें अबुकीर येथें त्याचा चक्काचूर उडविला. इतक्यांत फ्रान्स्मध्यें बराच गोंधळ झाल्याची व इंग्लंड्च्या खटपटीनें युरोपांतील राष्ट्रांनीं पुन्हां संघ बनवून फ्रान्सवर झडप घालण्याची तयारी चालवि-

त्याची बातमी नेपोलियन्ला समजली. तेव्हां आरमाराची सोय नसल्यामुळें नेपोलियन् आपलें सैन्य तसेंच इजिप्तमध्यें सोडून, कसेंबसें गलबत मिळवून, गाजावाजा न करतां, फ्रान्स्ला आक्टोबर महिन्यांत परत येऊन दाखल झाला. ( १७९९ )

### फ्रान्स्ची दुःस्थिति.

नेपोलियन् फ्रान्स्मध्यें परत आला, त्यावेळीं देशाची स्थिति फार केंविलवाणी झाली होती. कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नव्हता. शासनमंडळांत पांच सर्वाधिकारी होते, परंतु ते सर्व जवळजवळ क्रियाशून्य झाले होते. त्यांत लष्करी सरदार एकही नव्हता. देशांत सर्वत्र दंगेधोपे व अनन्वित अत्याचार दिवसाढवळ्या होत असत, पण त्यांचा बंदोबस्त करण्याची तडफ व कुवत कोणांतही नव्हती. ज्वलन् जहाल जो जॅकोबिन् पक्ष त्याचा प्रसार झपाट्यानें होत होता व आतां ही स्थिति कोणत्या थरास जाणार या चिंतेनें शासनमंडळ ग्रस्त होऊन दिङ्मूढ बनलें होतें. नेमस्त पक्षाचे लोक, अशा बेबंदशाहीपेक्षां राजेशाही पत्करली, असें म्हणून राजसत्तेकरितां आंतून प्रयत्नही करूं लागले होते. देशाबाहेर शत्रुराष्ट्रांना या विस्कळित देशस्थितीमुळं खटपटीलटपटी करण्यास आयताच वाव सांपडला. इटली देश ऑस्ट्रिआनें पुन्हां व्यापला. इंग्लंड्नें पैसे चारून युरोपीय राष्ट्रांची पुन्हां जूट जमवली. ही स्थिति पहातांच फ्रान्स्मधील शासनमंडळ अगदींच घाबरून गेलं. व "दैव करो, आणि कोणी तरी आम्हांला या जबाबदारींतून सोडवो," असें तें मनांत म्हणूं लागलें.

### भाग्योदय.

नेपोलियन्च्या लक्ष्यांत ही स्थिति ताबडतोब आली, आणि लष्करी

सत्तेच्या बळावर आपला हात चालविण्यास ही सोन्याची संधी लाभली आहे, तरी हिचा उपयोग करून घेऊन आपला भाग्योदय करावा, असें त्यानें ठरविलें. त्या वेळीं टॅलेरां हा एक वयोवृद्ध, हुशार व लटपट्या मुत्सद्दी होता नेपोलियन्नें त्याला आपल्या कटांत ओढून घेतला. त्याच्या मार्फतीनें लांच चारून शासनमंडळांतील एक सर्वाधिकारी सायेस् यालाही बोटचेपें करण्यांत आलें. यानन्तर जहाल जॅकोबिन् लोकांनीं पॅरिसूवर हल्ला करून सर्व सत्ता आपल्या हातीं घेण्याचा भयंकर गुप्त कट केला आहे, अशा बातम्या जिकडेतिकडे हस्तकांकडून पसरविण्यांत आल्या. या बातम्यांनीं सामान्य जनतेची अगदीं गर्भगळित अवस्था झाली, आणि जो तो, ' नेपोलियन्च राष्ट्राला या प्रसंगीं तारील तर तारील, ' असें म्हणूं लागला. शासनमंडळाच्या सर्वाधिकाऱ्यांचीही अगदीं घाबरगुंडी उडून गेली; तशांत नेपोलियन्नें बोटचेपा केलेला सायेस् तर त्यांच्या तारांबळीस जास्तच चाळवूं लागला. अखेर त्यानें आपणासकट सर्वांचे राजिनामे घेऊन ते लोकसभेपुढें दाखल केले. लोकसभेलाही बंडाची दहशत पडली होतीच. तेव्हां हे सर्व राजिनामे कसेबसे मंजूर करून, लोकसभेनें १७९९ च्या नोव्हेंबरच्या नवव्या तारखेस तीन नवे सर्वाधिकारी ( Consuls ) निवडले; त्यांत नेपोलियन् हा सर्वश्रेष्ठ सत्ताधारी असून, डॅको व सायेस् हे दुय्यम होते.

### आस्ट्रिआवर स्वारी.

असो, नेपोलियन् राष्ट्राचा श्रेष्ठाधिकारी झाल्याबरोबर त्याचे पुढें लष्करी कामगिरी दत्त म्हणून उभी राहिली. इटली देश तर फ्रान्सूच्या हातांतून गेल्यासारखाच झाला होता. आस्ट्रिआनें मोठें थोरलें लष्कर

जमवून फ्रान्स्‌ला स्वाहा करण्याचा आव आणला होता. फ्रेन्चांचा एक अनुभवी सरदार मोरो यावेळीं स्वित्झर्लंड्मध्यें होता, आणि त्यानें व्हिएन्नावर एकदम चाल केली, तर आस्ट्रियन् सैन्याला पायबंद बसण्याचा थोडासा संभव होता. परंतु हें मोरोला कितपत साधेल याची नीटशी खात्री नसल्यामुळें नेपोलियन्‌ला कांहींतरी युक्ति करून ऑस्ट्रिआचा पक्का बंदोबस्त करणें प्राप्त होतें. नेपोलियन्नें या प्रसंगीं एक अचाट कल्पना लढविली व यूरप्‌ला चकित करून सोडलें. फ्रान्स् देश व इटलींतील ऑस्ट्रिआच्या सैन्याचा तळ यांच्यामध्यें गगनचुंबी आल्पस् पर्वताची रांग होती. या युरप्‌मधील हिमालयाला ओलांडून कोणी सेनापति आपलें लष्कर आणील अशी कल्पनाही कोणाच्या मनाला शिवली नव्हती. परंतु नेपोलियन्नें हीच अशक्य गोष्ट प्रत्यक्ष शक्य करून दाखविली. त्यानें आटोकाट मेहनत करून व कष्ट सोसून आपलें सर्व सैन्य, तोफा वगैरे सर्व अवजड सामानासह, विलक्षण धाडशीपणानें या हिमपर्वतावर चढविलें, आणि, ज्या बाजूनें आपल्याला कोणताच धोका नाहीं अशा समजुतीनें ऑस्ट्रिअन् सैन्य तळ देऊन निर्धास्त राहिलें होतें, त्याच बाजूनें नेपोलियन्नें त्याच्यावर अचानकपणें एकाद्या वाघासारखी झडप घातली. हीच सुप्रसिद्ध मारेंगोची लढाई ( १४ जून १८०० ). मोरोनेंही पुढें डिसेम्बरच्या आरंभीं होहेन्‌लिन्डेन् येथें ऑस्ट्रिआवर मोठा विजय संपादिला; परंतु तो विजयही मारेंगो येथील नेपोलियन्च्या अकल्पित विजयापुढें केवळ फिका पडला. या दोन तडाख्यांनीं ऑस्ट्रिआचा बादशहा अगदीं चीत होऊन, गयावया करूं लागला, आणि अखेर १८०१ च्या फेब्रुवारी महिन्यांत त्यानें ल्युने-

व्हिलेच्या तहनाम्यावर सही केली. या तहनाम्यानें फ्रान्स् व ऑस्ट्रिआ यांचे संबंध पुन्हा इ. स. १७९७ च्या स्थितीवर आले.

## इंग्लंड्वर डोळा.

लुनेव्हिलेच्या तहानन्तर जरा स्थिरस्थावर झालें असें पाहून, नेपोलियननें एक नवाच डाव खेळण्यास सुरवात केली. युरोपांतील राष्ट्रांना फ्रान्स्-विरुद्ध चिथवणारें पाताळयंत्र इंग्लंडांत आहे, हें तो जाणून होता, आणि इंग्लंडाचा नक्षा उतरणें, हें त्याचें ध्येय होतें. तेव्हां आतां कांहीं धाकदपटशानें, तर कांहीं गोडीगुलाबीनें, रशिआ, प्रुशिआ, स्वीडन्, आणि डेन्मार्क्, या राष्ट्रांचा संघ बनवून त्यांच्याकडून इंग्लंड्ला वाळींत टाकण्याचा प्रयत्न नेपोलियन्नें चालविला. परंतु हा प्रयत्न नीटसा यशस्वी झाला नाहीं. इंग्लंड्च्या आरमारापुढें नेपोलियन्ला हार खावी लागली. नेलसन्च्या इंग्लिश् आरमारानें डेन्मार्क्ला असा फटका लगावला, कीं, तें अगदीं गोगलगाय होऊन गेलें. इतक्यांत रशिआचा बादशहा झार् पॉल् याचाही खून झाला, आणि नेपोलियन्ची युरोपीय राष्ट्रसंघाची कल्पना तेव्हांच समाधिस्थ झाली. यानंतर इंग्लंड् व नेपोलियन् या दोघांनाही या खळबळाटाचा कंटाळा आला, आणि १८०२ सालीं मार्च महिन्यांत फ्रान्स् व इंग्लंड् यांचा अमीन्स् येथें तह झाला.

## नेपोलियन्ची चतुरस्रता.

इ. स. १८०१ पासून १८०३ पर्यन्त नेपोलियन्ला शांततेचा अवसर सांपडला. अचाट बुद्धीचा व विलक्षण पराक्रमाचा सेनानी म्हणून त्यानें दिगन्त कीर्ति मिळविलीच होती; आणि या स्वस्थतेच्या काळांत फ्रान्स्ची अन्तर्गत व्यवस्था नीट लावून मुत्सद्दीपणांत व राज्यव्यवहा-

रांतही त्यानें उज्ज्वल नांवाजणी संपादन केली. या काळांत राज्यकारणाच्या व राष्ट्रनियमनाच्या प्रत्येक बाबतींत त्यानें ज्या सुधारणा करून शिस्ती बांधून दिल्या, त्या पाहिल्या म्हणजे त्याच्या विशाल बुद्धीची चतुरस्रता मनाला चांगलीच पटते. प्रथमतः नेपोलियन्नें धर्मसंस्थेचा उद्धार केला. राजसंस्थेबरोबर धर्मसंस्थाही फ्रान्सांत धुळीस मिळाली होती. देवळें, उपाध्याय, प्रार्थना, वगैरे सर्वांना त्या बारंगळलेल्या राष्ट्रानें अर्धचन्द्र दिला होता. नेपोलियन्लाही धर्म पाहिजे होता, असें नाहीं. परंतु धर्मसंस्था व धर्मोपाध्याय यांचें सर्व ठिकाणीं जनतेवर सामान्यतः पुष्कळ वजन असतें, व जनतेला कह्यांत ठेवण्यास त्यांचा आपल्यास फार उपयोग होईल, असा त्यानें धूर्तपणें अंदाज बांधला, व तो लागलाच धर्मोद्धाराच्या कार्यास लागला. फ्रान्समध्यें पोप्ची सत्ता निर्मूळ झाली होती. पण नेपोलियन्नें आतां पोप्शीं एक तडजोडीचा तहनामा केला, आणि फ्रान्सांत उपाध्यायांच्या नेमणुका होऊन देवळांतून पुन्हां प्रार्थना होऊं लागल्या, व विवाहविधि, प्रेमसंस्कार, इत्यादि सर्व कार्यें उपाध्यायामार्फत होण्यास सुरवात झाली. नेपोलियन् स्वतःही देवालयांत प्रार्थनेकरितां जाऊं लागला, आणि लोक त्याचा कित्ता भराभर गिरवूं लागले. या नव्या उपाध्यायांवर असें बंधन होतें, कीं, “ आम्ही फर्स्ट् कॉन्सल् व शासनसत्ता यांविषयीं अत्यन्तनिष्ठ राहूं, लोकांनाही असें राहण्याबद्दल उपदेश करूं आणि त्यांचे जे कोणी द्रोही आढळतील, त्यांची सरकारांत ताबडतोब वर्दी देऊं,” अशा अर्थाची शपथ त्यांनीं नेमणुकीपूर्वीं घेतलीच पाहिजे. यानन्तर नेपोलियन्नें तुरुंगाकडे दृष्टि फिरविली. जुन्या अमदानींत असंख्य लोक बिनचौकशीनें कारागृहांत पडले होते. त्यांना ताबडतोब मोकळे करून नेपोलियन्नें त्यांचा

दुवा मिळविला. अनेक लोक हद्दपार करण्यांत आलेले होते, त्यांनाही सरकारशीं एकनिष्ठ राहण्याच्या अटीवर परत फ्रान्सांत येण्याची मुभा देऊन नेपोलियन्नें सुखी केलें. शिक्षणसंस्था एकतन्त्री केली असतां व नवीन पिढीस आपल्या उपयोगी पडेल असें शिक्षण दिलें असतां, आपल्या सत्तेचा पाया भक्कम व खंबीर होईल, असें धोरण बांधून, नेपोलियन्नें फ्रान्स्च्या विश्वविद्यालयाची स्थापना केली. पैशाच्या बाबतींत राष्ट्र वारंवार पेचांत येई व त्यामुळें व्यापारव्यवहाराची तारांबळ उडे, म्हणून नेपोलियन्नें सरकारी आश्रयानें एक सराफी पेढीही उघडली. न्यायखात्याला तर त्यानें आमूलाग्र उजळा दिला, आणि राष्ट्रीय कायद्याचे व्यवस्थित ग्रंथ तयार केले. एकंदरींत नेपोलियन्नें सर्व सरकारी खात्यांवर आपला सुधराईचा व सफाईचा हात फिरवून, राष्ट्राला जवळजवळ नवाच जन्म दिला. वरील सर्व संस्था व योजना एकदम पूर्णतेला गेल्या, अशांतला भाग नाहीं; पण त्यांचें बीजारोपण करून त्यांच्या पूर्णावस्थेचे आराखडेही नेपोलियन्नें या शांततेच्या अल्पकाळांत रेखाटून ठेवले, यांत संशय नाहीं.

### इंग्लंडविरुद्ध धोरण.

फ्रान्स्चा मुख्य प्रतिस्पर्धी इंग्लंड् आहे, असें नेपोलियन्च्या मनानें पक्कें घेतलें होतें. " अठराव्या शतकांत फ्रान्स्च्या हलगर्जीपणानें इंग्लंड् फारच पुढें सरकलें, आणि फ्रान्स् तसेंच मागें रेंगाळत राहून, त्यानें आपलें अपरिमित नुकसान करून घेतलें आहे, " असें तो म्हणत असे. अमेरिका इंग्लंड्नें दडपली, हिंदुस्थानांत आपलें बास्तान बसवलें, पॅसीफिक् महासागरांत वर्चस्व स्थापलें, आणि अजिंक्य आरमाराची कीर्ति संपादली; इतकें इंग्लंड् करीत असतां

फ्रान्स्नें कांहींच केलें नाहीं, उलट हातीं होतें तेंही गमावलें, ही गोष्ट नेपोलियन्च्या काळजाला सारखी जाचत होती, आणि ही अठराव्या शतकांतली चुकी आतां कशी दुरुस्त करावी, या प्रश्नाचा त्याला रात्रंदिवस ध्यास लागला होता, आणि या चिन्तनिकेनें तो पुन्हां लवकरच लढाईच्या हौद्यांत उतरला.

## बादशाही तख्त.

परंतु लढाई प्रत्यक्ष सुरू होण्याच्यापूर्वी फ्रान्स्मध्यें कांहीं विशेष भानगडी उद्भवल्या, व त्यांचा बन्दोबस्त करतांना नेपोलियन्ला फ्रान्स्च्या राज्यघटनेच्या स्वरूपांत एक महत्वाचा फरक घडवून आणण्यास आयतीच सन्धी मिळाली. फर्स्ट् कॉन्सल् म्हणजे शासनसंस्थेचा ज्येष्ठ सर्वाधिकारी या नात्यानें नेपोलियन् एकाद्या बादशहाप्रमाणें थाटानें राजवाड्यांत राहून अंमल चालवूं लागला. जुन्या राजवटींतील बऱ्याच प्रसिद्ध मनुष्यांना जवळ करून नेपोलियन्नें त्यांना मोठ्या बहुमानानें अंमलदारीच्या जागा देऊन खूष केलें. सैन्यांतील लोक तर नेपोलियन्ला केवळ देवतुल्यच मानीत. त्यानें लाविलेल्या सुव्यवस्थेनें व घडवलेल्या सुधारणांनीं बहुजनसमाजही नेपोलियन्चें कौतुक करून त्यास दुवाच देत असे. परंतु आतां दोन राजकीय पक्ष मात्र त्याच्या विरुद्ध खलबतें व खटपटी करूं लागले. फ्रान्सांत जो ज्वलत् जहाल क्रान्तिकारकांचा पक्ष होता, त्याला बादशाही थाटानें सत्ता चालविणाऱ्या नेपोलियन्चा आतां तिट्कारा येऊं लागला. ज्या राजसत्तेला गाडण्याकरितां आपण एव्हढा खटाटोप केला, तीच राजसत्ता नेपोलियन्च्या रूपानें पुन्हां जन्माला येत आहे, हें पाहतांच त्यांचें

पित्त अगदीं खवळून गेलें. तेव्हां १८०१ सालीं या ज्वलत् जहालांनीं, म्हणजे जॅकोबिन् लोकांनीं, एक गुप्त कट करून, फर्स्ट् कॉन्सल् नेपोलियन् व त्याचे साथीदार यांचे गुप्त तोफांच्या धडक्यानें बळी घेण्याचा घाट घातला. परंतु हा कट उघडकीस आला व बऱ्याच जॅकोबिन् लोकांना हद्दपार करण्यांत आलें. पुढें १८०३ सालीं राजपक्षीयांनीं एक मोठा कट केला. नेमस्त पक्षाचेही लोक यांत सामील झाले. त्यांचें असें म्हणणें पडलें, कीं, "फ्रान्सांत जर पुन्हा राजसंस्थेचा उद्धार करणेंच असेल, तर नेपोलियन्सारख्या उपटसुंभ्याला राजा करण्यापेक्षां, जुन्या राजवंशांतील इसमासच गादीवर बसविणें अधिक श्रेयस्कर." मोरोसारखे कांहीं सेनापतिही मत्सरानें प्रेरित होऊन या कटांत मिसळले. पण या कटाचाही सुगावा अगदीं ऐनवेळीं नेपोलियन्ला लागला. ताबडतोब मोरो वगैरेंची चक्कडबंदी करण्यांत आली, आणि बोर्बाँ राजवंशांतील ज्या वारसास या कटवाल्यांनीं पुढें करून हें बंड उभारलें होतें, त्याचा १८०४ च्या मार्च महिन्यांत नेपोलियन्नें वध करविला. यानन्तर अशा प्रकारचे बंडावे होण्यास जागाच राहूं नये, म्हणून नेपोलियन्नें स्वतःच उघडउघड राजा व्हावें, असें त्याच्या भक्तांनीं व चाहत्यांनीं त्यास सुचविलें व त्यालाही तें फार पसन्त वाटलें. लागलीच राज्याभिषेकाच्या तयारीला सुरवात झाली. युरोपांतील जुन्या-जुन्या राजांच्या पंक्तीला आपल्याला हक्कानें व थाटानें बसतां यावें, म्हणून नेपोलियन्नें आपला राज्याभिषेक अगदीं शास्त्रोक्त करून घेण्याचें ठरविलें. या कार्याकरितां खुद्द पोप्महाराजांची स्वारी फ्रान्स्ला आणण्यांत आली, आणि त्यांच्या हातून सर्व विधि यथासांग करून, नेपोलियन्नें "फ्रान्स्चा बादशहा, पहिला नेपोलियन्" हें विरुद धारण

केलें. अशा रीतीनें राजवधानें रक्तबंबाळ झालेल्या राज्यक्रान्तीची परिणति क्रान्तिकारकांच्याच एक हस्तकाच्या बादशाहीनें पुरी झाली !

## इंग्लंड्च्या स्वारीचा बेत.

आतां मात्र नेपोलियन्चा कटाक्ष गंभीरपणें इंग्लंड्वर पडला. इंग्लंड्ला चिडवण्याचीं कृत्यें त्याच्या हातून बरींच घडलीं होतीं. इंग्लंड्नें फ्रान्स्विरुद्ध जो युरोपीय राष्ट्रांचा संघ बनविला होता, तो तर नेपोलियन्नें आपल्या लष्करी धडाधडीनें केव्हांच विस्खळून टाकला, इतकेंच नव्हे, तर इंग्लंड्विरुद्ध नवा राष्ट्रसंघ तयार करण्याचाही घाट घातला, पण तो डेन्मार्क्च्या आरमाराच्या नाशानें व झार् पॉल्च्या खुनानें सिद्धीस गेला नाहीं. इटलींतील पार्मा, पीडमॉन्ट्, व पिआसेन्झा, हे प्रान्त नेपोलियन्नें फ्रान्स्च्या राज्यांत सामील केले, हें इंग्लंड्ला फार झोंबलें. स्वित्झर्लंड्मध्यें आपला हात शिरकावून, तेथें नेपोलियन्नें नवीन लोकशाही राज्यघटना केली, हेंही इंग्लंड्ला जाचत होतें. पण जेव्हां नेपोलियन्नें जर्मनींतील इंग्लंड्च्या राजाचें खासगी संस्थान जें हॅनोव्हर् त्याच्यावर झडप टाकली, तेव्हांतर इंग्लंड्चा जिव्हाळाच दुखवला गेला. सन १८०० मध्यें इंग्लंड्नें माल्टा बेटाचा कबजा केला होता, तो अद्याप तसाच त्याच्याकडे होता. आतां कांहींतरी कुरापत काढण्याच्या उद्देशानें नेपोलियन्नें इंग्लिशांच्यामागें 'तें बेट सोडा' म्हणून टकळी लावली. पण आपण तें बेट सोडलें, कीं नेपोलियन् तें बळकावणार, अशी भीति इंग्लंडला वाटत असल्यामुळें इंग्लंड्नें तें सोडण्याचें नाकारलें. पण नेपोलियन्नें फारच तगादा लावल्यावरून इंग्लंड्नें अखेरच्या खलित्यानें असें कळविलें, कीं, "आम्हीं हें बेट

दहा वर्षेपर्यंत आपल्या हातांत ठेऊं, व त्यानन्तर तें तेथील रहिवाशांच्या हवालीं करूं. " पण हा अखेरचा निर्वाणीचा खलिताही जेव्हां नेपोलियन्नें धुडकावून लाविला, तेव्हां म्हणजे १८०३ च्या मे महिन्यांत दोन राष्ट्रांत लढाईचा उघड पुकारा झाला. आतां इंग्लंड्नें पुन्हां रशिआ, ऑस्ट्रिआ, व स्वीड्न, या राष्ट्रांशीं संधान बांधलें, तर नेपोलियन्नें स्पेन्शीं जुळतें केलें. नेपोलियन्ला अशी धमक होती, कीं, जर आपल्या सैन्याचे पाय आंग्लभूमीला लागले तर त्या राष्ट्राची आपण तेव्हांच लगड वळवूं. पण हें होणार कसें? इंग्लंड्ची खाडी ओलांडून जाण्याचें दिव्य कसें तडीस जाणार? इंग्लंड्च्या आरमाराशीं तुलना करतां फ्रान्सचें आरमार कोतें व कमकुवत होतें; तशांत इंग्लिश आरमार अगदीं डोळ्यांत तेल घालून इंग्लिश् खाडी व युरोप्चा पश्चिम किनारा, यांजवर रात्रंदिवस गस्त घालीत होतें. पण या निराशाजनक स्थितींतही स्पेनूचें आरमार मदतीस मिळाल्यामुळें नेपोलियन्ची आशा जरा फुलून आली. फ्रान्स्च्या उत्तर किनाऱ्यावर बोलोन् बन्दरांत बरेंचसें आरमार व सुमारें एक लाख सैन्य नेपोलियन्नें जमविलें. शिवाय या तळाच्या दोनही बगलांस अॅन्ट्वर्प्पासून ब्रेस्ट्पर्यंत सुमारें पन्नास हजार सैन्य पसरलेलें होतेंच! इंग्लिश आरमारी गस्तीचा डोळा चुकवून आपण केव्हांतरी खाडी ओलांडूं आणि इंग्लंड्वर गारुडी झडप टाकूं, अशा आशेंत नेपोलियन् गर्क होऊन, वाट पहात बसला. मध्यन्तरीं त्यानें इटलीच्या राज्यघटनेंत उलटापालट करून टाकली. त्या राष्ट्राच्या लोकशाहीचें आतां राजेशाहींत रूपान्तर करण्यांत आलें, आणि नेपोलियन् हा स्वतः त्याचा राजा झाला. ( जुलै १८०५ ). इकडे फान्स्च्या उत्तर किना-

त्यावरील सैन्य खाडी ओलांडण्याच्या संधीची वाट पाहूनपाहून कंटाळलें व नेपोलियन् अगदीं रंजीस झाला.

## आस्ट्रिआवर स्वारी.

इतक्यांत रशिआ, ऑस्ट्रिआ, व प्रुशिआ, यांचीं खलबतें होऊन, त्यांची डॅन्यूब् नदीच्या थडी प्रान्तांत कांहीं चुळबूळ सुरू आहे, असें नेपोलियन्च्या लक्ष्यांत आलें. त्यानें लागलाच इंग्लंड्वरील स्वारीचा नसता नाद सोडून, सर्व सैन्यानिशीं डॅन्यूब्कडे इतक्या झपाट्यानें भरारी मारली, कीं, त्याचें सैन्य अगदीं नजरेच्या टप्प्यांत आलें, तरीही शत्रूचा आपल्या डोळ्यावरही विश्वास बसेना ! डॅन्यूब्च्या कांठीं उल्म् नांवाच्या ठिकाणीं त्यानें सेनापति मॅक् याच्या नेतृत्वाखालीं असलेल्या अठ्ठावीसहजार ऑस्ट्रिअन् फौजेवर २१ ऑक्टोबर १८०५ रोजीं अकस्मात् धाड घालून, तिला दांतीं तृण धरून शरण येण्यास भाग पाडलें. नन्तर लगोलग ऑस्ट्रिआची राजधानी व्हिएना हिचा कबजा करून, तो तसाच पुढें झटकला, आणि बरोबर दोन महिन्यांनीं त्यानें रशिआ व ऑस्ट्रिआ यांच्या एकवटलेल्या सैन्यांचा ऑस्टर्लिट्झ् येथें पूर्ण मोड केला. अशा रीतीनें फ्रान्स्विरुद्ध बनलेला युरोपीय राष्ट्रसंघ पार फुटला. प्रुशिआनें घाबरून जाऊन इंग्लंड्ची कास सोडली, आणि नेपोलियन्बरोबर तह केला. नेपोलियन्नें हॅनोव्हर् संस्थान प्रुशिआच्या गळ्यांत अडकवून, इंग्लंड् व प्रुशिआ यांचें सतत वैर राहील अशी युक्ति केली ! इंग्लंड्ला यानें किती दुःख वाटलें असेल, याची कल्पनाच करावी, कारण हॅनोव्हर् हें इंग्लंड्च्या राजाचें खासगी संस्थान होतें. या सर्व प्रकारानें इंग्लंड्चा मन्त्री धाकटा पिट् याच्या मनानें इतकी हाय घेतली कीं, तो एक वर्षाच्याआंतच या मनोव्याधीनें मृत्युमुखीं पडला.

## आरमारी युद्ध.

पण नेपोलियन्‌ची जरी जमिनीवरील युद्धांत अशी चढती कमान होती, तरी दर्यावरील युद्धांत इंग्लंड्‌नें त्याला हारीसच आणलें. योगायोग असा जुळून आला, कीं, ज्या दिवशीं नेपोलियन्‌नें उल्म्‌ येथें सेनापति मॅक्‌वर विजय मिळविला, नेमका त्याच दिवशीं लॉर्ड् नेलसन्‌नें फ्रान्स् व स्पेन् यांच्या एकवटलेल्या प्रचण्ड आरमाराचा स्पेन्‌च्या किनावर कॅडिझ् बंदराजवळ ट्रॅफलगार् येथें अगदीं विध्वंस उडवला. या आपत्तीनें नेपोलियन्‌च्या जमिनीवरील विजयांत बरेंच विरजण पडलें व इंग्लंड्‌ला हारीस आणण्याच्या त्याच्या मनोराज्यावर निराशेची दाट छाया पसरली.

## नेपोलियन् राजवंश.

ऑस्टर्लिट्झ्‌च्या लढाईच्यापूर्वीं एका इसमानें नेपोलियन्‌जवळ एकदा असे उद्गार काढले होते, कीं, “ आपण जरी विधिपूर्वक राज्याभिषेक करून घेतला आहे, तरी तुम्हांला जग पिढीजाद राजांच्या बरोबरीचे समजणार नाहीं. तुम्हांला ते उपटशुंभच गणणार, कारण पिढीजाद राजांचे सर्व नातेवाईक राजघराण्यांतील असतात व त्यांपैकीं बरेच प्रत्यक्ष राजे व राण्या होतात. तसा प्रकार तुमच्यासंबंधें नाहीं. ” यावर नेपोलियन्‌नें जरा बेपर्वाईनें व फणकाऱ्यानें उत्तर केलें, कीं, “ एवढेंच ना ? ठीक आहे. मीही आपल्या गोत्रांत राजे–राण्यांचा सुळसुळाट करून टाकतों ! ” आणि ऑस्टर्लिट्झ्‌च्या लढाईनंतर तो खरोखरच या उद्योगाला लागला. त्यानें आपला मेव्हणा म्यूरा याला बर्ग्‌संस्थानचा अधिपति केलें. आपल्या मर्जींतल्या दुसऱ्या कित्येकांना त्यानें अशींच दुसरीं संस्थानें दिलीं. इटलीच्या दक्षिण भागांत नेपल्स्

येथें स्वतंत्र बोर्बाँ वंशांतला राजा राज्य करीत होता, त्यास पदच्युत करून, नेपल्स्च्या राज्यलक्ष्मीकडून नेपोलियन्नें आपला मोठा भाऊ जोसेफ् यास माळ घालविली. त्यानें आपला सावत्र मुलगा अजेन याचा बव्हेरियाच्या ज्येष्ठ राजपुत्राशीं शरीरसंबंध जुळवून आणला. याप्रमाणें नेपोलियन्नें नव्या राजवंशाचा ताणा ऐसपैस ताणण्यास सुरवात केली.

## प्रेस्बर्ग्चा तह.

ऑस्टर्लिट्झ् येथील कंबरमोडीच्या पराभवानें भेदरून जाऊन ऑस्ट्रिआनें प्रेस्बर्ग्चा तह १८०५ च्या दिसेंबरांत केला. या तहावर रशिआच्या झाराची मात्र सही नव्हती. असो. या तहानें आस्ट्रिआला आपल्या मुलखाच्या एक षष्ठांश भागाला मुकावें लागलें. यानंतर नेपोलियन्नें राइन् नदीच्या थडीप्रान्तांत आपल्या आश्रयछत्राखालीं एक संस्थानिकांचा संघ तयार केला. सन १८०६ च्या ऑगस्ट् महिन्यांत रोम येथील पोप्च्या संस्थानासही हरताळ लावण्यांत आला.

## प्रुशिआशीं युद्ध.

हा प्रकार चालला असतां प्रुशिआचा राजा अगदीं तटस्थ राहिला होता. पण आंतून त्याची युद्धाची तयारी चालली होती, आणि रशिआचा झार् ॲलेक्झॅन्डर् हा 'आपण प्रेस्बर्ग्च्या तहावर सही केलेली नाहीं, तेव्हां तो मला बंधक नाहीं,' असा बहाणा करून, प्रुशिआला नेपोलियन्च्याविरुद्ध उठाव करण्याला चिथवीत होता व या कामीं मदत करण्याचेंही कबूल करीत होता. या अन्तःस्थ कारस्थानाची नेपोलियन्ला पक्की कुणकुण लागली. तेव्हां त्यानें मुळींच दिवसगत न करतां, आपलें वेंचक सैन्य सज्ज करून एकदम बव्हेरिआंतून

प्रुशिआच्या मुलखांत बर्लिनच्या रोखानें घुसविलें. त्यानें आपल्या सैन्याच्या बऱ्याच टोळ्या करून, त्या प्रान्तभर पसरून दिल्या व प्रुशिआच्या सैन्याचा कोंडमारा करीत करीत, त्यास जेना व ऑर्स्टाट् येथें कोंडींत पकडून एकदम दुहेरी लढाईत त्याचा चेंदा उडवून टाकला. ( १४ ऑक्टोबर् १८०६ ). यानंतर लगोलग पंधरा दिवसांच्या आंत नेपोलियन्‌ची स्वारी मोठ्या थाटानें बर्लिन् शहरांत विराजमान झाली. नेपोलियन्‌नें प्रुशिआच्या राजधानींतून एक ' Berlin Decree' नांवाचा हुकूमवजा जाहीरनामा पुकारला. या जाहीरनाम्यानें, फ्रान्स्‌शीं तह करून मित्रत्वानें वागणाऱ्या सर्व युरोपीयन् राष्ट्रांनीं इंग्लंड्‌शीं कोणताही व्यापारी संबंध ठेऊ नये, असें बजावण्यांत आलें. यानंतर नेपोलियन्‌नें रशिआवर धाड घातली, आणि रशिआच्या नामांकित फौजेचा फीड्लॅन्ड् येथें सन १८०७ च्या जून महिन्यांत पूर्ण मोड केला; अखेर झार् अलेक्झॅन्डर्‌नें टिलसिट्‌च्या तहावर जुलैमध्यें सही केली. आतां नेपोलियन्‌नें प्रुशिआच्या प्रान्ताचे वाभाडे काढून, आपला भाऊ जेरोम् याच्यासाठीं वेस्ट् फॅलिआचें नवें राज्य उत्पन्न केलें.

## पोर्तुगॉल् व स्पेन् येथील युद्धें.

आतां नेपोलियन्‌ची वक्रदृष्टि पोर्तुगॉल्‌कडे वळली. पोर्तुगॉल् व इंग्लंड् यांचे संबंध मित्रत्वाचे होते; तेव्हां इंग्लंड्‌चा नक्षा उतरण्याला पोर्तुगॉल् काबीज केलें पाहिजे, असें नेपोलियन्‌नें ठरविलें. पण त्या देशांत जाण्याचा मार्ग स्पेन्‌मधून आहे, म्हणून नेपोलियन्‌नें स्पेन्‌च्या राजाशीं गुप्त तह करून, आपला सरदार ज्यूनो याला या स्वारीवर तीस हजार फौजेसह पाठविलें. ही अचानक आलेली धाड पहातांच पोर्तुगाल्‌च्या राजवंशाचें धाबें दणाणलें व त्यानें स्वदेश सोडून एकदम

अॅटलॅन्टिक् महासागरापलीकडे दक्षिण अमेरिकेंत ब्रॅझिल्ला पोबारा केला, आणि नेपोलियन्च्या सरदारानें पोर्तुगाल् देशाचा कबजा केला. आतां नेपोलियन्नें स्पेन्मध्यें कुलंगडीं उत्पन्न केलीं. स्पेन्चा राजवंश फ्रान्स्प्रमाणेंच बोर्बाँ घराण्यांतला होता, आणि तो नेपोलियन्च्या डोळ्यांत शल्याप्रमाणें खुपत होता. स्पेन्चा राजा चार्लस् व राजपुत्र फर्डिनंड् यांच्यांत कांहीं बिघाड झाला होता. इतक्यांत सन १८०८ च्या मार्च महिन्यांत मॅड्रिड् शहरांत एक बंड उद्भवून चार्लस्ला राजचिन्हांचा त्याग करावा लागला, व फर्डिनन्ड् हा गादीनशीन झाला. यानंतर एक आठवड्याच्याआंतच नेपोलियन्चा सरदार म्यूरट् हा फ्रेन्च् सैन्यासह स्पेन्च्या राजधानींत शिरला, आणि राजा व राजपुत्र यांना कांहींतरी थापांनीं फुसलावून फ्रान्स्च्या सरहद्दीवरील बेऑन् शहरीं नेपोलियन्च्या मुलाखतीकरितां नेण्यांत आलें, व तेथें दोघांजवळून नेपोलियन्नें आपल्या राज्याचे राजिनामे लिहून घेतले. नंतर नेपोलियन्नें नेपल्स्चा राजा झालेला आपला मोठा भाऊ जोसेफ् यास स्पेन्चा राजा केलें, आणि नेपल्स्चें राज्य आपला मेव्हणा मूरट् यास बहाल केलें, अर्थात् आपल्या देशाची नेपोलियन्नें लावलेली ही विल्हेवाट स्पेन्मधील राष्ट्रीय पक्षाला रुचली नाहीं. त्यानें लढाईची तयारी केली, आणि समोरासमोर फ्रेंचांशीं उघड मैदानांत फारसें तोंड न देतां गनीमीकाव्यानें सतत लढत राहून फ्रेन्चांना टेंकीस आणण्याचा त्यानें उपक्रम केला. इंग्रजांनींही प्रथम सर् जॉन् मूर् व नंतर सरदार वेलस्ली ( ड्यूक् ऑव् वेलिंगटन् ) यांच्या हाताखालीं सैन्य पाठवून, पोर्तुगाल्च्या किनाऱ्यावर चांगले पाय रोवले व फ्रेंच् सैन्याला थोडथोडें मागें लोटण्याचा उपक्रम मोठ्या चिकाटीनें केला. स्पेन्च्या राष्ट्रीय

सैन्यानेंही फ्रेन्चांची तारांबळ उडवून मॅड्रिड् शहरांतून त्यांस हुसकावलें. ही बातमी नेपोलियन्‌ला लागतांच, तो चवताळून स्पेन्‌मध्यें १८०८च्या नोव्हेम्बरांत जातीनें आला. त्यानें स्पेन्‌चें राष्ट्रीय सैन्य मोठ्या आवेशानें उधळून टाकून मॅड्रिड् शहराचा कबजा केला. यानंतर स्पेन्‌मध्यें घुसूं पाहणाऱ्या इंग्लिश् सैन्याची त्यानें लांडगेतोड चालविली. परंतु इतक्यांत आस्ट्रिया पुन्हां डोकें वर करून कांहीं चळवळ करीत आहे, अशी वार्ता आल्यामुळें स्पेन्–पोर्तुगाल्–मोहिमेची पुढील कामगिरी सरदारांवर सोंपवून, नेपोलियन् एकदम फ्रान्स्‌ला परत गेला. ही स्पेन् पोर्तुगाल्–मोहीम सन १८१४ एप्रीलपर्यन्त म्हणजे सहा वर्षें चालली. नेपोलियन्‌ची खुद्द नजर नसल्यामुळें या मोहिमचें काम बरेंच सैलपणानें चाललें असें आढळतें. स्पेन्‌च्या राष्ट्रीय पक्षाची व इंग्लिशांची चिकाटी व धोरण हीं नांवाजण्यासारखीं होतीं. आणि कूर्मगतीनें का होईना, पण त्यांनीं अखेर पूर्ण यश संपादलें. फ्रेन्च् सैन्यांना पोर्तुगॉल् व स्पेन् या देशांतून मागें लोटीत लोटीत, अखेर त्यांना फ्रान्स्‌च्या दक्षिणभागांत चेपून, टुलूस्‌च्या लढाईंत १८१४ च्या एप्रील महिन्यांत इंग्लंड्‌नें त्यांचा पुरा मोड केला.

## ऑस्ट्रिआशीं युद्ध.

इकडे १८०९ सालीं स्पेन्-पोर्तुगॉल्‌मधील युद्ध सरदारांवर सोंपवून नेपोलियन् जो परत आला, तो तसाच एकदम ऑस्ट्रिआच्या समाचारास गेला. त्यानें १८०९ च्या जून महिन्यांत वाग्राम्‌च्या घनघोर संग्रामांत आस्ट्रिआची तिरपीट उडवून, त्यास दांतीं तृण धरून शॉन्‌ब्रन्‌चा तह करण्यास भाग पाडलें ( ऑक्टोबर, १८०९ ).

## नवी राणी.

यानंतर नेपोलियन्नें युरोपांतील राजमंडळांत आपला दर्जा वाढवण्याकरितां एक नवाच डाव टाकला. आपल्या गणगोतांत बऱ्याच राजेराण्या करून, त्यांच्या प्रभावळीनें त्यानें आपल्या बादशाही पदवीला पूर्वीच सुशोभित केलें होतें. परंतु बादशाहीण जोसेफाईन् हिला, लग्न होऊन आज चवदापंधरा वर्षें झालीं, तरी सन्तान झालें नव्हतें. यामुळें नेपोलियन्ला तळमळ लागून राहिली होती. आपल्यामागें सरळ वारस असला आणि युरोपांतील राजमंडळाचा पाठिंबा असला, तर आपलें बादशाही छत्र टिकेल, नेपोलियन्-राजवंश बरींच वर्षें नांदेल, नाहीं तर त्याचा आपल्याबरोबरच लय होईल, अशी त्यास धास्ती वाटूं लागली होती. तेव्हां हे दोन्ही हेतु साधण्यासाठीं त्यानें जोसेफाइन्ला तलाख दिला, आणि ऑस्ट्रिआची तरुण राजकन्या मेरि लुइझे हिला मागणी घातली; व लवकरच हें लग्न घडूनही आलें. एका वर्षाच्या आंतच या नव्या राणीला पुत्ररत्न झालें, आणि आतां आपला नूतन स्थापित राजवंश चिरंजीव होणार, अशा आशेनें जनकाला अत्यन्त आनंद झाला.

## रशिआवरील स्वारी.

रशिआच्या झार् अलेक्झॉन्डर्ला या लग्नानें फारच राग आला. शिवाय नेपोलियन्नें युरोपांतील राष्ट्रांची उलथापालथ चालविली होती, याचीहा झार्ला अतिशय चीड आली. त्यानें १८०७ सालीं नेपोलियन्बरोबर केलेला टिल्सिट्चा तह मोडला, व स्वीडन्ला वश करून घेऊन, नेपोलियन्शीं दोन हात करण्याला तो सज्ज झाला. तेव्हां १८१२ सालीं नेपोलियन्नें आपलें सैन्य पुन्हां रशिआंत घुसविलें. सप्तेंबर महिन्यांत बोरोडिनो येथील तुंबळ लढाईंत त्यानें रशिअन् सैन्याची फार

कत्तल केली. तेव्हां रशिअन् सेनापतींनीं केवळ बचावाचें धोरण स्वीकारून, पळता पाय काढला. नेपोलियन् या विजयानंतर एकदम पुढें घुसला व त्यानें रशिआची राजधानी मास्को आपल्या ताब्यांत घेतली. शहरांतील बहुतेक लोक पळून गेले होते; जे कांहीं थोडे राहिले होते, ते विशिष्ट हेतूनें राहिले होते. नेपोलियन् मास्को येथील भव्य राजवाड्यांत उतरला. त्याचे सरदार व शिपाई यांनीं शहरांत आपली सोय लावण्याची तजवीज केली, पण त्यांना अन्नसामग्री मिळण्याला फारच पंचाईत पडूं लागली. इकडे शहरांत जे कांहीं लोक राहिलेले होते, त्यांनीं शहरांत ठिकठिकाणीं आगी लावून दिल्या. नेपोलियन्च्या लोकांनीं एके ठिकाणची आग विझविण्याचा प्रयत्न चालवावा, तों इतक्यांत दुसरीकडे आग लागल्याची वर्दी यावी. याप्रमाणें त्यांची नुसती तारांबळ व घुसळाघुसळ चालली होती. अखेर, आगीचा डोंबाळ राजवाड्याला येऊन पोंचला. तेव्हां नेपोलियन् बादशहाला वाडा सोडून जाण्यास त्याच्या लोकांनीं विनविलें. परंतु रशिआची विख्यात राजधानी अशा रीतीनें सोडून जाण्याची कल्पना त्यास केवळ असह्य झाली. तो आपल्याच लोकांवर उलट उसळला, आणि “ तुम्हांला आग विझवलीच पाहिजे ! मी इथून पाऊलभरही हालणार नाहीं. ! ” असे त्राग्याचे उद्गार त्यानें काढले. पण होणारापुढें इलाज नाहीं. “ मी मी ” म्हणणाऱ्यांना धुळीस मिळविणारी जी अतर्क्य शक्ति, तिच्यापुढें नेपोलियन्लाही लवावें लागलें. ! अखेर राजवाड्यानें पेट घेतला आणि बादशहाची स्वारी बाहेर पडली. आतां मात्र नेपोलियन्वर कठिण प्रसंग आला. त्याच्या दमल्याभागल्या सैन्याला आश्रयाची जागा मिळेना; अन्नसामग्री, घास-

दाणा, हातीं येईना; शत्रूनें लढाईला तोंड न देण्याचें ठरवल्यामुळें धाड घालण्याला शत्रुही कोणी दिसेना. अशा किंकर्तव्यतामूढ स्थितींत, नेपोलियन्‌चा निधडेपणा पुरा कसोटीस लावण्याकरितांच जणूं काय, त्या वर्षी नेहमींचा हिसाब चुकवून रशिआंतील कडक हिंवाळ महिना—पंधरा-दिवस लवकरच सुरू झाला! अखेर परत स्वदेशाकडे कूच करण्याचें नेपोलियन्‌नें नाइलाज म्हणून ठरविलें, आणि त्याप्रमाणें हुकूमही सुटले. हिंवाळ्याच्या मनस्वी कडाक्यानें, अन्नवैरणीच्या दुष्काळानें, प्रवासाच्या हलाकीनें, आणि शत्रूच्या गनिमी काव्यानें, या प्रवासांत नेपोलियन्‌चें बहुतेक सर्व सैन्य मृत्युमुखीं पडलें. नेपोलियन्‌च्या या अकल्पित दुरवस्थेची वार्ता कानीं येतांच, प्रुशिआला रणस्फूर्ति झाली. एकंदर सर्व प्रुशिअन् लोक एकदम शस्त्रास्त्रांनीं सज्ज होऊन, आधींच हैराण होऊन वैतागलेल्या नेपोलियन्‌वर धाड घालण्यास उतावीळ झाले. नेपोलियन् विलक्षण चिकाटींत सांपडला. त्याच्या जवळ आतां केवळ मूठभर लोक शिल्लक होते. स्पेन्‌मधील युद्ध ऐन रंगांत आलें असल्यामुळें तिकडून मदत येण्याची मुळींच आशा नव्हती. कोठूनही साह्य मिळण्याचा मार्गच उरला नव्हता. तरी पण त्या शूरानें आपल्या तडफेनें व समरचातुर्यानें लिट्झेन् व बॉट्झेन् या दोन लढायांत प्रुशिआला खडे चारले. (१८१३ मे). इतक्यांत प्रुशिआला रशिआची कुमक लाभली, इतकेंच नव्हे, तर तटस्थ राहिलेल्या आस्ट्रिआनेंही आपल्या जांवयाविरुद्ध या संयुक्तांची बाजू धरून, तो त्यांस येऊन मिळाला. यानंतर शेळ्यांमेंढ्यांचा खेळ सुरू झाला. जिकडेतिकडे चकमकी होत, आणि वाघ मधूनमधून शेळ्यांमेंढ्यांना स्वाहा करून टाकी. पण तो आस्तेआस्ते कोंडतच चालला होता. अखेर, सन १८१३ च्या आक्टोबरांत लिप्झिक्

येथें संयुक्तांनीं नेपोलियन्चा पराभव केला. नेपोलियन् पॅरिस्कडे पळून जाऊं लागला; तेव्हां संयुक्तांच्या सैन्यांनीं फ्रान्स्मध्यें घुसून त्याचा पाठलाग केला.

## राज्यसंन्यास.

आतांमात्र नेपोलियन्ला ही स्थिति दुःसह झाली. जोंपर्यन्त फ्रान्स्बाहेर लढाई चालू होती, तोंपर्यन्त त्यास ती गम्मत वाटे. पण फ्रान्स्च्या भूमीवर युद्ध सुरू झालें, म्हणजे फ्रान्स् देशाची व फ्रेन्च् प्रजाजनाची किती दैना उडेल व त्यांची किती हानि होईल, याचें चित्र त्याच्या डोळ्यापुढें स्पष्ट उभें राहिलें. शिवाय, या झगड्यांत आपल्याला यश येईल, अशी त्यास अणुरेणुही आशा आतां वाटत नव्हती. हाताशीं सैन्य नाहीं. स्पेन् मधून पराजयाच्या सारख्या वार्ता येत आहेत, राजपक्षाचे कट जोरांत आले आहेत, संयुक्तांचें सैन्य राजधानीजवळ येऊन उरावर बसलें आहे, अशा बिकट स्थितींत नेपोलियन्चें धैर्य सुटलें, तर नवल काय ? सन १८१४ एप्रीलमध्यें नेपोलियन्नें संयुक्त राष्ट्रांच्या मागणीप्रमाणें राज्यसंन्यास केला, आणि बोर्बा वंशांतील आठरावा लुई हा सिंहासनस्थ झाला. या वेळीं झालेल्या करारप्रमाणें नेपोलियन्ला 'ऐल्बा' बेटाचें स्वतंत्र राज्य मिळालें. त्या बेटाबाहेर त्यानें न येतां, तेथें खुशाल स्वतंत्र बादशाही सत्ता भोगीत रहावें, असें या करारनाम्यांत होतें, आणि नेपोलियन् ताबडतोब आपल्या नव्या राज्यांत गेलाही.

## पुनश्च एल्बा.

एल्बामध्यें आल्याबरोबर नेपोलियन्नें, बाह्यतः तरी, आपलें सर्व लक्ष्य त्या बेटाच्या सुधारणेकडे लाविलें. शिक्षण, उद्योगधंदे, व्यापार,

कलाकौशल्य, नगररचना, दळणवळणाच्या मार्गांची आंखणी, राज्य-घटना, या सर्व दिशांनीं अपूर्व सुधारणा व प्रगति करून, त्या बेटाचें पांचदहा वर्षांत इंद्रभुवन व रामराज्य बनावण्याच्या योजना तो आपल्या कल्पक डोक्यांतून काढूं लागला. पण एका वर्षाच्या आंतच हें सर्व बाजूस राहून, नेपोलियन्‌ची स्वारी फ्रान्स्‌च्या भूमीवर पूर्वींच्या वैभवानें विराजमान झाली आणि पुन्हां युरोपला विजेचा धक्का बसला.

## पुनश्च फ्रान्स्.

नेपोलियन् फ्रान्स्‌च्या राजचिह्नांचा त्याग करून एल्बाला गेला, तेव्हां फ्रान्स्‌मध्यें बोर्बा वंशाचा जीर्णोद्धार झाला. पण नव्या लुई राजानें नेपोलियन्‌चेच सरदार सैन्याचे अधिकारी ठेवले व सैनिकही पूर्वींचेच कायम होते. या सरदारांना व सैनिकांना नेपोलियन् हा जीवश्च कंठश्च वाटत असे. तरी पण या सर्वांनीं राजनिष्ठेची शपथ घेतल्यामुळें त्यांना नव्या सरकारनें आश्रय दिला. पण आस्तेआस्ते यांतील कांहीं सरदार व सैनिक राजद्रोही म्हणून हद्दपार करण्यांत आले. हे हद्दपार झालेले लोक नेपोलियन्‌ला फ्रान्सांत परत आणण्याची खटपट गुप्त रीतीनें करूं लागले. त्यांतील कांहीं प्रत्यक्ष एल्बांतही गेले, व त्यांनीं नेपोलियन्‌च्या अन्तःकरणांत बादशाही थाटाची आशा पुन्हां सळसळूं लागेल, अशी तजवीज केली. फ्रान्स्‌मधील कांहीं लष्करी सरदारांबरोबर व सैन्याब-रोबरही गुप्त संधान बांधण्यांत आलें. अखेर, १८१५ च्या मार्च महिन्यांत नेपोलियन् खरोखरच एल्बाबेट सोडून फ्रान्स्‌च्या दक्षिण किनाऱ्यावर उतरला. फ्रान्स्‌मध्यें एकदम नवें चैतन्य संचारलें ! नेपो-लियन् पॅरिस्‌कडे येऊं लागला, तसतसा त्याचा सर्व ठिकाणीं जयघोष होत चालला, व त्याच्या अनुयायाची संख्या झपाट्यानें वाढूं लागली.

सैन्यांतही फितुरी झाली. कित्येक सरदार आपल्या सैन्यासह नेपोलियन्ला येऊन मिळाले. कित्येक सैन्याच्या फलटणी सरदारांच्या हुकुमास न जुमानतां नेपोलियन्च्या सेवेला लागल्या. कित्येक फलटणी अगदीं राजनिष्ठ म्हणून भरंवशाच्या ठरल्या होत्या, व नेपोलियन्वर धाड घालण्याच्या निश्चयानें त्या पुढें सरसावल्या होत्या, परंतु ऐन प्रसंगीं नेपोलियन्च्या केवळ दर्शनाच्या जादूनें भारून जाऊन सैनिकांना इतकी मोहनी पडली, कीं, ते त्याच्याविरुद्ध लढण्याच्याऐवजीं अचानक त्याच्याच पक्षांत सामील झाले. नेपोलियन्च्या या स्वारीचा जयघोष कानीं पडतांच, लुई राजाचें धैर्य गळालें, व तो एका वेशीनें पॅरिस् शहर गुप्तपणें सोडून गेला, आणि लवकरच दुसऱ्या वेशीनें नेपोलियन् शहरांत प्रविष्ट होऊन पुन्हा बादशहा बनला !

## अखेरची धडपड.

संयुक्त राष्ट्रांबरोबर केलेल्या कराराची एका वर्षाच्या आंतच नेपोलियन्नें अशी पायमल्ली केल्यामुळें त्यांना अर्थात्च विलक्षण चीड आली. त्यांतल्या त्यांत इंग्लंड् व प्रुशिआ यांच्या अंगाचा नुसता भडका झाला, आणि आतां नेपोलियन् आपल्यावर धाड घालणार अशी धडकीही त्यांच्या उरांत बसली. यामुळें त्या राष्ट्रांनीं युद्धाकरितां मोठ्या जारीनें व मनोभावानें तयारी केली. इंग्लंड्नें ड्यूक ऑफ् वेलिंगटन् याच्या नेतृत्वाखालीं भलें मोठें सैन्य बेलजमम्मध्यें पाठविलें, व त्याचा तळ ब्रुसेलस् शहराजवळ पडला. प्रुशिआचें सैन्य सेनापति ब्लुचर्च्या हाताखालीं सज्ज झालें, आणि इंग्लड्च्या व प्रुशिआच्या या दोन सैन्यांनीं एकत्र जुळून फ्रान्स्वर चढाव करावयाचा, असा बेत ठरला. नेपोलियन्ला आपल्याविरुद्ध काय काहूर उठणार आहे, याचा पक्का अंदाज होता, व हीं दोन सैन्यें एकत्र होण्यापूर्वींच प्रत्येकाला

निरनिराळी थप्पड देऊन त्यांना लुलीं करून टाकावयाचीं, असा त्यानें ताबडतोब निश्चय केला, व आपली सर्व फौज घेऊन त्यानें एकदम फ्रान्स्‌च्या पूर्व सरहद्दीच्या बाहेर मुसंडी दिली. पहिल्याच धडाक्याला त्यानें ब्लुचर्‌च्या सैन्याचा लिग्नि येथें मोड करून त्यास उत्तरेस पिटाळून लाविलें ( १६ जून १८१५. ) आदल्याच दिवशीं त्यानें आपला सरदार ने याला लिग्नि व ब्रुसेलस् यांच्या मध्यन्तरीं असलेलें कात्र ब्रा नांवाचें महत्वाचें ठाणें घेण्यास पाठविलें होतें. परंतु नेपोलियन्‌च्या हालचालीची बातमी वेलिंगटन्‌ला लागतांक्षणींच त्यानें लगबगीनें कूच करून सरदार ने येण्याच्या पूर्वींच कांहीं तास नेमका त्याच ठाण्याचा कबजा केला. तेव्हां दुसऱ्या दिवशीं म्हणजे १६ जूनला ने ला त्या ठाण्याकरितां हल्ला करून लढण्याचा आटापेट करावा लागला. परंतु त्याच्या वांट्यास यश आलें नाहीं. इतक्यांत प्रुशिआच्या लिग्नि येथील पराजयाची वार्ता आली, व नेपोलियन्‌नें पळून जाणाऱ्या प्रुशिअन् सैन्याची लांडगेतोड करण्याची कामगिरी सरदार ग्राउशेवर सोंपवून; तो स्वतः कात्र ब्राकडे वळला आहे, असें समजलें. तेव्हां वेलिंगटन्‌नेंही आपली फौज उत्तरेकडे हटवून वॉटर्लू खेडयाजवळ तळ दिला. येथें जून १८ ला नेपोलियन् येऊन थडकला व लागलीच युद्धाला सुरवात झाली. हें समर फारच घनघोर झालें. दोन्ही पक्षांनीं शौर्याची, धैर्याची, व चिकाटीची, शर्थ केली. दोन्ही पक्षांकडे भयंकर प्राणहानि झाली. परंतु कोणीही हार खाईना. अकरा वाजल्यापासून संध्याकाळचे चार वाजेपर्यंत टिपरघाईची लढाई चालून, दोनी पक्ष थकून गेले. अशा संशयित स्थितींत ब्लुचर्‌च्या हाताखालील प्रुशिअन् सैन्य सरदार ग्राउचीला झुंकांडी देऊन, ऐन वेळीं वॉटर्‌लूला दाखल झालें, आणि दमलाभागलेला नेपोलियन् इंग्लिश् व प्रुशिअन् सैन्यांच्या

कैचींत सांपडला. त्याचा दम अगदींच सुटला; मरतांना पाय झाडावे, त्याप्रमाणें त्यानें आपल्या खाशा फौजेला इंग्लिशांवर हल्ला करण्याचा हुकूम सोडला. हुकुमाप्रमाणें ती फौज मोठ्या धिटाईनें व जोमानें एकदम पुढें सरसावली, पण अगदीं ऐन वेळीं तिचें अवसान जाऊन तिनें कच खाल्ली, आणि नेपोलिअन्च्या आशेचे सर्व डोल्हारे एकदम कोसळले ! लागलाच नेपोलियन्नें समरांगणांतून पळता पाय काढला; त्याला एकप्रकारें बुद्धिभ्रंशच जडला.

### अखेर.

फ्रान्स्मध्यें आल्यावर आपला सर्वस्वीं घात झाला आहे हें पाहून, आणि आतां संयुक्त राष्ट्राच्या हातांत सांपडल्यास आपली धडगत नाहीं हें पक्कें ओळखून, नेपोलियन्नें अमेरिकेस जहाजांतून पळून जाण्याचा बेत केला. पण तोही सिद्धीस जाईना, कारण इंग्लिश् आरमार फ्रान्स्च्या किनाऱ्यावर डोळ्यांत तेल घालून टेहळणी करीत होतें. अखेर, ज्या इंग्रजांचा द्वेष करण्यांत त्याचा सर्व जन्म गेला, व ज्यांचा नाश करण्याकरितां त्यानें जंगजंग पछाडले, त्याच इंग्रजांच्या औदार्यवर व गोडेपणावर भोळी भिस्त ठेवून, तो त्यांच्या स्वाधीन झाला. इंग्रजांनीं त्याची लागलीच उचलबांगडी करून, हा पेंड एकादाचा आफ्रिकेच्या पश्चिमेस असणाऱ्या सेंट् हेलिना नांवाच्या खडकाळ बेटावर चक्कडबंद बंदोबस्तांत ठेवला. या ठिकाणीं बन्दीवानाच्या स्थितींत समुद्राच्या लाटा मोजीत सहा वर्षें काढल्यावर, नेपोलियन्चा देहभोग सन १८२१ सालीं मृत्यूनें संपविला. त्याचें प्रेत तेथेंच पुरण्यांत आलें, परंतु सन १८४० मध्यें तें तेथून फ्रान्स्मध्यें नेण्यांत आलें, व मोठ्या इतमामानें व राष्ट्रीय महापुरुषास साजेल अशा बहुमानानें त्याचा पॅरिस्मध्यें दफनविधि करण्यांत आला.

## प्रकरण सहावें.

# चर्चा.

क्रॉम्‌वेल्, शिवाजी, वॉशिंग्टन्, व बोनापार्ट्, या चार लोकोत्तर पुरुषांचीं त्रोटक चरित्रें संकल्पाप्रमाणें मागील चार प्रकरणांत समाविष्ट केलीं आहेत. आतां या चार पुरुषांची परिस्थिति, साधनसामग्री, ध्येय, प्रयत्न, व शील, यांचा तारतम्यानें विचार करून, त्यांच्या चरित्रास पहिल्या प्रकरणांत उल्लेखलेली कसोटी लावावयाची आहे.

### मातृसहवास.

या चारी महापुरुषांसंबंधें एक समान गोष्ट विशेष ठळकपणें नजरेस येते ती ही, कीं, त्यांना पितृसहवासापेक्षां मातृसहवासच जास्त लाभला. क्रॉम्वेल्, वाशिंग्टन्, व बोनापार्ट्, यांच्या पोरवयांतच त्यांचे वडील वारले. शिवाजीचे वडील जरी शिवाजीच्या चाळिशी जवळजवळ हयात होते, तरी त्याला वडिलांच्या सहवासांत राहण्याचा फारसा प्रसंगच आला नाहीं. एवंच या चारी पुरुषांना गृहशिक्षण लाभलें तें त्यांच्या आयांकडून. लहान वयांत मुलांच्या स्वभावपटावर आईबापांच्या आचारविचारांचे जे ठसे उमटतात, तेच त्यांच्या प्रौढपणींच्या स्वभावचित्राची रूपरेषा बनतात. प्रौढवयांत भासणाऱ्या अडीअडचणी, खेंचणाऱ्या ओढी, व गुरफटणारे गुंते, यांनीं मनुष्याच्या स्वभावाची बरीच ताणाताण होते, तरी बहुशः बालवयांतील खोल ठसे अजी पुसले जात नाहींत. क्रॉम्वेल्, शिवाजी, व वॉशिंग्टन्, या तिघांच्या माता मोठ्या संसारदक्ष, प्रेमळ, उदार, करारी, व धर्मभीरु होत्या, आणि त्यांच्या मुलांना

या गुणांचें वळण आपसूक लागलें. हे तिघेही मातृभक्त होते, आणि आपल्या वैभवाच्या शिखरास पोंचल्यावरसुद्धां ते आपल्या आयांच्या सहवासाला व प्रेमाला भुकेलेले असत, आणि प्रत्येक महत्वाच्या कामगिरीला हात घालण्यापूर्वीं ते त्यांची संमति मिळवीत असत. बोनापार्ट् व त्याची आई यांच्यासंबंधेंमात्र असें निश्चयात्मक विधान करतां येत नाहीं. या मायलेकांचें फारसें रहस्य होतें असें दिसत नाहीं. बोनापार्टाची आई मोठी खटपटी, काटकसरी, व मतलबी, बायको होती, आणि हे गुण लेकांत ओतप्रोत उतरले होते. परंतु सदाचार, धर्मबुद्धि, मनाचा मोकळेपणा, या सद्गुणांचें बीजारोपण तिनें आपल्या मुलाच्या मनोभूमिकेंत साक्षेपानें केलें होतें, असें मुळींच आढळत नाहीं. पहिल्या तिघांच्या माता जशा उत्तम शीलवती होत्या, तशाच त्या दैवशालिनीही होत्या. त्यांनीं आपल्या मुलांना राष्ट्रवीराच्या पदवीस चढलेले, दानतीनें व नेकीनें राष्ट्राला प्रिय झालेले, व निर्मळ यशानें भूषवलेले, पाहून, मोठ्या शान्तीनें व समाधानानें आपली लौकिक यात्रा संपविली. बोनापार्टाच्या आईची अखेरीस अत्यन्त केविलवाणी स्थिति झाली. जिनें सम्राटाची माता म्हणून फ्रान्सच्या राजवाड्यांत संपत्तीच्या व सत्तेच्या दिमाखांत दिवस काढले, तिला आपल्या लोकोत्तरगुणी दिग्विजयी मुलाला शत्रूच्या बंदींत व मृत्युपेक्षांही खडतर अशा अपमानाच्या दाढेंत गेलेला पाहण्याचा भयंकर प्रसंग यावा, आणि तिचे अखेरचे वृद्धापकाळाचे दिवस कोठेंतरी परदेशांत, अज्ञातवासांत, शोकांत, किंबहुना दारिद्र्यांतही जावे, याहून दुर्दैवविपाकाचें अधिक दारुणत्व तें कोणतें ?

## लष्करी शिक्षण.

या चार पुरुषांनीं आपल्या आयुष्यांत जी कामगिरी केली, तिला आवश्यक असें लष्करी शिक्षण त्यांना कोठें व कसें मिळालें, याचा विचार केला असतां, क्रॉम्वेल्च्या बाबतींत मोठेंच कौतुक वाटतें. शस्त्रास्त्रांचा उपयोग करण्याचें कसब मेहनतीनें गुरूपासून शिकावयाचें असतें, परंतु सेनापतीचें कौशल्य, धोरण, व चाणाक्षपणा, हे गुण लष्करांत शिरून संग्रामप्रसंगाचा अनुभव घेऊनच ज्याचे त्यानें कमवावयाचे असतात, ही गोष्ट खरी आहे. तरीपण शिपाईगिरीकडे मन वळण्याला, लहानपणापासूनच त्या दिशेनें ओढा उत्पन्न होईल, असें शिक्षण देणारे प्रसंग यावे लागतात. शिवाजीचें चरित्र पुढें कसें रंगलें पाहिजे, याचा आराखडा जिजाबाईनें आगाऊच आपल्या अन्तरंगांत रेखला होता, व अगदीं बालवयापासूनच तिनें तो शिवाजीच्या मनावर ठसवून वज्रलेप केला होता. अर्थात् आरंभापासूनच शिवाजीच्या शिक्षणांत क्षात्रबाणा शिरला होता. जॉर्ज् वाशिंग्टन्ला लहानपणींच सैन्यभरतीची धांदल पाहण्यास सांपडली, आणि आपला भाऊ लष्करी पेशांत सजलेला पाहून, त्याच्या मनांत त्या पेशाविषयीं प्रेम व कौतुक उत्पन्न झालीं. नंतर जमीनपाहणीचें काम करतांना त्याला थोडाफार क्षात्रवृत्तीचा अवलंब करावा लागला. भावाच्या पश्चात् आपल्या टापूंतील लष्करी अंमलदाराचें काम ओघानेंच त्याच्या अंगावर पडलें. पुढें त्याला लढाईचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी आली. अशा प्रकारें जवळजवळ वीसपंचवीस वर्षांच्या अनुभवानें रुळल्यावर वरिष्ठ सेनानायकत्व त्याच्या वांट्यास आलें. बोनापार्टला त्याच्या बापानें लहानपणींच राजरोस रीतीनें लष्करी शाळेंतच घातलें होतें. पण

क्रॉम्वेल्‌ची गोष्ट अगदींच निराळी होती. तो जमीनदार होता, आणि आपल्या स्थावर मिळकतीची देखरेख करणें व अंगीं जमीन कसणें, हा त्याचा पेशा होता. अशा रीतीनें शेतकीच्या कामांत त्यानें आपल्या वयाचीं पहिलीं चाळिसांवर वर्षें घालवल्यावर, देशांत लढाईची हुल्लड उठली व त्याला तींत सामील होण्याचा योग आला. पण अशा स्थितींतही दोनतीन वर्षांचे अवधींत तो अद्वितीय योद्धा व सेनानी ह्मणून प्रसिद्धीस आला, व राजाच्या कसलेल्या शिलेदारांना त्यानें धुळीचे दिवे चारले, ही गोष्ट खरोखरच आचंबा करण्यासारखी आहे.

## जयापजय.

लढाई म्हटली कीं ती सामान्यतः सेनापतीच्या धोरणावर, साहसावर व धडाडीवर, आणि त्याच्या सैन्याच्या पराक्रमावर व शिस्तीवर अवलंबून असते. परंतु वारंवार असें आढळून येतें, कीं, सेनापतीनें कितीही कसोशीनें धोरण सांभाळलें आणि हिशोब बांधले, तरी कांहीं अनपेक्षित घटनेनें सर्व धोरणें चकतात आणि हिशोब चुकतात. एकंदरींत, प्रत्येक भला सेनानायक युद्धांत यश मिळावें म्हणून ईश्वराची करुणा भाकतो, आणि यश पदरीं पडलें म्हणजे ती ईश्वरी कृपाच समजतो. अशी ईश्वरी कृपा क्रॉम्वेल्‌वर पूर्ण होती, असें म्हणणें प्राप्त आहे. त्याला कोणत्याही रणक्षेत्रावर केव्हांही अपेश आलें नाहीं, ही गोष्ट खरोखरीच अद्वितीय होय. शिवाजी व वाशिंग्टन् यांच्यावर आरंभींआरंभीं अपेशाचे प्रसंग बहुत आले. त्यांना वारंवार माघार घेऊन आपला बचाव करावा लागावा. पण अखेरमात्र पूर्ण यश त्यांच्या पदरांत पडलें. बोनापार्टाचा मामला याच्या अगदींच उलट दिशेनें चालला, आरंभींच्या भराऱ्यांत त्याला यशच यश मिळत गेलें. त्याच्या

मनगटाचा जोर आजूबाजूच्या सर्व राष्ट्रांना भोंवला, व जो तो गालचोळींत त्याच्या पुढें गोगलगाय झाला. पण पुढें फांसा उलटला, तो असा कीं बोनापार्टाच्या पायाखालील खडेच पळाले! आणि त्याला अखेरचे दिवस शत्रूच्या बंदींत एका खडकाळ बेटावर काढावे लागले! शिवाजी व वाशिंग्टन् यांच्या बाबतींत

सुखं हि दुःखान्यनुभूय शोभते
घनान्धकारेष्विव दीपदर्शनम् ।

असा प्रकार घडला, तर बोनापार्टाची

सुखात्तु यो याति नरो दरिद्रतां
धृतः शरीरेण मृतः स जीवति ।

अशी अवस्था झाली. सारांश, केवळ लढाईंतील यशाचाच विचार केला, तर क्रॉम्वेल् हा अत्यन्त दैवशाली व बोनापार्ट् हा अत्यन्त कमनशिबी ठरतो.

### सैनिकांशीं वर्तन.

सेनानायक या नात्यानें विचार केला, तर हे चारी पुरुष फार उच्च कोटींतील होते, यांत शंका नाहीं. ते सर्वच अचाट पराक्रमी, विलक्षण बुद्धिवान्, पक्के धोरणी, दीर्घोद्योगी, कर्तव्यनिष्ठ, प्रसंगावधानी, व समयज्ञ होते. आपल्या कर्तृत्वाची सर्व मदार आपल्या सैनिकांवर आहे, हें ते पूर्ण जाणून होते, आणि त्यांच्या सुखाची, सोईची, व कल्याणाची ते शक्य तेवढी काळजी घेत. सैनिकांनीं निरन्तर खूष राहून हिंमतीनें कार्य करावें, म्हणून ते त्यांच्याशीं मोठ्या प्रेमानें, मोकळेपणानें, व औदार्यानें वागत. सैनिकांना कर्तव्यतत्परतेचा धडा आपण स्वतांच्या वर्तनानें घालून दिला पाहिजे, याची त्यांस पूर्ण जाणीव

होती. कोणत्याही अवश्य अशा धाडसी व साहसी कृत्यांत ते कधींही अंगचुकारपणा करीत नसत, आणि कोणत्याही उपस्थित झालेल्या संकटास तोंड देण्यास डगमगत नसत. याचा साहजिक परिणाम असा होई, कीं, त्यांच्या हाताखालील अधिकारी व सैनिक कोणतीही कामगिरी करण्यास हातावर शिर घेऊन तयार असत, आणि अशा प्रकारें कार्य करण्याची आपल्यास संधी लाभणें यांत आपला अत्यन्त बहुमान आहे, असें ते मानीत.

**संग्रामपद्धति.**

या चौघां सेनानायकांपैकीं प्रत्येकानें आपल्या परिस्थितीस साजेल अशीच युद्धपद्धति अंगीकारली व तिला पूर्णतेला नेऊन तिचा ठसा इतिहासपृष्ठावर कायमचा वठविला आहे. सर्वांत क्रॉम्वेल्‌ची धडाडी विशेष होती. त्याचें रणक्षेत्र स्वदेशांतच आणि इतरांशीं तुलना करतां फार आकुंचित होतें. त्याला राष्ट्रांतील बहुसंख्याक प्रबळ पक्षाचा पाठिंबा होता व प्रतिपक्षी स्वदेशीच असल्यामुळें त्याच्या खाणाखुब्या, न्यूनपूर्ण, त्याला इत्थंभूत माहिती होतें. तेव्हां त्याला ही धडाडी फारच उपकारक झाली. प्रतिपक्षाची गांठ पडली कीं, चवताळलेल्या वाघाप्रमाणें त्याच्यावर झेंप टाकून त्याचे लचके ओढावयाचे व तो भेदरून पळूं लागला कीं, त्याची लांडगेतोड करावयाची, हा त्याचा नेहमींचा खाका. बोनापार्टाची भरारी फार आवेशाची होती. बोनापार्ट्‌ आपल्यापासून शेंकडों मैलावर दूर आहे, अशा समाधानाच्या निर्धास्त भ्रमांत शत्रु आहे, तोंच बोनापार्ट्‌ जणूं काय रसातळांतून वर आल्यासारखा त्याच्यापुढें दत्त ह्मणून थाटावयाचा ! मग शत्रूची घाबरगुंडी उडाली, कीं, बोनापार्ट्‌ त्याची नुसती होलपट काढावयाचा ! पण बोनापार्टाचें

रणक्षेत्र परदेशांत व बऱ्याच विस्तृत प्रदेशांत होतें. त्यामुळें भरारीच्या जोडीला हिशोबीपणाही अवश्य होता, आणि हा गुण बोनापार्टानें इतक्या अद्भुत व आश्चर्यकारक रीतीनें प्रकट केला कीं, बोनापार्टानें लढाईच्या प्रश्नांना गणिती हिशोबाचें स्वरूप दिलें, असें बरेच युद्धकलाविशारद म्हणतात. रणक्षेत्राच्या टापूंचे नकाशांचा अत्यन्त सूक्ष्मतेनें अभ्यास करून, आपल्याला अनुकूल अशी युद्धक्रीडेची जागा तो आगाऊ निश्चित करी. नंतर आपल्या अमलदारांस गुप्त रीतीनें खुलासेवार हुकूम देऊन, व सैन्याच्या निरनिराळ्या तुकड्या निरनिराळ्या दिशांना पसरून, त्यांची एकदम एकाच केन्द्राकडे हालचाल सुरू करी. अशा रीतीनें शत्रूला तिन्ही बाजूंस घेरून त्यास चेपीत चेपीत आपल्या निश्चित स्थळीं कैचींत दडपावयाचें, आणि मग खाशा सैन्यानिशीं त्याच्यावर धाड घालून त्याचा फन्ना उडवावयाचा, असा बहुशः बोनापार्टाचा अडाखा असे, आणि कांहीं वर्षेपर्यन्त या युद्धपद्धतींत त्याला विलक्षण यश आलें, आणि त्यानें युरोपांतील ऑस्ट्रिआ, प्रुशिआ, रशिआ, यांसारख्या बड्याबड्या धेंडांचीं नाणावलेलीं अफाट सैन्यें धुळीस मिळवून त्यांस दांतीं तृण धरावयास लाविलें. जोंपर्यन्त बोनापार्टाच्या या नव्या बेगुमान युद्धपद्धतीनें युरोपीय राष्ट्रें चपापून दिङ्मूढ झालीं होतीं, आणि जोंपर्यन्त बोनापार्टाला मनुष्यबळ यथास्थित होतें, व जोंपर्यन्त एके वेळीं एकाच दिशेला लढाई उपस्थित होई, तोंपर्यन्त त्याच्या अचाट भरारीला व हिशोबी रणलीलांना यश आलें. परंतु जेव्हां बोनापार्टाच्या यशाची खुबी ध्यानांत येऊन युरोपीय राष्ट्रसंघानें बचावाची भुरटी युद्धपद्धति स्वीकारली, आणि एकाच वेळीं निरनिराळ्या दिशांना लढाईचा उठाव होऊन जेव्हां फ्रेंच् सैन्याची पांगापांग होऊं लागली, तेव्हां बोना-

पार्टीच्या युद्धगणितांतील उदाहरणांचीं उत्तरें चुकूं लागलीं व त्याच्या भराऱ्या अपुऱ्या पडून वाया जाऊं लागल्या. जॉर्ज् वॉशिंग्टन्‌ची युद्धपद्धति विशेषतः बचावाच्या धोरणाची होती. त्याच्या पाठिंब्याला सबंध राष्ट्र निश्चयानें बद्धपरिकर झालेलें होतें. तरीपण इंग्लंड्‌शीं तुलना करतां या वसाहतींचें मनुष्यबळ व साधनसामग्री हीं फारच नियमित होतीं, तेव्हां गरुडोड्डानाच्या अस्मानी भराऱ्या मारून किंवा अंगमस्तीनें धटिंगणशाही करून ही बांधलेली शिदोरी गोत्यांत पाडणें फारच संकटावह झालें असतें. यामुळें वाशिंग्टन्‌ला चढाईच्या धोरणापेक्षां बचावाचें धोरण अंगीकारणें जास्त इष्ट होतें, हें उघड आहे. हें धोरणसुद्धां इंग्लंड्‌च्या प्रचंड बळापुढें फार दिवस टिकलें नसतें. परंतु एकदोन गोष्टी अमेरिकनांना फार अनुकूल होत्या, आणि त्यामुळें इंग्लड्‌चा लोखंडी भुजदंडही लुला पडल्यासारखा झाला. इंग्लंडनें चिमुकल्या वसाहतींवर हात टाकणें म्हणजे एकाद्या अवाढव्य राक्षसानें कोंवळ्या बटूला चिरडण्यासारखें नामर्दपणाचें कृत्य आहे, असें जग मानीत होतें आणि इंग्लंड्‌लाही स्वतांच्या अन्तःकरणांत तीच भावना जाचत होती. शिवाय, इंग्लिश् व अमेरिकन् हे दोन्ही एकाच हाडामासाचे असल्यामुळें या भांडणांत आपली नामोशी आहे, आणि या युद्धामुळें आपण आपल्याच अंगाचे लचके काढणार आणि इतरांना मात्र मौजेनें आपली टवाळी करून टाळ्या पिटण्यास संधी देणार, हा विचार इंग्लिश् लोकांना सारखा खवखवत होता. तसेंच, इंग्लंड् व अमेरिका यांमधील अन्तर आणि इंग्लड्‌च्या तिजोरीची असमाधानकारक दशा, या गोष्टीही अमेरिकनांच्या पथ्यावरच होत्या. या सर्व कारणांमुळें वाशिंग्टनचें बचावाचें धोरण यशस्वी झालें. शिवाजीची स्थिति वरील तीन्ही सेनानायकांच्या स्थितीहून अगदीं

निराळी व फार अडचणीची आणि संकटाची होती. वरील तिन्ही सेनापतींच्या मागें स्वतंत्र व अभिमानी राष्ट्राचा भक्कम टेंका होता. परंतु या बाबतींत " संन्याशाच्या मुंजीला शेंडीपासून तयारी, " या म्हणीप्रमाणें शिवाजीची अवस्था होती. महाराष्ट्र अविंधसत्तेनें व्यापलेला होता. सामान्य जनता केवळ पोटभरू व राष्ट्रीय भावनेला पारखी झाली होती. नाणावलेलीं क्षत्रिय घराणीं मुसलमान पातशाहांचे सेवक होऊन, त्यांतच आनंद, सुख, व प्रतिष्ठा मानीत होतीं. अविंध आपले स्वामी, व आपण त्यांचे पोष्य, अविंधांचा द्रोह म्हणजे स्वामिद्रोह—पंचमहापातकांतलें एक पातक—अशी भावना जवळजवळ चार शतकें त्यांच्या अन्तःकरणांत मुरून अगदीं हाडींमासीं खिळली होती. तेव्हां ही राष्ट्रीय गुलामगिरीची भावना नाहींशी करून, राष्ट्राच्या अन्तरंगांत राष्ट्रीय चैतन्याची स्फूर्ति उसळवून, नवें राष्ट्र बनवावयाचें, एवढें अचाट कार्य शिवाजीपुढें होतें. हें बौद्धिक कार्य घडल्याशिवाय खरी राष्ट्रीय वीरकृति त्याच्या हातून घडणेंच शक्य नव्हतें. शिवाजीला अनेक शत्रूंशीं टक्कर मारावयाची होती; एक, आपलेच विरोधक—अविंधपदारविंदीं मिलिंदायमान होणारे—घरबुडवे देशबंधु, व दुसरे दोन बलाढ्य पातशाहा, विजापुरेश आणि दिल्लीपति. त्याचें कार्यक्षेत्रही तुलनेनें फार विस्तृत होतें, उत्तरेस रेवेपासून तों दक्षिणेस कावेरीपर्यन्त, आणि पश्चिमेस दर्याकांठापासून तों पूर्वेस वऱ्हाडच्या सीमान्तापर्यन्त. त्याच्या चळवळीचें केंद्र पश्चिम मावळांत म्हणजे अत्यन्त पहाडी प्रदेशांत. अशा स्थितीमुळें जसा एकाद्या महानदाचा उगम उंच पर्वतावर लहान लहान ओढ्यांनीं व्हावा, पण पुढें तो नद क्रमाक्रमानें वाढत अखेर अवाढव्य जलसंचय घेऊन कड्यावरून उड्या घेत घेत खळाळत तळांत उतरावा, आणि

आडवें येईल त्याला बाजूला रेंटून अगर बुडवून आजूबाजूच्या थडी प्रान्तांतील जीवकोटीला जीवन देत देत वहावा, त्याचप्रमाणें शिवाजीच्या कामगिरीचें स्वरूप दिसून येतें. त्याची आरंभींची कामगिरी तर कित्येक इतिहासकारांना केवळ गुंडपणाची व बंडखोरीची वाटते. परंतु जसजसें त्याचें कार्य रंगारूपास चढत चाललें, तसतसें त्यानें जें युद्धविशारदत्व प्रकट केलें, त्याची वाखाणणी करण्यास कोणीही इतिहासकार खास कचरणार नाहीं. कल्याण प्रान्तांतील मुलुखगिरी, कोंकणांतील दिग्विजय, सुरतेवरील छापे, व कर्नाटकांतील मोहीम, यांत शिवाजीच्या ठायीं क्रॉम्वेल्‌ची धडाडी व बोनापार्टाची भरारी यानां दोन्हीही आढळून येतात. परंतु नुसती धडाडी व भरारी यांनीं शिवाजीचें काम भागण्यासारखें नव्हतें. विलक्षण परिस्थितीमुळें सर्वच युद्धपद्धतींचा प्रसंगानुसार प्रयोग करणें शिवाजीस अवश्य होतें, आणि या कामीं तो फारच सावधगिरीनें व धोरणानें वागला. त्याची बाजू दुर्बळ असल्यामुळें बहुशः त्याला बचावाचें धोरण ठेवणें व गनिमी कावा लढवणें अवश्य होतें, आणि ही युद्धपद्धति त्यानें इतक्या उत्तम रीतीनें प्रयोगांत आणली, कीं, वाशिंग्टन्‌चें चातुर्यही तिच्यापुढें फिकें पडेल. शिवाय, शिवाजीवर असे अनेक आणीबाणीचे भयंकर प्रसंग गुदरले, कीं, तशा प्रसंगांचा अनुभव बाकीच्या तिघांस कधींही आलेला आढळत नाहीं. हे प्रसंगच असे होते, कीं, तेथें नुसतें रणकौशल्य असून मुळींच भागणारें नव्हतें. अफ्झल्खानाची कारवाई, दिल्ली-आग्र्याची सफर, शहाजीचा कोंडमारा, इत्यादि प्रसंग अशा कोटींतले होत. अशा वेळीं शिवाजीनें योजलेल्या युक्त्या लक्ष्यांत घेतल्या म्हणजे त्याच्या बुद्धीचा व धोरणाचा अष्टपैलूपणा मनाला पटतो, व त्याच्या रणचातुरीच्या दर्शनाचा पार्श्वभाग फारच अद्भुत व मोहक वाटतो.

क्रॉम्वेल् याच्या युद्धांत कडवेपणा बराच भासमान होतो. मार्स्टन्मूर् वुर्सेस्टर्, डन्बार्, वगैरे लढायांत आपण सढळ हातानें रक्तपात केला, ही गोष्ट तो आपल्या पत्रांत बऱ्याचशा प्रौढीनें व अत्यन्त समाधानानें नमूद करतो. आयर्लंड् वरील मोहिमेंत तर क्रॉम्वेल्नें रक्तपाताचा कहरच उडवला. हा रक्ताचा सडा क्रॉम्वेल्च्या कीर्तीवर बडा डाग आहे, असे त्याच्या पक्षाचे इतिहासकारही निर्णय देतात. बोनापार्टचाही हाच खाका. शत्रूवर अकस्मात् धाड घालावयाची, आणि त्याच्यावर दहशत बसविण्यासाठीं शक्य तेवढे प्राणांचे बळी घ्यावयाचे, हा त्याचा नित्य क्रम. लढाई म्हटली कीं तींत प्राणहानि अपरिहार्य आहे. परंतु शत्रु पराभव पावून चौफेर पळ काढीत असतां, त्याची ससेहोलपट करून निष्कारण प्राणहानि करणें, ही गोष्ट मानवी सारासारबुद्धीला आसुरी अत्याचारासारखी वाटली, तर त्यांत आश्चर्य तें कसलें? या बाबतींत वॉशिंग्टन् व शिवाजी यांचें वर्तन फार प्रशंसनीय होतें. शत्रूची निष्कारण कत्तल होऊं नये म्हणून ते अतिशय जपत. समरांगणावर शरण आलेल्याशीं दिलदारपणानेंच वागलें पाहिजे, असा त्यांचा बाणा होता.

### शिस्त व शिकवण

हे चारी सेनापति आपल्या सैनिकांशीं प्रेमानें व औदार्यानें वागून त्यांच्या कल्याणाची काळजी वहात, म्हणून वर सांगितलेंच आहे. तथापि त्यांची शिस्त मात्र कडक व जबर असे. कोणी गैरवर्तन केल्यास, हुकूम अमान्य केल्यास, अगर कामांत टंगळमंगळ किंवा कुचराई केल्यास, ते अपराध्यास कडक शासन लावीत. क्रॉम्वेल्, वॉशिंग्टन्, व शिवाजी, हे खरे धर्मनिष्ठ, पापभीरु, व भाविक होते.

ईश्वराची प्रेरणा आपल्यास झाली आहे, राष्ट्राकरितां हाडांचीं काडें करण्यास ईश्वराची आपणास आज्ञा झाली आहे, आणि या कार्यांत त्याच्याच कृपेनें आपल्यास यश लाभणार आहे, अशी त्यांची पूर्ण श्रद्धा होती. म्हणून ते जेवढे पराक्रमी व साहसी होते, तेवढेच सदाचारी व विनयी होते. आपल्या अनुचरांनीं परमेश्वराचें स्मरण निरन्तर ठेवावें व त्याची करुणा भाकावी, असा त्यांचा मोठा कटाक्ष होता. आपण जें कार्य हातीं घेतलें आहे, तें सत्कार्य आहे, आपला पक्ष सत्यपक्ष आहे, तेव्हां आपला योगक्षेम परमेश्वर वाहणारच यांत संशय नाहीं, असें ते आपल्या सैनिकांच्या अन्तःकरणावर वाचेनें व कृतीनें ठसवीत असत. आपलें कर्तव्य तनमनधनानें करणें हीच खरी ईश्वरसेवा अशी त्यांची आपल्या लोकांस शिकवण असे. या प्रकरणीं बोनापार्टाची मनोभूमिका कांहीं निराळीच होती. ईश्वरावर त्याचा भरंवसा होता, असें निश्चयानें ह्मणतां येणार नाहीं. त्याच्या पेढीवर धर्माला मुळींच किंमत नव्हती. त्याचा सर्व भार आपल्या अक्कलेवर व हिंमतीवर असे. प्रार्थनेची त्याला मातब्बरी वाटत नसे, आणि ईश्वराचें स्मरण त्याला कधींही होत नसे. ‘ यथा राजा, तथा प्रजा, ’ या न्यायानें त्याच्या सैनिकांना धर्माचें बंधन नव्हतें कीं ईश्वराचें भय नव्हतें. आपण ज्या एवढ्या घनघोर लढाया खेळत आहों, त्या कोणत्या सत्कार्याकरितां, याची चांगलीशी जाणीव बोनापार्टाच्या सरदारांस किंवा सैनिकांस होती असें आढळून येत नाहीं. बोनापार्टाचा आवेश, तडफ, हुशारी, व पराक्रम, यांची त्याच्या लोकांवर इतकी विलक्षण छाप बसली होती, कीं तोच त्यांचा अधिदेव बनला होता, आणि ‘ बोनापार्ट सांगतो, म्हणून आम्ही लढतों,’ याच्याहून कोणतेंही भारदस्त तत्व त्यांच्या ठिकाणीं मुरलेलें होतें, असें वाटत नाहीं.

## ध्येय.

आतां या चार पुरुषांच्या कामगिरीचें ध्येय काय काय होतें, व तें त्यांनीं कितपत निश्चळपणें पाळलें, याचा आढावा काढून, हें प्रकरण आटोपतें घेऊं.

**क्रॉम्वेलनें** राजा आणि प्रजा यांच्या लढ्यांत प्रजेच्या बाजूनें शस्त्र उचललें, आणि राजपक्षाला नामोहरम् करून प्रजापक्षास जय संपादून दिला. पण पुढें काय झालें ? ज्या जनतेच्या हक्काकरितां त्यानें हा आटापेट केला, त्या जनतेच्या प्रतिनिधिसभेंत त्याच्या धोरणाला बहुमत लाभेना, आणि पूर्वींच्या चढेल राजांनीं जें केलें, तेंच आतां जनतेच्या हक्कास जपणाऱ्या क्रॉम्वेल्नें 'राष्ट्रसंरक्षक' या नात्यानें केलें. प्रतिनिधिसभा त्यानें उधळली, व राज्यशासन आपल्या मर्जी-प्रमाणें व लष्करी बळाच्या दराऱ्यानें चालविलें. यांत अहंता, सत्तेची हांव, व आत्मगौरव, यांचाही संचार अखेरअखेर बराच झाला. क्रॉम्वे-ल्नें 'राजा' या पदाची उपाधि आपल्या नांवामागें लावून घेतली नाहीं, हें खरें; पण शेवटीं त्यानें वस्तुतः सुलतानी सत्ता बळकावली व उपभोगली; इतकेंच नव्हे, तर ती सत्ता आपल्याच कुळांत वंशपरं-परेनें चालावी अशी मतलबी वासनाही त्याच्या मनांत उद्भवली, कारण, असें नसतें, तर आपल्या पश्चात् आपल्या मुलास 'राष्ट्रसंरक्ष-काचें' पद देण्यांत यावें, अशी इच्छा त्यानें प्रदर्शित केली नसती. लोकांना धर्मस्वातंत्र्य असावें, हा त्यांचा जन्मसिद्ध हक्क आहे, असें मान-णाऱ्या पक्षाचा पुढाकार क्रॉम्वेल्नें केला. परंतु सत्ता हातीं आल्यावर त्यानें या बाबतींतही संकुचित वृत्ति दाखविली. त्याला स्वातंत्र्य पाहिजे होतें, तें आपल्या धर्मपंथीयांकरितांच, इतर पंथांविषयीं त्याच्या

मनांत पक्की आधीच होती. रोमन् कॅथोलिकांवर तर त्याचा उघड उघड दांत होता. प्रतिमापूजनाला उत्तेजक होतात म्हणून देवालयांतील मूर्ति त्यानें फोडवल्या व भिंतीवरील चित्रें खरवडून सारवून टाकवलीं. अशाच सबबीवर लोकांच्या वार्षिक महोत्सवांतील खेळ, गाणें, नाचणें, हेंही त्यानें सक्तीनें बंद केलें. एकंदरींत क्रॉम्वेल् आपल्या मूळ ध्येयापासून बराच चळला, आणि आपल्या कारकीर्दीच्या अखेरीस तो लोकांना अप्रिय झाला.दोन पिढ्यांपूर्वी जसा लोकांना राजाचा तिरस्कार वाटूं लागला होता, तसाच आतां या 'राष्ट्रसंरक्षकाचा' वाटूं लागला. याचा परिणाम असा झाला कीं क्रॉम्वेल्च्या मागें एक वर्षभरसुद्धां त्याचें कार्य टिकलें नाहीं. राजेशाही पुन्हां सुरू झाली, व ती पूर्वीपेक्षांही अनर्थकारक ठरली.

**जॉर्ज् वॉशिंग्टन्चें** चरित्र खरोखरच निर्मळ आहे. "इंग्लंड्नें वसाहतींना समान हक्कानें वागवावें, त्यांना बरोबरीचा मान द्यावा, त्यांच्या आत्मोन्नतीच्या कार्यांत ढवळाढवळ करूं नये, आणि त्यांच्या स्वातंत्र्यावर घाला घालूं नये," असें प्रतिपादणाऱ्या पक्षाचा पुरस्कार त्यानें केला, व या कार्याला आपलें तनमनधन समर्पण केलें. आपल्या देशाच्या स्वातंत्र्याकरितां आपण लढत आहों, ही गोष्ट त्यानें कधींही नजरेआड केली नाहीं. ज्या लोकशाहीसाठीं आपण झटलों, तिला मारक किंवा कमीपणा आणणारें असें कृत्य आपल्या हातून घडूं नये, असा त्याचा नेहमीं प्रयत्न असे. लोकशाहीचें अध्यक्षपद लोकांनीं वॉशिंग्टन्ला दोनदां दिलें, आणि तिसऱ्या खेपेस हें पद त्यास तहहयात देण्याचें त्यांनीं योजिलें. वास्तविक रीतीनें आपोआप घरीं चालून आलेलें हें निधान दवडणारा मनुष्य क्वचितच मिळेल. पण वॉशिंग्टन्नें तेंही केलें. लोकांच्या या योजनेनें त्याला सुख न होतां, विषादच वाटला.

" तहाहयात अध्यक्ष होणें, म्हणजे लोकशाहीला खो देऊन सुलतान होण्यासारखेंच आहे. लोकांनीं असें अध्यक्षपद कोणाला देणें म्हणजे आपण होऊन आपला अधिकार गमावण्यासारखें आहे. तसेंच, आपण हें तहाहयात अध्यक्षपद स्वीकारणें म्हणजे ध्येयापासून चळण्यासारखेंच आहे. मी त्या पदाचा दुरुपयोग करणार नाहीं, असें निश्चित गृहीत धरलें, तरी हें उदाहरण भावी पिढ्यांना वाईट आहे. इतकी सत्ता तहाहयात लाभल्यावर मनुष्य अरेराव व लोभी होण्याचा फार संभव आहे. तेव्हां लोकांची ही योजना आपलें ध्येय सांभाळण्यासाठीं हाणून पाडणेंच अवश्य आहे." असा विचार करून वॉशिंग्टन् तिसऱ्या खेपेला मुळीं उमेदवार म्हणून उभाच राहिला नाहीं. जॉर्ज् वॉशिंग्टन्ची कामगिरी त्याच्यामागें चिरस्थायी झाली व त्याचें राष्ट्र आज गेल्या दीडशें वर्षें उत्तरोत्तर अधिकाधिक वैभवाला चढत आलें आहे.

**शिवाजीचें** ध्येय अगदींच निराळ्या स्वरूपाचें होतें. राजाची सत्ता व प्रजेचे अधिकार, याबद्दलचा वाद त्याच्यापुढें नव्हता. एका राष्ट्रानें आपल्या राष्ट्राची स्वायत्तता किंवा स्वतंत्रता मान्य करावी हाही प्रश्न त्याच्यापुढें नव्हता. त्याचें ध्येय असें होतें, कीं, परकीयांच्या आडदांड सत्तेनें दबून, दडपून, चिरडून, गेलेल्या मराठ्यांना—हिंदूंना संजीवनी पाजून त्यांचें राष्ट्र बनवावयाचें, आणि त्यांना स्वतंत्र स्वराज्य देऊन देशकार्य व धर्मकार्य साधावयाचें. अनिर्बन्ध लोकशाही किंवा अनियन्त्रित राजेशाही, या दोन्हीही भारतीय आर्यांना सारख्याच निषिद्ध वाटत. अराजकाचें जसें ते भय मानीत, तसेंच राजा दुष्ट निघून स्वधर्मानें वागत नाहींसा झाला तर राजान्तर घडवून आणण्याचा अधिकार प्रजेस आहे, असेंही ते समजत. राजानें गुरुजन, महाजन,

नागरिक, पंच, इत्यादि मण्डळें व निवडक अधिकारी यांच्या अनुमतानें प्रजेच्या कल्याणाकरितां राज्य करावें, आणि प्रजेनें राजनिष्ठ व कर्तव्य-दक्ष असावें, असा भारतीय आर्यांचा कटाक्ष आहे, आणि हेंच ध्येय शिवाजीपुढें होतें. शिवाजीच्या राज्याभिषेकाचा हेतु मागें दर्शविलाच आहे. आपलें राज्य देवा-धर्माचें आहे असें तो नेहमीं म्हणे आणि त्यास अनुसरूनच त्याचें आचरण असे. शिवाजीला आपल्या कार्यांत चांगलेंच यश आलें व त्याच्यामागें तें सुमारें दीडशें वर्षेंपर्यन्त टिकलें. शिवाजीचें कार्य किती पक्कें होतें, याची परीक्षा त्याच्या मृत्यूनंतर तावडतोब झाली. कडव्या औरंगझेब बादशाहाची खाशी स्वारी दख्खण सर करण्याकरितां आपल्या बादशाही वैभवासह व बळासह महाराष्ट्रांत उतरली. त्यानें जिकडेतिकडे धुमाकूळ उडवून दिला. मराठ्यांचा राजाही त्याच्या हातीं सांपडला व त्यानें त्याचा अत्यन्त क्रूरपणानें वध केला. पण शिवा-जीच्या तालमींत वाढलेल्या राष्ट्रीय वीरांनीं अशा बिकट परिस्थितींतही आपलें स्वत्व गमावलें नाहीं आणि शिवाजीचें कार्य कायम टिकवलें. अखेर औरंगझेबास या महाराष्ट्रापुढें हात टेंकावे लागले, व त्याचा अंत अत्यन्त निराशामय स्थितींत झाला.

**बोनापार्टाच्या** पुढें कांहीं मोठें उदात्त व उच्च ध्येय होतें, असें त्याच्या चरित्रावरून दिसत नाहीं. फ्रान्स्मध्यें राज्यक्रान्ति झाली, ती

“ हेतु लोकहिता तीन साम्य, स्वातन्त्र्य, बन्धुता, ”

या तत्त्वावर उभारली होती. यांत खरोखर वाईट कांहीं नव्हतें. परंतु फ्रान्स्नें आपल्या अत्याचारांनीं या लोकशाहीचा नुसता खेळखंडोबा केला. शासनयन्त्राच्या एकसारख्या उलथापालथी होऊन देशांत जिकडे-

तिकडे सांवळा गोंधळ पिकला, आणि अशा भ्रमिष्ठ स्थितींतही अशाच क्रान्त्या इतर देशांत जुलूमजबरदस्तीनें घडवून आणण्याचें कंकण फ्रान्सनें आपल्या मनगटांत बांधलें. या धांदलींत लोकांचा पुरस्कर्ता व स्वातंत्र्याचा पक्षपाती म्हणून नेपोलियन् पुढें आला. इटलीवर स्वारी करून, विलक्षण यश संपादून, व तेथें लोकशाही स्थापून, तो फ्रान्सचा कंठमणि झाला. यानन्तर जगज्जेता म्हणून सवाई शिकंदर मिरवण्याच्या महत्वाकांक्षेनें व साधल्यास निराळें स्वतंत्र राज्य स्थापण्याच्या उद्देशानें त्यानें इजिप्तची मोहीम काढली. पण या मोहिमेंत इंग्रजांच्या आरमारी पंजानें चांगलीच थप्पड मारल्यामुळें, नेपोलियन् आपली मोहीम वाऱ्यावर सोडून गाल चोळीत फ्रान्सला परत आला. मग तेथील बेबंदशाहीच्या कुलंगड्यांत या पाताळयंत्री पुरुषाला पुन्हां लोकशाहीचा त्राता ह्मणून मिरवण्यास संधी सांपडली. युरोपभर लाखों लोकांच्या रक्ताचा सडा करीत त्यानें लढाईचा हुतुतू घातला आणि आपल्या दिग्विजयानें फ्रान्सचे डोळे दिपवले, पण जगाचे शिव्याशाप घेतले. जसजसें फ्रान्समध्यें नेपोलियन्चें वजन वाढून बस्तान नीट बसत चाललें, तसतसे त्याचे आपमतलबी व महत्वाकांक्षी विचार प्रकट होऊं लागले आणि लोकशाहीचें ध्येय नजरेआड होऊं लागलें. अखेर नेपोलियन् लोकशाहीचा तहहयात सर्वाधिकारी झाला, आणि थोड्याच वर्षांनी फ्रान्सच्या साम्राज्याचा शास्त्रोक्तविधीनें मूर्धाभिषिक्त सम्राट् ह्मणून पट्टारूढ झाला ! मग पूर्वी ज्या देशांत त्यानें लोकशाह्या स्थापन केल्या होत्या, त्याच देशांच्या डोक्यावर राजेराण्या लादण्यास त्यानें सुरवात केली, आणि आपल्या प्रभावळींतील स्त्रीपुरुषांमध्यें राजेराण्यांचीं जोडपीं निर्माण करण्याचा पत्त्यांचा डाव त्यानें आरंभला ! पुढें आपल्या पुष्टितुष्टीसाठीं या

संग्रामसिंहानें पोर्तुगॉल् व स्पेन् या चिमुकल्या देशांच्या स्वातंत्र्यावर पंजा टाकून त्यांस 'खरनखरविद्रावित' करून सोडलें. पण लवकरच नेपोलियन्‌ची सद्दीची भरती पूर्ण होऊन, तिचा ओहोट वळला; आणि जेव्हां अगदीं निखारीची वेळ आली, तेव्हां

" सर्वनाशे समुत्पन्ने ह्यर्धं त्यजति पण्डितः "

या न्यायाचा भलताच अतिरेक करून

" आत्मानं सततं रक्षेत्पुत्रदारधनैरपि "

या म्हणीप्रमाणें हा वीरमणि सम्राट्पदाचा संन्यास करून एल्बाच्या तुकड्यानें संतुष्ट राहिला. पण लटपट करण्याला संधी मिळतांच, सम्राट् नेपोलियन् पुन्हां फ्रान्सांत प्रकट झाले व पुन्हां युद्धाची धुमश्चक्री उसळली ! तिचा परिणाम काय झाला; हें मागें चरित्रांत नमूद झालेंच आहे. एकंदरींत नेपोलियन्‌चें अमुक एक ध्येय कायम होतें, असें म्हणतां येत नाहीं. फार तर इतकेंच म्हणतां येईल, कीं, महापराक्रमी जगज्जेता म्हणून आपला लौकिक व्हावा, आणि आपण साम्राज्यसत्तेचा दिमाख मिरवावा; हें त्याचें ध्येय होतें; परंतु त्यांतही त्यास स्पृहणीय यश लाभलें नाहीं.

असो; वरील विवेचनावरून या चार महापराक्रमी व बुद्धिमन्त पुरुषांत दैवी संपत्तीचे धनी कोण होते; आणि आसुरी संपत्तीनें ग्रासलेले कोण होते, हें वाचकांस निराळें सांगितलें पाहिजे असें नाहीं.

एका आधुनिक कवींनीं[1] शिवाजी व नेपोलियन् यांच्यासंबंधें जे यथार्थ व मार्मिक उद्गार काढले आहेत, त्यांचा उतारा देऊन आम्ही या प्रकरणाचा उपसंहार करतों:—

---

१ रा. रा. सीताराम बाळकृष्ण जोशी, मुरूड—जंजिरा.

## नेपोलियन व शिवाजी.

जेव्हां मी अवलोकितों सकलही राष्ट्रेतिहासाप्रती,
योद्धे दोन पराक्रमी मम तदा येतात डोळ्यांपुढें,
ज्यांच्या शौर्यबळें यशोगिरि, जरी दुर्लंघ्य, थोडा पडे,
तद्देशांस भयामुळें वचकती राष्ट्रें दुजीं शूर तीं.
स्वातंत्र्या मिळवी प्रजा भडकुनी दुर्नीतिनें गांजली,
त्या होमांत नृपाहुती पडुनियां माजे झणीं यादवी;
होतें वैभव लोपलें कधिंच तें येथूनियां हिंदवी,
मृत्यूची सहचारिणी विकळता राष्ट्रान्तरीं दाटली.
अन्धारांतुन हा घुसे, यश सवें बाहेर ये घेउनी,
घाली बन्ध समृद्धिकारण, करी राष्ट्रास अत्युन्नत;
चैतन्यास अणू–अणूंत उसळी देशान्तरीं सन्तत,
जागें राष्ट्र करी, अखण्ड झगडे राष्ट्राचिया कारणीं.
दोघेही नरवीर; एक पडला स्वार्थामुळें खालती,
निःस्वार्थी श्रमला, म्हणून चढला हा धन्य कीर्तिप्रती !

समाप्त.

# भारतीयवीरकथा.

लेखक—

श्री. चिंतामण विनायक वैद्य, एम्. ए. एल्एल्. बी.

" श्रीमहाभारत " या लोकमान्य ग्रंथाचें महत्त्व अलोट आहे. संसारी जनांना आपल्या कर्तव्याची जाणीव करून देणारा हा श्रेष्ठ ग्रंथ आहे. या ग्रंथाचा **श्री. चिंतामणराव वैद्य** याचा व्यासंग किती दांडगा आहे हें सर्व महाराष्ट्राला माहीत आहेच. अशा या **महाभारत** ग्रंथांतील, पराक्रमी वीर योद्धयांच्या, व पतिव्रता स्त्रियांच्या रसभरित वीरकथा, आबाल-वृद्ध स्त्रीपुरुषांस व मुलांस बोधपर व मनोरंजक होतील अशा मार्मिकतेनें श्री. वैद्य यांनीं लिहिल्यामुळें, पुस्तक अत्यंत संग्राह्य झालें आहे. सुंदर कापडी सोनेरी बाइंडिंग; पृष्ठें ४२९ असून किंमत फक्त २ रुपये. व्ही. पी. खर्च ६ आणे.

( मोठ्या गांवीं सर्व बुकसेलर्सकडे विकत मिळेल. )

केशव भिकाजी ढवळे, गिरगांव—मुंबई.

# समर्थांचें सामर्थ्य

## किंवा

# श्रीरामदासस्वामींचा लीलानुग्रह.

लेखक—" **महाराष्ट्रभाषाचित्रमयूर** "

## कृष्णाजी नारायण आठल्ये.

भक्ति, मुक्ति, युक्ति आणि विरक्ति हा चतुर्बीज मंत्रात्मकग्रंथ मुद्दाम श्री. आठल्ये यांजकडून लिहविला आहे इतकें सांगितलें म्हणजे त्यांतील भाषा व विचार कसे आहेत तें निराळें सांगण्याची गरजच नाहीं. कारण आठल्ये यांची लोकसेवा सर्वविश्रुतच आहे. या ग्रंथाचे 'पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग केले आहेत. पूर्वार्धांत समर्थांच्या अद्भुत लीलेंतील शक्याशक्यतेबद्दल अद्भुत पुरावे, नंतर त्यांच्या सर्व लीला व चरित्र दिलें आहे व उत्तरार्धांत **समर्थांस गोसावी व दासबोधास** 'चिटोरें' ह्मणणारे वगैरे आक्षेपकारांचा विचार करून नंतर '**दासबोध**' **जुना दासबोध** '**आत्माराम**', 'मनाचे श्लोक' वगैरे त्यांच्या प्रत्येक ग्रंथांतील सारभूत विचार, स्थळें, कूटें, वगैरे निवडक वेंचे ग्रथित केले आहेत. ह्यामुळें **समर्थांचें चरित्र** लीला, व ग्रंथावलोकन हें सर्व एकत्रच पहावयास मिळतें. आणखी सर्वांत विशेष हें कीं, ह्या चरित्राचा हल्लींच्या '**स्वराज्य**' जागृतीच्या कामीं कसा उपयोग करून घेतां येण्याजोगा आहे आणि त्यांत विशेषें करून पुढारी होऊन आपण समर्थ कसें बनावें ही तर शेवटची गुरुकिल्ली आहे.

ह्यामुळें हा ग्रंथ सर्वांगसुंदर झाला आहे. प्रापंचिकांला व पारमार्थीकांला, जुन्यांना व नव्यांना, बायकांना व मुलांना, सर्वांना सारखाच जसा मनोरंजक तसाच बोधपर झाला आहे. कागद ग्लेज पृष्ठें ७५० बाईंडिंग सोनेरी असून एवढ्या मोठ्या व सुंदर ग्रंथाची किंमत किती ? तरः–अवघी २॥ रुपये. व्ही. पी. खर्च ०८ आणे.

**केशव भिकाजी ढवळे,** गिरगांव–मुंबई.

# श्रीमहाभारत सुभाषितानि.

संग्राहकः—विष्णु विनायक परांजपे, पेण.

महाभारतांतील **नवनीतच** अशीं सर्व लोकांना उपयुक्त, सुबोध, मार्मिक, ओजस्वी, स्फूर्तिदायक १०३२ निवडक संस्कृत सुभाषितवचनें **विद्यार्थ्यांनीं** तोंडपाठ केल्यास त्यांचें संस्कृत भाषेचें ज्ञान वाढून त्यांना चांगले स्फूर्तिदायक विचार समजतील, आणि पुढील आयुष्यक्रमांत अनेक प्रसंगीं योग्य रीतीनें वागण्यास ते समर्थ होतील. तसेंच श्रोत्यांच्या मनावर महाभारतांतील वचनांचा ठसा अधिक उमटतो यासाठीं प्रतिपादनाचे वेळीं **हरिदास-पुराणिक,** यांना व **वक्ते, लेखक** यांनाही हीं वचनें उपयोगी पडतील. शिवाय संस्कृत भाषेची अभिरुचि असणाऱ्या सर्व वाचकांस या वचनांचा उपयोग होईल अशी आशा आहे.

**किंमत कागदी ०८ आणे—कापडी ०१२ आणे.**

केशव भिकाजी ढवळे, गिरगांव—मुंबई.